म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं.

स्वातंत्र्यशाहीर

# कवि गोविंद.

यांची कविता

REFBK-0004493

कै० गोविंद त्र्यंबक दरेकर.

उर्फ

नासिक येथील

# स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद

# यांची कविता

[ चरित्र, आठवणी, काव्यविवेचन, काव्यपुरस्कार,
गोविंद काव्य प्रशस्ति यांसह. ]

गोविंदकाव्य प्रकाशन-मंडळ

नासिक.

—:o:—

माघ वद्य १४ शके १८५२.

[ किंमत एक रुपाया. ]

REFBK-0004493

मुद्रक,
श्री . पं. **विष्णु दिगंबर पलुस्कर.**
संगीत प्रिं. प्रेस,–पंचवटी नासिक.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

प्रकाशक,
**कृ. व महाबळ, अस्थिवैद्य**
हुंडीवाल्यांची गल्ली, नासिक.

# प्रारंभींचे चार शब्द.

परमेश्वरकृपेनें आज गोविंद कवीच्या चौथ्या निधन दिनीं 'स्वातंत्र्य शाहीर गोविंदकवीची कविता' मुद्रित होऊन बाहेर पडलेली पाहून आम्हांस समाधान होत आहे. गोविंद कवींच्या मृत्यूनंतर लवकरच त्यांची कविता छापून प्रसिद्ध करण्यासाठीं 'गोविंद काव्य प्रकाशन मंडळ' स्थापन करण्यांत आलें. त्यांत डॉ० ना॰ दा. सावरकर, डॉ. वि. म भट, वै. भू. वामनशास्त्री दातार, श्री. कृ. व. महाबळ, श्री. र. वर्तक हे गृहस्थ होते. त्यांच्याकडूनच आज हें काव्य प्रकाशित करण्याचा योग आलेला आहे.

प्रस्तुत पुस्तकांत गोविंद कवीची समग्र कविता नाहीं. गोविंद कवींची बरीच स्फूर्तिदायक कविता सरकारी रोषास पात्र होऊन जप्त झालेली आहे, हें सर्वांस माहीत आहेच. आजच्या बदललेल्या काळांत कोणी आमदार यत्न करून ती कविता प्रसिद्ध करण्याची परवानगी मिळवील, तर महाराष्ट्र वाङ्मयावर त्यांचे मोठे उपकार होतील. हें पुस्तक तयार करितांना वरील मंडळाखेरीज अनेकांचे श्रम कारणीभूत झाले. ह. भ. प. ल. रा पांगारकर यांनीं उत्कृष्ट पुरस्कार लिहून दिला. प्रो. रा. श्री. जोग एम. ए. यांनीं मार्मिक काव्यविवेचन लिहून दिलें. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले व श्री. ग. वि केतकर, सहसंपादक केसरी यांनीं मुद्रितें पाहून अगदीं वेळेवर आपले अभिप्राय लिहून पाठविले. येथील वाङ्मयविहार मंडळाचे सभासद प्रो. सबनीस व प्रो. ओतूरकर आणि श्री. पानसे वकील यांनीं प्रकाशनाचे कामीं वेळोवेळीं साह्य केलें ह्याबद्दल मी या सर्वांचा फार आभारी आहें. सुमारें दोनशेंहून अधिक पृष्ठांचें पुस्तक अवघ्या एक

रुपयांत आम्ही देत आहोंत यांत गोविंद कवीच्या काव्याचा सर्वत्र बृहन्महाराष्ट्रभर प्रसार व्हावा व त्यांचीं स्वातंत्र्यगीतें घरोघर गायिलीं जावींत याहून अधिक हेतु नाहीं. महाराष्ट्रवाचक याचें योग्य तें चीज करून दुसरी आवृत्ति प्रकाशित करण्याचा व त्याबरोबरच गोविंद कवीची जप्त झालेली कविता छापून प्रसिद्ध करण्याचा योग आणतील अशी आशा आहे.

चतुर्थ गोविंद कवि निधनदिन<br>फाल्गुन वद्य १।१८५१<br>ता. १५-३-३० } श्री. र. वर्तक.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

गेल्या फाल्गुन व. १ शके १८५१ ता. १५।३।३० रोजीं कै० कवि **गोविंदांच्या** चतुर्थ निधन दिनीं त्यांचें चरित्र व काव्य प्रसिद्ध झाल्यावर इतक्या लवकर ' गोविंद काव्य प्रकाशन मंडळास ' दुसरी आवृत्ति काढावी लागेल अशी कल्पना झाली नव्हती परंतु कोणाच्या कांहींही समजुती असल्या तरी " **महाराष्ट्र** " कै. कवि गोविंदाना विसरला नाहीं, हें मंडळाच्या पूर्ण निदर्शनास आलें आहे- हल्लींच्या राजकीय आंदोलनाचे काळांत महाराष्ट्रांत प्रत्येक ठिकाणीं दररोज निघणाऱ्या प्रभात फेऱ्या मधून ' स्वातंत्र्य शाहीर ' कवि गोविंद या काव्य चंडोलाच्या लकेऱ्या ऐकूं येतात व स्वातंत्र्य प्रेमी वीरांना स्वार्थत्याग करून आत्माहुति देण्यास, उत्साह, धैर्य व वीरवृत्ति उत्पन्न करण्या-करितां त्यांची ' **वीर कविता** गाइली जाते, हें पाहून गोविंद काव्य प्रकाशन मंडळास अभिमान वाटत आहे १९०८ सालीं ऐकलेलें, अर्थात सरकार जमा

झालेलें, कै० गोविंदांचें काव्य ज्यांच्या कानांत अद्यापही गुणगुणत आहे अशा पुष्कळ रसिक काव्य प्रेमी जनांना प्रस्तुत पुस्तकाचे पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें दुसऱ्या आवृतींतही ती कविता नाहीं हें पाहून निराशा वाटेल हें आम्हांस माहीत आहे परंतु अनुकूल कालाच्या अभावीं सदर कविता प्रसिद्ध होणें अपरिहार्य आहे.

पहिल्या आवृत्तींत शेवटीं 'गोविंद प्रशस्ति' म्हणून जो भाग होता. त्यांतील पत्रें काढून टाकून त्या ऐवजीं त्यांच्या काव्यावद्दल आमचें संग्रहीं असलेले निरनिराळया वृत्तपत्रांतून व मासिकांतून आलेले गद्यपद्यात्मक अभिप्राय दिले आहेत.

दुसऱ्या आवृतीप्रमाणें तिसरी आवृत्तिही पुनः लवकर काढण्याचा सुयोग महाराष्ट्र वाचक आणतील अशी अशा आहे.

माघ वद्य १४ शिवरात्र १८५२.
ता. १५-२-३१.

श्री. र. वर्तक.

# अनुक्रमणिका.

## प्रास्ताविक.


पृष्ठांक.

१ कै० गोविंद त्र्यंबक दरेकर यांचें चरित्र १-३४

१ कुलवृत्तांत, २ पूर्वचरित्र, ३ मानसिक स्थित्यंतर, ४ मित्रमेळयाची स्थापना, ५ संस्थेचा कार्यक्रम, ६ स्वातंत्र्याचा शाहीर गोविंद, ७ काव्यप्रसार, ८ कवीची मनोभूमिका, ९ इतर कार्याचा व्याप, १० विपत्कालांतील अप्रतिम धैर्य, ११ दडपशाहिस सुरवात, १२ वंदेमातरम्‌चा खटला, १३ कवितांचें निमित्त, १४ आध्यात्मिक विषयाकडे कल, १५ पुनश्च हरिः ॐ, १६ मनःप्रवृत्ति व परिस्थिति यांची फारकत, १७ मित्रांची सुटका, १८ शेवट, १९ स्वभाववर्णन.

२ श्री. कृ. ब. महाबळ यांच्या आठवणी ३५-४४

३ स्वातंत्र्यशाहीर गोविंद कवीची कविता ४५-६५

**काव्यविवेचनः**-( प्रो रा. श्री जोग, एम् ए. हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज, नासिक. ) ... ...

# स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांची कविता.

१ काव्य पुरस्कार ( ह. भ. प. ल. रा. पांगारकर ) १—६

२ कविता ... ... ... १–१२५

१ गणेशमहिमा ... ... ... १
२ सुंदर कविता ... ... ... १
३ स्वागतपर पद्य ... ... ... ३
४ मना ! काय कर ! ! ... ... ४
५ महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषदेकरितां स्वागतपर गीत ५
६ सरस्वतीची भूपाळी ... ... ८
७ श्रीजिजाबाईने बालशिवाजीस दिलेला झोका ... १०
८ प्रभु रामरायाची प्रार्थना ... ... १३
९ वसंत गेला ! ... ... ... १४
१० गणेश स्तवन ... ... ... १५
११ दारुबाजास इषारा ... ... १६
१२ लोकमान्य टिळकांची भूपाळी... ... १७
१३ शिवकालीन होलिका महोत्सव ... २२
१४ हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ... २४
१५ मुरली ... ... ... २७
१६ देवाचा धांवा ... ... २९
१७ कै० लोकमान्य टिळकांच्या दहाव्या दिवसानिमित्त ३०
१८ भगवद्गीतेच्या भूपाळीचें ध्रुवपद ... ३१
१९ पुरुष कोण ? ... ... ... ३२
२० शिववाचा दरबार ... ... ३३
२१ शेतकऱ्यांची दुःखद कहाणी ... .. ३६

२२ शिवाजी ... ... ... ३७
२३ प्रतापराव गुजर यांनीं केलेली मरणाची प्रार्थना ३९
२४ नरवीर तानाजी याच्या स्त्रीचा वीरोचित विलाप ४०
२५ मोक्षपुराण अथवा सेवायोग ... ... ४३
२६ धांवरे ! धांव भगवंता ! ? ... ... ४५
२७ प्रीतिदेवीचा उत्सव ... ... ४७
२८ प्रेमशृंगार ... ... ... ४९
२९ ब्राह्मण ... ... ... ५३
३० महाराष्ट्र-गीत ... ... ... ५६
३१ भारत प्रगल्भित ... ... ५८
३२ भारताची आरती ... ... ६७
३३ परमेश्वराजवळ काय मागावें ? ... ... ६८
३४ वेदांताचा पराक्रम ... ... ६९
३५ राष्ट्रमंत्र प्रतिज्ञा ... ... ७१
३६ अनभिषिक्त भूपति ... ... ७३
३७ मंगलमूर्ते ! मंगल दे ... ... ७४
३८ भगवान होइ अवतीर्ण ... ... ७५
३९ श्रीकृष्ण जन्मोत्सव ... ... ७६
४० जन्माची सार्थकता ... ... ८८
४१ पक्षिदूत ... ... ... ८८
४२ जपान स्तवन ... ... ... १०१
४३ वाहवा ! साधुवृत्ति ... ... १०२
४४ स्वातंत्र्य लक्ष्मीस उद्देशून ... ... १०३
४५ देवा, तारी हिंदुस्थान ! ... ... १०३
४६ डोळे उघडाना !... ... ... १०५
४७ मुरली ... ... ... १०६
४८ सुंदर मी होणार ! ... ... ११९
४९ ' गोविंदा 'चें करुणागान ... ... १२१

५० नमस्कार ... ... ... १२३
५१ गोविंदांची अगदीं पहिली कविता ... ... १२४
५२ हरवलेली कविता ... ... १२४

---

# गोविंद काव्य प्रशस्ति

१ श्री. लक्ष्मणशास्त्री लेले ... ... १
२ श्री. ग. वि. केतकर ... ... २
३ श्रद्धानंद ... ... २
४ श्री डॉ॰ विष्णु महादेव भट ( केसरी ) ... ३
५ श्री. विश्वनाथ विनायक केळकर ( महाराष्ट्र ) ... ६
६ श्री. आदर्श ( वैनतेय ) ... ... ८
७ आनंद ... ... ... ९
८ ज्ञानप्रकाश ... ... ... ९
९ केसरी ... ... ... १०
१० प्रो. रा. वि. ओतूरकर एम्, ए ( मनोरंजन ) १२
११ लोकशिक्षण ... ... ... १४
१२ ब्राह्मण ... ... ... १५
१३ फर्ग्युसन कॉलेज त्रैमासिक ... ... १५
१४ सर परशरामभाऊ कॉलेज ... ... १६
१५ श्री. आर पी. चिंचगांवकर ... ... १८
१६ श्री. वनवसंत नासिक ... ... १९
१७ श्री. धों. त्र्यं कोचरगांवकर बी. ए. वकील ... २०
१८ श्री अविनाशचंद्र ( लोकशिक्षण ) ... ... २३

# प्रास्ताविक

## ( चरित्र, आठवणी व काव्यविवेचन )

कै. गोविंद त्र्यंबक ऊर्फ (आबा) दरेकर.

# स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद.



जन्मकाल

ता. ९।२।१८७४

मृत्युकाल

ता २८।२।१९२६

# कै० गोविंद त्र्यंबक दरेकर

## यांचें चरित्र.

( लेखक—**वैद्यभूषण वामनशास्त्री दातार**,—नाशिक. )

१. **कुलवृत्तांतः**—गोविंद त्र्यंबक दरेकर ऊर्फ गोविंद कवि, हे नगर जिल्ह्यांतील कण्हेरपोखरी या खेडेगांवाचे रहिवाशी. दरेकर या नांवाचें एक मराठा जातीचें घराणें स्वराज्याच्या अमदानींत शूर योद्ध्यांमध्यें गणलें गेलें होतें; व हें घराणेंही मूळचें नगर जिल्ह्यांतीलच होय. या घराण्यांतीलच आपल्या चरित्रनायकाचा वंश असावा असा आमच्या तर्काप्रमाणें खुद्द चरित्रनायकाचाही तर्क होता. या तर्काशिवाय दुसरा पुरावा या बाबतींत उपलब्ध नाहीं. कण्हेरपोखरीहून कवि गोविंदाचे आजे राहूरी वांबूरीकडे आपल्या मामाच्या घरीं राहण्यास गेले. तेथेंही त्यांचा जम जमला नसावा. कारण तेथून ते नाशकास उद्योग पहाण्यासाठीं आले. घरची अत्यंत गरिबी असावी. एरव्हीं चरितार्थाचें साधन हुडकीत या गांवाहून त्या गांवीं जाण्याचें कारण काय ? त्यांच्या आजांनीं नाशकास बिऱ्हाड करून नाशिकजवळच तीन कोसांवर असलेल्या सातपूर येथें एका मारवाड्याकडे खाजगी शिपायाची नोकरी पत्करली. कवि गोविंदाचे वडील नाशकास गवंड्याचें काम करीत असत. नाशकास या वेळीं ते भद्रकाळीचे मंदिराजवळ धोंडो महादेवाच्या हवेलीसमोरील टेकावर बाळकृष्ण गायधनी यांचे घरीं बिऱ्हाड करून रहात असत. गोविंद कवींच्या मातोश्री ह्या संस्थान सुरगाणें जवळ रावडगांवच्या जाधवांच्या कुलांतील होत. कवि गोविंदांच्या मातोश्रींच्या वडिलांचें नांव गंगारामजी जाधव व आईचें नांव भीमाबाई असें होतें. या गंगारामजींस तीन मुली. एक भागूबाई, दुसऱ्या वारूबाई व तिसऱ्या म्हणजे कवि गोविंदाच्या मातोश्री आनंदीबाई ह्या होत. पैकीं भागूबाई नाशिक-जवळ मुंगसरे येथील पारखांच्या घराण्यांत दिल्या होत्या. त्यांचे चिरंजीव

माधवराव पारख ( म्हणजे कवींचे मावस बंधू ) हे प्रसिद्ध कवि व वकील बलवंत खंडूजी व नारायण खंडूजी यांचे सख्खे चुलत बंधू होत. दुसऱ्या वारूबाई ह्या संस्थान सप्तश्रृंग वणी येथील पुजारी भोपे कदम यांचे घराण्यांत दिल्या व तिसऱ्या आनंदीबाई ह्या दरेकरांच्या येथें रा. त्र्यंबकराव यांस दिल्या. कवि गोविंदांचा जन्म* शके १७९५ श्रीमुखनाम संवत्सरे माघ

---

*टीपः—कै० गोविंदकवि यांची जन्मकुंडली पुढील प्रमाणें आहे.


## कवि गोविंदाची जन्मपत्रिका


शके १७९५ श्रीमुखनाम संवत्सरे माघ मासे कृष्णपक्षे ८ म्यां तिथौ, इंदुवासरे घ. ५८ प. ३७ विशाखा नक्षत्र घ. ४९ प. ३९ परं अनुराधा नक्षत्रस्य प्रथमचरणे जन्म. जन्मनाम नारायण प्रतिष्ठितं. अस्य अवकहडा चक्रानुसारेण वृश्चिक राशिः, देवगणः, मध्यनाडी, शुभराशीश्वरो भौमः ॥ ता. ९–२–१८७४ ( पहाटे ३।३ मुंबई वेळ ) रवि उदय ७–१२.

शुभं भूयात्.

होराभूषण श्री. ग. प्र. दीक्षित
यांनीं केलेली सायन कुंडली.

**जन्मलग्नकुंडली.**



वद्य अष्टमी सोमवारीं ( ता. ९-२-१८७४ ) पहाटे ३ वाजून ३ मिनिटांनीं झाला. त्यानंतर रा. दरेकरांचे वडील विजयानंद नाटकगृहाचे मागें असलेल्या जळक्या वाड्यांत राहण्यास आले. तेथें त्यांचे वयाचे १०-११ वर्षे पावेतों वास्तव्य होतें. त्यांचे वडील त्यांच्या वयाच्या चौथ्यापांचव्या वर्षीच वारले. कवि गोविंद हे वयाच्या आठव्या नवव्या वर्षी मराठी शाळेंत जाऊं लागले; पण दुर्दैवानें त्याच सुमारास त्यांना भयंकर ताप येऊन ते अजारी झाले. हा ताप बरेच दिवस व उग्र स्वरूपांत होता. या तापांतच त्यांचे हात व कमरे-पासून पाय लुळे पडले व सुकत चालले. या वेळेस ते जवळ जवळ सहा महिने अंथरुणावर पडून होते. त्यांचा बिलकूल भरंवसा नव्हता मातोश्रीला एकुलता एकच मुलगा म्हणून त्यांची अत्यंत काळजी वाटे. घरची अत्यंत गरिबी होती तरी त्यांच्या अनुकूलतेप्रमाणें त्यांनीं अत्यंत कष्ट सोसून व आपल्या शक्ती-बाहेर द्रव्यव्यय करून रात्रंदिवस नानातऱ्हेचे उपचार केले व त्या उपचारांचें, कष्टांचें व परमेश्वराच्या कृपेचें फळ म्हणूनच रा. गोविंदराव दरेकर हे त्या दुखण्यांतून निभावले पण कायमचे अपंग मात्र झाले. मुलाच्या जिवावरची देहावरच बेतल्यानें त्यांची मातोश्री दुःखांत सुख मानून काळ कढूं लागली. अशा तऱ्हेनें अपंग झालेले कवि गोविंद शिक्षणांत मागें पडले व खेळाडू बनले.

२. **पूर्व चरित्रः**—त्या वेळचा त्यांच्या भोंवतालचा परिवार अत्यंत अशिक्षित, उनाड व वृत्तीनें बऱ्याच कमी दर्जाचा असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. त्यांचा बहुतेक दिनक्रम म्हणजे अशा मंडळींत बसून त्या मंडळींत शोभतील अशा प्रकारच्या गप्पागोष्टी करणें, नाचरंग, तमाशे व ख्यालीखुशाली यांत गढून जाणें, असा असे. त्यांची वृत्ति व भाषा अगदीं खालच्या दर्जाच्या मनुष्यास शोभेल अशी असे. कारण ते आपल्या सवंगड्याबरोबर आपल्या घरीं व घराबाहेरील ओट्यावर बसून उनाडपणाच्या

अनेक गोष्टि करीत. तथापि त्या मंडळींत ते प्रमुख मणले जात असत. अशा मंडळींच्या दर्जास शोभेल असे खबुतरें पाळणें, पांढरे उंदीर बाळगणें, वगैरे उद्योग ते करीत असत. ह्या आयुष्यक्रमांतच त्यांना डफ व तबला वाजविण्याची कला अवगत झाली. अनेक शाहीरांच्या शृंगारिक व भेदी लावण्या त्यांना येत असत. येथूनच त्यांच्या कवित्वास स्फूर्ति मिळाली असावी असा तर्क करतां येतो. त्यांनीं ज्या लावण्या केल्या त्या याच तमासगीर लोकांच्या संगतींत असतांना झाल्या आहेत. ह्या वेळीं त्यांना लिहिण्याचा व वाचण्याचा नाद असावा असें वाटत नाहीं. याच लोकांच्या संगतींत राहून त्यांना कातरकाम येऊं लागलें. हें काम प्रसिद्ध बाळा खंडू चितारी यांचे जवळ ते शिकले. पुढें हें काम त्यांना चांगलें येऊं लागून त्यांच्या उपजीविकेचें साधन म्हणूनही कांहीं दिवस उपयोगी पडलें होतें. नाशिक शहरांत लग्नभुंर्जातील मिरवणुकीच्या पुढें बाग आणि टोपमाळेची शोभा त्यांनीं जास्त प्रचारांत आणिली, यापासून त्यांना वार्षिक २००–३०० रुपये मिळत असावे. पतंग करून ते विकीत असत. कांहीं दिवस रॉकेलचे हिलाल मिरवणुकीस देऊन त्यावरही प्राप्ति मिळवीत असत. वरील प्रकारचे धंदे सहकारी तत्त्वानें यांच्या भोवतालीं असणाऱ्या मंडळींच्या मदतीनें ते चालवीत असत. अनायासें सहकारी मंडळींस धंद्याच्या दृष्टीनें यांचेपासून फायदाच होत असे. याच वेळीं त्यांना विडीचें जबरदस्त व्यसन लागलें. या वेळची त्यांची स्नेहीमंडळी म्हणजे बाबाजी तेली, बेलदे, बळवंत खंडू चितारी, गंगाराम व गणपत न्हावी, रंभाजी सांगळे वगैरे असत. अशा तऱ्हेचा आयुष्यक्रम सरासरीं आठदहा वर्षे म्हणजे कवि गोविंदांच्या वयाच्या सुमारें सतरा अठरा वर्षांपर्यंत चालू असावा. कवि गोविंदांचें पूर्वींचे बिऱ्हाड पुन्हां बदलून ते नगरकरांच्या गल्लींत विश्वामित्रांचे घरीं रहाण्यास आले. आतां रा. दरेकर हे ब्राह्मण वस्तींतच राहूं लागल्यानें

... ग्रंथसंग्रहालय

त्यांच्याशीं त्या वस्तींतील मंडळींचा सहवास होणें अपरिहार्य होतें आणि त्या सहवासाचा इष्ट तोच परिणाम त्यांचेवर घडून आला. त्या गल्लींतील मुलांचा व त्यांचा हळूंहळूं संबंध येऊं लागला, व त्यांची त्या मुलांमध्यें बैठक सुरू झाली. यामुळें रोजच्या बैठकींतील नाच तमाशे जाऊन त्यांच्याऐवजीं नाटक पहाणें, त्यांतील पदें म्हणणें, सोंगट्या, पत्ते, बुद्धिबळें खेळणें वगैरे थोडेसे वरच्या दर्जाचे मनोरंजनाचे प्रकार सुरू झाले; व त्यास साजेल अशाच प्रकारच्या गप्पागोष्टीही होऊं लागल्या. तथापि त्या वेळच्या वयाला व विद्यार्थीवृत्तीला अनुसरून पोरकट आणि उच्छृंखल वृत्तीचे प्रकार सुरू असतच. यामुळें या उनाड मुलांचा अनेक प्रकारचा त्रास गल्लींतील मोठमोठ्या मंडळींना सहन करावा लागत असे. या बैठकींतील त्या वेळची मंडळी म्हणजे श्रीपतराव व वैजनाथराव गोरे, बळवंतराव काशीकर, जी. एस्. कुळकर्णी, अनंतराव वैशंपायन, रामभाऊ नातू, रामभाऊ दातार वगैरे होत. अनेक नाटकें पाहिल्यानें व त्यांतील पद्यें म्हणण्यानें आपणही एक नाटक लिहावें असें त्यांना वाटलें असावें. त्यांच्या 'मन्मथप्रभाव' नाटकाचा आरंभ वरील प्रकारच्या मंडळींच्या सहवासांत असतांना झाला असावा. पूर्वीच्या बैठकींतील मंडळींमध्यें जसे प्रमुख म्हणून ते गणले जात, त्याचप्रमाणें याही मंडळींत प्रमुखच गणले जात असत. ज्या ज्या मंडळींत ते बसतील त्यांत ते चमकून दिसावेत हा गुण त्यांच्यामध्यें स्वभावसिद्धच होता, असें यावरून आणि त्याच्या पुढील अनुभवावरूनही सिद्ध होतें. या दुसऱ्या बैठकींत असतांना त्यांच्या अयुष्याला विशेष वळण लागलें असें म्हणतां येत नाहीं. कारण तोच दिनक्रम, मनोरंजनाचे तेच विषय, तीच ख्यालीखुशाली, फक्त भाषाभेद, प्रकारभेद, आणि मित्रमंडळींचा थोडासा पालट, यांपेक्षां कांहीही दुसरा फरक या मंडळींत दिसत नव्हता. ही बैठक सुमारें ३–४ वर्षें असावी म्हणजे हा काल सुमारें १८९७–९८ चा असावा. या वेळीं यांचा पोषाख

थोडासा ऐटदारच होता. डोक्यास जरीची टोपी, अंगांत पातळ विलायती मलमलीचे इस्तरीचे सदरे, व त्यावर नक्षीदार सुंदर जाकीट असा असे. या दोन्ही बैठकींत असतांना व पुढें कोठेंही बाहेर जावयाचें असल्यास ते भगवान् गरुडवाहनाची आठवण करून देत. भगवान् विष्णूला एकच गरुड असे, पण यांना मात्र यांच्या स्नेहीमंडळींच्या बाहुल्यानें स्वयंस्फूर्तीनें रोज एक नवीन गरुड मिळत असे आणि हें गरुड होण्याचें काम पुढें होणाऱ्या बॅरिस्टरांनींहीं आपखुषीनें पत्करलें होतें.

**३ मानसिक स्थित्यंतरः**—यानंतर १८९८ सालीं नाशिक येथें प्लेगचा धुमाकूळ सुरू झाला. नाशिकला त्यावेळीं स्टूअर्ट कलेक्टर होते. त्यांच्या कारकीर्दीत लोकांस अतिशय त्रास झाला आणि लोकही हवालदील होऊन गांव सोडून बाहेर गेले. त्या वेळीं रा. दरेकर हे मुंगसऱ्यास रहाण्यास गेले. १८९९ सालीं परत गांव भरल्यावर रा. दरेकर हे नाशकास राहण्यास आले. त्याच वेळीं रा. गणेश दामोदर व रा. विनायक दामोदर सावरकर शिक्षणाच्या निमित्तानें याच नगरकरांचे गल्लींत वर्तकांचे वाड्यांत रहावयास आले. रा. गणेश दामोदर सावरकर यांचा व रा. रामचंद्र केशव दातार व रा. धोंडो रघुनाथ वर्तक यांचा शाळेमधला जाण्याचा नित्यत्वाचा संबंध यापूर्वीच जुळून आला होता व त्याचेंच दृढीकरण म्हणजे सावरकर बंधूंचें वर्तकांच्या वाड्यांत राहण्यास येणें हें होय. विशेषतः रा. विनायकराव सावरकर हे या गल्लींत राहण्यास आल्यापासून त्या गल्लींतील त्यांच्या समवयी मुलांच्या मनांत महत्त्वाकांक्षेचें वारें खेळूं लागलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं रा. सावरकरांचें वयही त्यांच्या बुद्धीचें कौतुक करण्या-इतकें लहान होतें. तथापि त्यांच्या त्या आकर्षक चेहऱ्यावरील दिसणारी बुद्धिमत्ता व तरतरी आणि त्यांचा सततोद्योगी स्वभाव याचा परिणाम आसपास राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्या वेळीं

रा. सावरकर हे जगद्धितेच्छु वर्तमानपत्रांत किरकोळ बातमीपत्रें लिहीत असत. त्यांच्याविषयीं कोणी मत्सरानें कोणी कौतुकानें, कोणी महत्त्वाकांक्षेनें तर कोणी प्रेमानें पाहूं व विचार करूं लागल्यानें प्रत्येकाच्या बुद्धीला त्यायोगें चालन मिळून जिवंतपणा व निराळें वळण लागल्याशिवाय राहिलें नाहीं व त्याचाही अप्रत्यक्ष परिणाम रा. दरेकर यांच्यावर झाला असलाच पाहिजे.

सन १८९९ च्या मार्च महिन्यांत रा. रामभाऊ दातार यांचे व आमचे वडील रा. केशवशास्त्री यांस प्लेग झाला. त्या वेळीं रा. बाबासाहेब सावरकर यांनीं त्यांची शुश्रूषा स्नेहभावाच्या नात्यानें अत्यंत केली. त्यामुळें सावरकर व दातार या घराण्यांचा संबंध दृढ झाला आणि आळींतील इतर मंडळीचाही स्नेहभाव वाढत गेला. याच सालीं भाद्रपदांत गणपति उत्सवाचे सुमारास सावरकरांचे गांवीं-भगूर येथें-प्लेगचा कहर उसळला. सावरकर कुटुंबावर ही मोठी आपत्ति गुदरली. त्यांत सावरकर बंधूंचे वडील रा. दामोदरपंत, चुलते व लहान बंधु ( प्रसिद्ध डॉ० सावरकर ) नारायणराव यांस प्लेग झाला. प्लेगसंबंधीं अधिकाऱ्यांचा जुलूम विशेष चालू असल्यानें यांना स्मशानाजवळील देवळांत राहण्याचा प्रसंग आला. हें वृत्त कळतांच रा. रामभाऊ दातार व रा. दत्तोपंत भट वगैरे मंडळी तेथें जाऊन आजारी असलेल्या मंडळीसह सावरकर बंधूस त्यांनीं घरीं आणलें. त्या प्रसंगीं सावरकरांचे वडील व चुलते कालवश झाले. डॉ. सावरकर यांस नाइलाजानें ते अत्यवस्थ आजारी असल्यानें प्लेग हॉस्पिटलमध्यें पोंचविण्यांत आलें. त्यांच्याबरोबर रा. गणपतराव सावरकर हे हॉस्पिटलमध्यें शुश्रूषेसाठीं गेले होते. हॉस्पिटलमध्यें अन्न पोहोंचविण्याचें काम रा. विनायकराव सावरकर करीत असत. त्यावेळीं तेथें रा. झसकर या नांवाचे कारकून होते. त्यांचा व गणपतराव व विनायकराव सावरकरांचा परिचय झाला. रा. झसकर हे, स्वार्थत्यागी, स्वदेशाविषयीं अत्यंत कळकळ बाळगणारे व लोकमान्य

टिळकांचे कट्टे अनुयायी असे होते. याच परिचयाचा परिणाम, नाशिकच्या सुप्रसिद्ध मित्रमेळा संस्थेच्या स्थापनेंत झाला.

४. **मित्रमेळ्याची स्थापना:** – प्रत्यक्ष मित्रमेळ्याची स्थापना, नातू बंधूंच्या ( डिसेंबर १८९९ इ. ) सुटकेनिमित्त त्यांचें अभिनंदन सार्वजनिक तऱ्हेनें झालें नाहीं, याविषयीं मनांत अत्यंत वाईट वाटल्यामुळें विजयानंद थिएटरांत नाटक पाहण्यास गेलेल्या ह्या मंडळीच्या मनांत, आपणांस स्वतंत्रपणें कार्य करण्यास अवसर व स्थान असावें अशा विचारानें झाली. प्रारंभीं संस्थेचें उत्पादकत्व तीन अगर चार मंडळीकडेच होतें. नंतर एक एक सभासदांचा त्यांत प्रवेश होऊं लागला. रा. दरेकर यांचा या संस्थेंत प्रवेश सुमारें तीन चार महिन्यांनीं झाला असावा. अशा संस्थेंत आपला प्रवेश व्हावा ही इच्छा होणें, हें रा. दरेकरांवर सावरकरादि मंडळींच्या तात्कालिक वागणुकीच्या परिणामाचें द्योतक होय आणि प्रत्यक्ष संस्थेंत त्यांचा प्रवेश होणें ह्मणजे तर रा. दरेकरांचा पुनर्जन्मच होय. कारण रा. दरेकर यांच्या अंगीं असलेल्या सर्व गुणांच्या विकासास येथूनच प्रारंभ झाला. आतां रा. दरेकर हे स्वदेशाचा विचार करूं लागले. आपल्या वैयक्तिक गुणावगुणांकडे बारीक लक्ष पोहोंचवून स्वत:च्या गुणांची वाढ करणाचा प्रयत्न करूं लागले. त्यांच्यात महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. विद्येचें महत्त्व व लेखनवाचनाची आवश्यकताही त्यांस पटून आपला ख्यालीखुशालीचा पूर्वींचा जीवनक्रम बाजूला सारून ते लिहूं वाचूं लागले.

मित्रमेळा या संस्थेमध्यें स्वदेशाच्या उन्नतिसंबंधीं प्रयत्न करण्याची भावना मूलभूतच होती. या भावनेची सिद्धी कोणत्या प्रकारें होईल याचे विचार संस्थेमध्यें चालू असत. ब्रिटिश साम्राज्याशीं असलेला संबंध तोडून पूर्ण स्वातंत्र्य मिळविणें ही कल्पना या संस्थेमध्यें थोडी पाठीमागून उद्भूत

झाली व तीच संस्थेचें पूर्ण ध्येय ठरलें. हें ध्येय ठरविण्याचें श्रेय कोणा एका विशिष्ट व्यक्तीस नसून त्या वेळच्या सर्व मंडळीसच दिलें पाहिजे.

५. **संस्थेचा कार्यक्रम:**—या संस्थेचा कार्यक्रम प्रथमतः पुढीलप्रमाणें होता. आठवड्यांतून दर रविवारीं किंवा शनिवारीं मंडळीची नियमितपणें रात्रीं बैठक होत असे. त्या बैठकींत अगाऊ ठरलेल्या विषयावर पूर्व नियोजित वक्त्याचेंच प्रामुख्यानें भाषण होई, व त्यावर बाकीच्या सभासदांचीं उपवक्ते म्हणून भाषणें होत. अशा तऱ्हेनें अनेक विषयांची साधक बाधक चर्चा चालून निरनिराळ्या विषयांचें ज्ञान व तात्विक सत्य सिद्धांत सर्व सभासदांस अवगत होत व त्यांची वैयक्तिक योग्यताहि वाढण्यास मदत होई. संस्थेतील सर्वसाधारण धोरण असें असे कीं, मित्रमेळ्यांतील सर्व सामान्य सभासद हाही आपलें उद्दिष्ट साधण्याकरितां समाजामध्यें वावरत असतां आपल्या कर्तृत्वानें व ज्ञानानें लोकांमध्यें विशेषत्वानें चमकला जावा. यासाठीं इतिहास, काव्य, निबंध, तत्त्वज्ञान, धर्म, वगैरे आवश्यक विषयांची ठराविक पुस्तकें, त्यांनीं वाचलींच पाहिजेत असा निर्बंध असे. वादविवादांत अचूक सत्य हुडकून काढण्याची कलाही त्यास अवगत असावी, यासाठीं त्यानें वादविवादांतही भाग घेतलाच पाहिजे असाही निर्बंध असे, यामुळें प्रत्येक सभासद बहुश्रुत, चपखल कोटिक्रम करणारा, असा तयार होई. आणि याच पद्धतीमुळें ‘आधीं सामाजिक कीं राजकीय,’ ‘आधीं धार्मिक कीं राजकीय,’ आधीं औद्योगिक कीं राजकीय’ वगैरे देशिक चळवळीमध्यें मोठमोठ्या कार्यकर्त्यांसही ज्या प्रश्नासंबंधीं व्यामोह होई, व अजूनही होतो त्या सर्व प्रश्नांचा संशय दूर होऊन सभासद स्थिरबुद्धि होत असे. याचा परिणाम असा झाला कीं मित्रमेळ्याचे सभासद स्वदेशाच्या पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय मध्यवर्ति ठेवून त्याला अनुषंगून असणाऱ्या सर्व प्रकारच्या सर्व विषयांच्या चळवळींमध्यें पूर्णपणें भाग घेण्यास समर्थ होत असत.

आणि ते कोणत्याहि ठिकाणीं गोंधळत नसत. कारण ते तितकेच धार्मिक, तितकेच औद्योगिक, तितकेच सामाजिक, तितकेच शैक्षणिक, तितकेच शारीरिक इत्यादि विषयांचे भक्त म्हणून त्या त्या विषयांच्या एकांगी भक्ताबरोबर मोठ्या तत्परतेनें कार्य करण्यास समर्थ होत व या विषयांच्या अवास्तव व स्वातंत्र्यध्येयविरोधक अशा स्तोमापासून तितकेच चटकन दूर राहत. मित्रमेळ्याच्या कार्यक्रमाचें दुसरें अंग राष्ट्रवीर व धर्मवीर पुरुषांचे उत्सव साजरे करून त्यायोगें लोकांत देशप्रेम व धर्मप्रेम वाढवून स्वातंत्र्यानुकूल वातावरण उत्पन्न करणें हें होय. त्याप्रमाणें संस्थेमार्फत श्री. नानाफडणवीस श्रीशिवाजी महाराज, श्रीसमर्थ रामदास, श्रीगजानन इत्यादिकांचे उत्सव साजरे केले जात. कांहीं दिवस अकबरजयंतीचा उत्सवही साजरा केला जात होता. त्याचप्रमाणें चालू असलेल्या देशहिताच्या चळवळींना व त्या करणाऱ्या पुढाऱ्यांना जी जी शक्य असेल ती ती मदत करण्याचा मार्गही संस्थेनें पत्करला होता. या सर्व कार्यक्रमांतून संस्था व संस्थेचे सभासद जात असतांना हिंदुस्थानाला स्वातंत्र्याशिवाय तरणोपाय नाहीं व तें स्वातंत्र्य सशस्त्र क्रांतीशिवाय केव्हांही प्राप्त होणें शक्य नाहीं, बाकीचे सर्व प्रयत्न त्या दृष्टीनें अगदीं अलीकडचेच होत, या विचारापर्यंत मित्रमेळा ही संस्था व तिचे सभासद येऊन ठेपले. संस्थेच्या या कार्यक्रमाचा व ध्येयाचा रा. दरेकर यांच्या मनावर व बुद्धीवर पूर्ण पगडा बसला व ते पूर्ण स्वातंत्र्यवादी व निस्सीम देशभक्त बनले.

६. **स्वातंत्र्याचा शाहीर गोविंदः**—संस्थेचा अत्यंत आदरणीय असा आणखीही एक कार्यक्रम असा होता कीं, संस्थेतील प्रत्येक सभासदाचें गुणदोषविवेचन दर तिमाहीस सर्वांनीं मुक्तकंठानें करावें. त्याचाही फायदा रा. दरेकर यांनीं घेऊन आपल्या अंगांतील दोष नाहीसे करून गुणांची अभिवृद्धि करण्यास ते झटत असत. त्यांनीं आपलें लेखन सुधारलें, वाचन सुधारलें.

निरनिराळया विषयांवरील ग्रंथ मागवून आणून ते वाचण्याचा त्यांचा सपाटा सुरूं झाला. हें वाचन करीत असतांना महाराष्ट्र कवींचीं काव्यें, विशेषतः मोरोपंतांचीं काव्यें काव्याभ्यासाचे दृष्टीनें त्यांनीं वाचलीं व त्यांच्या कवित्वास श्रीगणपत्युत्सव, श्रीशिवाजी उत्सव व इतर सार्वजनिक प्रसंगांमुळें वाव मिळाला. अशा दृष्टीची त्यांची पहिली कविता एक ओवीबद्ध असावी असें स्मरतें. दुसरी कविता पैसाफंडाचे उत्पादक श्री. अंताजी दामोदर काळे यांच्या पैसाफंडाच्या कार्यासंबंधानें व त्यांच्या स्वतःच्या कर्तबगारीसंबंधानें केलेली होती. मित्रमेळयाचा शिवाजी उत्सव व गणेशोत्सव साजरा करण्याचे वेळीं आपली स्वातंत्र्यध्येयाची कल्पना लोकांत प्रसृत करण्याचा व देशाभिमान प्रज्वलित करण्याचा प्रघातच पडल्यानें शिवोत्सवप्रसंगीं ऐतिहासिक उदाहरणें व गणपत्युत्सव प्रसंगीं धार्मिक अगर पौराणिक उदाहरणें घेऊन आपलीं ध्येयें लोकांपुढें उदात्त व स्फूर्तिमय पद्धतीनें मांडण्याचें कार्य त्यावेळीं रा. सावरकर व रा. दरेकर यांजकडे ओघाओघानेंच आलें. बॅ. सावरकर यांनीं सिंहगड व बाजीप्रभु यांचे पोवाडे केले, तर रा. दरेकरांनीं अफझुल-खानाचा पोवाडा, व शिवाजी व मावळे यांचा संवाद शिवजन्मोत्सवप्रसंगानें केला. रा. सावरकरांनीं श्रीशिवाजी महाराजांची सुप्रसिद्ध आरती तयार केली तर रा. दरेकर यांनीं श्री समर्थांची आरती तयार केली. गणपति उत्सवांतील मेळयाचीं पद्यें मात्र रा. दरेकर यांचींच होत. या सुमारास रा. अनंत वामन बर्वे यांच्या पद्यांचेंही मेळयामधून नाशिक येथें गायन होत असे व इतर बरेच मेळे गांवांत होत असत. यामुळें रा. दरेकर यांनाही चढाओढीच्या महत्त्वाकांक्षेनें स्फुरण येऊन ते आपलीं पद्यें काव्यदृष्टीनेंही सरस कशीं होतील इकडे लक्ष पुरवीत असत. लवकरच त्यांचीं पद्यें नांवाजलीं गेलीं व तीं पद्यें गाणारा मेळा श्रेष्ठ प्रतीचा ठरला.

७. **काव्यप्रसार:**—याप्रमाणें नाशिकास दरेकरांचें काव्य, त्यांतील

कवित्व आणि स्वातंत्र्यतत्त्व या योगानें लोकप्रिय झाल्यावर, त्याचा प्रसार करण्यासाठीं, महाराष्ट्राचें मुख्य केंद्रस्थान जें पुणें शहर, तेथें व रायगड वगैरे ठिकाणींही जाण्याची उत्कट इच्छा मंडळींनीं बाळगून निवडक मंडळीसह १९०५ सालीं पुण्यास व १९०६ सालीं रायगडास काव्याचें गायन गाऊन दाखविलें. पुण्यास सार्वजनिकहिताच्या व देशहिताच्या तत्त्वांचा प्रसार करण्याचें कार्य करण्यांत ' सन्मित्रसमाज मेळा ' हा अग्रस्थान पावला होता. त्या मेळ्याच्या गायनप्रसंगीं पुण्यास हजारों लोकांची गर्दी जमत असे व महाराष्ट्रांतही त्या मेळ्याची कीर्ति सर्वतोमुखीं झाली होती. अशा ठिकाणीं आपलीं पद्यें गाऊन दाखविण्याची सात्त्विक महत्त्वाकांक्षा मंडळीनें धरली व लोकमान्य टिळक यांच्या ( विंचूरकरांच्या ) वाड्यांत त्यांच्या समोर मेळ्याच्या संमेलनाचे वेळीं आपलीं पद्यें गाऊन दाखवून लोकमान्यांकडून मुक्तकंठानें वाहवा मिळविली. खरोखरच त्या वेळीं उभ्या महाराष्ट्रांत देशाचें अंतिम ध्येय म्हणजे स्वातंत्र्य, याची घोषणा तडफेनें, निःसंदेहानें, धैर्यानें व स्पष्टतेनें करणारीं, त्यांतही प्रतिभेचीं व स्फूर्तीचीं बहार उडवून देणारीं पद्यें, रा. दरेकरांशिवाय किंवा मित्रमेळ्याचे पद्यांशिवाय दुसरीं कोणाचींही नव्हतीं. यामुळें मित्र-मेळ्याची व पद्यांची कीर्ति फार लौकर महाराष्ट्रभर पसरली व जीं उत्सवप्रसंगीं गाण्याकरितां तात्पुरतीं म्हणून पद्यें रचिलीं गेलीं तीं महाराष्ट्राचीं नित्याचीं स्वातंत्र्यसूक्तें होऊन बसलीं व याचें श्रेय स्वातंत्र्याच्या सत्यसिद्धांतास जितकें देणें प्राप्त, त्यावरोबरच रा. दरेकर यांच्या सुंदर पद्यरचनेसही देणें प्राप्त आहे. इ. स. १९०६ चे सुमारास, हीं वेळोवेळीं रचलीं गेलेलीं पद्यें '**लघु अभिनव मालेचीं पुष्पें**' म्हणून प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलीं. याच वेळेस मित्रमेळा या संस्थेचें '**अभिनव भारत**' या नामकरणांत रूपांतर झालें आणि मित्रमेळा हें टोपण नांव ठरलें गेलें. अभिनव भारत हें नांवच असें सुचवितें कीं, भारताची परदास्याच्या जोखडांतून सर्वस्वी मुक्तता करण्याचें ध्येय

उराशीं बाळगणारा, त्याकरितां देहत्यागापर्यंत प्रयत्न करणारा तरुणांचा संघ हिंदुस्थानांत प्रस्थापित झालेला आहे. अशा प्रकारची मालेंतील १ ते ९ लघुपुष्पें तयार झालीं. त्यांत ५ पुष्पें रा. दरेकरांनीं ग्रथित केलेलीं होतीं.

८. **कवीची मनोभूमिका**:—रा. दरेकरांच्या प्रत्येक पद्याचे पाठीमागें एक प्रकारची विशिष्ट कल्पना अगर विशिष्ट हेतु किंवा प्रसंग आहे, असें आम्हांस वाटतें. त्यांचें काव्य केवळ उत्सवप्रसंगीं करावयाच्या पावसाळी काव्याप्रमाणें अभिप्रायरहित व अहेतुक असें नाहीं. हें काव्य म्हणजे उत्सवप्रसंगांच्या निमित्तानें अभिनव भारताचा आपल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कल्पनांचा प्रसार करण्याचा प्रयत्न होय. अर्थात् असें काव्य तयार करण्याकरितां रा. दरेकर यांस सर्वकाल विचार करावा लागे व त्यांच्या मित्रवर्गास तें काव्य अर्थपूर्ण होण्याकरितां वारंवार वाद-विवादाच्या रूपानें साहाय्य द्यावें लागे आणि अशा दीर्घ प्रयत्नानेंच उठावदार झालेलें रा. दरेकरांचें काव्य हें जनतेच्या हृदयास पोंचून जाऊन तादात्म्य पावें.

रा. दरेकरांची दृष्टि काव्य करतांना पूर्वसंकल्पित कल्पना काव्यांत स्पष्टपणें पण माधुर्ययुक्त कशा उमटतील इकडे असल्यानें प्रत्येक शब्दाची छाननी करून निवड करण्यांतच त्यांचा वेळ जाई. हा चिकित्सकपणा त्यांचें काव्य जास्त न होण्याचें पहिलें कारण होय. याशिवाय रा. दरेकर यांस संस्कृत व मराठी काव्य ग्रंथांचा व कवींचा, तसेंच मराठीखेरीज इतर कोणत्याही भाषेंतील काव्यग्रंथांचा गाढ व्यासंग नसल्यानें व साहित्यशास्त्राशीं त्यांचा परिचय मुळींच नसल्यानेंहि त्यांचें काव्य फार झालें नाहीं. हें दुसरें कारण होय. अशा अडचणींतूनही त्यांनीं जें काव्य निर्माण केलें त्याहूनही कमी अशा काव्यानेंही ते सरस, प्रतिभावान् व स्वतंत्र असे कवि ठरावयास कोणतीच अडचण नाहीं इतकें त्यांचें काव्य उत्कृष्ट आहे.

महाराष्ट्रांत रामजोशानंतर पारतंत्र्याच्या काळांत जे कवि निर्माण झाले त्यांत बॅरिस्टर सावरकरांचा अपवाद धरून रा. दरेकर यांच्याशिवाय देशाचें स्वातंत्र्य या एकाच विषयावर काव्य निर्माण करणारा एकही कवि निघाला नाहीं आणि म्हणूनच त्यांस ' **स्वातंत्र्यशाहीर** ' हें यथार्थ नामाभिधान मिळालें. रा. दरेकरांनीं एकादें महाकाव्य किंवा कथानकात्मक लघुकाव्य न लिहिण्याचें आणखी एक कारण हें कीं, एकच एक स्वातंत्र्याची कल्पना निरनिराळ्या तऱ्हेच्या प्रसंगांतून म्हणजे पुराणांचा, इतिहासाचा, वेदान्ताचा व इतर तत्त्वांचाही आधार घेऊन आणि त्यांतूनच मांडावयाची असल्यानें तुटक तुटक कल्पनांनीं युक्त अशीं निरनिराळीं पद्येंच करणें त्यांना भाग पडलें आणि ज्या वेळेस परसत्तेच्या दुर्दमनीय अशा सामर्थ्यानें चिरडून हतवद्ध झालेला समाज आपल्या खऱ्या कर्तव्यास ओळखीत नसतो व एकायानें त्याचें स्वातंत्र्यसंपादन हेंच खरें कर्तव्य सांगितल्यास तें न पटून त्याला धर्मांचा तत्त्वांचा, पुराणांचा, वेदांचा, इतिहासांचा जुना आधार नसल्याचें मानून कर्तव्य सांगणारासच मूर्ख ठरवूं पाहतो, त्या वेळेस अशा समाजास खऱ्या धर्माची व खऱ्या वेदांताची ओळख करून देणें व त्यांतूनच स्वातंत्र्यसंपादनाचे अनेक आधार देऊनच त्या समाजास जागृत करण्याचें काम अधिक महत्त्वाचें समजलें जातें आणि याकरितां तुटक तुटक, लहान लहान पद्यें करावीं लागतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

अभिनव भारताच्या कार्यास वंगभंगाच्या चळवळीनें फार मोठी मदत झाली असें म्हणण्यापेक्षां या चळवळीचा अभिनव भारतानें पूर्ण उपयोग करून घेतला, असें म्हणणेंच जास्त सयुक्तिक होईल. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीचा राष्ट्रानें स्वीकार केल्याबरोबर अभिनव भारताला आपलें यापुढचेंही स्वातंत्र्याचें ध्येय तरुणांच्या पुढें उद्बोधक रीतीनें मांडतां येऊं लागलें. अर्जविनंत्यांपासून

बहिष्कारापर्यंत राष्ट्र येऊन थडकल्यावर व आपलें उद्दिष्ट ध्येय स्वराज्य हें साध्य होत नाहीं म्हणून निराश झाल्यावर या वरील साधनांवर तरुणांचा विश्वास बसेनासा झाला. या साधनांपेक्षांही बलवत्तर आणि नोकरशाहीला हदरवून टाकणारा असा मार्ग तरुणांना हवा होता. वंगभंग वज्रलेप झाला असें नोकरशाही उन्मादानें सांगत होती आणि या योगानें राष्ट्राचा झालेला अपमान तर अत्यंत मवाळाग्रणींना देखील सहन होत नव्हता. यावेळीं धडाडीच्या स्वार्थत्यागी तरुणांना नोकरशाहीचा उन्माद घालविण्यास व राष्ट्राच्या अपमानाची भरपाई करून घेण्यास खात्रीचें असें साधन हवें होतें. स्वदेशी केली तरी वंगभंग कायमच. बहिष्कार घातला तरी वंगभंग वज्रलेपच. राष्ट्रीय शिक्षणाकरितां विद्यालयें काढलीं तरीही वंगभंगाचा भंग होईना. मग तरुणांनीं काय करावें ? अर्थात् तरुणांना त्याच्या पलीकडचा मार्ग हुडकणें भागच झालें. तशांत महर्षि दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना नोकरशाहीवर विश्वासून राष्ट्राच्या कल्याणाकरितां केलेल्या अनेकविध प्रयत्नांना अपयश आल्यानें वैतागून जाऊन उद्गारलेल्या ‘ मी निराशेचे इतके प्रसंग सोसले कीं त्यामुळें दुसऱ्या कोणाचेंही काळीज फाटून गेलें असतें व निराशेच्या वेडानें तो बंड करण्यास प्रवृत्त झाला असता ! ’ ह्या तळमळीच्या वाक्याची भर पडली व तरुणांना जोर चढला आणि त्यांची आपल्यापुढें आलेल्या क्रांतीच्या तत्त्वाविषयीं व सशस्त्र प्रतिकाराविषयीं खात्री पटली. राष्ट्राला स्वराज्य म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्याशिवाय तरुणोपाय नाहीं व तें स्वातंत्र्य सशस्त्र क्रांतीशिवाय मिळणें शक्य नाहीं या कल्पनेचा स्पष्ट विकास ह्याच चळवळींत पूर्णत्वास पावला.

९ **इतर कार्यांचा व्यापः**—अभिनव भारतानें हेंच इच्छिलें होतें व त्या इच्छेप्रमाणें आलेल्या संधीचा पूर्ण उपयोग करून आपलें जाळें संबंध आर्यावर्तांत पसरविण्याचें काम जोरानें चालू केलें.

या कामीं ज्यांचा बुद्धीचा मोठा उपयोग झाला त्यांत रा. दरेकर यांची गणना करणें जरूर आहे. कारण रा. दरेकर हे शरीरानें पंगू असल्यानें त्यांचें वास्तव्य कायमचेंच नाशिकला असे. रा. सावरकर हे बॅरिस्टर होण्याकरितां यावेळीं ( १९०६-१९०७ ) विलायतेस गेले होते. अभिनव भारताचें मुख्य ठिकाण नाशिक हेंच होतें. त्याचा बाहेरचा व्याप रा. गणपतराव सावरकर हे सांभाळीत असत. परंतु खुद्द नाशिकच्या कार्याची बहुतेक जबाबदारी रा. दरेकरांवर पडत असे व ती पार पाडण्यांत चिकाटी; धोरण, व्यवहारकौशल्य व चातुर्य इत्यादि त्यांच्या गुणांचा फार उपयोग होई; आणि ह्मणूनच त्यांना "**अभिनव भारताचा बुंधा**" असें विनोदाचें पण सत्य असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. त्या वेळेस सर्व मंडळींना इतका दृढ विश्वास वाटत असे कीं "नाशिकास कोण? आबा ऊर्फ कवि गोविंद आहेत ना! मग अभिनव भारताचें कार्य न नासतां व्यवस्थित चालेल काळजी करण्याचें कारण नाहीं." इतकें त्यांचें अभिनव भारताच्या कार्यात महत्व होतें. त्यांच्या घरीं ते नेहमींच ह्मणजे २४ तास कायमचे असल्यानें मंडळीची २४ तास बैठकच होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां यावें व देशाच्या उद्दिष्टाच्या दृष्टीनें विचार करून आबा दरेकरांपासून कांहीं तरी घेऊन जावें असा अहर्निश क्रम चालू होता. अशा नित्याच्या कार्यक्रमांत जर अभिनव भारतातर्फे किंवा बाहेरच्या टोपण नांवाच्या मित्रमेळ्यातर्फे एखादें चळवळींतील प्रासंगिक काम उत्पन्न झालें तर किंवा नित्याचें श्रीगणेशोत्सव वगैरेचें प्रसंग आले ह्मणजे तर ते पार पाडण्याविषयीं रा. दरेकरांची धांदल अवर्णनीयच होती. ते घरीं बसूनच असत परंतु त्यांचें डोकें व वाणी मात्र ते प्रसंग पार पाडण्याकरितां करावयाच्या अनेकविध योजनांच्या विचारांत व उच्चारांत गर्क असे. हीं सर्व सार्वजनिक कृत्यें पार पाडण्यांत त्यांचें सूत्रचालकत्व हें प्रधान असे.

१०. **विपत्कालांतील अप्रतिम धैर्यः**—ज्याप्रमाणें अभिनव भारताच्या कार्यात कवि व मुत्सद्दी म्हणून त्यांचा उपयोग होत असे, त्याचप्रमाणें अनेकांचे ते जिव्हाळ्याचे स्नेही झाल्यानें त्या स्नेह्यांच्या व्यक्तिगत सांसारिक सुखदुःखाचे प्रसंगीं त्यांना आबा म्हणजे एक मोठा आधार वाटत असे. कोणत्याही संकट, प्रसंगीं आबा दरेकरांचा सल्ला मार्गदर्शक व्हावयाचाच. स्वतः निष्कांचन असतांही नाना तऱ्हेच्या खटपटी करून इतर स्नेही मंडळींच्या द्रव्यविषयक तात्पुरत्या अडचणी भागविण्याचा जणूं कांही मक्ताच आबांनीं घेतला होता. आणि अशा रकमा कांहीं आण्यापासून निदान शें दोनशें रुपयांपर्यंत तरी असत. यावरून मित्रत्वाची खरी कसोटी त्यांनीं आपल्यास लावून स्वतःस पारखून घेतलें होतें. रा. आबांचा उपयोग त्यांच्या स्नेहीमंडळींच्या स्त्रीसमाजाला व लहान लहान मुलांनाही झाला. दातार बंधु व सावरकर बंधु, रा. भट, रा. चंद्रात्रे, रा. केळकर, रा. गोरे वगैरेंच्या कुटुंबांना देशविषयक व धर्मविषयक शिक्षण व वाचनाची अभिरुचि वगैरे रा. आबांकडूनच प्रामुख्यानें मिळाली. सारांश रा. आबा दरेकर हे अभिनव भारतांतील एक कवि किंवा एक चळवळे मुत्सद्दी एवढ्याच नात्याचे राहिले नसून अंतर्बाह्य एककुटुंबीय असे बनले होते. पुढच्या दुर्धर प्रसंगीं तर अनेक कुटुंबांची सर्व तऱ्हेची जबाबदारी व काळजी प्रत्यक्ष आबा दरेकरांवरच येऊन पडली होती व ती त्यांनीं मोठ्या धैर्यानें, चातुर्यानें, शहाणपणानें व स्वार्थत्यागानें पार पाडली. कुटुंबांतले कर्ते पुरुष तुरुंगांत गेलेले, सामान्य जनता हदरून व गांगरून गेलेली, संबंधी लोक थोडीशी झळ लागेल या कल्पनेनें अत्यंत विरोधी बनलेले व अपशब्दशूर झालेले, गजबजलेलें शहर असून ओसाड व निर्जन अरण्याप्रमाणें भासूं लागलेलें, आणि घरीं निष्कांचन स्थिति पूर्णत्वानें वास करीत असलेली, अशा भयानक वेळीं शोकानें, त्वेषानें वा उद्वेगानें ज्यांची आत्महत्त्येपर्यंतही मजल जावयाची अशा आपल्या जिवलग स्नेह्यांच्या अर्धांगींना धैर्याचें,

प्रेमाचें, सर्वतोपरी साह्याचें आणि सुविचारांचें पाठबळ देऊन ज्यांनीं आप्तजनांचे संसार कायम राखले त्या आबांची थोरवी काय वर्णावी ? रा. आबा दरेकर म्हणजे नगरकरांचे गल्लींतील कांहीं घरांचें जिवंत कुलूपच होत, असें त्यांचें अनुकरणीय खासगी वर्तन असे. खरोखर एक दरेकरच काय ? पण त्या वेळच्या पांच सहा कुटुंबांची अशी समरस व एकजीव वृत्ति होऊन गेली होती कीं, कुटुंबांतलीं मुलेंबाळें, पुरुष व स्त्रियाही इतरांना कांहीं तरी विशेषत्वानें भासत असत. एकमेकांचें नातें काय ? असा प्रश्न लोकांत व त्या कुटुंबांत उत्पन्नच होत नसे. कारण एकमेकांचें नातें असलें पाहिजे ही इतरांची खात्री व लौकिक नात्यापेक्षां प्रेमाचें एकजिनसी एकमेकांचें नातें आहेच अशी त्या कुटुंबांची खात्री होती. या प्रेममय जीवनामध्यें देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, यजुर्वेदी हे ब्राह्मणांतले भेद, मराठा, कुणबी, माळी, न्हावी, तेली, तांबोळी, रजपूत, गोसावी ब्राह्मण, वगैरे जातिविषयक भेद व हिंदु, पारशी, ख्रिश्चन वगैरे धर्मविषयक भेद हे जगांत नाहींतच अशीच भावना उत्पन्न होऊन रूढ झाली होती. स्वातंत्र्याचें ध्येय ज्यांचे अंतःकरणांत पूर्ण बाणलें आहे तो मनुष्य इतक्या उदात्त विचाराचा, विस्तृत अंतःकरणाचा झाल्याशिवाय राहात नाहीं. त्याला स्वातंत्र्य हाच धर्म, स्वातंत्र्य हाच देश, स्वातंत्र्य हीच जात व स्वातंत्र्येच्छु अंत.करण हेच त्यांचे बंधु होत. याशिवाय दुसरी जाणीव त्याला शिल्लक राहात नाहीं. अशी स्थिति त्या वेळेस कांहींची तरी झालीच होती हें निर्विवाद होय आणि याच वृत्तीवर रा. दरेकर हे आरूढ झाले होते.

११. **दडपशाहीस सुरुवात**:—अभिनव भारताला ऊर्फ मित्रमेळा या संस्थेला सन १९०० पासून १९०६-७ पर्यंतचा काळ एकंदरीनें मोठ्या उमेदीचा, खळबळीचा व उत्कर्षाचा असा गेला. पण सतीचें वाण हातीं घेतलेल्या, या अभिनव भारताच्या संघास ज्या नोकरशाहीविरुद्ध त्याचे

उद्योग चालू होते त्या सत्ताधारी नोकरशाहीकडून आलेली छळाची व संकटाची परंपरा भोगणें क्रमप्राप्तच होतें व अशा तऱ्हेच्या संकटास सुरवात होणार अशीं चिन्हें प्रथमच दिसूं लागलीं. रा. बाबा सावरकर हे मित्रमेळयाचे चिटणीस आहेत असें सिद्ध करून त्यांस शिक्षा देण्याकरितां पहिला खटला त्यांचेवर रचला गेला. साधरणतः मित्रमेळा या संस्थेची सभा वगैरे सर्व सार्वजनिक कामें नुसतें 'चिटणीस मित्रमेळा' एवढ्याच शब्दानें प्रसिद्ध होऊन होत असत. चिटणीस म्हणून कोणाचीही सही नसे. असें प्रसिद्ध करण्यांत कांहीं मोठा हेतू होता असें नव्हे. परंतु प्रथम 'चिटणीस मित्रमेळा' अशा स्वाक्षरीचें सभेच्या निमंत्रणाचें एक पत्रक प्रसिद्ध झालें आणि तीच पद्धत पुढें चालू राहिली व ती निःसंशय लोकमान्यही झाली. कारण १८९९ पासून १९०६ पावेतों त्यासंबंधीं कायदेशीर प्रश्न कोणीही उपस्थित केला नव्हता. परंतु संस्थेच्या वतीनें सार्वजनिक कामें अत्यंत नेटानें व उत्साहानें होऊन संस्था जनसमूहाचें चित्ताकर्षण करूं लागली व त्यामुळें शहरांत नवजीवन संचरूं लागलें, असें दृष्टोत्पत्तीस येतांच, स्थानिक नोकरशाहीच्या डोळयांत तें खुपूं लागलें. त्याचा प्रतिकार करण्याचा प्रारंभींचा प्रयत्न म्हणून हा खटला भरला गेला. त्या वेळेस मित्रमेळयातर्फे होणारीं कामें इतकीं उद्दीपक व लोकप्रिय होत कीं, 'चिटणीस मित्रमेळा' अशा स्वाक्षरीचें सभेचें–सामारंभाचें हस्तपत्रक निघाल्यावरोबर हजारोंनीं जनसमाज जमत असे व संस्थेचें तें कार्य अत्यंत उत्साहानें पार पडत असे. त्यावळेस ही संस्था म्हणजे तरुणांची; शहरांतील स्थानिक पुढाऱ्यांची नव्हती. स्थानिक पुढाऱ्यांनीं निमंत्रण केलेल्या सभेस अफाट (!) म्हणजे १०।१२ लोकांची भयंकर गर्दी होत असे व कित्येक सभा उद्दिष्ट कार्य न होतांच रहीत होत असत. १९०४।५ सालाची स्वदेशी चळवळ महाराष्ट्रांत सुरू झाली. तिचा जोर विशेषतः नासिक इतका त्या वेळेस कोठें

दिसला नाहीं. जवळ जवळ सर्व महाराष्ट्रभर नासिककरांनीं ही चळवळ प्रसृत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. प्रत्यक्ष नासिकास तर या चळवळीचें तेजच कांहीं निराळें होतें. मुष्टिफंड, राष्ट्रीय शाळा, स्वदेशीचा प्रसार बहिष्काराचा जोर यानें नासिक शहरांतला प्रत्येक कानाकोपरा दुमदुमून गेला होता. त्या तेजस्वी चळवळीच्या अनेकविध कार्यक्रमांत रा. दरेकरांचें अन्तर्गत असें साहाय्य फार मोलाचें होतें. जातीजातींतून, आळीआळींतून जागृति उत्पन्न करणें, सभा ठरविणें या कार्यांत आवांचें कौशल्य विशेष उपयोगीं पडे. या सर्व चळवळी करीत असतांना व सर्व चळवळींतून समाजास नेत असतांनाही समाजापुढें स्वातंत्र्याचें उच्च ध्येय ठेवण्यास अभिनव भारत व रा. दरेकर कधींही चुकत नसत. यामुळें या चळवळीस नासिकास जोर आला व तरुणांत कर्तव्याची आवड, बाणेदारपणा व त्यागवृत्ति उत्पन्न झाली.

अभिनव भारताची लघुपुष्पें छापून प्रसिद्ध होऊं लागलीं तसतसा रा. दरेकरांचा पूर्वीचा पोटाचा व्यवसाय संपुष्टांत आला; व मातोश्रींच्या उद्योगावर किंवा पुष्पांच्या विक्रीच्या तुटपुंज्या पैशावर त्यांचा चरितार्थ चालूं झाला. कारण त्यांच्या सभोंवतालीं केवळ पोशाखी मंडळी जमली होती. त्यांचा दरेकरांच्या पहिल्या उद्योगाचें कामीं कांहींही उपयोग होणें शक्य नव्हतें. कारण बाग वगैरे तयार करण्याचें काम हें जरी अत्यंत कष्टाचें नव्हतें तथापि हलक्या दर्जाचें व किचकट आणि तासन्तास करावयाचें असल्यानें त्या कामाची आवड सभोंवतालच्या मंडळींना असणें शक्य नव्हतें. रा. दरेकरांची पहिली मंडळी त्यांच्या झालेल्या या उत्क्रमणानें त्यांचेकडे जमेनाशीं झाली. अर्थात् त्यांचेकडून होणारीं कामेंही होईनाशीं झालीं व खुद्द रा. दरेकर यांस असल्या कामाचा आतां वीटही येत चालला होता. त्यामुळें त्यांना बराच त्रास सहन करावा लागत असे.

त्यांच्यापेक्षांही त्यांच्या मातोश्रींना भारी कष्ट होत. कारण त्यांचा गोविंदा पहिल्यासारखे पैसे न मिळवितां तिच्या दृष्टीनें नुसत्या रिकाम्या गप्पा मारूं लागला व उलट पहिल्यापेक्षांही बरीच वरच्या प्रतीची राहणी पत्करून खर्च अधिक करूं लागला, यामुळें त्या म्हातारीस शरीरकष्ट व मनःक्लेश अधिक होऊं लागले. पण एकुलता एक, अपंग, व गुणी मुलगा असल्यानें त्याच्यापुढें सदयतेमुळें व प्रेमपाशामुळें तिला हे कष्ट बोलून दाखवितां येत नसत इतकेंच.

**१२. वंदेमातरम्‌चा खटला**:—रा. दरेकरांस त्यांच्याविषयीं सहानुभूति व प्रेम असणारांकडून क्वचित् आर्थिक मदतही होत असे. त्यामुळेंही त्यांचे कांहीं खर्च भागत असत. अशा स्थितींत स्वातंत्र्याच्या उच्च वातावरणांत व नानातऱ्हेच्या विद्वत्ताप्रचुर वादविवादांत व अनेक प्रकारच्या उत्साहपूर्ण कार्यांत त्यांचा काल जात असतांना, अभिनव भारतावर पहिल्यापेक्षां जोराची संकटाची लाट आदळली. ती म्हणजे इ. स. १९०७ चा 'वंदेमातरम्' हा सुप्रसिद्ध खटला होय. मित्रमेळ्याचा विजयादशमीच्या सीमोल्लंघनाचा समारंभ, प्रतिवर्षीं मोठ्या समारंभानें पार पाडण्याचा कार्यक्रम मित्रमेळ्याकडून मोठ्या उत्साहानें साजरा केला जात असे. या उत्सवांत नवरात्राचे दिवसांत नाशिक येथील गांवाबाहेर असणाऱ्या कालिका मंदिरांत देवीच्या दर्शनास जाण्याचा शहरवासीयांचा प्रघात आहे. त्या प्रघातास अनुसरून सीमोल्लंघन समारंभाची मिरवणूक गांवांतून कालिका मंदिरापर्यंत जाऊन येण्याच्या वहिवाटीप्रमाणें निघाली होती. 'स्वातंत्र्यदेवी' 'वंदेमातरम्' 'लोकमान्य टिळक' वगैरेंचा जयजयकार मोठ्या उत्साहानें व प्रेमानें चालू होता. परंतु हा जयजयकार व हा वाढता समारंभ त्या वेळच्या अधिकाऱ्यांस सहन न झाल्यानें त्यांनीं गांवांतून मंदिरापर्यन्त जाणाऱ्या रस्त्यावर ठिकठिकाणीं पोलीस बसवून जयजयकारास व मिरवणुकीस निष्कारण अडथळा सुरूं

केला. त्याचा परिणाम म्हणजे विजयादशमीच्या दिवशीं झालेल्या मारामारीच्या रूपानें दिसून आला. ही मारामारी मुद्दाम विशिष्ट गोष्टीकरितांच घडवून आणिली गेली असा लोकांचा नोकरशाहीबद्दल जबर संशय होता. कारण मिरवणुकींत हजारों माणसें असतांना ज्यांचा त्या मारामारीशीं बिलकूल संबंध नव्हता अशा, व कांहीं लोक या मारामारीच्या वेळीं समारंभांत नसून गांवांत होते व कांहीं परगांवींही होते अशांनाही नेमकें धरून म्हणजे श्री. बाबासाहेब खरे, रा. रामभाऊ दातार व रा. श्री. र. वर्तक वगैरे यांजवर दुसरे दिवशीं खटले भरले गेले. या सरकारी अभियोगाचा ( खटल्याचा ) त्रास जवळ जवळ एक वर्षभर मित्रमेळ्याच्या मंडळीस काढावा लागला व हा अभियोग नाशिक जिल्ह्यांतल्या निरनिराळ्या गांवांतूनही चालविला गेला. अशा रीतीनें जेरीस आणण्याची इच्छा असतांनाही आरोपित सर्व मंडळी अभियोगाकरितां ज्या ठिकाणीं नेलीं गेलीं तेथें तेथें अभियोगाच्या प्रत्यक्ष कालाव्यतिरिक्तच्या कालांत, स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीचा प्रसार करण्याचा प्रयत्न मंडळींनीं मोठ्या धडाक्यानें केला. अशा तऱ्हेनें मित्रमेळा न दवतां स्वमतप्रसाराचें कार्य मित्रमेळ्यास करण्याचा समय अनायासें प्राप्त झाला. ह्या एका वर्षांचे उद्योगांत रा. दरेकरांचें साहाय्य पदोपदीं मोठें महत्त्वाचें समजलें जाऊन त्याचा उपयोग फार झाला.

या अभियोगाचे धामधुमींत आरोपित गृहस्थांचे झाडे घेणें वगैरे प्रकार चालत असतांना या बाबतींत घ्यावयाची सावधगिरी रा. दरेकर आपल्या चतुरपणानें अगोदरच घेऊन ठेवीत असत व हाच प्रघात पुढच्या सर्व लहान मोठ्या अनेक प्रसंगांमध्यें त्यांचा होता. वास्तविक रा. दरेकरांचें घर म्हणजे अभिनव भारताचें ऊर्फ मित्रमेळ्याचें मुख्य ठिकाणच होय. दर शनिवारच्या अगर रविवारच्या नित्याच्या सभा, विशेष प्रसंगीं भरावयाच्या सभा,

पुस्तकालयें, ऐतिहासिक वगैरे सर्व तऱ्हेचें सामान ठेवण्याची जागा रा. दरेकरांचें घर हेंच होय. असें असतांही पुढें झालेल्या प्रसिद्ध खटल्याचे वेळीं रा. दरेकरांच्या घरांत कांहींही सांपडलें नाहीं.

**१३. कवितांचें निमित्तः**—त्यानंतरचा प्रसंग म्हणजे बंगाल्यांत सन १९०८ सालीं उडालेला बॉबचा धडाका हा होय. हा धडाका उडाल्याबरोबर त्याची झळ महाराष्ट्राला लागणार हें गृहीतच धरलें गेलें होतें. त्याप्रमाणें लोकमान्य टिळक व देशभक्त अण्णासाहेब परांजपे यांच्यावर खटले झाले व संधीस रा. बाबा सावरकर हे मुंबईस गेले असतांना एक महिन्याची त्यांनाहीं शिक्षा झाली. त्या शिक्षेनंतर लवकरच पुन्हां त्यांचेवर मोठा खटला उभारला गेला ( सन १९०९ ). या खटल्याच्या कोऱ्या पकड वारंटावर कलेक्टराची सही झाल्यावर अर्ध्या तासाचे आंत रा. दरेकर यांस ही बातमी कळली. त्यांनीं रा. सावरकरास ताबडतोब कळविण्याकरितां एका गृहस्थास मुंबईस पाठविलें. हें त्यांच्या सूत्रचालकत्वाचें निदर्शक म्हणून मुद्दाम दिलें आहे. रा सावरकरांचेवर खटला करण्यांत आणि त्यांचेवर १२१ व १२१ अ अशीं बादशहांचे विरुद्ध बंड करण्यासंबंधाचीं कलमें लावण्यांत अभिनव भारताच्या चळवळीस गाडून टाकण्याचाच उद्देश नोकरशाहीचा असावा. त्या शिवाय रा. सावरकरांना जन्मठेप काळें पाणी दाखविण्याचें दुसरें कोणतेंही कारण नसावें, असा त्या वेळेस सर्वांचा समज झाला. रा. दरेकरांच्या कवितेमुळें रा. सावरकरांवर हा प्रसंग, ते कवितांचे प्रकाशक होते म्हणून ओढवला. परंतु जितकें या कवितांना या खटल्यांत महत्त्व दिलें गेलें तितकें तें नव्हतें. कविता ह्या केवळ निमित्तकारण म्हणून पुढें केल्या. त्या वेळेस ज्या कांहीं दुर्दैवानें विशेष गोष्टी घडल्या त्या घडल्या नसत्या तर नुसत्या कवितांवरून राजद्रोहाच्या दृष्टीनें ज्यास्त ४।५ वर्षे शिक्षा झाली असती असा लोकांचा समज होता. पण जन्मठेपेस कारण कविता ह्याच

प्रामुख्यानें धरल्या गेल्या. या मुळें रा. दरेकरांच्या अंतःकरणास फार दुःख होई कारण त्यांची समजूत आपल्या कविता ह्याच त्यांच्यावर प्रसंग आणण्यास कारणीभूत झाल्या अशी झाली व त्यामुळें त्यांनीं बरीच वर्षे कविता करण्याचा नादही सोडून दिला होता.

प्रत्यक्ष जॅक्सनच्या खुनाच्या ( १९०९ डिसेंबर ) खटल्याचे वेळीं तर रा. दरेकर हे प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें अत्यंत विकल होऊन पडले होते. तशा स्थितींतही त्यांस नोकरशाहीकडून बराच त्रास दिला गेला. परंतु या खुनाशीं कोणत्याच प्रकारचा त्यांचा संबंध नसल्यानें नोकरशाहीला त्यांचें जवळ कांहींच सांपडलें नाहीं. खुनाचे व कटाच्या खटल्याचे वेळीं रा. दरेकरांना पकडून कच्च्या कैदेंत ठेवण्याचा स्थानिक अधिकाऱ्यांचा इरादा असावा; व त्या तयारीनें ते रा. दरेकरांच्या घरीं आलेही असावेत. परंतु त्यांची अत्यंत रुग्णावस्था पाहून त्यांचा आपणास कांहीं उपयोग होणार नाहीं हें ध्यानांत आल्यानें–दयेनें• नव्हे–तो हेतु त्यांस सोडून द्यावा लागला. तरीही तशा विव्हल अवस्थेंतही पांच चार वेळेस त्यांच्याकडून कांहीं माहिती मिळेल अशा समजुतीनें दोन दोन चार चार तास त्यांची भेट घेऊन धाकदपटशानें व इतर निरनिराळ्या तऱ्हेच्या संभाषणप्रकारानें अधिकारी वर्गानें त्यांची कसून चौकशी केली. परंतु रा. दरेकरांकडून अधिकाऱ्यांस उपयोगीं पडेल असें एकही अक्षर अगर साधन मिळूं शकलें नाहीं. अंगांत मनस्वी ताप, सर्वांग विशेषतः सांधे भयंकर सुजलेले व ठणकत असलेले, सर्व नित्यविधी ठिकाणच्या ठिकाणींच होत असलेले आणि वाचा व बुद्धिही स्वाधीन नसलेली अशी त्या वेळीं त्यांची स्थिति होती.

या दुखण्यांतून सुमारें २।२ महिन्यांनीं ते साधारणपणें बरे झाल्यावर भोंवतालच्या परिस्थितीकडे पाहूं लागले. तों त्यांना निराशेशिवाय कोठें कांहींही दिसूं शकलें नाहीं. सर्व जिवाचे जिवलग पकडले गेले आहेत.

त्यांच्या घरांतून चिंतेचें व शोकाचें काहूर माजलें आहे. प्रतिष्ठित म्हणविणारे व सहानुभूति दाखविणारे लोक प्रसंगीं ओळखही विसरून गेलेले व सर्व गांव हदरून गर्भगळीत झालेला, पकडलेल्यांचे आप्तइष्ट शिव्याशाप देण्यामध्यें गर्क झालेले व अधिकारी वर्ग पूर्ण उन्मादाच्या स्थितींत चढलेला ! अशा स्थितींत एकटे रा. दरेकर हे काय करूं शकणार ! ! ! तथापि ज्यांनीं ज्यांनीं समक्ष भेटून जो जो सल्ला मागितला तो तो प्रेमानें व आस्थेनें देणें, खटल्याचे कामीं कपटपटू व खोटेंनाटें करण्यांत पटाईत असलेल्या व लोकांच्या चितेवर आपला स्वयंपाक शिजविणाऱ्या स्वार्थी व लोभी लोकांच्या नीच प्रयत्नास जिकडून कमी यश येईल, त्यांचे धागेदोरे बनावट अशा आधारावर बळकट होऊन त्यानें पकडलेल्यांचे गळे ज्यायोगें अधिक घट्ट आवळले जाणार नाहींत असे प्रयत्न शक्य तर करणें हेंच काम त्या वेळीं त्यांचे होतें व तें त्यांनीं यावत् शक्य तितकें पार पाडलें. यानंतर रा. दरेकर हे रा. रामभाऊ दातार यांचे येथें पुण्यास प्रकृतिस्वास्थ्यासाठीं गेले ते तेथें बरेच महिने होते,

१४. **आध्यात्मिक विषयाकडे कलः—**साधारण प्रकृतीला बरेंच बरें वाटल्यावर ते परत नासिकास आले. त्यावेळीं ( इ. स. १९१० त ) खटल्याचा निकाल लागला होता व बहुतेकांस जबर शिक्षा ठोठावण्यांत आल्या होत्या. त्यामुळें याच्या पुढचें रा. दरेकरांचें कार्य म्हणजे शिक्षा झालेल्या लोकांच्या कुटुंबांची सर्व तऱ्हेची व्यवस्था लावणें हेंच ठरलें. शिक्षा झालेल्यांच्या स्त्रियांनीं शोकवश होऊन आपल्या आयुष्याचें भलतें सलतें करूं नये म्हणून त्यांचें समाधान करणें, त्यांना निरनिराळ्या प्रसंगांत धीर देणें, त्यांना आध्यात्मिक व ऐतिहासिक असे निरनिराळे ग्रंथ वाचून दाखविणें व त्यांच्या सर्व तऱ्हेच्या रोजच्या गरजा भागविण्याची व्यवस्था करणें, त्यांच्या घरांतील कारभारांची व्यवस्था लावणें, पत्रव्यवहार

करणें, त्यांच्या आरोग्याची काळजी ठेवणें अशी अनेक तऱ्हेची व्यवस्था त्यांना बरींच वर्षें करावी लागली व मनही उदास, हताश झालेलें असल्यामुळें त्यांच्याकडून ४-५ वर्षांच्या अवधींत देशविषयक अगर वाङ्मयविषयक कसल्याच प्रकारचें कार्य होऊं शकलें नाहीं.

याच उदासीनतेमुळें आणि इतरांकरितां कराव्या लागणाऱ्या आध्यात्मिक विषयांच्या वाचनामुळें त्यांचें मन आध्यात्मिक विषयाकडे जास्त ओढ घेऊं लागलें असावें असें वाटतें व असें होणें हेंच शक्य होतें. कारण स्वातंत्र्याचें उच्च ध्येय मनापुढें ठेवून त्याकरितां करावयाचे प्रयत्न, वेचावयाचें शक्तिसर्वस्व, यांचा त्यांच्या सहवासीयांच्या बरोबरच विध्वंस झालेला होता; व त्याच्या पुनरुज्जीवनाचा अल्पांशानेंही संभव नसल्यानें त्यांची वृत्ति हताश व उदास होणें शक्य होतें. आणि यामुळेंच त्यांचा अध्यात्माकडे ओढा लागणेंही अपरिहार्य होतें. याचा परिणाम रा. दरेकरांवर होऊन त्यांनीं विशेषकरून दासबोध, ज्ञानेश्वरी, तुकारामाचा गाथा, रामतीर्थ व मुख्यतः श्रीस्वामी विवेकानंद यांचें अध्ययन सुरूं केलें, व रोज सकाळीं धारणाध्यान करण्यास प्रारंभ केला. त्यांत त्यांची मनःस्थिति बरीच रंगली. उदास व निराश झालेल्या मनुष्याला तत्त्वज्ञान बरोबर समजतें व पटतें व तो मनुष्य सर्व विषयांकडे निःसारबुद्धीनें पाहूं लागतो. त्याचें विषयांवरचें ममत्व नाहींसें होतें व असेंच रा. दरेकरांचें झालें. या पांचसहा वर्षांत त्यांची वृत्ति वर सांगितल्याप्रमाणें झाली. त्यामुळें त्यांच्या कवित्वास विषयच नाहींसा झाला होता. कारण त्यांचें जीवन स्तब्ध बनलें होतें.

१५. **पुनश्च हरिःॐः**—१९०८ ते १९१६ पावेतों नासिक शहर निश्चेतन स्थितींत होतें. कसलीही सभा अगर चळवळ या कालांत होऊं शकली नाहीं. सन १९१४ सालीं लोकमान्य टिळक तुरुंगांतून सुटल्यावर

नासिकास आले होते. त्या वेळीं त्यांचेंहीं व्याख्यान अगर जाहीर सन्मान होऊं शकला नाहीं. स्वराज्यसंघाची स्थापना बेळगांवीं यापूर्वीच १–२ वर्षें झाली असून व महाराष्ट्रांत जिल्हानिहाय त्याच्या शाखा स्थापन झाल्या असूनही नासिकास १९१७ पावेतों स्वराज्यसंघाच्या शाखेची स्थापना होऊं शकली नाहीं. परंतु ही शहराची मृतप्राय स्थिति फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. नासिकला ' पुनश्च हरिः ॐ ' करण्यास योग्य अशी संधि प्रांतिक परिषदेच्या निमित्तानें नाशिककरांनीं साधून घेतली. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय चळवळी पुनः जोरानें या प्रांतिक परिषदेच्या निमित्तानें सुरू झाल्या. ही सतरावी प्रांतिक परिषद सर्व दृष्टींनीं अपूर्व अशी झाली. स्वराज्यसंघाची वार्षिक परिषदही या परिषदेबरोबरच भरली गेली. या दोन्ही परिषदांच्या निमित्तानें चार पांच हजारावर प्रतिनिधि सर्व ठिकाणांहून एकत्रित झाले होते. या निमित्तानें नासिकापासून दूर दूर गेलेल्या व कांहीं बंधमुक्त झालेल्या व नासिकच्या तरुण हुतात्म्यांविषयीं सात्विक प्रेम व पूर्ण सहानुभूति बाळगणाऱ्या अशा महाराष्ट्रभर पसरलेल्या सर्व देशभक्तांच्या भेटीगांठींचा योग अनायासें आला. या सर्वांच्या भेटी रा. दरेकरांच्या घरीं झाल्या. सर्वांचे विचार व उच्चार आणि मनोरहस्य एकमेकांना समजलें गेलें. यामुळें प्रत्येकाला धीर येऊन नवजीवन प्राप्त झालें. याचा परिणाम निराश व निस्तब्ध बनलेल्या रा. दरेकरांवरही झाला त्यांच्या मनाला वाचा व वाचेल मन यांची सांगड जमून एक प्रकारची टवटवी त्यांना प्राप्त झाली. त्या वेळीं " तुम्ही स्वस्थ बसूं नका. तुमच्या नैसर्गिक प्रतिभासंपन्न काव्याला पुन्हां महाराष्ट्रभर संचार करूं द्या असा सर्वांनीं अत्यंत आग्रह केला. " व त्या वेळेस रात्रभर जागून त्यांच्या सर्व कवितांचें सामुदायिक व व्यक्तिशः पारायण व गायन त्यांच्या समक्ष मोठ्या कौतुकानें केलें गेलें. यामुळें आपल्या कवितांच्या प्रसिद्धिकरणानें रा. गणपतराव सावरकर तुरुंगांत गेले व अशाच कविता करून इतरांच्यावर

हीच आपत्ति ओढवेल हा आक्षेप कांहीं अदूरदर्शी व घाबरट वृत्तीच्याच लोकांनीं उत्पन्न केलेला असून त्यास सार्वत्रिक थारा नाहीं हें ओघानेंच त्यांच्या निर्दशनास आलें व रा. दरेकर पुनः कविता करूं लागले.

त्यांच्या कवितेचा पुनश्चहरिःॐ त्यांच्या सुप्रसिद्ध 'सरस्वतीच्या भूपाळी' पासून झाला. यानंतर त्यांनीं निरनिराळया प्रसंगांनीं निरनिराळ्या कविता केल्या. या कविता प्रसिद्ध करण्याचें कार्य कांहीं दिवस तसेंच राहिलें. कारण मुद्रक व प्रकाशक यांचा अभाव व प्रकाशनास आवश्यक अशा द्रव्याचाही अभावच होता. आणि रा. दरेकर हे स्वतः कोणासही "माझें पुस्तक छाप व प्रकाशक व्हा" असें म्हणत नसत. परंतु हिंदुधर्म परिषदेच्या प्रथम अधिवेशनाचें 'स्वागतपद्य' छापूनच वाटण्यांत आलें. सन १९२० सालीं नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या अगोदर रा दरेकर हे त्यांचे सन्माननीय मित्र रा. विश्वनाथराव केळकर वकील यांच्या येथें प्रकृतिस्वास्थ्याकरितां गेले असतां नागपूरच्या राष्ट्रीय सभेचा अपूर्व समारंभ त्यांना पहाण्यास सांपडला. त्याच नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं त्यांच्या ६ कवितांचें एक लघुपुष्प कै० विठ्ठल गौरी शंकर मिश्र हे त्यांचे प्रकाशक झाल्यानें प्रसिद्ध झालें. त्यानंतर त्यांच्या गीतांची तीन पुस्तकें छापलीं गेलीं. या कवितांच्या निर्मितीखेरीज या कालांत त्यांच्या हातून सार्वजनिक कामगिरी फारच थोडी झाली. याचीं कारणें म्हणजे पूर्वीच्या अभिनव भारताच्या ध्येयानुसार केल्या गेलेल्या चळवळींचा या कालांत पूर्ण अभाव झाला होता इतकेंच नव्हें तर त्या ध्येयाची कल्पनाही जवळ जवळ नष्ट झाली होती. आणि चालू असलेल्या चळवळीचें स्वरूप मिळमिळीत व रा. दरेकरांस न पटणारें असें होतें.

या कालांतली सर्व साधारण आकर्षक अशी चळवळ म्हणजे हिंदी स्वराज्य संघाची होय. लो. टिळकांनीं ही चळवळ सर्व बृहन्महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत प्रसृत करून जें कार्य घडवून आणलें त्यासंबंधीं रा. दरेकरांना योग्य

अभिमान व आनंद वाटत असे. परंतु या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेऊन करितां येण्यासारखें कार्य रा. दरेकरांस शक्य नसल्यानें व ध्येयाच्या दृष्टीनें हिंदी स्वराज्य संघाचें ध्येय व्यावहारिक कोटींतलें असल्यानेंही त्यांचें मन तीव्रतेनें त्यांत वेधलें नाहीं हें खरें. लोकमान्यांच्या गुणगौरवास्तव त्यांच्या जगन्मान्य श्रेष्ठतेस्तव त्यांचा केला गेलेला साठावा वाढदिवस समारंभ महाराष्ट्रानें मोठ्या हर्षातिरेकानें साजरा केला. त्या प्रसंगाला अनुसरून लोकमान्यां संबंधीं अंःतकरणांत वसत असलेल्या सर्व प्रकारच्या सत्य व उच्च भावनांचा समुच्चय रा. दरेकरांनीं आपल्या उत्कृष्ट अशा काव्यानें प्रदर्शित केला. रा. दरेकरांचें लोकमान्यांवरील हें तिसरें काव्य होय. लोकमान्यांसंबंधीं निरनिराळ्या वेळीं केलेल्या या तिन्ही काव्यांत लोकमान्यांविषयीं या कवीची असलेली प्रेमादरयुक्त पूज्य बुद्धि एकसारखी अनुस्यूतच असलेली दिसते. यावरून लोकमान्यांच्या विषयीं पूर्ण जाणीव कवीला होती असें स्पष्ट होतें. यानंतर लोकमान्यांच्या निधनसमयींही रा. दरेकरांनीं शोकविव्हल होऊन लोकमान्यांविषयीं आपल्या उज्ज्वल अशा भावना काव्यरूपानें प्रगट केल्या आहेत. असें जरी असलें तरीही लोकमान्यांनीं चालविलेल्या स्वराज्यसंघाच्या चळवळीस ते दुय्यम प्रतीची चळवळ समजत असत, हेंही तितकेंच खरें आहे च कांहीं करतां येत नाहीं त्यापेक्षां लोकमान्यांची चळवळ योग्य आहे असें ते अभावपक्षीं मानीत.

१८ **मनःप्रवृत्ति व परिस्थिति यांची फारकतः**— यानंतरची चळवळ म्हणजे सध्यां अंशभूत चालू असलेली महात्माजींची असहकारितेची चळवळ होय. लोकमान्य दिवंगत झाले. रौलॅट ॲक्ट नोकरशाहीनें कायम करण्याचें घोषित केलें. त्याचा सर्वस्वी प्रतिकार करावा म्हणून देशांत जोराची चळवळ सुरू झाली व त्याचें पर्यवसान असहकारितेच्या रूपांत झालें. महात्मा गांधींची त्या वेळची भाषा, कायदेभंग करण्याची घोषणा व त्याकरितां

करावयाचा सार्वत्रिक सत्याग्रह, नोकरशाहीस तोंडीस तोंड म्हणून स्वतंत्र लोकशाही स्थापन करण्याची उमेद व हा सर्व कार्यक्रम पार पाडण्यास आवश्यक अशा शांततेकरितांच पाळावयाचें अहिंसा व्रत अशा मोहक व क्रांतिदर्शक आंदोलनांत कांहीं काल क्रांतिकारकही साशंक मनानेंच सामील झाले. या प्रसंगीं रा. दरेकरांच्या घरीं अनेक वेळां वादविवाद झाले. त्यांत रा. दरेकर हे पूर्णपणें या चळवळीच्या विरुद्ध होते.

प्रथमतः लौकिकरीत्या म. गांधींचें वैयक्तिक महत्त्व मान्य करुनही त्यांनीं अहमदाबादेच्या दंग्याचे वेळीं या दंग्याचे कामांत सुशिक्षितांचें चिथावणीचें अंग आहे असें केलेलें विधान, युरोपियनांस त्यांच्या झालेल्या नुकसानीकरतां लोकांनीं दंड भरून द्यावा ही त्यांची आज्ञा, वरिष्ठ कायदे कौन्सिलांत पंडित मोतिलाल नेहरू व पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अविश्रांत व जिवापाड प्रयत्नानें कत्तलीचा सर्व दोषारोप युरोपियनांवर भरभक्कम पुराव्यानें सिद्ध केला असतांही इंडेम्निटी बिलास महात्माजींनीं दर्शविलेली मान्यता, बार्डोलीचा फुसका बार, शांततेनें मिळणारें स्वराज्य, कायिक, वाचिक, मानसिक अहिंसेनें मिळणारें स्वराज्य, एका वर्षांत स्वराज्य, सुतानें व चरख्यानें मिळणारें स्वराज्य इत्यादि कृत्यांनीं व तत्त्वांनीं रा. दरेकरांचें मन या चळवळींतून उठून गेलें होतें. इतकेंच नव्हे तर या चळवळीला पूर्ण विरोधही ते करीत होते. त्यांच्या हयातींत महात्माजींवर एकही काव्य त्यांनीं केलें नाहीं. यावरून महात्माजींच्या चळवळीसंबंधानें जसा कवीचा विरोध दिसतो तसा वैयक्तिक दृष्ट्या महात्माजी-संबंधानें आदरही दिसून आला नाहीं. कवीच्या ध्येयाच्या व कार्यक्रमाच्या विरुद्ध टोकावरच ही चळवळ सुरूं असल्यानें त्यांनीं यांत भाग घेणें म्हणजे आपण आपल्याच ध्येयाच्या व कार्यक्रमाच्या शत्रुस्थानीं होणें असें त्यांना वाटत होतें. म्हणूनच ते या चळवळींत कोणत्याही प्रकारें भाग घेऊं शकले नाहींत.

रा. दरेकर हे याप्रमाणें कोणत्याही चळवळींत भाग घेत नसत, तरीही आपण शपथपूर्वक स्वीकारलेल्या क्रांतीच्या ध्येयाचें निर्मूलन होणें व तो मार्ग अजिबात विसरला जाणें हें केव्हांही त्यांना योग्य वाटत नसल्यानें चालू असलेल्या सर्वस्वी विरुद्ध अशा शांततेच्या युगांतही आपला मार्ग बीजरूपानें रहावा या उद्देशानें त्यांनी व त्यांच्या कांहीं मित्रांनीं विचार करून एक क्रांतिमार्गाचें बोधक वाङ्मय प्रसिद्ध करणारें मंडळ स्थापन केलें. त्या मंडळाच्या वतीनें एक वर्तमानपत्रही नाशिकास चालू करावें असें ठरवून त्याप्रमाणें स्वतः झीज सोसूनही त्यांनीं प्रयत्नाची शिकस्त केली. कदाचित् सावरकरबंधू बंधमुक्त झाल्यास त्यांनाही सुटल्याबरोबर एखादें आसन तत्क्षणींच लाभावें व त्यांची गैरसोय दूर होऊन त्यांचेपासून व्हावयाचा लाभ जनतेस मिळावा हाही दुय्यम हेतु त्यामध्यें त्यांचा होता. त्याप्रमाणें नासिकास "स्वातंत्र्य" या नांवाचें वृत्तपत्र सुरू झालें. परंतु या प्रयत्नाचा उद्दिष्टानुरूप उपयोग झाला नाहीं.

१७. **मित्रांची सुटका:** – याच कालांत ह्मणजे १९२२ ते २४ च्या दरम्यान रा. दरेकरांच्या मनास आनंद होईल अशा दोन गोष्टी घडून आल्या. त्या म्हणजे १९२२ सालीं रा. गणेश दामोदर ऊर्फ बाबा सावरकर यांची व १९२४ त रा. विनायक दामोदर ऊर्फ तात्या सावरकर यांची जन्मठेप काळ्यापाण्याच्या शिक्षेंतून मुक्तता या होत. यामुळें त्यांना अत्यंत आनंद झाला व ते मनाच्या एका स्वतः कल्पिलेल्या अशा जाचणींतून मुक्त झाले. रा. बाबा सावरकर मुंबईस अत्यवस्थ स्थितींत अजारी असतांना त्यांना भेटण्याकरितां रा. दरेकर आपल्या स्वतःच्या रुग्णस्थितीकडे दुर्लक्ष करूनही अत्यंत तातडीनें गेले व आपल्या मित्राच्या सुटकेचा पण मृत्युशय्येंत असलेल्या अवस्थेचा असा सुखदुःखात्मक भावनांचा अनुभव घेऊं लागले. बॅ. सावरकर सुटून नासिकास आल्यावर ज्या वेळीं रा. दरेकरांची व त्यांची भेट झाली त्या

वेळींही त्यांना अत्यंत समाधान झालें. तसेंच बॅ. सावरकरांना सर्व महाराष्ट्रातर्फे जी थैली अर्पण करण्याचा अपूर्व समारंभ झाला त्या वेळींही त्यांना स्वर्गीय आनंद झाला.

याच वेळेस रा. दरेकर यांची प्रकृति साधारणतः बिघडूं लागली होती. परंतु यापुढें मात्र दिवसेंदिवस त्यांची प्रकृति खालावत चालली. त्यांचा नित्याचा ध्यानधारणेचा व वाचनाचा कार्यक्रमही त्यांना झेपेनासा झाला व सोडावाही लागला ! त्यांच्या हृदयांत विशेषतः विकार जडला. नित्यज्वर, अग्निमांद्य, शौचास, साफ न होणें, हृदयाची कालवाकालव व धडधड हे विकार सुरू झाले. शरीरांतील रक्ताचाही नाश हलके हलके होऊं लागला. चावून गिळणें दुःसह झालें. यामुळें केवळ पातळ पदार्थ व तेही थोडे असे घेऊनच भागवावें लागे. विचार करण्याची व वादविवाद करण्याची शक्ति नष्ट झाली. झोंपही कमी झाली. परंतु मनाची तळमळ मात्र कायम राहिली. देशस्थितीचा निदिध्यास व स्वतःच्या उत्क्रांतीची उत्कंठा या दोन विचारांनीं त्यांच्या मनांत अखेरपर्यंत काहूर उठत राही, ते वेदनांनीं इतके जर्जर व त्रस्त झाले होतें कीं मृत्यूशिवाय त्यांना कोठेंहि विसांवा दिसेना. विचारानें व निर्धारानें मृत्यूची भीति त्यांचेपासून दूर राहिली होती. मृत्यूची तात्त्विक कल्पना त्यांना पूर्ण असल्यानें ' मृत्यू ' ह्या कल्पनेचें सर्व तऱ्हेचें भयानक महत्त्वच त्यांच्यापुरतें नष्ट झालें होतें, इतकेंच नव्हे तर मृत्यू हें सुखाचें स्थान, स्वरूपानंतरची सोय, निसर्गाची अवस्था, असा त्यांचा ग्रह झाल्यानें ती एक आदरणीय अवस्था आहे असें त्यांना वाटूं लागलें होतें. हें त्यांचें वाटणें निसर्गाचा वा परमेशाचा सत्यत्वानें साक्षात्कार घेऊन तेच बोल बोलणाऱ्या साक्षात्कारी प्रतिभावान, सत्कवींच्या सत्यप्रमेयाप्रमाणें अंतर्बाह्य सत्य स्वरूपाचें होतें. तेंच त्यांच्या प्राणोत्क्रमणकालीन " सुंदर मी होणार " या कवितेंत प्रतीत झालें. रा. दरेकरांचा हें काव्य प्रगट करण्याचा काल इतका बिकट, सहस्र यातनांनीं युक्त होता कीं, या कालांत

लौकिकार्थ करावयाची कविता करणेंच त्यांना शक्य नव्हतें. म्हणून ही कविता म्हणजेच त्यांच्या पवित्र विचारांशीं तादात्म्य पावून स्वयमेव उत्स्फूर्त झालेली भगवती शारदाच होय.

१८. **शेवट**:—त्यांच्या मृत्यूच्या अगोदर त्यांना दुःख देणारे असे एकदोन प्रसंग घडून आले. ते म्हणजे त्यांना बऱ्याच प्रसंगीं अंतःकरणपूर्वक प्रेमानें व कर्तव्यतत्परतेनें आपलें म्हणणाऱ्या रा. रामभाऊ दातार यांचा, ( स्वतःच्या मृत्यूच्या अगोदर ७ दिवस ) झालेला मृत्यु व लहानपणापासून ज्यांच्या घरांत ते आमरण राहिले व ज्यांच्या मोठ्या मनानें ते एक घरांतले कौटुंबीयच समजले गेले, त्या रा. धोंडभट विश्वामित्र यांच्या एकुलत्या एक सुशिल, सुस्वभावी, आचारसंपन्न, व आज्ञाधारक, आणि पुत्राप्रमाणें निर्विशेष प्रेम असणाऱ्या अशा तरुण यशवंत विश्वामित्राचा दिसत असणारा मृत्यूचा काल हे होत. जिवाच्या इतक्या धडपडींतही रा. रामभाऊ दातारांच्या मृत्यूविषयीं शोकप्रदर्शक असें त्यांनीं पत्र लिहिलें. यावरूनच त्या दोघांचा संबंध किती जिव्हाळ्याचा होता हें दिसून येतें. असो.

आपण लौकरच कालवश होणार हें निश्चित असल्यानें त्यांनीं निर्धास्तपणें आपल्या पाठीमागें असणाऱ्या आपल्या मातोश्रींची व्यवस्था लिहून ठेविली. आणि विशेष हा कीं आपल्या जुन्या नव्या कवितांची योग्य प्रकारची जोपासना होण्याकरितां एक मंडळ नेमिलें. या मंडळानें त्या कवितांचें मुद्रण करून त्यांपासून होणारें उत्पन्न सार्वजनिक संस्थांना मदत म्हणून द्यावें अशी योजना ठरविली व अखेर ता. २८–२–१९२६ फाल्गुन वद्य १ शके १८४७ रोजीं रात्रीं २॥ वाजतां त्यांनीं आपला देह ठेविला व ते ‘ सुंदर ’ झाले.

१९ **स्वभाव वर्णन:**—रा. दरेकरांचा स्वभाव सर्व साधारण चांगला होता. त्यागवृत्ति, मित्रप्रेम, यांचा त्यांचे ठिकाणीं उत्कटत्वानें विकास झाला होता. परंतु महत्त्वाकांक्षीपणानें कधीं कधीं तुटक वृत्तीनेंही ते वागत असत. त्याचप्रमाणें ते आग्रही असत. तसेंच त्यांची अंतःकरणवृत्ति कठोरतेची असे. त्यांच्यावर सौम्यभावनांचा कोणत्याही प्रकारचा त्वरित परिणाम होत नसे.

ते खोल बुद्धीचे व चौकसपणानें वागणारे असत त्यामुळें त्यांच्या मनाचा थांग लागणें मोठें कठीण असे. विचाराचे पक्के, व बुद्धीचे निश्चयी असे असल्यानें गृहीत कार्याविषयीं त्यांचेवर विश्वासून राहण्यास कोणासही शंका येत नसे. त्यांची बुद्धि एकाच वेळीं अनेक कार्यांत व्यवस्थितपणें सारखी चालत असल्यानें त्यांचेकडे कांहीं काल अभिनव भारताच्या नासिकच्या शाखेचें बरेंच महत्त्वाचें स्थान आलें होतें व त्या अवधींत त्यांची कार्यकुशलता पूर्णपणें व्यक्त झाली. त्यांना आपल्या पंगूपणाविषयीं अत्यंत वाईट वाटत असे व आपल्या बुद्धीच्या विकासास हा एक मोठा अडथळा आहे असें त्यांस सदोदित वाटे. आपण खरोखरच शक्यता असल्यास कोणी तरी फार मोठें होऊं शकूं किंवा वास्तविक असूंही शकूं अशी त्यांची जवळ जवळ खात्रीही असे व त्यामुळें त्यांना अनेकवेळां त्यांच्या परिस्थितीबद्दल वैताग उत्पन्न होई. असो. याप्रमाणें रा. दरेकरांचें संक्षिप्त जीवनचरित्र वाचकांना सादर करून त्यांचें ऋण अंशतः फेडण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांना हें चरित्र उद्दीपक वाटेल अशी आशा आहे.

रा. दरेकरांच्या काव्याच्या परीक्षणाचें महत्त्वाचें कार्य प्रो. जोग यांनीं पुढील निबंधांत केलेलें आहे. त्याकडे वाचकांचें लक्ष वेधून वाचकांची रजा घेतों.

# श्री. कृ. ब. महाबळ यांच्या आठवणी.

(१) रा. रा. अंताजीपंत काळे पैसाफंडाचे उत्पादक हे नासिक येथें आले असतांना रघुनाथ भटजी यांच्या मठांत पैसाफंडासंबंधीं सभा व्हावयाची होती. त्या सभेंत पैसाफंडाची कल्पना कशी आहे ? तिचा उपयोग व्यवहारांत कसा होइल याची जाणिव करून देणारें एखादें पद तयार व्हावें अशी इच्छा रा. काळे यांनीं प्रदर्शित केली. त्यावर रा. दरेकर यांनीं अर्ध्या तासाचे आंत पद तयार करून दिलें. पदांतील विषयाची मांडणी सोपी, सरळ, पण बाणेदार वृत्तीची पाहून रा. रा. काळे यांना फारच आनंद झाला, व इतक्या लौकर उत्तम पद्यरचना केली याबद्दल आश्चर्यही वाटलें. सभेंत कवीच्या संबंधीं कौतुकार्थ प्रशंसापर उद्गारही काढले.

× × × ×

(२) सन १९०३ ते १९११ पर्यंत कवींचा माझा विशेष परिचय नव्हता. मित्रमेळ्यांत पदें करून देणारे कवि आहेत, मित्रमेळ्यांतील एक गृहस्थ आहेत यापेक्षां अधिक जाणीव नव्हती. मेळ्याचें शिक्षण चालू असतां कधीं कधीं ऐकण्यास गेलों असतांना असें आढळून येई कीं, इकडे मुलें पद म्हणत आहेत व कवि पुढच्या ओळी करून देऊन पुढील कडवें म्हणण्याकरितां तयार करीत आहेत. विषयाची तयारी डोक्यांत पूर्णपणें असली म्हणजे कवीला शब्दरचना करण्यास कितीसा वेळ लागणार !

× × × ×

(३) श्रीशिवजयंत्युत्सव हा मित्रमेळ्याचा—जवळ जवळ सर्व नासिककरांचा—एक मोठा उत्सव सन १९०७।८ साला आखेरपर्यंत होत असे.

उत्सवाची सर्व व्यवस्था मित्रमेळा करी. या असल्या उत्सवप्रसंगीं कोणकोणतीं कामें कोणीं करावयाचीं हें आबांच्या घरीं निश्चितपणें ठरवून दिलेलें असे. या कामांत प्रत्यक्ष मित्रमेळ्यांत नसलेला परंतु स्वयंसेवक ह्मणून काम करणारा लहान विद्यार्थीवर्गही उत्साहानें भाग घेत असे. विशेष इतकाच कीं, त्यावेळच्या विद्यार्थीवर्गांत शिस्तीनें काम करण्याची हौस विशेष दिसे. आपआपलें काम व्यवस्थेशीर कसें पार पाडलें याची खबर आबांना प्रत्येकानें दिलीच पाहिजे असा परिपाठ असे. असल्या उत्सवप्रसंगीं मिरवणूक येऊन पोहोंचण्याचें अगोदर, सावरकरबंधू, दातारबंधू, खुशालसिंह, गणपति मगर, भाऊ सांगळे वगैरे मंडळी कवीला पाठीवर घेऊन उत्सवाचे ठिकाणीं अगोदर जाऊन पोहोंचत असत. तेथें पोवाडे किंवा पदें म्हणण्याचे वेळीं तबला वाजविण्याचें काम आबा करीत असत. गणपतिउत्सवांत गांवांत मेळा फिरत असतांना मेळ्या-बरोबर कवि गोविंदही असत. मेळ्याच्या शिक्षणाचें काम प्रामुख्यानें कवि करीत असत.

× × × ×

(४) सन १९१० च्या होमसत्रामध्यें बऱ्याच मंडळींच्या आहुत्या पडल्या त्यावेळीं आबा हे फारच आजारी होते. त्यावेळीं आपण अंथरुणावर तडफडून तडफडून असेंच मरणार असें त्यांना वाटत होतें. ह्मणून वा मरणा! अरे मरणच जर यावयाचें असलें तर मला अशा अशा प्रकारें येऊं दे असें प्रार्थनात्मक पद तयार करून त्याचें ते मनोमय पारायण करीत असत. तें पद ह्मणजे 'प्रतापराव गुजर यांनीं केलेली मरणाची प्रार्थना' हें होय. या पदावरून देशाला स्वातंत्र्य मिळवून देत असतांना, नव्हे, तें स्वातंत्र्य मिळालें आहे अशा वेळीं मला मरण येऊं दे अशी उत्कृष्ट देशभक्ति त्यांच्या हाडीं मांसीं खिळून गेलेली होती.

(५) प्रकृति चांगली सुधारल्यावर मग वेदांत विषयाच्या वाचनाकडे त्यांचा विशेष कल होऊं लागला. स्वामी रामतीर्थ, उपनिषदें, ज्ञानेश्वरी, दासबोध वगैरेचें वाचन होऊं लागलें. संस्कृत शब्दांचें व्याकरणदृष्ट्या ज्ञान व्हावें, म्हणून भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांचा अभ्यास सुरू झाला. संस्कृत मराठी कोशाच्या साह्यानें शब्दांचे अर्थ उलगडून घेऊं लागले. हिंदी, गुजराथी, व बंगालीमध्यें काव्य फार चांगल्या प्रकारचीं आणि सुबोध अशीं आहेत; म्हणून हिंदी गुजराथी व बंगाली भाषा शिकण्याकरितां त्या भाषेंतलि कोशासह सोपीं सोपीं प्राथमिक पुस्तकें मागवून त्यांचा अभ्यास चालविला. इंग्रजी भाषेचें थोडें तरी ज्ञान असावें म्हणून तर्खडकरांच्या तिन्ही भाषांतर पाठमाला, मराठी इंग्लिशटीचर व निरानिराळीं रीडर्स यांचा अभ्यास केला. मराठी भाषेचा व्याकरणदृष्ट्या अभ्यास झाला पाहिजे म्हणून प्रचलित असलेल्या व्याकरणाच्या पुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करावा, शक्य तितका अभ्यास, पुस्तकरूप गुरूंच्या चरणीं नम्रपणें शिष्यत्व पत्करून सदैव अर्पण करण्याचा परिपाठ चालू असे. आलेल्या शंकांचें चिंतन करून निवारण स्वतःच करून घ्यावयाचें व प्रत्यंतर पटावें म्हणून आमच्या सारख्यांना विचारावयाचें असा हा अभ्यासक्रम नित्याचा असे. प्राणायामाचें महत्त्व काय आहे हें पटवून घेण्याकरितां तोही अभ्यास निवांतवेळीं करावयाचा. ॐकारावर निश्चल दृष्टि ठेवून "त्राटक" करीत करीत शेवटीं भ्रुकुटीमध्याकडे दृष्टि ठेवून अभ्यास चालू झाला.

× × × ×

(६) मी एकदां आबांना म्हटलें कीं आबा ! मन हें फार त्रास देतें. एकाद्या ठिकाणीं एकसारखें लावून ठेवण्याचा विचार आला कीं पुरे, एकसारखे निरनिराळे विचार मनांत उत्पन्न होतात. नुसतें मूर्तीकडे पहात बसावें, तों बाह्यात्कारी दृष्टि मूर्तीकडे पण मनश्चक्षूपुढें कांहीं निराळाच प्रकार असतो, काय

करावें हेंच समजत नाहीं. त्यावर त्यांनीं ह्मणावें कीं, " काय करावें रे ? मी जर ब्राह्मण असतों तर आज ज्या गोष्टी श्रम करून कराव्या लागत आहेत, त्या कराव्या लागल्या नसत्या. ब्राह्मणांचा वाणी संस्कार, मनःसंस्कार हे मागील जन्मांच्या चांगल्या चांगल्या संस्कारांनीं उत्तम झालेले असतात, तसें आमचें मराठ्यांचें नाहीं. आमचे विचार किती कोते असतात, वाणी किती अशुद्ध असते, मनावर हलक्या प्रकारच्या विचारांचीं पुटें बसलेलीं असतात. त्यामुळें या प्रकारच्या अभ्यासांत मोठी तारंबळ उडते, डोकें भडकून जातें, एखादें वेळीं तर असें होतें कीं पळून जावें, परंतु आम्हीं हे असे—म्हणजे पांगळेः—

आबा ! तुम्ही प्रयत्न कसा करितां ? असें विचारतां आबा सांगत कीं, ' पहाटे अंथरुणांतच निजल्या निजल्या ॐकाराचा जप लक्ष लावून करण्याचा प्रयत्न. करावयाचा. मनांत विचार–मग ते उत्तम किंवा क्षुद्र कोणचेही असोत–ते येतातच; पण लक्षांत ठेवा कीं शक्य तितका लक्षपूर्वक जप करीत रहावयाचा. जेव्हां जेव्हां म्हणून मी रिकामा असतों तेव्हां तेव्हां हा जप चालूंच ठेवतों. कांहीं वेळ मनांत उत्पन्न होणाऱ्या वृत्तीची मौज पहात राहतों. ही वृत्ति उत्पन्न झाली म्हणजे तिच्याकडेच लक्ष पुरवावें तों ती इतकी कांहीं वाढत जाते कीं, जशा कांहीं समुद्राच्या मोठ्या लाटाच. ही वृत्ति दाबून टाकण्याचा प्रयत्न मी अलीकडे करीत नाहीं. कारण वृत्ति दाबून टाकण्याच्या प्रयत्नांत फार त्रास होतो. वृत्ति उत्पन्न झाली, होऊं द्या. आतां पुढें काय ? असा विचार करीत करीत पहावें तों ती नाहींशी होते तर दुसरी उत्पन्न होते. तिच्याकडे लक्ष पुरवावें तों तिची स्थिति पहिलीप्रमाणेंच, तोंच तिसरीची उत्पत्ति, असें सारखें चाललेलें असतें. होतां होतां कांहीं वेळानें शांत होतें. प्रथम प्रथम तर असें होई कीं, डोळे मिटून आंत काय आहे हें पाहण्याचा प्रयत्न करावा तर आपण अगदीं गडद अंधःकारांत

आहोंत. पर्वताच्या कड्यावरून एकाद्या खोल दरींत पडत आहोंत, कीं काय असें होई. कोठें जाण्यास वाटच नाहीं, भांबावून जावें. भीति वाटावी, घामाघुम व्हावें, जीव गुदमरल्यासारखें होई म्हणजे, चटकन डोळे उघडून सभोंवार निरर्थक पहात रहावें. वाटलेल्या भीतीचें, त्या गडद अंधःकाराचें व उडालेल्या तारांबळीचें आश्चर्य वाटावें आणि वाटावें कीं हें आहे तरी काय ? तों मनांत येई कीं, आपल्या पूर्वकर्माचे, जन्माचे, जे पूर्व संस्कार आहेत, त्यांचें हें दडपण असलें पाहिजे. तसाच नेटानें प्रयत्न करूं लागलों. भीतीला जरा बाजूला सारण्याचा प्रयत्न करूं लागलों. दाबून दडपून पुढें काय आहे, हें पाहावयाचेंच असें निश्चयानें चाललें असतां असें वाटे कीं, गडद अंधःकारांत लांबवर तेजःपुंज, परंतु बारीक चांदणी चमकावी तसा प्रकाश भासूं लागला. अंधःकारांतून उजेडांत येत असतां ज्या ज्या गोष्टी आपल्या प्रत्यक्ष अनुभवांत येतात त्याप्रमाणें डोळे मिटल्यावर अनुभवास येऊं लागल्या. जप चालूं होताच पुढें पुढें तोच प्रकाश मोठा होत होत मी आतां उजेडांत आलों असें वाटलें. मन शांत झालें, भीति गेली, आनंद वाटला, पण उजेडांतून पुढें कोठें जावयाचें ? हा विचार आला. विवेकानंद, रामतीर्थ, दासबोध, ज्ञानेश्वरी यांच्या वाचनानें चित्त, मन, बुद्धि आणि अहंकार यांची जी शाब्दिक जाणीव झाली असें वाटे तिचा विचार करूं लागलों. प्रथम प्रथम वृत्ति उत्पन्न होतात कशा ? लय पावतात कशा ? हेंच पाहूं लागलों. मन आणि बुद्धि हीं काय आहेत हें पाहूं लागलों. यांच्याही पलीकडे जाऊन अहंकाराचा विचार करूं लागलों, तों अहंकाराच्या पलीकडे जाणें फार कठीण. जातां आलें नाहीं. फारच घाबरलों. देहच नाहींसा होतो कीं काय न कळे असें होऊन जाई. शेवटीं आपलें सामर्थ्य नाहीं. पुढच्या जन्मांत ह्या संस्कारांचें गांठोडें बरोबर घेऊन जाऊं, नंतर मग पुढचें पुढें असें वाटे

लागलें. अहंकारचे पलीकडे जातां येत नाहीं. तें जर आलें असतें तर फार बरें झालें असतें.' मी आबांना विचारावें कीं, आबा ! तुह्मीं चित्त, मन, बुद्धि यांना ओळखून पलीकडे गेलांत असें ह्मणतां पण कसें कसें गेलां ? तें स्पष्ट समजावून द्या. तेव्हां त्यांनीं ह्मणावें कीं तें सांगतां येत नाहीं. स्वतःचा अभ्यास असल्याशिवाय कांहीं समजणें शक्य नाहीं. शद्बानें जाणीव करून देणें कठीणच. स्वानुभवाशिवाय पटणें शक्य नाहीं. इतकी गोष्ट खरी कीं, मी ब्राह्मण असतों, तर अहंकाराच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न खास झाला असता. असो ! पुढें पाहूं !

दुपारच्यावेळीं डोळे लावून मनन करीत असतांना, हळूंच न समजतां आपण जाऊन बसावें, पंधरा मिनिटें अर्धा तास होऊन जावा, तों तेथेंच स्वतःस झोंप लागून जावी. आपण जागें झाल्यावर विचारावें कीं, काय हो ! बसून झोंप घेत होतां कीं काय ? झोंप नव्हतों घेत, सहज विचार करीत बसलों होतों. तूं केव्हां आलास ? अमूक वाजतां. तुह्मींच डोळे लावलेले तेव्हां कशाला त्रास द्या ! तुह्मीं डोळे उघडाल ही वाट पाहतां पाहतां आमचेच डोळे लागले. अन् काय ! असें तर कित्येक वेळां माझ्या अनुभवास आलें आहे.

× × + +

(७) रा. रा. खुशालसिंह नारायणसिंह यांच्या आग्रहानें व्यायामशाळेचीं आह्मीं १७।१८ मंडळी आबांना बरोबर घेऊन थोडप किल्ला पाहण्याकरितां गेलों होतों. प्रथम वडनेर ( भैरवाचें ) येथें रात्रीं मुक्काम करून कार्तिक शु. १२ चे दिवशीं सकाळीं ९।१० चे सुमारास किल्ल्यावर जाण्याकरितां गाड्या जोडल्या. मंडळी मंडळी मिळून प्रवास होत असला ह्मणजे जी कांहीं मजा असते ती सर्वांस माहितच आहे. संध्याकाळचे सुमारास पायथ्याजवळचे वाडीला जाऊन पोहोंचलों. जो तो आपआपलें सामान घेऊन रस्ता चालूं लागला.

चालूं लागला. परंतु आबा म्हणजे ‘ पंगूल्लंघयते गिरिम् ’ अशी स्थिति. तेव्हां मी, त्रिंबकराव देशपांडे, सीताराम शिंपी, शंकरगीर गोसावी, आणि खुशालसिंह इतकी मंडळी गरुड वाहनाचें काम आळीपाळीनें करून रात्रीं ८ चे सुमारास ’ हट्टी ’ येथें खुशालसिंहाच्या घरीं जाऊन पोहोंचलों. दुसरें दिवशीं सकाळीं किल्ल्यावर जाण्याकरितां निघालों. किल्ल्याची चढण बरीच अवघड परंतु त्या कठीण चढणीवरून खुशालसिंहानें मोठ्या कुशलतेनें आबांना नेलें, तेव्हां आम्हांस तर आश्चर्यच वाटलें, पण आबांनाही मोठें कौतुक वाटलें. असो किल्ल्याची पाहणी झाल्यावर देवीचें दर्शन घेऊन पोटपूजा केली. नंतर निरामय अशा देवीच्या देवळांत गप्पागोष्टी करण्याकरितां बसलों. तरुण मुलांचा जमाव सभोंवार जमलेला पाहिल्याबरोबर आबांचें हाडींमांसीं खिळून गेलेलें देशाचें प्रेम जागृत होऊन ते मुलांना सहज प्रश्न विचारतात कीं, ‘देहाचें सार्थक कशांत आहे ? ’ याचें उत्तर प्रत्येकानें सांगितलें पाहिजे. अशी जणूं कांहीं आज्ञा देते झालें ! गप्पाष्टकाला आतां सभेचें रूप आलें. तदनुसार कार्यक्रम सुरू झाला. प्रत्येकजण आपआपल्यापरी कोणी कांहीं कोणी कांहीं सांगतच होता. शेवटीं आबा म्हणाले “ आज आपण समर्थांनीं म्हटलेल्या रामवरदायिनीच्या मंदिरांत, श्रीशिवाजी महाराजांची अधिदेवता जी भवानी तिच्या मंदिरांत बसलों आहोंत. प्रत्यक्ष भवानीचा अवतार कशाकरितां झाला ? श्रीशिवाजीमहाराजांचें अवतारकार्य कशाकरितां झालें ? याचा विचार राष्ट्राच्या भावी आधारस्तंभ अशा तरुणांनीं केला नाहीं तर देशाची अवनति किती होईल हें सांगवत नाहीं. परिस्थिति व कालमानाप्रमाणें आपल्यावर असलेलें देशाचें ऋण फेडण्याचा प्रयत्न प्रत्येक तरुणानें केला पाहिजे. देशाला स्वातंत्र्य संपादन झाल्याशिवाय आपली ऐहिक उन्नति होणार नाहीं, तें सामर्थ्य अंगीं आणण्यास प्रत्येकानें

शारीरिक सामर्थ्य उत्तम प्रकारें, उपयुक्त असें वाढविलें पाहिजे. त्याच प्रमाणें मन व बुद्धि हीं सुसंस्कृत झालीं पाहिजेत. शरीर, मन व बुद्धि यांचें सामर्थ्य वाढवितांना याचा उपयोग मी देशाकरितां करीन अशी तीव्र जाणीव प्रत्येक तरुणानें ठेविल्यानेंच पुढील आयुष्य देशमातेच्या सेवेंत खर्च केलें जाईल, तर त्यांतच दहाचें सार्थक आहे. या संभाषणांत तीन तास कोणीकडे आणि कसे गेले हें समजलेंही नाहीं

(८) श्री. दे. भ. ग. दा. ऊर्फ बाबा सावरकर यांची जन्मठेप काळे-पाण्याच्या शिक्षेंतून सन १९२२ सालीं मुक्तता झाल्यावर त्यांना भेटण्याकरितां निवांतपणानें आठ दिवसांनीं आबा मुंबईस आले. जो कोणी इसम भेटण्यास जाईल त्यास अनेक प्रकारचे प्रश्न विचारण्याचा क्रम बाबा सावरकर यांचा असे. परंतु या बाबांना भेटण्यासाठीं आबा आले असतां दोघांची दृष्टादृष्ट होते पण एक शब्दही परस्परांच्या तोंडून निघेना. अनेक कष्टदायक अवस्थांचा बाबांच्या शरिरावर झालेला तो अनिष्ट परिणाम पाहून आबांचे डोळे भरून आले. अशा स्थितींत कां होईना, पण बाबा आपल्यास परमेश्वरी कृपेनें भेटला याचा आनंदही मुखावर दिसल्याशिवाय राहिला नाहीं. या भेटींत दोघेही कांहीवेळ दृष्टीनेंच बोलले. कुशल प्रश्न नंतर झाले.

× × × ×

(९) सन १९२४ साल म्हणजे आबांच्या आजारीपणाचें दुसरें वर्ष या सालीं बॅ. वि. दा. सावरकर हे नासिक येथें आले असतां त्यांच्या मुक्कामीं जाऊन भेटण्याचे सामर्थ्य आबांना नव्हतें. आबांची अस्वस्थ स्थिति आहे. हें समजल्यावर उद्यां मी तुमच्याकडे येतों. आज प्रवासाचे श्रम फार झाले आहेत असा तात्या सावरकरांचा निरोप आला. तात्या उद्यां घरीं येणार हें समजल्यावर आबांची कोण तारांबळ उडाली. लगेच सांगतात कीं —उद्यां सकाळीं बाजारांतून चांगलीं फळें आणा. तुम्ही सर्व मंडळी येथें या माझ्या-

ध्यानें उठवणार नाहीं. दुसरे दिवशीं तात्या भेटण्यास आल्याबरोबर दारांतूनच म्हणतात ' कां आबा ? कसें काय आहे ? १८ वर्षांनीं तुमची आमची भेट झाली. ' घटकाभर आबांचें आजारीपण कोठें गेलें कोणाला ठाऊक ! दोघेही अत्यंत आनंदांत होते.

( १० ) शक्य तोंवर आपल्याकरितां दुसऱ्या कोणासही त्रास देऊं नये ही वृत्ति मूळपासूनच असल्यानें आजारीपणांत आपल्या करितां इतरांना फार त्रास होतो याबद्दल त्यांना फार वाईट वाटे. तुमचे मजवर उपकार होतात. हे मी कसे फेडूं ! असें ते वारंवार म्हणत. दुखण्याला अत्यंत कंटाळून गेलेले, त्यामुळें कधीं कधीं आत्मघात करून घ्यावा असेहि विचार त्यांच्या डोक्यांत येत व त्यामुळें ते गोंधळून जात. परंतु आत्मघाताचा आणखी नवा दोष पदरीं बांधून त्याची फेड कुठें करूं ! या सुविचारीपणामुळें त्यांनीं आपल्याजवळ चाकू, कातरी, दोरी दिवा, काड्याची पेटी वगैरे कांहींही पदार्थ ठेवूं नये असें सक्त सांगून ठेविलें होतें.

× × × ×

( ११ ) रोगानें जर्जर पीडिलें असतां वेदांताचा कांहीं विषय निघाला कीं आबांचें दुखणें कमी झालेंच. मग सावकाश सावकाश त्यासंबंधाचें त्यांचें भाषण चांगल्या प्रकारें ऐकावयास मिळावयाचें, भाषण संपलें कीं, ' अग आई ' ! ' अरे रामा ! काय करूं रे ! फार त्रास होतो. ' असें उद्गार बाहेर पडत.

अत्यवस्थ स्थिति झाली असतां माझ्या काव्यसंग्रहाची व्यवस्था तुम्ही करा, याचें उत्पन्न यशवंत व्यायाम शाळेस द्या, तदनंतर तुम्हांला योग्य वाटेल त्या सार्वजनिक कार्यांत खर्च करा, अशा प्रकारचें व्यवस्थापत्र आबांनीं करून ठेविलें.

(१२) अंतःकालापूर्वी १०।१२ दिवस 'सुंदर मी होणार' हें पद व 'देवा दावीरे। निजचरण' हा धांवा तयार करण्याचें काम चालू होतें. क्षणोक्षणीं मरण जवळ येत चाललें, परंतु यांच्या काव्यरचनेचें कार्य मात्र डोक्यांत सारखें चाललेलें असेंच दिसून येत असे. मरणाच्यापूर्वी आठ तास आबा मला सांगतात कीं, अरे देवाच्या धाव्याच्या पद्यापैकीं २१ ते २५ पर्यंतचीं ५ कडवीं माझ्या डोक्यांत आहेत. परंतु आतां मला सांगवत नाहीं; तरी जेवढें झालेलें आहे तेवढेंच पुरें समज. आणि शेवटच्या ओळींत '**देवा नमनें तुज सदा कदा**' असें आहे त्या ठिकाणा '**देवा नमनें तुज सहस्रदां। सहस्रदां सर्वदा**' असें कर. ही वेळ संध्याकाळीं ६ वाजण्याची होती. नंतर व्यायामशाळेंत शनिवारची पूजा असल्यानें विचारून जाऊं लागलों इतक्यांत आतां केव्हां येशील ? असें आबांनीं विचारलें असतां 'आज होळी पौर्णिमा आहे तेव्हां रात्रीची मारुतिरायाची पूजा करून सुमारें १२ वाजतां रात्रीं येईन' असें मी सांगितलें खरें; परंतु त्या रात्रीं दुसऱ्या एका स्नेह्याचे घरीं जाणें आवश्यकच झाल्यानें पुनः आबांकडे येतां आलें नाहीं. उत्तररात्रीं २ वाजतां त्यांचें देहावसान झालें. शेवटीं ते ह्मणाले त्याप्रमाणें:—

**आनंदी आनंद जाहला मरतां मी हंसणार हो।**
**हांसत मरणें गोविंदाचा प्रेमपंथ ठरणार हो॥**

असें हास्य मुखावर दिसत होतें!

# स्वातंत्र्यशाहीर गोविंदकवीची कविता

## काव्य-विवेचन.

( ले. प्रो. रा. श्री. जोग एम. ए. हंसराज प्रागजी ठाकरसी. कॉलेज, नाशिक )

प्रस्तुत विवेचन केवळ वाङ्मयदृष्ट्या केलेलें आहे. लेखकास कै. गोविंदास प्रत्यक्ष पहाण्याचाही योग न आल्यामुळें, परिचयामुळें होणारा पक्षपात किंवा अतिपरिचयामुळें उत्पन्न होणारी अवज्ञा या दोनही भावनां पासून अलिप्त राहिल्यानें, गुणांचें वा दोषांचें अतिशयोक्त वर्णन त्याचे-कडून न होणें साहजिक आहे व म्हणूनच पुढील विवेचन वाचकांस पूर्वग्रहदूषित नाहीं असेंच वाटेल अशी आशा आहे. सोईसाठीं म्हणून गोविंदांचें फक्त काव्यविषयक चरित्र आधीं देऊन पुढें त्यांच्या काव्याचा क्रमशः विचार करण्यांत येईल.

गोविंद कवि हे मराठा जातीचे होते. परंतु ते मराठा असले म्हणून त्यांना प्रतिभादेवीनें झिडकारिलें होतें असें नाहीं. लहानपणींच पित्यानें त्यांना सोडून दिल्यानें त्यांच्या पालनपोषणाचा व शिक्षणाचा भार त्यांच्या मातेवर पडला. वयाच्या आठव्या वर्षी कांहीं आजारानें ते कायमचे पंगू बनले, व मराठी पहिल्या इयत्तेमधूनच त्यांनीं शिक्षणाला-शालेय शिक्षणाला-रामराम ठोकला. याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला, व यांचीं पुढील कित्येक वर्षे अडाणी, नाचरंग व तमाशे करणाऱ्या लोकांमध्यें गेलीं. त्या वेळच्या आपल्या मित्रांबरोबर घरीं व घराबाहेरील ओट्यावर बसून उनाडपणाच्या अनेक गोष्टी करण्यांत, खबुतरें पाळण्यांत व पांढरे उंदीर बाळगण्यांत त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें. तेव्हां वाङ्मयदृष्ट्या पहिला महत्वाचा काळ म्हणजे वयाच्या सतरा अठरा वर्षांच्या वेळचा होय. कवीस प्रथम स्फूर्ति केव्हां झाली हें जाणण्याची पुष्कळांस उत्सुकता असते.

गोविंदकवीस ती या काळीं झाली असें दिसतें. अर्थात् स्फूर्तीचा पहिला प्रसंग मोठा उदात्त होता असें नाहीं. शिक्षण मुळींच नाहीं व संगतिही फारशी चांगली होती असेंही नाहीं. तेव्हां अभिरुचि सुद्धां फारशी उच्च असेल अशी कल्पना करणें चुकीचें होईल. परंतु यासंबंधींच्या कल्पना करीत बसण्यापेक्षां या विषयाची हकीगत स्वतः गोविंद कवींच्या तोंडून ऐकलेली बरी. 'त्या वेळीं मी एका शाहिराचे मठींत जात असें व म्हणतही असें. तेथें एकदां एक नाच्या पोऱ्या आला. तो एक लावणी म्हणत असें. ती लावणी मंडळींना फारच आवडत असे. तिच्यावर तोड रचावी असें मंडळींचें म्हणणें पडलें. तोड म्हणजे तिच्यासारखी दुसरी एक लावणी तयार करणें. त्यांचें म्हणणें मीं ऐकिलें. त्या वेळीं थंडीचे दिंवस होते. दुसऱ्या दिवशीं मी चुलीजवळ पाणी तापवीत शेकत बसलों असतां, आपण तशी लावणी करावी अशी मला इच्छा झाली. मी लागलीच गुणगुण करायला लागलों. अर्ध्या एक तासांत पहिले दोन चरण जुळले. पुढें त्या साऱ्या दिवसांत २-४ कडव्यांची लावणी पुरी केली, ही माझी पहिली कविता. पुढें ती लावणी दुसऱ्या दिवशीं शाहिरास दाखविली. त्यांना ती पसंत पडली. त्यांनीं ती तमाशांत बसविली. तिचा एक महिन्यांत साऱ्या गांवांत बोलबाला झाला. नंतर दोन चार लावण्या केल्या. परंतु त्या कांहीं आठवत नाहींत.' ही अशी लावणी तरी कोणती हें जाणण्याची उत्सुकता वाचकांस असेल. तिचें एकच कडवें उपलब्ध आहे, व तें असें:—

**हौशिनें करा मशि गेंदगेंद । घडवा हो बाजुबंद ॥ ध्रु० ॥**
**बाजुबंद पायांत साखळ्या । मूद राखडी नथ पाटल्या । दुशासरी आणीक बुगड्या । विल्लोरी भरा मसि छंद छंद । घडवा हो बाजुबंद**

या एका कडव्यावरून तीमध्यें कांहीं विशेष आहे असें दिसत नाहीं त्यांतल्या त्यांत 'गेंदगेंद छंदछंद' या शब्दांचें तादृश औचित्य काय आहे

हें समजणें कठीण आहे. तोड म्हणून रचलेल्या व ' एक महिन्यांत साऱ्या गांवांत बोलबाला ' झालेल्या या लावणींत नाविन्य दिसत नाहीं. इतर लावण्यांप्रमाणेंच लावणी वाङ्मयांतील ठराविक शब्दांचाच भरणा दिसतो. पुढें भव्य स्वरूप धारण करणाऱ्या गोदेप्रमाणेंच गोविंद कवींच्या काव्यप्रवाहाचें हें मूळ असावें. त्या मुळाकडे ज्यास्त कठोर दृष्टीनें पाहणें योग्य होणार नाहीं.

. यानंतर ( ही गोष्ट मुमारें १८९०-९२ सुमारास घडली असावी. ) कवि गोविंदाच्याच सांगण्यावरून त्यांनीं निदान २-४ लावण्या तरी रचिल्या असाव्यात. त्यांनीं आणखीही कांहीं लिहिलें असावें. कारण एकदां स्फूर्ति झाल्यावर कविप्रतिभा स्वस्थ राहणें शक्य आहे. तो तिचा स्वभाव नव्हे. गोविंद कवि पुढें सांगतात " त्यानंतर ( म्हणचे या लावणीनें मिळालेल्या प्रसिद्धीनंतर ) मला वाचनाचा नाद लागला. पदें म्हणणाऱ्या मंडळींचा व माझा स्नेह जमला. " हीं पदें म्हणणारी मंडळी कोण ? यांचा शाहिरा खेरीज निराळा उल्लेख करण्याचें कारण काय ? हीं म्हणणारी मंडळी म्हणजे गणपत्युत्सवांतील मेळ्यांतलि मंडळी असावी. इ. स. १८९० ते १८९३-९४ पर्यंतचा गोविंद कवींचा आयुष्यक्रम काय असावा ? आईच्या मोलमजुरीवर व थोडेबहुत स्वतः मिळविलेल्या पैशावर उपजीविका करून राहिलेला वेळ तमाशा किंवा इतर टिवल्याबावल्या यांत घालवावा असाच असेल. वाचनाचा नादही यथातथाच असावा. कारण साधारण सुशिक्षित अशा लोकांचा संपर्कही १८९३-९४ नंतर आला. त्यानंतर ते म्हणतात; " तेव्हां ( म्हणजे पदें म्हणणाऱ्या मंडळींची संगति लागल्यावर ) मी एक नाटक लिहिलें होतें. त्याचें नांव ' मन्मथप्रभाव '. " लावण्यापासून नाटकासारख्या उच्च प्रतीच्या वाङ्मयाकडे लक्ष लागणें ही गोष्ट उच्च सुशिक्षीत लोकांच्या संगतीचें लक्षण आहे. ही मंडळी कोण होती हें ही कळणें

इष्ट आहे. नाटकाचें नांव असें सुचवितें कीं अजूनही पूर्वीच्या शाहिरी लावणी वाङ्मयाचें वजन त्यांच्या मनावर होतें. अभिरुचि बदलत होती, पण पूर्ण बदलली नव्हती, पुढें ते म्हणतात. ' तें नाटक पुढें मला आवडलें नाहीं म्हणून मी तें फाडून टाकलें ' या वेळीं कदाचित् ती अभिरुचि पूर्ण बदलली असावी. वाचनही वाढतें असावें.

या नाटकांतील दोन तीन पदें उपलब्ध आहेत. पहिली नांदी अशी आहे.

**पद्मधवपादपद्ममिलिंदा । सेवा मनुज मिलिंदा ॥ धृ० ॥ ध्यानीं सुमना रूपीं नयना । नामस्मरणीं भजनीं रसना । तेवीं श्रवणां नामश्रवणा । योजीं प्रभुच्या कामीं । अर्चनविधिच्या घ्राणं गंधा । सेवी मनुजमिलिंदा ॥**

अद्याप पुढील पदांमधील प्रसाद आला नाहीं. मञ्जुगुञ्जनाची आसक्ति भारीच दिसते. त्याच नाटकांतील दुसरें एक पद घ्या. एका स्त्रीचें वर्णन आहे.

**हा शुशुभा शुभांगा। स्मरस्त्री रंभा । ती सांबाची गंगा अंबा। मानासें वाटे चंचल लंबा ॥ धृ० ॥ रजनीरमणा सौंदर्यानें । कुरंगशिशुना निजनयनानें । मंद मंद मातंग गतीनें । लाजवील ही उरुनें रंभा ॥**

अनुप्रासाची हौस कायम आहे लंबा हा शद्ब लक्ष्मी या अर्थी अप्रयुक्त आहे मातंग शद्ब दुसऱ्या अर्थाच्या सादृश्यानें दूषित आहे. कल्पनांचे नावीन्य नाहीं तिसरें उपलब्ध पद तर लावणी वाङ्मयांतच जाईल या प्रमाणें अद्यापि जुनें वळण सुटलें नाहीं, नवें लागत चाललें असावें; हा संक्रमणावस्थेचा काल १९०१-२ पर्यंत चालला असावा या कालांत शेवटीं तरी भेळ्याचीं पद्यें करण्यांत यांचा बहुत हातभार असावा. पूर्वीचा विषय बदलला. महाराष्ट्राच्या इतिहासांतही बऱ्याच गोष्टी होऊन गेल्या हिंदु-

मुसलमानांचे दंगे झाले, गणपतिउत्सव सार्वजनिक झाला मेळे निघाले दुष्काळ व तत्संबंधीं चळवळ झाली. पहिला प्लेग व त्याला आनुषंगिक अशा बऱ्याच गोष्टी घडल्या. गोविंद कवींचें मन स्वस्थ नव्हतें. साऱ्या गोष्टी मनावर परिणाम करित होत्या कांहीं सुशिक्षित लोकांच्या नादानें पूर्वीचा ग्राम्य अभिरुचि बदलून तिला उजळा मिळाला होता. " **या कुणब्याशीं वालि न कुणि हो जाणा** " व " **दावि येसकर हक्क एकटा सारा पट्टी घेतांना । परंतु द्याया सूट खरोखर नसे कुणाला परवाना ॥** " हीं पदें या वेळचींच असावीं. या वेळींच चरितार्थाच्या साधनांमध्यें फरक झाला असावा. कांहीं काळ दुकानामध्यें सामान देण्याघेण्याचें काम केलें असें म्हणतात. कागदी कातरकामही करीत असत व लग्नामध्यें कागदी बाग लागतात तेही करीत आणि त्यावर होणाऱ्या प्राप्तीवर उपजीविका करीत.

यानंतरचा काळ म्हणजे गोविंदकवींच्या चरित्रांतील अत्यंत उज्ज्वल असा भाग आहे. सन १९०० च्या सुमारास नाशिक येथील मित्रमेळ्याची स्थापना झाली. यानंतर तीन महिन्यांनीं गोविंदांचा त्यामध्यें प्रवेश झाला. तो बहुतेक पूर्वीच्या पदें म्हणणाऱ्या स्नेह्यांमार्फत झाला असावा. या वेळेपासून ते सन १९०९ पर्यंत त्यांचीं बहुतेक स्फूर्तिदायक पद्यें निर्माण झालीं असावींत. १९०२-३ मध्यें पुण्यास मेळ्यामध्यें शिवाजी व दादोजी यांमधील संवाद म्हटला गेला. त्यावेळचे ' मावळे वीरांनो ! ऐका भय टाका.' हें, त्यानंतर ' हे भूमाते ! आम्ही गाऊं तुजला ' भूपाळी हें पद, तदनंतर ' गेला गेला धर्म वाया । नीतीचाही खचला पाया ' हें पद, त्यानंतर ' हिंदुस्थाना रे हिंदुस्थाना । जग हंसे तुझ्या अज्ञाना ' अशीं पदें झालीं. १९०५ सालीं मराठ्यांच्या पराक्रमाचा फटका तयार झाला. त्याच्या पहिल्या ओळी अशा:—

ज्यांहीं रणीं रडविलें तुडविलें देशरत्नहर रिपूटका।
ऐका त्या बलवंत मराठ्या शूर गड्यांचा तुम्हि फटका॥

१९०५ चे पुढें बहिष्काराची झळ महाराष्ट्रामही लागून जागृति झाली. ती जागृति सामान्य जनांपर्यंत पोंचविण्यास गोविंद कवींची पद्यात्मक कविता बरीच कारणीभूत झाली असली पाहिजे. त्या वेळचीं त्यांचीं बरीच पदें व अफझुलखानाचा पोवाडा हीं सरकार जमा झालीं हीच गोष्ट त्या पद्यांच्या भावनेची तीव्रता पटविण्यास समर्थ आहे. याच अवधींत मित्रमेळ्याचें नेतृत्व व सूत्रचालकत्वही त्यांचेकडे आलें असावें असें दिसतें. त्यामुळें त्यांचे चरितार्थाचें साधन जें कातरकाम त्याकडेही दुर्लक्ष झालें व दारिद्र्याची बरीचशी झळही त्यांना सोसावी लागली असावी. वर्तमानपत्रीय उल्लेखांवरून त्यांच्या जप्त झालेल्या कवितांत "**रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळालें**' ही सर्वांत प्रसिद्ध कविता दिसते. आणखीही बऱ्याच कविता असाव्या. पण त्या आज उपलब्ध नसल्यामुळें त्याविषयीं येथें सांगतां येत नाहीं.

सन १९०९ सालीं जप्ती व मित्रमंडळीस झालेल्या शिक्षा यांमुळें गोविंदांनीं जी हाय घेतली ती १९१७ पर्यंत. त्या दीर्घावधींत त्यांनीं कांहींही लिहिलें नाहीं असें म्हणतात. ज्या वाणीमुळें आपल्या मित्रमंडळीस इतकीं दुःखें भोगावीं लागलीं त्या वाणीस धिक्कार असो अशा बुद्धीनें त्यांनीं या पुढें ८-९ वर्षे काव्यरचनेस अजीबात फांटाच दिला. दुःख अत्यंत मोठें असलें तर तें मूक असतें. अत्यंत संताप आला असतां मनुष्य बरळूं शकतो. परंतु दुःखातिशयाला वाचा नसते. परंतु हें प्रायश्चित्त अत्यंत कठीण व जाज्वल्य आहे उद्दीप्त कविप्रतिभेस इतका दीर्घ काळ लगाम खेंचून आवरून धरणें हें कार्य फार कठीण आहे. यावरून सुमारें दोन वर्षांपूर्वीं प्रसिद्ध

झालेली गोष्ट आठवते. इटली देशांतला माणूस एके दिवशीं संतापानें बायकोस व मुलांस ह्मणाला ' तुम्हि जळून कां जात नाहीं ? ' दुसरेंच दिवशीं कर्मधर्मसंयोगानें त्याच्या घरास आग लागून त्याची बायकामुलें सर्व जळून गेलीं; त्यास अत्यंत दुःख झालें. धर्मोपदेशकास प्रायश्चित्त काय म्हणून विचारिलें. धर्मोपदेशकानें उत्तर केलें:—' तुझ्या या अभद्र वाचेनें पुन्हां एक शब्दही उच्चारूं नकोस. ' त्या दिवसापासून मरेपर्यंत म्हणजे २० वर्षें त्यानें तोंडांतून एक शब्दही काढला नाहीं कवि गोविंदांनीही दीर्घ कालपर्यंत हेंच केलें असें दिसतें. त्यांनीं हें शेवटपर्यंत केलें नाहीं हेंच आपलें भाग्य समजावयाचें. नाहींतर, आपण त्यांच्या कांहीं उत्तम कवितांना मुकलों असतों. हा काळ बहुतेक अज्ञातवासाचाच म्हणावयाचा. सरकारी रोष झालेल्याकडे जातो कोण आणि येतो कोण ! या कालांत बरेचसे हाल झाले असावेत. पुढें १९१७ सालीं टिळकांच्या जुबिलीच्या वेळीं त्यांना उद्देशून भूपाळी करावयास सांगितली असतां ती त्यांनीं मान्य केली व त्यापुढें कवितालेखन तसेंच चालू ठेविलें. त्यानंतरची त्यांची कविता गोविंदगीत या नांवानें प्रसिद्ध झाली आहे. पुस्तकांच्या प्रसिद्धीनें होणारी प्राप्ति त्यांच्या चरितार्थाकडे लागत असे. गोविंदगीताचीं चार पुस्तकें आहेत. शिवाय कांहीं कविता अपूर्ण व अप्रसिद्ध आहेत. १९१७ सालचे आधीं त्यांनीं कांहीं ध्यानधारणादिकांचाही अभ्यास केला असें समजतें. यानंतरच्या त्यांच्या काव्यांत बऱ्याच कविता राजकीयेतर विषयांवर लिहिलेल्या आहेत. मुरली, श्रीकृष्णजन्मोत्सव, वेदांताचा पराक्रम, ब्राह्मण, महाराष्ट्रकाव्य, अपूर्ण पक्षिदूत वगैरे कविता ह्या स्वरूपाच्या आहेत. देशाचा ध्यास त्यांस कधींच सुटला नाहीं. पण या कवितांत तो विषय अप्रधान आहे.

आयुष्याचीं शेवटचीं तीन वर्षें त्यांना क्षयासारख्या जबरदस्त व्याधीनें छळिलें. पंगू देहाला अधिकच श्रम पडले, व शेवटीं मरणकाळ जवळ आला

असतां त्यांनीं मरणाचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. आपलीं ध्येयें नाहींशी झालीं. असहकारिताही आली व गेली, क्षयासारख्या व्याधीनें तीन वर्षे खाल्लीं. अशा स्थितींत कोणत्या आकांक्षी मनाला जगांत राहणें आवडेल? पण त्यांचा आपल्या देशाचा अभिमान जबरदस्त होता. मरणाचे आधीं तीन दिवस त्यांनीं 'सुंदर मी होणार' हें आपलें सुंदर गाणें रचिलें. मरतांनां देखील मी पुनः जन्म घेणार व हा पंगू देह टाकून घेणार. या जन्मीं या पंगू देहानें आपल्यास कांहीं साधितां आलें नाहीं. पुढील जन्मीं तें आपण करून दाखवूं असे त्यांचे शेवटचे उद्गार आहेत. मरणाचे आधीं कांहीं दिवस त्यांचे सुहृत् सावरकरबंधू यांची भेट झाली होती एवढी एक समाधानास जागा होती. त्या वेळचा प्रसंग अर्थात् अत्यंत हृदयस्पर्शी होता. त्याची कल्पनाच केली पाहिजे. लेखणी यथार्थ वर्णन करूं शकणार नाहीं. याप्रमाणें हा पुण्यात्मा आपली ऐहिक देहयात्रा संपवून वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षीं तारीख २८ फेब्रुआरी १९२६ सालीं ह्मणजे फाल्गुन शुद्ध १५ शके १८४७ या दिवशीं इहलोक सोडून गेला.

येथवर झालें हें विवेचन त्यांच्या काव्यचरित्राविषयीं झालें. आतां त्यांच्या काव्य विषयक कामगिरीकडे वळूं. कवि गोविंदांचा काव्यसंभार फारसा मोठा आहे असें नाहीं, व आहे त्यांतही बराचसा सरकारजमा झालेला व विसरून गेलेला आहे. त्यांच्या एकंदर काव्यांची गणना करावयाची झाल्यास ती अशी होईल. प्रथम दोन चार लावण्या नंतर मन्मथप्रभाव नांवाचें नाटक, त्यावर मेळ्याचीं बरीच पद्यें, त्यानंतर लघुअभिनव-काव्य मालेंतील त्यांचीं सरकारी रोषास पात्र झालेलीं पद्यें, तदनंतर प्रसिद्ध झालेलीं चार गोविंदगीतें, कांहीं सुट्या प्रसिद्ध झालेल्या कविता व कांहीं अप्रसिद्ध व अपूर्ण गाणीं एवढाच त्यांचा काव्यसंभार आहे. त्यांच्या काव्यचरित्रांत एकंदर तीन विभाग दिसून येतील. पहिला त्यांना

आपल्या वयाच्या सतराव्या अठराव्या वर्षी स्फूर्ति झाल्यापासून इ. स. १९०० पर्यंतचा काल; दुसरा १९०० ते १९०९ पर्यंतचा; व तिसरा १९१७ ते १९२६ पर्यंत मरणापर्यंतचा काल. त्यापैकीं पहिल्या भागांतील काव्यविषयक कामगिरी बहुतेक बरीचशी शृंगाररसात्मक व तीहा उत्तान शृंगार—असावी. कवि गोविंदांना स्फूर्ति कशी कां होईना, शाहीर लोकांनीं त्यांना, मञ्जुगुञ्ज-नात्मक शृंगारिक कां होईना, पण काव्यरचना करावयास उत्तेजन दिलें याबद्दल आपण त्या मंडळांचे आभारी असलें पाहिजे. अशाच प्रकारच्या कवितेंत पहिलीं ४–५ वर्षे गेलीं असलीं पाहिजेत. त्यानंतर या प्रकारच्या वाङ्मयावरून त्यांचें मन उडालेलें दिसतें व पुढें त्यांनीं मेळ्याचीं पदें बरींच लिहिलीं असावींत. या संक्रमणात्मक अवधींत, त्यांनीं जें एक नाटक लिहिलें, त्याचा विषय व पद्धति लावणी वाङ्मयास अनुरूप असावा असें दिसतें कविप्रतिभेच्या उन्नतिच्या इतिहासाच्या दृष्टीनें हें नाटकही उपलब्ध असावयास पाहिजे होतें. या कालांतील बहुतेक कविता अनुपलब्ध असल्यानें तींविषयीं विस्तृत व प्रमाणभूत अशी चर्चा करणें अशक्य आहे. तरीही ज्या कांहीं तुटक तुटक भागांचें अवलोकन करितां येतें, त्यावरून या कालांतील बहुतेक कविता अनुकरणात्मक असावी असें दिसतें. तींवर लावणी वाङ्मयाचा बराचसा ठसा असावा. चमत्कृतिपूर्ण नादमाधुर्य, अर्थशून्य शब्दरचना, जुन्या जुन्या कल्पना यांचा बराचसा भाग या काव्यांत असावा. हा काल काव्याविषयक उमेदवारीचा होता. या काळाच्या शेवटीं शेवटीं नवे नवे विषय व नव्या नव्या चाली या योगानें व उच्च संगतीमुळें येऊं लागणारी बहुश्रुतता व अग्राम्यता यामुळें त्यांच्या काव्यास चांगलें स्वरूप येऊं लागलें; व सन १९०० नंतर मित्रमेळ्यांत प्रवेश झाल्यावर तर त्या स्वरूपास अधिकच उजळा मिळाला असावा यांत नवल तें काय ? त्यांची प्रेमशृंगार ही कविता या वेळचीच असावी. या कवितेंत उन्मत्तशृंगार दिसून येतो.

त्याचप्रमाणें नादलुब्धताही दिसून येते. यावेळीं त्यांचें वाचन वाढलें होतें असें दिसतें. खालील शब्दप्रयोग या तीनही गोष्टींचें द्योतक आहेत. उदाहरणार्थः- **" मुग्धेच्या परिरभांत " " तन्वीच्या सुधाधरांत " " मरंद माधुर्याचे " " तरुणिनीं । विश्वप्रेमळ । मधुरमंगल मृदुल मंजुळ । सुप्रसन्न सुनंदशील जाहले. " " करभुवना जयजयकार । करुनि मधुमधुर । नयन शृंगार रमणीय । नयनसंभार । लाजले । "**

अशीं अनेक उदाहरणें या एकाच काव्यांतून देतां येतील. असो. इ. स. १९०० ते १९०९ पर्यंतच्या काव्यांत मात्र सुधारणा झाली असावी. यांतील बराचसा भाग उपलब्ध नाहींच. तेव्हां याहीं भागाचें विस्तृत पर्यालोचन करणें अशक्य आहे. कांहीं सामान्य अनुमानें काढितां येतील. तीं हीं कीं, काव्याचा विषय पूर्णपणें बदलला. देशभक्ति, देशाच्या उद्धाराची तळमळ, त्यासंबंधीं तरुण लोकांस उपदेश, हाच या अवधींत काव्याचा विषय झाला. ऐकीव व इतर माहितीवरून यावेळीं प्रसिद्ध झालेल्या काव्यांत पूर्वीं उल्लेखिलेलीं पदें व पोवाडे झाले. त्याशिवाय " बोधपर पुरातन मौज " ' काळाराम ' ' यमाचा दरबार ' वगैरे पद्यें महाराष्ट्रास हलवून सोडणारीं झालीं असावींत देश हाच गोविंदाचा देव होता. देशभक्ति हाच त्यांचा धर्म होता. मनास सारखी तगमग लागली होती. हा वेळपर्यंत काव्यकलेची उमेदवारी करण्यांत त्यांनीं शक्ति खर्च केली होती. मग त्यांच्या कविता स्फूर्तिदायक कां होऊं नयेत? डोळ्यांनीं आंधळा असल्यास कर्णेंद्रिय तीक्ष्ण होतें. तसेंच देह पंगू असल्यानें आत्मा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्यास स्वतंत्र व्हावयास पाहिजे होतें. या स्वतंत्र आत्म्यास पंगू देहाच्या पंजरांत रहावें लागल्यामुळें अत्यंत दुःख होत असलें पाहिजे. हातून कामगिरी होत नसली तरी आपल्या वाणीनें लोकांत जागृति उत्पन्न करण्याचें कार्य तरी त्यांनीं केलें. सत्याचा जाज्वल्य अभिमान होता कोणीही आपल्या लोकांस हलकें लेखिलें

असतां त्यांचा संताप होई. आपलें श्रेष्ठत्व स्थापण्यास त्यांनीं काव्य केलेंच म्हणून समजावें. यामुळें आपल्या लोकांचें, आपल्या देशाचें उत्कृष्ट स्वरूप, अनुकरणीय कृत्यें जनतेपुढें मांडून तीमध्यें स्वत्वाचा अभिमान उत्पन्न करण्यास या कवितांचा फार उपयोग झाला. तीं पद्यें सरकार जमा झालीं. यावरूनच त्यांतील रसरसणाऱ्या भावना लोकांस किती उद्दीपित करीत असतील याची कल्पना सहज होईल. असल्या जोरदार वाङ्मयास महाराष्ट्र मुकलें हें त्याचें हतभाग्य होय. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें हें वाङ्मय पुनःउपलब्ध होणें जरूर आहे. त्याखेरीज वाङ्मय दृष्ट्या त्याची योग्य किंमत ठरविणें अशक्य आहे. एवढें मात्र खरें कीं त्यांत कांहींतरी अपूर्व शक्ति होती.

आतां आपण त्यांच्या काव्याविषयक कामगिरीच्या शेवटास आलों. या काळास टिळकांच्या भूपाळीपासून सुरुवात होते. कवीची प्रतिभा, प्रौढ व शांत तशीच मनोहर दिसते. टिळकांच्या निरनिराळ्या गुणांचा आलंकारिक पण समुचित भाषेंत उल्लेख करून कवि शेवटीं म्हणतो:—

**तुझी योग्यता भारी भारी जनता ऐसें वदे ।**
**विचारी । जनता ऐसी वदे ।**
**असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढें ।**
**मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे ।**
**तुझ्यावर । शब्दांचे बुडबुडे ।**
**तुझे पवाडे गातिल पुढतीं तोफांचे चौघडे ।**
**कुशल असो हा विजयि असो हा टिळक, जगन्नायका ॥**
**आयका । टिळक जगन्नायका ।**
**प्रभु या एका खांबावर उभि महाराष्ट्रद्वारका ॥**

अभिनव कल्पना, नादमाधुर्य पण शब्दांची उचितता या पहिल्याच कवितेंत दिसून येईल. याच पुस्तकांत महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेस स्वागतपर गीत आलें

आहे. यांत 'समता हाच नवयुगधर्म आहे' हें तत्त्व प्रतिपादन केलें आहे. कविता प्रतिपादनात्मक आहे तेव्हां भाषा कोठें कोठें आलंकारिक असली तरी भावना कमी आहे. किंवा भावनेस विवेकाचें, विचाराचें स्वरूपच ज्यास्त आहे. अर्थात् काव्य प्रासंगिक असल्यानें यावी तितकी मौज येत नाहीं तरी पण मनाची कळकळ व्यक्त होत आहे. उदाहरणः—

**भगवंताचा शोध हवा कां? अर्पा मन मग समतेला,**
**आनंदाचा कंद हवा कां, जीव वहा मग समतेला,**
**जगदंबेचा श्री समतेचा करा करा जयजयकार,**
**कलहजन्य त्या मूर्ख रूढिचा, अतां पुरे हो सत्कार,**
**मूर्ख रूढीनें लिलाव करुनी आमुच्या राष्ट्रप्रेमाचा,**
**विकत घेतला गुलामगिरीचा मूर्खपणा बेअब्रूचा,**
**मनुष्यनिर्मित भेद नसावा मानव बंधुबंधूंत,**
**निदान त्यांनीं जनांत येतां त्यागावा तो देशार्थ,**

आपल्याच लोकांची सद्‌गुणस्तुति गोविंदांनीं जितकी व ज्या जोरदार भाषेंत केली, त्याच भाषेंत स्वजनदोषकथन जर त्यांनीं केलें असतें तर तेंही तितकेंच परिणामकारक झालें असतें हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल.

सरस्वतीची भूपाळी अलंकारिक आहे. व इतर कवींच्या सरस्वतीस्तवना-इतकीच काव्यगुणांत उच्च ठरेल. श्रीजिजाईनें बाल शिवाजीस दिलेला झोंका प्रसिद्धच आहे. त्यांतील विचार व भावना उदात्त परंतु चिरपरिचितच आहेत. मृडरमणी ह्मणजे महिषासुरमर्दिनी सारखे संस्कृत शद्व कमी येते व शुद्ध मराठींत काव्यरचना होती; तर दुधांत साखर पडल्यासारखें झालें असतें. परंतु अशी कसोटी या काव्यांना लावावयाचीच नाहीं. पुढील कल्पना मनोहर वाटेल.

गद्गदा तदां पाळण्यांत शिव हंसला । जणुं मातृबोल त्या रुचला
मग करि लीला मृदुल मुष्टि वळवून । जणुं म्हणे हिनें रिपु वधिन
तशि आर्यशिखा रक्षिन या भावें हो । जावळांशि तो खेळे हो ॥

प्रतापराव गुजरांनीं केलेली मरणाची प्रार्थना वीरोचित आहे. त्याहूनही तानाजीच्या स्त्रीचा विलाप नाविन्यपूर्ण आहे.

( जरी कुणा—या चालीवर. )

एक सिंहगड घेतांना श्रांत काय झाला ।
अजुन कितिक गड घेण्याचें राहिलें दयाळा ।
अजुनि नाहिं झाली अपुली मायभू स्वतंत्र ।
कुठें शत्रु सांगा बुडले मृत्युसागरांत ।
श्रीशिवास केल्यावांचुनि भाद्रिं शोभिवंत ।
उचित काय स्वर्गारोहण भूमिभाग्यमंदिरा ।
लढावया भूमातेस्तव समरिं मी न आलें ।
म्हणुनि काय कोपुनि प्रियकर पहुडले भुकेले।
क्षमा करा,चुकले, बहु मत्प्राण तृषित झाले ।
पुण्यवर्षक त्वत्प्रेमाचे पिण्या प्रेमनिर्झरा ।
सोडुनियां पाठीवरची रक्तमिश्र भाकरी ।
दोन प्रहर भरले कांता चला करा न्याहरी ।
तुम्हांविण सेना सारी लेश अन्न ना वरी ।
उठा चला येतिल आतां शिवप्रभू गंभिरा ।
अहो अजुन आहे अपुला रायबा लहान ।
देशभक्ति शिकविल त्याला तुम्हांवीण कोण ।
लावुनियां तरवारीशीं तयाचें लगीन ।

कीर्तिसहित आलिंगा मग देवि मुक्तिसुंदरा ।
अश्रु गाळि स्वातंत्र्याचें स्फुंदुनी निशाण ।
नभांतून नाथांवरतीं फुलें वर्षि कोण ? ।
शोक हर्ष यांच्या ध्वनिचें पाहुनी तुफान ।
हृदय कमल भ्रमलें, भ्यालें महामोहसागरा ।

वरील कवितेंतील विचार व शब्द-प्रयोग तानाजींच्या स्त्रीच्या बाबतींत कितपत स्वाभाविक ठरतील हा प्रश्न चिंतनीय आहे. लगीन, न्याहारी सारखे शब्द सोडिल्यास बहुतेक शब्दसंग्रह त्या वेळच्या मराठ्या स्त्रीच्या मुखीं कसासाच वाटेल. परंतु हा विचार सोडिल्यास काय सुंदर आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रीतिदेवतेचा उत्सव म्हणून एक कविता या पुस्तकांतील शेवटची कविता आहे. ही संक्रांतीच्या दिवशीं लिहिलेली दिसते. वर्णन अत्यंत आलंकारिक आहे, त्यामुळें शब्दावडंबर फार वाटतें. हिचा एक विशेष म्हणजे या पुस्तकांतील इतर कवितांपेक्षां हिचा विषय अगदीं निराळा आहे.

गोविंदगीत मालेंतील दुसरें पुस्तक मुरली हें आहे. ही एकच कविता असून बरीच मोठी आहे. ही कविता खरोखर नितांतसुंदर असून साधी आहे. सुंदर वर्णनें, उदात्त तथापि नाजूक भावना, नादमाधुर्य इत्यादि गुणांत हें काव्य गोविंदकवींच्या इतर काव्यांहून श्रेष्ठ ठरेल. पूर्वीच्या कांहीं कवितांप्रमाणें नुसत्याच जळत्या भावना नाहींत. कला व निसर्गसुंदर भावना यांचा गोड मिलाफ या काव्यांत पहावयास सांपडेल. उदाहरणादाखल कांहीं थोडेच उतारे येथें देणें शक्य आहे. कवि प्रीतीची भिक्षा मागत आहे, पण ती त्याला मिळत नाहीं.

**प्रीतिची भिक्षा । भिक्षा मागाया । हिंडलों जगाजवळ वांया ॥**
**म्हणुन तुज शरण । शरण मायबापा । विश्वप्रियकरा प्रेमरूपा ॥**

पुढील वर्णन वाचण्याजोगें आहे.

**चंद्रिका चंद्र । चंद्र खिद्‌ळतात । भव्य गगनाच्या वाड्यांत ॥**
**गगनिं या हलती । हलती हांसेचे । मेघ झोपाळे सोन्याचें ॥**
**चंद्र त्यावर तो । तो बसतो हंसतो । वायु त्याला झोके देतो ॥**
**नव्हे हा चंद्र । चंद्ररूप विमलें । मला मुख देवाचें गमलें ॥**
**चंद्र मुख खालीं । खालीं वाकवून । हंसे प्रभु जगास पाहून ॥**

ईश्वरास आमंत्रण करूनही त्याचें योग्य स्वागत करितां येत नाहीं म्हणून कवीस वाईट वाटत आहे.

**सलामी द्याया । द्याया तुज भूपा । आमुच्याजवळ नाहीं तोफा ॥**
**झडाया मुजरे । मुजऱ्यांची फेर । आमुच्याजवळ न दलभार ॥**
**प्रभुरे आम्ही । आम्ही परतंत्र । कशाचें नाहीं स्वातंत्र्य ॥**

शेवटीं हे गायन संपवितांना कवि म्हणतो:—

**पुरें गायन हें । हें आकांताचें । भवाच्या जाचाकाचाचें ॥**
**पुरें गायन हें । हें संसाराचें । सुखाच्या भासाचें साचें ॥**
**कशाची शांति । शांतीची भ्रान्ति । जगामधिं नाहीं विश्रांति ॥**
**धुंडिले सकल । सकल छंदफंद । नाढळे कोठें स्वानंद ॥**
**धुंडिले सकल । सकल वेदमंत्र । नाढळे कोठें स्वातंत्र्य ॥**
**कुणीतरि दावा । दावा मज आतां । कुठें मम हारवली समता ॥**

या मालेच्या तिसऱ्या पुष्पांत भारतप्रशस्ति हें मोठें काव्य व इतर लहान कविता आहेत. पैकीं पहिल्या काव्याचीं सोळा कडवीं असून त्यांत भारताची श्रेष्ठता वर्णन केली आहे. यामध्यें विचार जुनेच असले तरी पद्धति मात्र गोविंदांचीच आहे. पुढील ओळी एकंदर काव्याची कल्पना देतील.

**असासि भारता तूं वनराज केसरी। इतर देश भासति हे जंबुकापरी**
**घेशि योगनिद्रा तूं जधीं स्वातंरीं । ते जंबुक शिरति तदां**
**तुझ्या गव्हरीं ॥**

**बांधिति तुज कपटगुणीं दास्यबंधनीं।**
**जिंकियलें तुजासि असें कळविती जनीं ॥**
**सिंहासनिं बसति तुझ्या भूप होउनी।**
**तव वैभव भोगिति कीं नेति पळवुनी ॥**

याच पुस्तकांतील ‘ ब्राह्मण ’ ही कविता उदात्त विचार प्रतिपादन करित्ये. ब्राह्मण कोण कीं जो ब्रह्म म्हणजे लोक. त्या लोकांच्या हितास्तव जो झटतो तोच ब्राह्मण होय. मग तो जातीनें कोणीही असो.

**तो असो विप्र वा क्षात्र। हो वैश्य शूद्र अतिशूद्र। जो सज्ज जनांचें भद्र। साधायाला। तो हिंदवि ब्राह्मण ठरला ॥**
**ब्राह्मण्य नसे ज्ञातीचें। ब्राह्मण्य नसे सत्तेचें। ब्राह्मण्य असें सुगुणाचें। मान गुणांला। तो गुणगण ब्राह्मण ठरला ॥**

असा या काव्याचा रोख आहे.

पुस्तक ४ थें यांत श्रीकृष्ण जन्मोत्सव व इतर कविता आहेत. पहिली वरीच मोठी आहे. विषय अर्थात् कृष्ण जन्मोत्सव आहे. परंतु मुरली काव्याची मौज यांत आली नाहीं. वर्णन आलंकारिक खरें, परंतु फार आलंकार झाले कीं मूळ शरीराचें सौंदर्य अजीबात झांकून जावें तसें झालें आहे; किंवा मूळ शरीराचें सौंदर्य कमी असलें कीं दागिने जसे बरेच घालावे लागतात त्यापैकीं प्रकार असावा. ‘ वेदांताचा पराक्रम ’ या कवितेंत वेदांताची महती गायिली आहे. राष्ट्रसंतांच्या प्रतिज्ञेंत ‘ मायभूला स्वतंत्र करूं तेव्हांच राहूं ’ अशी प्रतिज्ञा केली आहे. चारी पुस्तकांत शेवटच्या दोन्हीपेक्षां पहिलीं दोन पुस्तकें अधिक चांगलीं उतरलीं आहेत.

ही त्यांच्या प्रसिद्ध व पूर्ण काव्यांची गोष्ट झाली. त्यांच्या अपूर्ण व अप्रसिद्ध कविता ५–६ चे वर नाहींत. या सर्वांत ‘ पक्षिदूत ’ नांवाचें काव्य मोठें आहे. एक मराठ्याची सासुरवाशीण आपल्या माहेराला एका नीलपक्ष्या-

बरोबर निरोप पाठवीत आहे असा कथाभाग आहे. या काव्याचे एकंदर तीनच विभाग लिहून झाले आहेत. पहिल्या विभागांत त्या मराठ्या तरुणीच्या घराची व त्याच्या परिसराची हकीगत देऊन तिचे स्वरूपवर्णन केलें आहे. दुसऱ्या विभागांत ती तरुणी एका नीलपक्ष्यास आपला निरोप सांगण्यास सुरवात करिते. त्यांत माहेराचे अर्थात् मातापित्याचें रसभरित वर्णन आलें आहे तिसऱ्या विभागांत आपल्या मैत्रिणी व त्यांचेबरोबर खेळलेले खेळ यांचें वर्णन चालू आहे व याच स्थितींत तें काव्य अपुरें राहिलें आहे. त्या भागावरून अनुमान काढावयाचें झाल्यास काव्य बरेंच मोठें व सुंदर झालें असतें असें वाटतें. शब्दांवरची हुकमत पूर्ण आहे. कल्पनासौंदर्य व नादमाधुर्यही तितकेंच आहे. पुढील ओळी या गोष्टीची साक्ष पटवितील.

**बाला विमला विशालभाला कोमला प्रियाला। सौधरूप पद्मांत शोभली ती पद्मा कमला ॥ नयनसुंदरा सुंदर देहाची। देशभक्ति शाहीराची हो लावणि देशाची ॥ वदन चंद्रमा त्या बालेचा दिसे शांत शांत। नयनचांदण्या परी भटकती उगाच**

केव्हां केव्हां या गुणांचाच अतिरेक झाल्यानें थोडेसें हीनत्व आलें आहे; व कोठें कोठें जरूरीपेक्षां विस्तार अधिक झाला आहे. उदाहरणः—

**आनंदाचे खेळे आम्ही, तें जणु झोपाळा। आनंदाचा खेळ चालला, झुले सदा झोला ॥ खेळण्यांत खिदळण्यांत सारा सारा आनंद। रडण्यामध्यें हसण्यामध्यें देखिल आनंद ॥ त्रिकाल जेथें आनंदाचा मजा करी काळ। रडण्याला रडण्याला तेथें कसा मिळे काळ ॥ सकाळ संध्याकाळ जेथला हंसण्याचा काळ। रडण्याला रडण्याला तेथें कसा मिळे काळ ॥ तिथें रडावें त्या रडण्यानें परि आनंदानें। त्या हसण्यानें परी हसावें तिथें आनंदानें ॥ आनंदाचा सुकाळ तेथें तदा सर्व काळ। आनंदाचा काळ न तेथें असा नसे काळ ॥**

दुसरें अपूर्ण काव्य म्हणजे मोक्षपुराण, अथवा सेवायोग हें आहे. या काव्यास नुकतीच सुरवात झाली असल्यानें तें कसें झालें असतें हें सांगणें कठीण आहे. वृत्त ओंवी आहे. लिहिण्याचें कारण म्हणून दिलें आहे तें असें ' **मुमुक्षु असो धर्ममोक्षाचा । मुमुक्षु असो देशमोक्षाचा । त्यातें मोक्ष अर्पील हें ॥** मोक्षाचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे. ' **मोक्ष म्हणजे मोकळें होणें । स्वायत्त होणें स्वतंत्र होणें । स्वानंदमोहापासून सुटणें या नांव मोक्ष ॥** '

या काव्याचा थाट रामदासी आहे. गोविंद कवींचें पालुपद आहेच. परंतु स्वानंदमोहापासून सुटणें म्हणजे काय हें मात्र समजत नाहीं. ह्याचे पुढील विवेचन ते करितात तें असें ' **स्वानंदाच्या स्वातंत्र्याला । स्वानंदास्तव व्यामोह जडला । घालविणें त्या तन्मोहाला । या नांव मोक्ष ॥** स्वानंद या शब्दाचा नुकीचा अर्थ गोविंदांना अभिप्रेत असावा असें दिसतें. असो. हें मोक्षपुराण ग्रंथच संपलें.

या शिवाय दोन भूपाळ्या अर्धवट राहिल्या आहेत. शिवाय भगवद्गीतेवर लिहूं घातलेल्या दोनच ओळी उपलब्ध आहेत, म्हणजे लिहून झाल्या आहेत.

**अनंत संता, अनंत दांता, अनंत तूं दाविला गडे ।**
**सहस्रचंदन श्रीमंत भगवाने भगवद्गाते तुझ्या पुढें ॥**

याप्रमाणें त्यांच्या साऱ्या काव्यसंभाराचें समालोचन झालें. आतां एकच कार्य उरलें आहे, व तें म्हणजे गोविंदांचें कवि या नात्यानें महाराष्ट्रवाङ्मयांत किती उच्चस्थान आहे हें अजमावणें होय. हें काम दोन दृष्टींनीं अवघड आहे. एक तर कवी अगदीं अलीकडेच मरण पावला. समकालीन वाङ्मयावर मतें देतांना तीं कालांतरानें चुकीचीं ठरण्याचा संभव असतो. दुसरी अडचण ही कीं गोविंदांच्या काव्यांपैकीं बराचसा भाग, तोही प्रातिनिधिक स्वरूपाचा असा सरकारजमा झाल्यानें

अनुपलब्ध आहे. आतां उरलेल्या भागावरून मत देणें ह्मणजे अगदींच शितावरून भाताची परीक्षा करण्यासारखें नसलें तरी बरेंचसें अनिश्चित स्वरूपाचें होईल. दण्डी ह्मणतो त्याप्रमाणें 'नैसर्गिक प्रतिभा' 'निर्मल श्रुत अथवा ज्ञान' व 'अमन्द अभियोग' किंवा सतत काव्योद्योग हीं तीनहीं काव्यसंपदेचीं कारणें कवि गोविंदाजवळ भरपूर होतीं. फक्त मराठी पहिली इयत्ता शिकलेला गृहस्थ बहुश्रुत इतका कसा झाला हा आश्चर्य करण्याजोगती गोष्ट आहे. त्यांच्या काव्यावरून त्यांचें वाचन साधारण नव्हतें हें सहज कळून येईल. महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थानांतील व यूरोपांतील इतर देशांच्या इतिहासाचेंही ज्ञान त्यांस असावें. त्यांचें काव्यवाचनही बरेंच असलें पाहिजे. कविलोकांचे संकेत, ठराविक उपमान उपमेयें इत्यादि काव्यसामग्रीची त्यांना चांगलीच ओळख होती. संस्कृत शद्बांचा त्यांच्याजवळील संग्रह एखाद्या ब्राह्मणालाही लाजवील. हिंदुतत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा व त्यांची परिभाषा यांचीही कवीस ओळख अगदीं चांगली दिसते. त्यांच्या काव्योद्योगाविषयीं ह्मणावयाचें झाल्यास प्रथम सुमारें १८९० सालीं स्फूर्ति झाल्यावर मधलीं आठ दहा वर्षें सोडून दिल्यास २५-२६ वर्षांचे अवधींत फार नसलीं तरी बरीच काव्यनिष्पत्ति त्यांचे हातून झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या काव्याचा मुख्य विशेष ह्मणजे रसरसणाऱ्या भावना. काव्याच्या जुन्या व नव्या लक्षणाप्रमाणें रसात्मकता हा जो काव्यात्मा-तो त्यांच्या काव्यांत परिपूर्ण आहे. दुसरा विशेष ह्मणजें अनुप्रासयुक्त नादमाधुर्य हा होय. या बाबतींत ते गडकऱ्याहून कमी ठरणार नाहींत. क्वचित् ठिकाणीं या गुणांचा अतिरेक होत असला तरी उपर्युक्त कवींच्यापेक्षां अर्थशून्य शद्बरचना यांच्या काव्यांत थोडी सांपडेल. स्वतः कवि गोविंद यांची काव्याची कल्पना जरी एकांगी असली तरी उदात्त आहे. ते ह्मणतातः-" **शृंगाराला दूर सारी। हास्यरसाला**

**नांगिकारी । परि वीररसा स्वीकारी । देशा तारुनि । जी ठरली जाणि । बल-साजिरा । गुण गोजिरा । करुणाकरा । ती वीर कविता मधुतर मधुरा । प्रतिभाभरासम सुंदरा ॥**

असें जरी असलें तरी त्यांच्या 'मुरली' 'पक्षिदूत' या काव्यांवरून ती एवढ्याच साच्यांतून जावी असें त्यांचें मत नसावें. अर्थात् काव्याची त्यांची कल्पना जशी एकांगी तशीच त्यांची काव्यरचनाही एकांगी व्हावी यांत नवल नाहीं. परंतु जें अंग त्यांनीं उचललें त्या अंगांत म्हणजे महाराष्ट्र वाङ्मयांत राष्ट्रीय शाहिरी काव्यांत त्यांचा दर्जा सर्वांत वर लागेल यांत शंका नाहीं. काव्यामध्यें स्पष्ट संदेश हुडकूं पाहणाऱ्या काव्यभक्तांस त्यांत स्फूर्तिदायक संदेशहि मिळेल. बहुजनसमाजावर, तात्कालिक कां होईना पण होणाऱ्या परिणामावरून काव्याची योग्यता ठरवावयाची असेल तर गोविंद कवींची योग्यता निःसंशय उच्च होती. त्यांच्या काव्यामधील भावना विश्वजनीन सर्वव्यापक नसल्या तरी अंतस्तीव्र खास होत्या. त्यांची बरीचशी कविता महाराष्ट्रीयांनाच पटणारी असली तरी त्यांना ती आवेशानें उड्या मारावयाला लावील यांत शंका नाहीं. मानवी मनाच्या गूढ गूढ पडद्या आड असणाऱ्या सूक्ष्म भावनांना हलवून मनुष्यास गुदगुल्या करून सोडणारें त्यांचें काव्य नसलें तरी देशाभिमानासारख्या स्थूल भावनेला गदगदा हलवून ऐकणाराला झोपेंतून जागें खास करील. उच्चतर कल्पनाविलास त्यांच्या कवितेला माहीत नसलें तरी आपलें शरीर शब्दार्थालंकारांनीं कसें सुशोभित करावें हें त्यांच्या कवितादेवीस पूर्ण अवगत आहे. असें करितांना क्वचित् अतिरेकाचा दोष घडला असला तरी तो क्षम्यच आहे. जगन्नाथासारख्या विद्वान् पंडिताच्या हातीं दिली असती तर त्यानें या कवितेंत यतिभंग, वृत्तभंग, भग्नप्रक्रमता, वर्णप्रतिकूलता, निहतार्थत्व इत्यादि झाडून सारे दोष काढिले असते हें जरी खरें आहे; तरी ही कविता अशा विचिकित्सक

पंडितांच्या करितां नव्हती हेंही तितकेंच खरें आहे. आधुनिक विद्वान कवींनाही ज्या दोषांचीं नांवेंही माहीत नसतील ते दोष झाल्याबद्दल बिचाऱ्या गोविंद कवींनाच न्यायनिष्ठुरतेनें दोष देण्यांत काय अर्थ आहे ? तथापि एवढेंच येथें नमूद करावेसें वाटतें कीं पुढील जोडाक्षर पाठीमागच्या ऱ्हस्व अक्षरास दीर्घता देते हा व यासारखे दुसरे काव्यरचनेचे सामान्य नियम गोविंदांस अवगत असते, तर अनेक ठिकाणीं त्यांच्या काव्याच्या माधुर्यास आलेलें हीनत्व आलें नसतें. हें सांगावयाचें कारण, ज्या कवीची भाषेवर एवढी हुकमत होती त्याला हा दोष कळता तर टाळता आला नसता असें नाहीं. सारांश महाराष्ट्रवाङ्मयांत कवि लोकांत शाहीर म्हणून गोविंदांची जागा पहिली आहे यांत शंका नाहीं. राजस्थानच्या इतिहासांत चांदभाटाला जो मान आपण द्यावा, तोच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत गोविंदांना देणें योग्य होईल.

स्वातंत्र्यशाहिर

# कवि गोविंद

यांची कविता

# काव्यपुरस्कार.

## स्वातंत्र्याचा शाहीर नाशिकचा कवि गोविंद

शारदादेवीच्या नंदनवांत विहार करणारे नानाप्रकारचे नानारूप वर्णाचे नाना कविविहंगम आहेत. त्यांत " **अनात्मवर्ग नीर। सांडूनि आत्मरसाचें क्षीर। चरताति सविचार राजहंस॥** " ह्या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें त्यांच्याचसारखे " जगाला आनंदाचें आवार घालणारे " कविराज, राजहंस अत्यंत थोर, विरळ व सर्वकाळीं विश्ववंद्य झालेले आहेत. त्यांचे काव्यग्रंथ इमर्सननें ह्मटल्याप्रमाणें गुडघे टेकून व हात जोडून भक्तिनम्र होऊनच वाचावयाचे असतात. त्यांचा वर्ग क्षणभर बाजूला सोडला तर बाकीच्या कवींत अनेक विषयांवर अनेक तऱ्हेनें, आपले विचार लोककल्याणार्थ प्रकट करणारे अनेक चांगले कवि आहेत. ह्या कवितेच्या शाखापैकींच एक शाखा शाहीर कवींची आहे. पूर्वी होऊन गेलेल्या अगर हयात असलेल्या पराक्रमी व रणधुरंधर वीरांचे व कर्तृत्ववान् मुत्सद्यांचे पराक्रम गाऊन लोकांत राष्ट्रकल्याणाची बुद्धि चेतविणारे, अगर जागृत ठेवणारे जे कवि ते शाहीर कवि होत. शाहीर कवि वीरांचे पराक्रम ह्मणजे पवाडे गातात व लोकांमध्यें तशीच वीरश्री जागृत व्हावी अशी त्यांचा उत्कट मनीषा असते. ते राष्ट्राच्या उदयकाळीं व उन्नतकाळीं चमकतात. शिवाजी महाराजांच्यावेळीं " अफजलखानाच्या प्रसंगावर " पोवाडा करणारा अज्ञानदास किंवा " सिंहगडच्या तानाजीच्या पराक्रमावर " पोवाडा गाणारा तुळसीदास हे मराठी भाषेंतले पहिले शाहीर होत. " **शूर मर्दांचा पोवाडा। शूर मर्दानें ऐकावा** "। व अधिकाधिक मर्दुमकीचीं कामें करायला प्रवृत्त व्हावें असा पोवाडे गाण्यांत शाहीरांचा हेतु असतो. पुढें पानपतच्या

रणसंग्रामावर ७–८ पोवाडे झाले व नंतरच्या मराठेशाहीच्या काळांत रामा सटवा, लहरी मुकुंदा, राम जोशी, प्रभाकर, अनंत फंदी, होनाजी बाळ, सगनभाऊ, परशुराम वगैरे अनेक प्रसिद्ध शाहीर कवि झाले. त्या उतरत्याकाळांत लोकाभिरुचि जशी बिघडत चालली तशी या शाहीरांनीं पोवाड्यांप्रमाणें लावण्याही रचल्या. वीररसाच्या उतरत्याकाळांत शृंगाराला चेव आला व शेवट स्वराज्यनाशांत झाला. यानंतरच्या काळांत "उमाजी नाइकावर" जो पोवाडा झाला तो अद्यापि लोकप्रिय आहे. १८५७ च्या धामधुमीनंतर जी दडपशाही झाली तीमुळें कीं काय कोण जाणें पण नानासाहेब, तात्या टोपी, लक्ष्मीबाई यांच्यावर पोवाडे करणारे कोणी शाहीर झाले नाहींत, पण गेल्या ३० वर्षांत स्वराज्याची व स्वातंत्र्याची जी भूक राष्ट्रास लागली व जी लोकमान्यांच्या व इतर राष्ट्रसेवकांच्या कर्तबगारीनें अधिकच पेटत चालली तिच्या उद्दीपनापासून पुन्हां शाहीर कवींना स्फूर्ति येऊं लागली आहे. स्वराज्य कां स्वातंत्र्य, डोमिनिअन स्टेटस् कां पूर्ण स्वातंत्र्य, ह्या उभय वृत्तींच्या आंदोलनांत राष्ट्राचे पुढारी हेलकावे खात आहेत तरी, महाराष्ट्रांत प्रारंभीच स्वयंस्फूर्तीनें स्वातंत्र्याची गाणीं गाणारा पहिला शाहीर पुढें सरसावला तो नाशिकचा "गोविंद कवि" हाच होय. याची उत्तमोत्तम कवनें सांप्रत लोकांपुढें नाहींत. दोन तपापूर्वी यांचीं वीररसात्मक कवनें गाऊन महाराष्ट्रांतले तरुण नाशिकची गंगथडी व पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजची किंवा पर्वतीची टेकडी प्रभातकालीं किंवा सायंकाळीं कशी दणदणून सोडीत याचें स्मरण अद्याप पुष्कळांना असेल व आहेही. वीस वर्षांपूर्वी दडपशाहीनें कायद्याच्या व सत्तेच्या बळावर इतर अनेक वीररसात्मक पुस्तकाप्रमाणें गोविंदकवीची स्फूर्तिदायक कविताही दडपून टाकली. यानंतर ८–९ वर्षें कवीच्या वाणीनें विश्रांति घेतली, तथापि इ. स. १९१७ नंतरची गोविंदकवीची कित्येक कवनें कवीचे मित्र रा. महाबळ, रा. दातार वगैरेंनीं प्रस्तुत पुस्तकांत संग्रहीत

केली असून ह्या तेजस्वी शाहीराचें स्मरण ताजें केलें आहे. यावरच तूर्त महाराष्ट्रास समाधान मानून घेणें भाग आहे. " देशभर धर्मवीरांना स्फुरण देऊन, रणवीरांना समरांगणावर धाडणारी, व रिपुगण तुडवून स्वदेशाला ज़यस्थानाला नेंणारी " कविता हीच गोविंदकवीला अभिमत आहे. "**श्रृंगाराला दूरी सारी। हास्यरसाला नागिकारी** "। अशी तिची मर्यादा आहे. " उन्नतीच्या शाळा उघडाव्या व प्रगतीचा ऐक्यपूर्ण चंद्रोदय व्हावा " अशाच धोरणाचे राष्ट्रांत उत्सव व्हावेत ही गोविंदांची मनीषा योग्यच आहे. " प्रभु रामरायाची प्रार्थना " कवीनें इतर सर्व राष्ट्रें स्वातंत्र्यसुख अनुभवीत असतांना भरतभूमातिला " **स्वातंत्र्य सकल सुखनिधि समर्पुनि कधीं पुरविशिल काम** " अशी केली आहे. " शिवबाचा दरबार " " धांवरे धांव भगवंता " " टिळकांची भूपाळी " " जिजाईनें बालशिवाजीस दिलेला झोंका " " प्रतापराव गुजरांची अंत्य प्रार्थना " " हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें " " भारतप्रशस्ति " " महाराष्ट्र गीत " इ० देशभक्तीनें रसरसलेलीं प्रतिभासंपन्न कवनें तरुणांचीं हृदयें हालवून सोडणारीं आहेत. " प्रीतिदेवीचा उत्सव " " प्रेमश्रृंगार " " मुरली " " कृष्णजन्मोत्सव " " पक्षिदूत " " ब्राह्मण " इ० प्रकरणांतही कवीचें हृदय स्वातंत्र्यप्रीतीनें कसें भरलें आहे याचीच साक्ष पटते. " प्रेमश्रृंगार " यांत प्रेमाचा श्रृंगार गायिला असून " पक्षिदूत " या सुंदर कवनांत माहेरच्या क्रीडाकौतुकांचें व बाहुलीच्या लग्नाचें फार मनोरम वर्णन आलें आहे. "**आयुष्याची उषा मजेची दुपार चिंतेची। सांज साच ती देहास्ताची केवळ दुःखाची**॥ असें कवीनें संसाराचें वर्णन केलें असून ह्या काव्यांत वत्सलरस भरपूर असूनसुद्धां त्यावर कवीच्या स्वानुभूत उदासीनतेची छाया पडलेली आहे. मुलींच्या खेळांतला संसार गोड आहे पण प्रत्यक्ष संसारांत " क्षेमाचा भ्रम " आहे असा कवीचा अनुभव आहे. तथापि

संतांचा संसार त्यांच्या धार्मिकतमुळें गोड असतो याची त्याला जाणीव आहे "**खेळामधल्या संसारासम केवळ सुखसार । शांतीसाठीं संत वरीती धार्मिक संसार**"॥ गोविंदाला ईश्वरी अवतारांपैकीं श्रीकृष्णाविषयीं व संतांपैकीं रामदासाविषयीं प्रेम वाटतें त्यांतही त्याची राष्ट्रीय दृष्टिच प्रकट दिसते. रामदास-तुकारामांस शिवबा ह्मणतात:—**गुरुदेवांनो तुमच्या चरणीं नमनें वारंवार । मूर्त मारुति आपण, आपण नारद कीर्तनकार ॥ स्वयंज्ञान ते आपण, आपण स्वयंभक्ति साचार**" यावर ते उभयतां ह्मणतात. " **ज्ञान भक्ति रक्षण्या शिवा तूं शक्तीची तलवार.**" गोविंदकवींच्या वाणींत स्वदेशप्रीतीची कळकळ मूर्तिमंत आहे, पण त्याचें हृदय धर्मभावनानांही जाणणारें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. असो पहिला स्वातंत्र्यशाहीर " गोविंद " याचीं हीं कवनें महाराष्ट्रीय तरुणांत स्वदेशभक्तीचें बीज पेरून त्यांस कर्तव्यतत्पर करोत व " **मला आवडे तो संतांचा सदानंद गोविंद** " याप्रमाणें कृष्णप्रेमानें त्यांचीं हृदयें भरोत असें इच्छून मी येथेंच थांबतों.

नाशिक ता० १ मार्च १९३० } **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

# स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद
# यांची कविता.

## १ गणेश महिमा.

चाल—( हा नृपति किति दिसे मनोहर० )

आज करुनि मधु मंजुल गायन। आनंदवुं हा देव गजानन। आज॥ धृ०॥
गायनिं कथितां स्वदुःख यातें। करिल दया हा दीन दयाघन ॥ १ ॥
इच्छित अपुलें पूर्ण कराया। शासिल खल हा मृगांकशासन ॥ २ ॥
व्यसनांपासुनि निज दासांना। मोचनकर हा सुरम्यलोचन ॥ ३ ॥

## सुंदर कविता.

( चाल:—धनराशी दिसतां )

ती वीरा कविता मधुतर मधुरा परमेश्वरासम सुंदरा ॥ धृ० ॥

जनक जनपद जननि जनता।
धर्म देव देवी आसिलता।
गेली अरिकरिं निज प्रभुता।
म्हणुन स्फुंदत। जी उद्धारत।
" परमेश्वरा! करुणाकरा, दीनोद्धरा "

ती वीरा कविता मधुतर मधुरा प्रभुसुंदरासम सुंदरा ॥ ती वीरा०॥

गाउन गाना देशवीरा ।
देउन स्फुरणा धर्मधीरा ।
धाडुन समरां रणशूरा ।
उठवुनि रणिं रण । तुडवुन रिपुगण ।
जी ने धरा, जयइंदिरा स्ववसुंधरा ।
ती वीरा कविता मधुतर मधुरा संतांतरासम सुंदरा ॥ ती वीरा० ॥

भू–दुष्टांची प्राणमाला ।
ल्याली रिपुरक्तांबराला ।
हस्तीं भयकर करवाला ।
भयकर वरिवरि । अंतरिं जी परि ।
जनशंकरा, भक्तीपरा, प्रभु किंकरा ।
ती वीरा कविता मधुतर मधुरा दिव्यांबरासम सुंदरा ॥ ती वीरा० ॥

शृंगाराला दूरि सारी ।
हास्यरसाला नांगिकारी ।
परि वीररसा स्वीकारी ।
देशा तारुनि । जी ठरली जनिं ।
बल–साजिरा, गुण–गोजिरा, करुणाकरा ।
ती वीरा कविता मधुतर मधुरा प्रतिभाभरासम सुंदरा ॥ ती वीरा० ॥

→←

## स्वागतपर पद्य.

( सर्वकाळीं व सर्व ठिकाणीं परमेश्वराचें आवाहन करून मागावयाचें झालेंच तर याच्याखेरीज काय मागावें ? )

( चाल:—प्रणती तव चरणां )

स्वागत देवाचें । प्रभूचें । स्तवन त्याचें, करूं प्रथमचें,
भुवननमनाचें । हरीचें ॥ धृ० ॥
मागू मग वाचें । शुभाचे । प्रसाद साचे तत्करुणेचे,
आशीर्वादाचे । सुखाचे ॥ १ ॥
घेई घननीळा । दयाळा । त्वच्चरणावरि वाहियल्या या
नमनांच्या माळा । दयाळा ॥ २ ॥
पात्रे स्नेहाळा । कृपाळा । जनगणमंगल होण्यासाठीं,
उत्सव हा केला । दयाळा ॥ ३ ॥
उत्सव हा असला । दयाळा । हेतू हा कीं प्रभु उघडाव्या
उन्नतिच्या शाळा । दयाळा ॥ ४ ॥
शिक्षण-बाग नवा । फुलावा । जन हृदयाला ज्ञान फुलांचा
बहर तो यावा । खुलावा ॥ ५ ॥
सुगंध पसरावा । गुणांचा । विद्वत्तेच्या छायेमध्यें
जन-कोकिळ गावा । नटावा ॥ ६ ॥
वसंत उमलावा । प्रगतिचा । ऐक्यपूर्ण चंद्रोदय व्हावा,
मयूर नाचावा । सुखाचा ॥ ७ ॥
कुरवाळुनि बाळा । दयाळा । ज्ञानामृत तें सरस्वतीनें
पाजावें सकळां । दयाळा ॥ ८ ॥

## मना ! काय कर ! !

### भूपाळी.

ऊठ मना ! चल घे स्कंधावर प्रेमविणा मंगल ।। मंजुळ ।।
प्रेमें प्रभुला गा भूपाळी, कंठ तुझा प्रेमळ ।। धृ०।।

ऊठ, ऊठ, चल आयुष्याचा उषःकाल हांसला । मना रे ।
उपरतिभर निर्झर पाझरला, हृत्स्नानाला तुला ।। १ ।।

मानस पूजन तुझें घ्यावया, कितिक काल जाहला । मना रे ।
तुझ्याच हृदयीं तुझाच आत्मा तुझाच प्रभु थांवला ।। २ ।।

निज हृदयींचा एक दोष जरि शोधुनि तूं त्यागिला । मना रे ।
सहज उमज मग अभिषिक्तचि तो परमात्मा जाहला ।। ३ ।।

दुर्गुण त्यागावयास तत्पर मानस होतां तुझें । मना रे ।
पुरुषसूक्त मग म्हणावयाला हवें कशाला दुजें ।। ४ ।।

षड्रिपुला जिंकावें, व्हावें यत्नें हृषिकेश । मना रे ।
संध्यावंदन हेंच आवडो तुजला निर्दोष ।। ५ ।।

गायत्रीचा मंत्र जपावा हाच निरंतर नवा । मना रे ।
स्वाधिन होवो सर्व कामना लोभमोहसंभवा ।। ६ ।।

( अपूर्ण )

# महाराष्ट्रीय हिंदु-धर्म परिषदेकारितां स्वागतपर गीत.

( देश, काल आणि परिस्थिति यांना अनुसरून आज समतारूप धर्माचीच प्रतिष्ठापना होणे अत्यंत इष्ट आहे तेंच सर्वेश्वरपूजन होय. )

( चाल:—सब दुनियेका पालनवाला )

प्रारंभीचें प्रणामपूजन ज्याचें त्याला निवेदन।
तदीय दर्शन अतीव दुर्लभ परी सुलभ तद्याधन ॥ ध्रृ०॥
धर्मसभेचें त्यास निमंत्रण धर्मप्रयोजन तो जाणे।
प्रसन्न व्हावें, येथें यावें स्वयं-प्रसन्नानें त्यानें ॥ १ ॥
सुमंगलांनीं, महद्यशांनीं, ईशाशीर्वादांनीं या।
स्वधर्म-चंद्रावरी शुभाचें तारामंडळ अंबर व्हा ॥ २ ॥
विश्वराउळीं प्रेमघनांनीं, अभिषेकाचें पात्र बना।
धर्म-शिवावर पावित्र्याचे श्रद्धेचे अभिषेक करा ॥ ३ ॥
या हास्यांनीं, या लास्यांनीं, करा मौज या काव्यांनीं।
तानांचें कारंजें उडवा उत्सवांत या गानांनीं ॥ ४ ॥
धर्म-सभेला मूळ मनांच्या मनोतरंगांनीं यावें।
धर्मोन्नतिच्या विकासावरी प्रकाश सांप्रत पाडावे ॥ ५ ॥
ज्ञानाच्या नौबदी नादवा, कर्णे फुंका त्यागाचे।
भो वेदांनीं, उपनिषदांनीं वाजंत्री तुम्हि देवांचे ॥ ६ ॥
गीता-देवी विवेक उधळी, समय पातला भाग्याचा।
सद्भक्तीच्या सभा-मंडपीं उत्सव होतो धर्माचा ॥ ७ ॥

श्रीमद्रामायणा, भारता, अखंड स्वागत तें तुमचें ।
तुम्ही आरसे आर्यमनाच्या धर्माच्या प्रतिबिंबाचें ॥ ८ ॥
धन्य धन्य तुम्हि ऋषीजनांनों, धर्मसूर्य तुम्हि वाढविला ।
त्या सूर्यावर बसवुनि जनगण परम पदाला पाठविला ॥ ९ ॥
श्रीरामाच्या वत्सल बाणा, श्रीकृष्णाच्या सुदर्शना ।
भवानि-खड्गा धांव रक्षणा धर्म होय केविलवाणा ॥ १० ॥
स्थिर सिंहासन केलें ज्यांनीं धर्माच्या साम्राज्याचें ।
अभिनंदन त्या जगद्गुरूचें आद्य शंकराचार्यांचें ॥ ११ ॥
मिरवित दिंडी ये भक्तीची पंढरिच्या पांडुरंगा ।
भूतदयेच्या मूर्त कळवळ्या स्वागत तव गौतमबुद्धा ॥ १२ ॥
गुरु गोविंदा, रामदास, या धर्मधीर तुम्हि साचार ।
स्वसंरक्षणा दिधली आपण धर्माच्या कारिं तरवार ॥ १३ ॥
वीरश्रीची जिवंत दीप्ती, धर्माची अन्तःस्फूर्ती ।
शत तोफांची सलामि झडुं द्या, आले श्रीमान् छत्रपती ॥ १४ ॥
प्रचंड चळवळ होमरूलची, उदंड खळबळ यत्नांची ।
बोला जयजयकार बंधुहो, स्वारी आली टिळकांची ॥ १५ ॥
प्रथित शीख, रजपूत, मराठे, धर्मशूर तुम्हि महाशूर ।
सेनासागर हेलावित या ‘ स्वागत ’ तुमचें निरंतर ॥ १६ ॥
उत्पादक या, संस्थापक या, या संरक्षक धर्माचे ।
सुधारकांसह उद्धारक या सादर स्वागत सकलांचें ॥ १७ ॥
स्वागत तुमचें चहुं वर्णाच्या सभासदांनों, आर्यांनों ।
धर्मरूप तुम्हि देवरूप तुम्हि, विनंति ऐका ज्ञात्यांनों ॥ १८ ॥

मनोवृत्तिची खळवळ उठणें—उठणें म्हणजे बहुखेद ।
मनोवृत्तिचा निग्रह होणें—होणें म्हणजे आनंद ॥ १९ ॥
मनोवृत्तिचा प्रसार झाला-झाला म्हणजे जीवात्मा ।
मनोवृत्तिची समता बनली-बनला म्हणजे परमात्मा ॥ २० ॥

निग्रह, समता, ज्ञान, ध्यान, नय, प्रेम, समाधी, वैराग्य,।
ऐक्यनिदर्शक, प्रसारध्वंसक, साम्यार्थार्थी हे शब्द ॥ २१ ॥
म्हणून समजा विचार—युक्तया-समता-कारक जें कर्म ।
त्या कर्माला, त्या मार्गाला, म्हणती ज्ञानीजन धर्म ॥ २२ ॥
समता धर्मच श्रीवेदांचा, उपनिषदांचा, सूत्रांचा ।
समता धर्मच श्रीगीतेचा, योगांचा, स्मृति-शास्त्रांचा ॥ २३ ॥
समता धर्मच श्रीरामाचा, योगेश्वर श्रीकृष्णाचा ।
समता धर्मच छत्रपतींचा, आचार्यांचा, टिळकांचा ॥ २४ ॥
या धर्मानें प्रेम वाढतें, प्रेमानें साधें ऐक्य ।
अशक्य ऐक्या असें काय मग? सिद्ध कार्य तें प्रत्यक्ष ॥ २५ ॥
हा ऐक्याचा गणेश झाला प्रसन्न जेव्हां शिवबाला ।
चमत्कार तधिं काय उडाला ठावा आहे सकलांला ॥ २६ ॥
गुलामगिरिचा ऱ्हास हवा कां? शरण रिघा मग समतेला।
स्वातंत्र्याचा स्वर्ग हवा कां? शिरीं धरा मग समतेला ॥ २७ ॥
भगवंताचा शोध हवा कां? अर्पा मन मग समतेला ।
आनंदाचा कंद हवा कां? जीव वहा मग समतेला ॥ २८ ॥
तरी प्रार्थना धर्मबंधुनां वंदावा शिरिं हा धर्म ।
या धर्माच्या हृदीं जन्मतें इहपरलोकांचें शर्म ॥ २९ ॥

जगदंबेचा–श्रीसमतेचा करा चला जयजयकार ।
कलहजन्य त्या मूर्ख रूढिचा अतां पुरे हो सत्कार ॥ ३० ॥
मूर्ख रूढिनें लिलाव करुनी अमुच्या राष्ट्रप्रेमाचा ।
विकत घेतला गुलामगिरिचा मूर्खपणा बेअब्रूचा ॥ ३१ ॥
मनुष्यनिर्मित भेद नसावा मानव बंधूबंधूत ।
निदान त्यांनीं जनांत येतां त्यागावा तो देशार्थ ॥ ३२ ॥
हिंदु बंधुनो, शांतिदेविला स्नेहालंकारें नटवा, ।
मनोरथावर अपुल्या मिरवा, स्वात्मपदावर मग बसवा ॥ ३३ ॥
विचार सुंदर न्यायमनोहर, समतासूत्रीं गुंफून ।
सर्व मनांची मंगलमाला करा प्रभूला समर्पण ॥ ३४ ॥

## ६ सरस्वतीची भूपाळी.

( परमात्म्याच्या चित्सौंदर्याच पूजन व आवाहन करावयाचें झाल्यास आत्मरूप वेलींच्या स्फूर्तिरूप विकसित फुलांनींच करणें योग्य. पूज्यपूजक संगम हाच सरस्वतीचा साक्षात्कार ! )

नमनें वाहुनि स्तवनें उधळा, जयजयकार करा ।
बंधुहो । जयजयकार करा ।
सकल मनांचा विकास येतो आज आपुल्या घरा ॥ ध्रु० ॥
विमलहास्यसुमवृष्टीमध्यें असो तुझें स्वागत ।
निरंतर । असो तुझें स्वागत ।
परमात्म्याच्या चित्सौंदर्या, येई वा हांसत ॥ १ ॥

आत्मवेलिच्या स्फूर्तिंफुलांवर वसंत जे विकसती ।
बुद्धिचे । वसंत जे विकसती ।
त्याच वसंता, तदिय विकासा, सरस्वती बोलती ॥ २ ॥
विश्वकाव्य वाचीत बैसली चित्तमयूरावरी ।
दीप्ति जी । चित्तमयूरावरी ।
त्या दीप्तीला, त्या ज्ञप्तीला, वदती वागीश्वरी ॥ ३ ॥
हे वाग्देवी, असे प्रार्थना ये या संकीर्तना ।
उत्सवा । ये या संकीर्तना ।
जगन्मंगले, सकल मंगलांसह दे पददर्शना ॥ ४ ॥
सगुण शांत त्वच्चित्रमूर्तिला गातों मी गायन ।
शारदे । गातों मी गायन ।
धन्य धन्य सौंदर्य, धन्य त्वत्प्रसन्नपुण्यानन ॥ ५ ॥
किरिट शोभला त्वन्मौलीला अमूल्य तत्त्वांचा ।
शारदे । अमूल्य तत्त्वांचा ।
अरुण राग त्यांतून उधळला सद्गुणरत्नांचा ॥ ६ ॥
डोले कंठीं सच्छास्त्रांचा चंद्रहार हांसरा ।
पाहुनी । चंद्रहार हांसरा ।
भालीं फुलला, गालीं खुलला काव्यदिव्यविजवरा ॥ ७ ॥
सौंदर्याहुनि दिव्य दिव्यतर हिचें ज्ञान सुंदर ।
खरोखर । हिचें ज्ञान सुंदर ।
त्या ज्ञानाहून जगांत सुंदर एकच परमेश्वर ॥ ८ ॥
हृदयमंदिरीं प्राण–शक्तिचे झोंपाळे डोलवी ।
देवि ही । झोंपाळे डोलवी ।
सुखदु:खाचे देउनि झोके जीवांना खेळवी ॥ ९ ॥

विचारकारंजावर तुषार शब्दांचे नाचवी ।
देवि ही । शब्दांचे नाचवी ।
जीवात्मा त्यांतून बोलवी परमात्मा डोलवी ॥ १० ॥
चराचराचा दावि चित्रपट अमुच्या स्मरणावर ।
भराभर । अमुच्या स्मरणावर ।
विजेऐवजीं त्यांत जळे चिच्चंद्राचें झुंबर ॥ ११ ॥

## ७ श्रीजिजाबाईनें बालशिवाजीस दिलेला झोका.

( प्रत्येक हिंदमातेनें असलेंच गाणें आपल्या लाडक्यांना नको का गावयाला ? )

( चाल:—अजि अक्रूर हा )

—१—

मी लोटीतें झोका तुज शिवबाळा ।
सुंदरा, नीज स्नेहाळा ॥ धृ० ॥
तनुशांतीतें शांत नीज तुज येण्या ।
राष्ट्रगीत गातें तान्ह्या ।
बघ दास्यिं जळे मही अंबिका माय ।
हंबरडे फोडी हाय ! ।
निजशत्रूंनीं हिचें भंगिलें छत्र ।
मांगल्य—सूत्र स्वातंत्र्य ।
या दु:खानें दु:खि फार रे पाही ।
मी जिजाबाइ तव आई ।

**(चाल)**— बहु शत्रु मातले मेले । रे ।
मेल्यांनिं आर्यधन नेले । रे ।
आमचें राज्य बुडवीलें । रे ।
कुणि निपजेना शास्ता यां चांडाळां ।
सुंदरा नीज स्नेहाळा ॥ १ ॥

—२—

भूमातेच्या भूतकाळिं उद्धरणीं ।
झुंजली रणीं मृडरमणी ।
श्रीरामानें रावण वधिला लढुनी ।
वानरां वीर बनवूनी ।
घे स्वतंत्रता कंसाच्यापासूनी ।
गोविंद गोप जमवूनी ।

**(चाल)**—तूं तसा वीर होशिल कां ? । रे ।
तरवार करीं धरशिल कां ? । रे ।
मिळविशिल मावळे गडि कां ? । रे ।
रणिं वधावया देशशत्रुचा मेळा ।
सुंदरा नीज स्नेहाळा ॥ २ ॥

—३—

भूभक्तीचें प्रबल दुग्ध पाजीन ।
मी वीर तुला बनवीन ।
रिपुरक्तें भू तुझ्या करीं न्हाणीन ।
स्वातंत्र्य घरीं आणीन ।

साधीन सख्या जाण लोककल्याण ।
तुज राज्यपदीं स्थापून ।
(**चाल**)—स्वातंत्र्य विराची माता । रे ।
मी स्वातंत्र सुधन्य होतां । रे ।
ध्वज स्वातंत्र्याचा डुलतां । रे ।
ठेवीन तनू अशा नंदमय वेळा ।
सुंदरा नीज स्नेहाळा ॥ ३ ॥

—४—

गद्गदा तदा पाळण्यांत शिव हंसला ।
जणुं मातृबोल त्या रुचला ।
मग कारि लीला मृदुल मुष्टि वळवून ।
जणुं म्हणे हिनें रिपु वधिन ।
ताशि आर्यशिखा रक्षिन या भावें हो ।
जावळाशिं तो खेळे हो ।
श्रीजिजाइला असा क्रीडतां तान्हा ।
दाटला प्रीतिचा पान्हा ।
(**चाल**)—उचलिलें तिनें तधिं त्याला । हो ।
उचलिलें जणूं प्रेमाला । हो ।
आलिंगि, चुंबि तान्हूला । हो ।
गोविंद म्हणे सफल तदाशय झाला ।
शिव स्वतंत्र कारि देशाला ॥ ४ ॥

## ८ प्रभु रामरायाची प्रार्थना.

( चालः—तू टाक चिरुनि ही मान. )

हे घनःश्याम—श्रीराम—वदात्माराम ।

स्वातंत्र्य सकल सुखनिधी समर्पुनि कधीं पुरविशिल काम ॥ ध्रृ० ॥

( चाल )— त्वां अमेरिका सुखवीली । स्वातंत्र्यें ।
भू—जपानींचि नटवीली । स्वातंत्र्यें ।
इटलीहि तशी हंसवीली । स्वातंत्र्यें ।
मग आर्यभूच कां पारतंत्र्य—कर्दमीं फसविली राम ॥ १ ॥

( चाल )— हे पक्षि तरूवरि गाती । स्वच्छंदें ।
काननीं त्यापरी रमती । मृगवृंदें ।
स्वातंत्र्य सौख्य सेवीती । आनंदें ।
मग अम्हांलाच कां पारतंत्र्यपंजरीं कोंडिलें राम ॥ २ ॥

( चाल )— दंडुनी दशानन तेव्हां । कोदंडें ।
सुरवृंद रक्षिला देवा ! । आनंदें ।
पांडवा राज्य दिधलें त्वां । गोविंदें ।
मग अम्हांवरिच कां दया न करिशी मुनींद्र ! जनविश्राम ॥ ३ ॥

## ९ वसंत गेला !

[ लोकमान्यांना १९०८ साली शिक्षा झाली त्यावेळीं ही कविता केली आहे ]

अमुचा वसंत कोणी नेला ।
त्यावांचुन जनहृत्कमलांचा बाग म्लान झाला ॥ धृ० ॥
भू रडे, स्मरे टिळकाला ।
प्रेमाच्या पाळण्यांत तीनें वाढविलें हो त्याला ॥ १ ॥
जो परम प्रिय देवाला ।
नीतिजातिशुभसुमनहार तो अग्नीवरती धरिला ॥ २ ॥
तो दयामृताचा पेला ।
जिवंत आह्मा करण्यासाठीं प्रसाद प्रभुनें दिधला ॥ ३ ॥
भूचैतन्याचा शेला ।
अंधारीं पळविला भूमिचा देह दिगंबर केला ॥ ४ ॥
स्मरतां मनीं टिळक रायाला ।
भगवद्गीते, तुझ्या कंठिं कां माते, गहिंवर भरला ॥ ५ ॥
जो करी बोध गानाला ।
देशभक्तिच्या आम्रवनांतिल कोकिळ व्याधें धरिला ॥ ६ ॥
या पुण्योत्सवकालाला ।
टिळकतुकोबा देशभक्तिच्या कां न कीर्तना आला ॥ ७ ॥
वाल्मीकि ह्मणूं टिळकाला ।
स्वतंत्रतेचें रामायण जो नित्य कथी विश्वाला ॥ ८ ॥
आह्मा मोक्षाला नेण्याला ।
ज्ञानेश्वरि केसरीपत्रिका, ज्ञानेश्वर तो बनला ॥ ९ ॥

तह देशाचा करण्याला ।
नरवर गाजी टिळक शिवाजी दिल्लीला कां गेला? ॥ १० ॥
कथि न्यायदेवते मजला ।
टिळक विठोबा केव्हां येइल पुण्यपूर पंढरिला ॥ ११ ॥
हे सख्या टिळक स्नेहाळा ।
आह्मांसाठीं बंदिवास—वनवास तुला कां आला ॥ १२ ॥
देवा पंख देइ आह्माला ।
ह्मणजे उडून जाऊं वदू त्या सज्जनचरणाला ॥ १३ ॥
गातां टिळकांच्या स्तोत्राला ।
कविता देवी ! नाहिं अजुनि कां हेतु पूर्ण तव झाला ॥ १४ ॥
गंधर्वांनो, गा गानाला ।
बंदिगृहांतील अमुच्या जनका टिळका रमवायाला ॥ १५ ॥
वर्षुनि तदिय शीर्षि सुमनांला ।
सुरांगनांनो—सुरप्रियांनो प्रसन्नता द्या त्याला ॥ १६ ॥
मम विनति सकळ देवांला ।
कारागृहिं व्हा रक्षण श्रीमत्पुण्यश्लोक टिळकाला ॥ १७ ॥

## १० गणेशस्तवन.

( चाल:—तूं टाक चिरुनि ही मान० )

हे सदया गणया तार, तुझ्यावरि भार ।
तूं माय बाप आधार, तुझ्यावरि भार ॥ धृ० ॥

कितिं देशशत्रु भूतलीं ।
तशि सहा भुतें आंतली ।
शापें वा सुशरें जाळी ।
तो ब्राह्मण आतां खाई परक्या लाथांचा वा मार ॥ १ ॥
देशावरि हल्ला आला ।
पुरुष तो लढोनि मेला ।
स्त्री गिळी अग्निकाष्टाला ।
रजपूत परी त्या परवशतेचें भूत पछाडी तार ॥ २ ॥
अटकेला झेंडा नेला ।
रिपुकटका फटका दिधला ।
दिल्लीचा स्वामी झाला ।
तो शूर मराठा पाहिं तयाचें खाइ न कुत्रें हाल ॥ ३ ॥

## ११ दारूबाजास इषारा.

( चालः—फटक्याची )

अनंत लाभासाठीं देखिल असेव्य मदिरा सेवुं नको ।
ऐक ऐक हा बोध बुधांचा, देशबांधवा ! भुलं नको ॥ धृ० ॥
दुग्धसुधा सुंदरा चुंबि वा, सुरेस कंठीं धरूं नको ।
निजमौळींचा मंगल धन्यद, सद्यशमंदिल मळवुं नको ॥ १ ॥
सुखद यौवनीं अभिनवयौवन, जराधीन तूं करूं नको ।
मद्यविषानें आयू असुनी मरूं नकोरे मरूं नको ॥ २ ॥
दुर्व्यसनांच्या संगें रंगुन, रोग घराला आणुं नको ।
बंधूराया सुंदरकाया, मद्याग्नीवर जाळुं नको ॥ ३ ॥

पत्निबालका उधळुनि पैका, झोळी घ्याया लावुं नको ।
सुरासुरीनें श्रीसंसारा, अरे प्रिया संहरूं नको ॥ ४ ॥
दिली प्रभूनें मनुष्ययोनी, पिशाचवर्गी शिरूं नको ।
पिशाच्चमदिरा देहिं नाचवुन, जगा तमाशा दावुं नको ॥ ५ ॥
परमेशाला निजधर्माला जे न रुचे तें वरूं नको ।
सुगुणमाधवी हृदी फुलूं दे, दुर्गुणविषतरु पोसुं नको ॥ ६ ॥
सकल मद्यपी मद्यसागरीं, बुडालेच तूं बुडूं नको ।
या भुवनाच्या अनुभूतीवर, मत्त होउनी थुंकुं नको ॥ ७ ॥
**चाल**—पुण्याचा क्षय करूं नको । पाप मस्तकीं धरूं नको ॥
नरकामध्यें पचूं नको । करून 'छीःथूः' घेउं नको ॥
सर्वस्वासह स्वप्राणाला प्राशुनि मदिरा भुलूं नको ॥ ८ ॥

—>•<—

—साठाव्या वाढदिवसानिमित्त केलेली—

## १२ लोकमान्य टिळकांची भूपाळी

( ज्या एकाच खांबावर ही 'महाराष्ट्रद्वारका' सुखांत निर्भर होती, त्याचें तिच्याकडून वारंवार कां बरें कौतुक होणार नाहीं ! व या 'जनचित्तचक्रवर्ती' ची भूपाळी जनता घोळून घोळून म्हटल्याशिवाय कशी राहील ! )

जय जय टिळका, अपर समर्था, धीरा धीभास्करा ।
शुभकरा । धीरा, धीभास्करा ।
मायभूमि ही करित आज तव जन्मोत्सव साजरा ॥ ध्रु० ॥
जो जो बाळा, जो जो टिळका, जो जो गुणसुंदरा ।
उदारा । जो जो गुणसुंदरा ।
तुझा पाळणा आज डोलवी जनप्रीति प्रियकरा ॥ १ ॥

आर्यजनमनें सुगंधसुमनें भूमाते, घे करीं ।
सत्वरी । भूमाते, घे करीं ।
टिळक सुतावर उधळ कुतुहलीं वात्सल्याच्या सरी ॥ २ ॥
उधळुं कीर्ति ती,उधळुं भूति ती,उधळुं भक्ति-नति खरी ।
स्तुतीसह । उधळुं भक्ति–नति खरी ।
स्वकीय क्षमता संतत उधळूं टिळकहृद्गतावरी ॥ ३ ॥
ज्ञानरवीचा उषःकाल तो बालतिलक जाहला ।
तेधवां । बालतिलक जाहला ।
मूढावस्था फोडुनि आतां विजयनभीं ठाकला ॥ ४ ॥
हृदयोहृदयीं प्रकाश पडला स्वत्वाचा धृतिधर ।
हितकर । स्वत्वाचा धृतिधर ।
जागृतिलोचन आले प्रगतिस उदयोन्मुख सुंदर ॥ ५ ॥
आर्यजनमनें सहस्रकिरणें सहस्रकर तो हंसे ।
टिळक हा । सहस्रकर तो हंसे ।
प्रताप त्याचा आशागगनीं निश्चित भरला असे ॥ ६ ॥
सुदैववनिच्या भविष्यतरुवरि बसुन आत्मशक्तिची ।
प्रचितिची । बसुन अत्मिशक्तिची ।
विवेक कोकिळ गाउं लागला भूपाळी मुक्तिची ॥ ७ ॥
शुभ यत्नांचा निसर्ग हळुंहळु फुलत चालला नवा ।
एधवां । फुलत चालला नवा ।
त्वत्तेजानें टिळकभास्करा, जयदेवा, धीधवा ॥ ८ ॥
उद्धरणाचीं, उल्हासाचीं, स्तोत्रें मुखिं नाचतीं ।
मनाच्या । स्तोत्रें मुखिं नाचतीं ।
विश्वासाचीं, साश यशाचीं, वाग्यंत्रें वाजतीं ॥ ९ ॥

संशय–अभ्रें गर्दी करिती मनावरी वरिवरी ।
जरि तरी । मनावरी वरिवरी ।
उपदेशाचा पवन तुझा तो सारी परि तीं दुरी ॥ १० ॥
( **चाल** )— धृतिहर दुःखावली । जशी ती ।
ग्रहणें तुज लागलीं । तशीं तीं ।
निर्भय तूं सोशिलीं । अशीं तीं ।
व्यसनच्छळानें अधिक झळाळे त्वत्प्रतिभा भास्वरा ।
भूवरा त्वत्प्रतिभा भास्वरा ।
आत्मश्रीचा अभयहस्त तो त्वच्छिरिं देशांबरा ! ॥ ११ ॥

—२—

टिळक नव्हे, हें श्रीगीतेचें हृदय प्रकट जाहलें ।
ज्ञानमय । हृदय प्रकट जाहलें ।
कर्मयोग तो शिकवायाला आर्यजनीं धांवलें ॥ १ ॥
कार्यकुशलता, नीतिचतुरता, श्रीहरिची जन्मते ।
टिळकमिष । श्रीहरिची जन्मते ।
विघ्नांशीं झुंजते, मांडिते डावावरि डाव ते ॥ २ ॥
परिस्थितीनें, प्रभूदयेनें सुगुणगुणीं गुंफिला ।
चांगला । सुगुणगुणीं गुंफिला ।
निजोन्नतीचा भद्र हार हा भूकंठीं घातला ॥ ३ ॥
जनभाग्यांतुन हिमालयांतुन गंगौघच हा पुढें ।
धांवला । गंगौघच हा पुढें ।
राष्ट्रिय दुर्गुण धूत चालला मोक्षसागराकडे ॥ ४ ॥

मनोबलफणाशेष टिळक हा करीतसे प्रार्थना ।
प्रभूला । करीतसे प्रार्थना ।
" अधर्महनना चला उठा हो विक्रमनारायणा !" ॥ ५ ॥
परमेशाचा जाहिरनामा टिळकरूप लागला ।
वाचला । टिळकरूप लागला ।
" प्रभुवर भूवर येइल आतां दीनांच्या पालना " ॥ ६ ॥
देशभक्तिचें कल्पद्रुमवन विस्तारी केसरी ।
जनहृदीं । विस्तारी केसरी ।
आशा वाटे खुलेल फुलेल वसंत तो लवकरी ॥ ७ ॥
सुबोध वीणा करीं झणाणा, नाच स्वावलंबना ।
मयूरा । नाच स्वावलंबना ।
टिळकांची वाग्भगवति गाते राष्ट्रगीतगायना ॥ ८ ॥
नव्हे टिळक, हा स्वार्थत्यागच महाभाग भासतो ।
साच तो । महाभाग भासतो ।
उपकृति-धृतिसह उदारता ती जनांवरि उधळितो ॥ ९ ॥
नव्हे टिळक, ही आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर । शिवरायाची असे ।
निश्चय-निग्रह-भगवा झेंडा करांत झेलीतसे ॥ १० ॥
रामदासकृत रघुरायाची उपासना ही म्हणूं ।
खरोखर । उपासना ही म्हणूं ।
धीरश्रीनें वीरश्रीनें भयास भिववी जणूं ॥ ११ ॥
विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते ।
टिळक ही । देशभक्ति खेळते ।
बंधुप्रीती गीतें गाते, समता ती डोलते ॥ १२ ॥

पूत ध्येय तें, पूत कार्य तें त्वदाचार पूत तो ।
मूर्त तो । त्वदाचार पूत तो ।
स्वदेशमंगल मंगल हेतू हृदयिं तुझ्या नाचतो ॥ १३ ॥
किती धन्यता, किती मान्यता, किती पूज्यता परा ।
नरवरा । किती पूज्यता परा ।
स्वयं कीर्ति ती चामर ढाळी तुजवर ज्ञानेश्वरा ॥ १४ ।
तव अनुशासन जनसंजीवन, सिंहासन तुज नसे ।
फक्त तें । सिंहासन तुज नसे ।
सार्वभौम भूपाळ परी तूं जनादराचा असे ॥ १५ ॥
तुझी योग्यता भारी भारी जनता ऐसें वदे ।
विचारी । जनता ऐसें वदे ।
असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढें ॥ १६ ॥
मुक्या मनानें किति उधळावे शद्बांचे बुडबुडे ।
तुझ्यावर । शद्बांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥ १७ ॥
कुशल असो हा, विजयी असो हा, टिळक जगन्नायका ।
आयका । टिळक जगन्नायका ।
प्रभु या एका खांबावर उभि महाराष्ट्रद्वारका ॥ १७ ॥
( **चाल** )— ऐक्याचा हेरंब । टिळक हा ।
मुमुक्षुचा अवलंब । टिळक हा ।
विजयाचा प्रारंभ । टिळक हा ।
ऊठ पूज्यते, अश्रुजलतते, अभिवादनदेवते ।
मन्मते । अभिवादनदेवते ।
पुण्यपुराला टिळकपदाला समर्पि मद्भाल तें ॥ १९ ॥

## १३ शिवकालिन होलिकामहोत्सव.

चाल:— **फटक्याची.**

अहो तरुणहो! कल्पद्रुमहो! स्वातंत्र्याचे प्रणते हो! ।
निजपूर्वजकृत हुताशनींचे मंगल विहार परिसा हो ॥ १ ॥
परसत्तेचा फाल्गुन ठेला स्वदेशांतरीं जाणून ।
गडी मराठे खेळ खेळण्या सर्व निघाले झाडून ॥ २ ॥
खड्गाच्या त्या करीं घेतल्या टिपऱ्या सजले होळकर ।
हल्ला! हल्ला! करित निघाले करण्या हल्ला अरीवर ॥ ३ ॥
समरपटांगण भव्य योजिले हुताशनीच्या महोत्सवा ।
रिपुरक्ताचे सडे घालुनी समारंभ मांडिला नवा ॥ ४ ॥
निजदेशाच्या सद्भाग्याच्या स्वातंत्र्याच्या चोरांचीं ।
छेदुनि मुंडें रचिली होळी थोर नगाच्या साम्याची ॥ ५ ॥
मग तो प्रभुवर वीर शिवाजी बसला होळी अर्चाया ।
रामदास गुरु भगवन् येतां सन्मंत्रातें सांगाया ॥ ६ ॥
रिपु–ऊर जो धुपूं लागला धूप जाळुनी तो सद्य ।
गंध अक्षता जुल्लम जबरी भेद अर्पिला नैवेद्य ॥ ७ ॥
वरी ठेवितां कोपानल भडकली होलिका बहुचंड ।
तींत जळाला गुलामगिरिचा जुनाट पोकळ एरंड ॥ ८ ॥
जयजय हरहर या स्वनघोषें अनंत अंबर नादविलें ।
परी नाहिं कधिं बिभत्स शब्दें वदन त्याहिं निज विटाळिलें ॥ ९ ॥
लंबकर्ण नव वारू वरतीं राष्ट्ररिपूगण बैसविला ।
करण्या लावुन शंखध्वनि अति पाठ काढुनी पिटाळिला ॥ १० ॥

तसा जाहला धुळवाडीचा खेळ वेळिं त्या बहु निका ।
धूळ कोंबितां शत्रुमुखीं मग कोण बोलतो नका नका ॥ ११ ॥
लाल लाल तोफेचे गोळे गुलाल गोटे फेंकियले ।
प्रतिपक्षाचा नक्षा उतरुनि बजरंगाचि त्या बनवीले ॥ १२ ॥
स्वातंत्र्यास्तव रणीं झुंजले शूर होउनी साक्षात ।
सोंगें घेउनि व्यर्थ विरांचीं ते न नाचले वायांत ॥ १३ ॥
पुढें उडाला रिपुरक्ताचा रंग चांगला पंचमिला ।
त्यासह सरला परवशतेचा गमे रंग हो लोकांला ॥ १४ ॥
झाल्यां कुस्त्या पहा शेवटीं समरकड्यांमधिं बहूपरी ।
गुलाम जन ते स्वतंत्र होउनि बसले अरिच्या उरावरी ॥ १५ ॥
माळ घातली शिववाला तधिं विजयश्रीनें गाठ्यांची ।
द्यावीं त्यानें आर्य विरांना कडीं कां न मग समतेचीं ॥ १६ ॥
अशा रीतिनें प्रसन्न होतां स्वातंत्र्याचा वसंत तो ।
केला उत्सव गुढ्या उभारुनि गुढीपाडवा येतां तो ॥ १७ ॥
गेले ते दिन परी राहिला बोध त्यांतला कायम हो ।
निजपूर्वजकृत हुताशनीचे मंगल विहार परिसा हो ॥ १८ ॥

→←

## १४ हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें.

( कोणत्याही अंतःकरणाचा ठाव घेतला तरी तेथें या खेरीज काय आढळेल ? )

[ चाल:—अच्युतं केशवं ]

दास्यहर, ऐक्यधर, लोकगण–गणपते,
वारिता होय बा ! भक्तजनसंकटें.
प्रकट सामर्थ्य कर विजयपर सन्मते !
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! १
आर्यबुध्यंबिके ! वीर्यबलशालिने !
पूर्वि तूं स्थापिलीं अमित सिंहासनें;
दाव कर्तृत्व तें समयिं या देवते !
हिंदभू वांच्छिते विगत स्वातंत्र्य तें ! २.
कांहिं कर डाव रे ! जनविचारा अरे
फेंक दास्यावरी युक्तिचें जाल रे !
मुक्तिच्या प्राप्तिचे दाखवी मार्ग ते
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ३
राष्ट्रमाना ! तुझ्या स्वाभिमानाप्रति
राष्ट्रकीर्ते ! तुझ्या ख्यात इर्ष्येप्रति
पौरुषाचें पुरें येउं द्या स्फुरण तें !
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ४
लोकलज्जे अगे ! ब्रीद स्मर पूर्विचें
होउंदे अवन तें भूमिच्या अब्रुचें !

देशदीपन घडो, आणि झडो दैन्य तें,
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ५

स्वार्थसंन्यास तो आदरी जनपदा !
तत्कृपें कामदा सिद्धि साऱ्या सदा !
त्यास दुःसाध्यसे नाहिं जगिं कांहिं ते
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ६

राजनीते ! तुझी चालवी चातुरी !
घाल घाला पुरा शत्रुछद्मावरी !
विफल कर प्रबलतर दास्यकृत खलव्रतें,
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ७

धीरते ! वीरते ! आत्मबल आठवा;
राष्ट्र रक्षावया शूर व्हा, सिद्ध व्हा;
चालुं द्या यत्न ते; यत्नवश ध्येय तें;
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ८

स्वानुभव पूर्व तो, आत्मविश्वास तो !
पूर्वजांचा कथिल विजय इतिहास तो!
पूर्व विज्ञान तें, भावि जयमान तें,
हिंदभू वांछितें विगत स्वातंत्र्य तें ! ९

गा कवे ! स्फूर्तिचीं राष्ट्रगीतें नवीं !
लोक हृदयांतरीं वीररस नाचवी !
नाचवी तरुण ते, चमकवी तेज तें
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! १०

'देउं स्वप्राण तो, रक्षुं भूप्राण तो'
आर्यतरुणा ! असा करच निर्धार तो

देहपातांत तव राष्ट्र तव वांचतें !
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! ११

लोकभवितव्यते ! कर कृपा सुंदरी
लोकयत्नास दे विजय परमेश्वरी
त्वत्कृपें होतसें विघ्न निर्विघ्न तें !
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें १२

सद्गुणांची करा वृष्टि या भारतीं
पूर्वजांनो ! तुम्हां विनति ही संप्रति
सगुण सकलांस तें संकटीं तारितें
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें १३

प्रार्थना ही यदा सकल देवा कळो !
भक्तजनतारणा त्याचि करुणा वळो !
भारताला मिळो भाग्यपद अचल तें !
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें ! १४

राष्ट्रस्वातंत्र्य द्या हिंदभूला नवें !
धर्मस्वातंत्र्य तें हिंदभूला हवें !
ज्ञानस्वातंत्र्य ती प्रार्थुनी मागते !
हिंदभू वांछिते सकलस्वातंत्र्य तें १५

——>०<——

# १५ मुरली.

( वृंदावनींची मोहिनी आणि भारतीं रणींची ज्ञानरूपिणी अशा दोन्ही रूपानें नटणाऱ्या हरिप्रियेची आज भारत वर्षाला जरूर आहे. )

भारता तार या कालिं कालिं । हरि वाजिव गीतामुरली ॥ ध्रु० ॥
नाचून कालियामौलिं मौलिं । हरि वाजिव गीतामुरली ॥

परतेचा हल्ला आला
फितुरीचा मारा झाला
ऐक्याचा किल्ला पडला
धनराशी चोरी गेला

परतंत्र मायभू झालि झालि । हरि वाजिव गीतामुरली ॥ १ ॥

कापट्य खड्ग उपसून
ये गुलामगिरि धावून
करि स्वातंत्र्याचा खून
मोदास नेइ पळवून

ऐक्याची करुनी होळि होळि । हरि वाजिव गीतामुरली ॥ २ ॥

कलहाचें नाचें भूत
समतेचा झाला अंत ।
पडलेंच ज्ञान बंदींत
हें सत्य करी आकांत

न्यायश्री अश्रू ढाळि ढाळि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ३ ॥

विघ्नांचा वणवा आला
सुगुणांचा मळा जळाला

पापांचा सुकाळ झाला
बाजार भ्रांतिचा भरला
हृदयाची लज्जा गेलि गेलि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ४ ॥
लोकांस कळेना वर्म
मानिती अधर्मा धर्म
तत्त्वांचें सरलें प्रेम
प्रेमाचें नुरलें नाम
नरकानें जनता न्हालि न्हालि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ५ ॥
हरि वाजिव गीतामुरली
धांवरे धांव वनमाली
तुजवीण नाहिं कुणि वाली
आम्हांस तार या काळीं
तुझि आशा केवळ उरलि उरलि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ६ ॥
हरि वाजिव गीतामुरली
कर सुजना विक्रमशाली
धैर्याची झडुं दे भेरी
नाचुं दे धर्मबल समरीं
होउं दे सत्य जयशालि शालि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ७ ॥
तव मुरलि मधुर घननीळ
शत्रुत्व भंगुनी सकळ
पाषाणा तसे द्याळ
जीवास करिल स्नेहाळ
मरणास हांसविल गालिं गालिं । हरि वाजिव गीतामुरली ॥ ८ ॥

तव मुरलीमोहनगीत
निर्जिवा करी जीवंत
षंढास समरपंडीत
रणधीर रिपुसि भयभीत
अबलासि करिल बलशालि शालि । हरि वाजिव गीतामुरली ॥ ९ ॥

हरि हांसिव गीताप्रेम
मग त्वदात्म्यासि अभिराम
जीवांचें घडुं दे क्षेम
भूतांचा तूं विश्राम
नांदु दे मोद चिरकालिं कालिं । हरि वाजिव गीतामुरली ॥ १० ॥

## १६ देवाचा धांवा.

( **चालः**—भूपति खरें तें वैभव. )

मज पाव पाव वैकुंठधामिंच्या देवा ।
मी नमस्कारयुत तुझा मांडिला धांवा ॥ धृ०॥
मी पुण्यहीन तूं पुण्यशक्तिचा ठेवा ।
त्वत्पुण्यदर्शनें पुनीत कर मज देवा ॥ १ ॥
अति दीन दरिद्री याचक मी कमलाक्षा ।
मज घाल प्रभो, रे मोक्ष—धनाची भिक्षा ॥ २ ॥
करिं दयारसाची वृष्टि दयाघन कृष्णा ।
या चातकपक्ष्या फार लागली तृष्णा ॥ ३ ॥


भगवंत वसंता वा रे येशिल केव्हां ।
हा केविलवाणा कोकिल करि तव धांवा ॥ ४ ॥
(चाल)—या तार तार दातारा । पाव रे ।
करि कृपा कृपा—आगारा । धांव रे ।
लव अंत अतां न उदारा । पाहि रे ।
"गोविंद" दास हा मंगल—धामीं न्यावा॥ ५ ॥

## १७ कै० लोकमान्य टिळकांच्या दहाव्या दिवसानिमित्त.

(चाल:—आमुचा वसंत कोणी नेला)

कोठें जाशी राष्ट्रप्राणा ! ॥ राष्ट्रप्राणा धर्मत्राणा
परदास्याच्या मरणा ॥ धृ०
कोठें जाशी भूसन्माना !॥ भूसन्माना ! विबुध-वंदना !
विजयाच्या जय—गाना ॥ १
कोठें जाशी जनकल्याणा ! ॥ जनकल्याणा ! स्वराज्य-
अरुणा ! स्वातंत्र्याच्या स्मरणा ॥ २ ।
कोठें जाशी राष्ट्रोद्धरणा ! ॥ राष्ट्रोद्धरणा ! जनाभिमाना !
पराक्रमाच्या स्फुरणा ॥ ३ ।
कोठें जाशी देशप्रेमा ! देशप्रेमा ! प्रथित—विक्रमा !
स्वयंशुद्ध श्रीरामा ॥ ४ ।
कोठें जाशि सुगुणश्रीमंता ! ॥ हे श्रीमंता ! बुद्धिवसंता !
सरस्वतीच्या संता ॥ ५ ॥

# कवि गोविंद यांचें हस्ताक्षर.



कोठें जाशी राष्ट्रानंदा ! राष्ट्रानंदा । हे धैर्येंद्रा !
कार्यकुशल गोविंदा ॥ ६ ॥

गेला टिळक राष्ट्रपरमात्मा । तयाविणें तळमळे
हळहळे सारा हा जीवात्मा ॥ ७ ॥

गेला शेष आमुचा गेला । तत्–शीर्षींचा आर्यभूमिचा
भुगोल हा डळमळला ॥ ८ ॥

गेला राष्ट्र–तात तो गेला । या राष्ट्राचा शोकाश्रूंचा
अंजलि अर्पण त्याला ॥ ९ ॥

गेला राष्ट्र–जनक तो गेला । या राष्ट्राचीं गहिंवरण्याचीं
हृदयें अर्पण त्याला ॥ १० ॥

गेला राष्ट्र–प्राण तो गेला । या राष्ट्राचीं नतशीर्षांचीं
नमनें अर्पण त्याला ॥ ११ ॥

भो ! भो ! भुवनमान्य श्रीटिळका ! तव राष्ट्रा या
स्वराज्य द्याया पुनरपि ये या लोकां ॥ १२ ॥

## १८ भगवद्गीतेच्या भूपाळीचें ध्रुवपद

ध्रुवपद.

अनंत संता अनंत दांता अनंत तूं दाविला । अंबिके ।
सदाच वंदन श्रीमति भगवति भगवद्गीते ! तुला ॥ धृ० ॥

( अपूर्ण. )

## १९. पुरुष कोण ?

( चालः—तेथेंच उभि कां ? )

या भरत-भूमिचे ठायीं । उरला न अतां कोणीही । पुरुष तो ! ।
नपुंसकें पूर्ण भरली ही । उरला न अतां कोणीही । पुरुष तो ! ।
नर येथिल भागुबाई । उरला न अतां कोणीही । पुरुष तो ! ।
**चालः**—पुरुष तो शिवाजी खरा । धनाजी पुरा । मावळे वीर ।
आणि बाजिराव रणधीर । पुरुष तो ! ॥ १ ॥

शिरिं थोर पागोटें ल्याला । ह्मणुनियां काय तो झाला । पुरुष हो? ।
बहु मिशाभार राखीला । ह्मणुनियां काय तो झाला । पुरुष हो? ।
लेंढार पशूसम व्याला । म्हणुनियां काय तो झाला । पुरुष हो? ।
**चालः**—पुरुष तो, नव्हे साचार । असा व्यवहार । करिति पशुप्राणि ।—
ह्मणुनि कां वदति त्या कोणी । पुरुष हो ॥ २ ॥

निजराष्ट्राच्या स्वहितार्थ । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो! ।
निज धर्माच्या प्रीत्यर्थ ! । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो! !
तो मनुज असो स्त्री-जात । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो! ।
**चालः**—पुरुष ती झांशिची राणि । शौर्य मिळवोनि । जाहलि साचि ।—
तशि उमाहि दाभाड्याची पुरुष ती ॥ ३ ॥
तशि भवानि बंगाल्याची ।—

## २० शिवबाचा दरबार.

( चालः—ह्मातारा इतुका )

भालदारः—न्याय खरा होणार । भरला शिवबाचा दरबार ।
अर्जदार हुशियार । भरला ॥धृ०॥

मुलगाः—दारूपायीं मम जनकानें घालविलें घरदार ।
भीक मागतों दीन लेंकरें आह्मीं दारोदार । महाराज ॥१॥

शिवाजीः—आजपासुनी राज्यिं आमुच्या मदिरा जो पीणार ।
स्ववंशस्वदेशघातकि जन तो हद्दपार होणार ॥२॥

निंबाळकरः—म्लेंच्छांनीं ह्या भ्रष्टविलें मज, मज देउनियां मार ।
शुद्धीकरणें या दीनाचा करावाच उद्धार । महाराज ॥३॥

शिवाजीः—धर्मनिष्ठ तुह्मि, आह्मी तुह्मां शुद्ध करुनि घेणार ।
अहो निंबाळकर मुलगी अमुची आपणास देणार । खरोखर ॥४॥

शिपाईः-हिंदू असुनी या दुष्टानें गायींचें खिल्लार ।
पैशासाठीं क्रूर कसाया विकिलें बारंवार । महाराज ॥५॥

शिवाजीः—आजपासुनी राज्यिं आमुच्या असला गुन्हेगार ।
धेनु-घातकी महापातकी फांसावर चढणार । खरोखर ॥६॥

शिपाईः—चोरांचा हा नायक धरिला यास करावें ठार ।
शूरत्वानें या चोरानें लोकां लुटिलें फार । महाराज ॥७॥

शिवाजीः—चोरा, शूरा, तुजला आह्मी बनवीतों सरदार ।
स्वधर्मचोरा हुसकुनि दे तूं या देशांतुनि पार । खरोखर ॥८॥

आवाजी सोनदेवः—लुटींत सांपडली म्लेंच्छांची एक मनोहर नार ।
नाटकशाळा होइल तुह्मां करा हिचा स्वीकार । महाराज ॥ ९ ॥
शिवाजीः—विटंबना अशि परस्त्रियांची ! असो तुह्मां धिक्कार ।
परकांता त्या साऱ्या आह्मां मातिसम साचार । खरोखर ॥१०॥
शिपाईः—दर्शनास तुमच्या आणीला हा धार्मिक चांभार ।
देव देउळें रक्षिलिं यानें म्लेंच्छा देउनि मार । महाराज ॥११॥
शिवाजीः—स्वधर्मरक्षक बा चांभारा असा तुझा सत्कार ।
खरा मराठा देशासाठीं असाच तो लढणार । खरोखर ॥१२॥
हिंदुः—हबसाणांतिल हिंदू आम्ही अर्जदार सरकार ।
आह्मांवरतीं जुल्म होतो शिद्द्यांचा अनिवार । महाराज ॥१३॥
शिवाजीः—धर्मासाठीं राज्य आमुचें, धर्म आमुचा प्यार ।
हबसाणावर स्वारि जाउं द्या चला उठा सरदार । खरोखर ॥१४॥
शिपाईः—दारिं उभा एक टोपीवाला गोरा घारा फार ।
म्हणें करूं द्या तुमच्या राज्यीं आह्माला व्यापार । महाराज ॥१५॥
शिवाजीः—त्यांस ह्मणावें तव अर्जाचा पुढतीं करूं विचार ।
आज रिकामें नाहिं मराठी हिंदूचें सरकार । खरोखर ॥१६॥
शिपाईः—तुमच्या भेटीला येताती धर्माचे आधार ।
रामदास श्री तुकाराम ते चला करा सत्कार । महाराज ॥१७॥
( " जयजय रघुवीर समर्थ " " पुंडलिक वरदे हरि विठ्ठल " )
शिवाजीः—गुरुदेवांनों तुमच्या चरणीं नमनें अनेकवार ।
रामदास-तुकारामः—तुझ्या न्यायि राज्याचा होवो जगभर तो
विस्तार । राजा ॥१८॥

शिवाजी:—स्वयंज्ञान ते आपण, आपण स्वयंभक्ति साचार ।
रा.व तु.:—ज्ञानभक्ति रक्षिण्या शिवा तूं शक्तीची तलवार । खरोखर ॥१९॥
शिवाजी:—मूर्त मारुती आपण, आपण नारद कीर्तनकार ।
रा. व तु.:—स्वराज्य स्थापक अरे शिवा तूं विष्णूचा अवतार ।
खरोखर रामाचा अवतार । खरोखर कृष्णाचा अवतार ।
खरोखर सांबाचा अवतार ॥२०॥
शिवाजी:—तुमच्या आशीर्वादें झाला सारा देशोद्धार ।
रा.व तु.:—महाप्रतापी तुझी भवानी तिचाच हा उपकार । शिवबा ।
तिचाच हा उपकार । बाळा तिचाच० ॥२१॥
शिवाजी:—आपण दोघे स्वातंत्र्याचा, ब्रम्हाचा सुविचार ।
रा. व तु.:—शिवबा तूं त्या स्वातंत्र्याचा मूर्तिमंत आचार ।
खरोखर ॥२२॥
शिवाजी:—लोकांनीं हें राज्य मिळविलें त्यांचा हा दरबार ।
रा. व तु.:—स्वलोकराजा त्या राज्याचा शिवबा तूं सरदार । खरोखर॥२३॥
शक्तियुक्ति भक्तीस मिळाली घडला साक्षात्कार ।
स्वदेश स्वधर्म स्वतंत्र झाला । भगवा झेंडा डोलुं लागला ।
बोला जयजयकार । शिवाचा । बोला जयजयकार ॥२४॥
सर्वजण:—स्वातंत्र्याचे सुवर्ण दिन ते भाग्याचें आगार ।
ते दिन दाखिव पुन्हां प्रभुवरा विनंति वारंवार ।
देवा विनंति वारंवार ॥२५॥
भालदार:—सरला शिवबाचा दरबार । न्याय इथुनि पळणार ।
सरला शिवबाचा दरबार ॥२६॥

## २१ शेतकऱ्यांची दुःखद कहाणी !

**फटका.**

अर्ध उपाशी या कुणब्याशीं वालि न जनहो कुणि जाणा ।
केविलवाणे झालों आम्ही ऐका अमुची ही दैना ॥ धृ०॥
थोड्या व्याजीं कर्ज अम्हाला सावकार कुणि देईना ।
काय करिल तो तरी टॅक्स त्या जराहि सरकार सोडीना ॥ १ ॥
खतपाण्याचा तोटा मोठा म्हणून भरपिक येईना ।
इकडे सारा कमति कराया राजी सरकार होईना ॥ २ ॥
पाण्यावांचुन दुष्काळ पडतो वहु भयंकर वदवेना ।
पाट कालवे गांवोगांवीं कधींहि सरकार बांधीना ॥ ३ ॥
चाऱ्यावांचुनि जनावरांना काम आमुच्या होईना ।
त्यास चारण्या कुरण मोकळें कधींहि सरकार सोडीना ॥ ४ ॥
चाक, कणा, जूं, गाडी, नांगर करण्या लांकुड पुरवेना ।
रान तोडण्या मुभा आम्हाला कधींच सरकार देईना ॥ ५ ॥
वसुलासाठीं सक्ती होते जशीं निघते कितिकांना ।
पीक न आलें तरि अधिकाऱ्या दया आमुची येईना ॥ ६ ॥
वाघ लांडगे गुरें मारिती शेती रक्षण होईना ।
हत्यार घेण्या परवाना तो कधींच सरकार देईना ॥ ७ ॥

**चालः**—अर्जा केल्या परोपरी ।
राजा घेइ न दाद तरी ।
जनहो अमुचा कैवारी ।
उरला नाहीं भूमिवरी ।

म्हणुनि सांगणें परोपरीनें अमुच्या साऱ्या बंधूंनां ।
नारसिंह अवतार स्मरा हो तोची रक्षिल सर्वांना ॥ ८ ॥

## २२. शिवाजी.

( महाराष्ट्राच्या स्वातंत्र्ययज्ञांतील स्फूर्तिरूप तीर्थप्रसाद महाराष्ट्रांतील प्रत्येक सुपुत्रानें सेवन करून पुनः तशा यज्ञाची मुहूर्तमेढ रोवण्यास बद्धपरिकर व्हावें. )

देशाचा पालनवाला । तो शिवाजिराजा झाला ।
धर्माचा रक्षणवाला । तो शिवाजिराजा झाला ॥ धृ०॥

त्रिभुवनांत डमरू ज्याचें । नांदतांच नंदी नाचे ।
जो परित्राण या भूचें । शंकर भोला । तो शिवाजि० ॥ १ ॥

गर्जते भवानी मेधा । चमकते भवानी खांडा ।
चाललाच भगवा झेंडा । रण—नाचाला ॥ २ ॥

तुकयाचा प्रेमळ वीणा । गहिंवरवी अंत:करणा ।
करुणेच्या घेउनि ताना । उठवी हरिला ॥ ३ ॥

प्रभु रामदास तो आला । राष्ट्राचा जादूवाला ।
मावळा मंत्रिला सगळा । भालेवाला ॥ ४ ॥

रणयज्ञ विजय—हेरंबा । पूजाया रणजगदंबा ।
तोरणा रणप्रारंभा । नारळ फुटला ॥ ५ ॥

त्या चंद्रराव मोऱ्याला । दास्याच्या सरदाराला ।
भूमिच्या मूर्त नरकाला । जाळा जाळा ॥ ६ ॥

तो विजापूरचा कोल्हा । वाघास दावि वागूरा ।
परि वाघनखीं तरवारा । दिसे न त्याला ॥ ७ ॥

खिंडींत शत्रुचे बाण । निज मरणावर तोलून ।
त्राणांत भूप झेलून । बाजी पडला ॥ ८ ॥

पूण्यांत राजवाड्यांत । खड्गाचि रात्र कुजबुजत ।
ऐकूनि मस्त शाइस्त । पळूनि गेला ॥ ९ ॥

तो पुरंदराचा झगडा । तो मुरारबाजी लढला ।
हाताच्या करुनि ढाला । रिपु रोधीला ॥ १० ॥

तो औरंग्या दिल्लींत । शिवपवन धरी डावांत ।
परि पवन डाव उडवीत । उडूनि गेला ॥ ११ ॥

मग सिंहगडाचें युद्ध । गड चढला वैभवसूर्य ।
रक्ताचे देउनि अर्घ्य । तान्हा गेला ॥ १२ ॥

किती असे वीर वर्णावे । कितिजणां पवाडे गावें ।
कवितेनें ओंवाळवें । कुणा कुणाला ॥ १३ ॥

श्रीस्वातंत्र्याची माला ! वीरांनीं गुंफुनि विमला ।
अर्पिली देशदेवाला । हरहर बोला ! ॥ १४ ॥

वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगण बनला ।
शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला ॥ १५ ॥

—→•←—

## २३ प्रतापराव गुजर यांनीं केलेली मरणाची प्रार्थना.

( ज्याला पुनः केंव्हांही मरण नाहीं तोच खरा मेला. नाहीं तर दरघडी
हजारों कीटक जन्मतात, पुनः मरतात. तेंव्हां मर्दांनीं असेंच
एकदाचें मरण मागितलें पाहिजे )

**फटका.**

वीरभूषणा, विश्वपावना, श्रीमन्नरणा, दयाघना ।
मदिय प्रार्थना ऐक सज्जना अनंत नमनें त्वच्चरणा ॥ ध्रु० ॥
मनोव्यथेनें अपघातानें ओढुनि बळेंच मत्प्राणा ।
कीं रोगांनीं तनू गांजुनी नको धाडुं मज यमसदना ॥ १ ॥
जलांत मातें बुडवायाची असेल युष्मन्मनीषणा ।
तरी बुडवि वा, राष्ट्ररिपूंची रक्त-तरंगिणि तरतांना ॥ २ ॥
राष्ट्र-रिपूंच्या चैतन्याच्या चितेंत मातें दे दहना ।
अग्नीमध्यें जाळावेंसें जरी वाटलें भवन्मना ॥ ३ ॥
भगवन्! आज्ञा आहे तुज कां? ढकल गिरीहुनि या दीना ।
तरी ढकल वा स्वतंत्रतेचे संरक्षक गड घेतांना ॥ ४ ॥
मंचक माझा शर खड्गांचा समर-स्फूर्ती ती ललना ।
त्या सुमंचकीं, त्या ललनांकीं मला शांति कर समर्पणा ॥ ५ ॥
मला शांति कर समर्पणा पण तदा सुंदरा मोदघना ।
श्रीभूचरणीं मी करितांना प्राणपद्मततिनिवेदना ॥ ६ ॥
स्वातंत्र्याची उषा रंगु द्या रक्तपंकिं पंकजानना ।
मग माझा तो अंत घडूं द्या करा प्रभो अशि नियंत्रणा ॥ ७ ॥

स्वातंत्र्याचें युद्ध न लाभे दिव्य भाग्यबलनिधीविना ।
धर्मयुद्धिं त्या मरुन होउं दे चिरंजीव मज चिरंतना ॥ ८ ॥
स्वातंत्र्याच्या गंधर्वांच्या कवी-जनांच्या कवनांना ।
गाउनि स्फूर्ती देते जेथें वीरश्री श्रीवीरांना ॥ ९ ॥
स्वातंत्र्याचा समरकाल तो परमेशाचा काल गणा ।
अशा पूत परमेश्वर-कालीं सुजना मरणा कर करुणा ॥ १० ॥

**चालः**—मज तानाजीच्या दे निधना ।
दे वीर बाजिच्या मज मरणा ।
कर मुरारबाजीसम करुणा ।
ऐसें प्रतापराव मृत्युला म्हणे निरंतर निरंजना ।
मदियप्रार्थना ऐक सज्जना अनंत नमनें त्वच्चरणा ॥ ११ ॥

—→←—

## २४ नरवीर तानाजी याच्या स्त्रीचा विरोचित विलाप

( तानाजीच्या भाग्यशाली पत्नीचें तेज महाराष्ट्रांतील स्त्रियांना पुनः प्राप्त होईल का ? )

**चालः**— जरी कुणा श्रीमंताची०

प्रिया ! काय घेतां निद्रा मृत्युची भयंकरा ।
उठा अहो, धीरा, वीरा, शूरसिंह—सुंदरा ॥ धृ०॥
एक सिंहगड घेतांना श्रांत काय झाला ।
अजुन कितिक गड घेण्याचें राहिले दयाळा ॥

नाथ चरण स्वकरें चुरुनी वारुं कां श्रमाला ।
दया करा ! आक्रंदे ही माउली वसुंधरा ॥ १ ॥
अजुन नाहिं झाली अपुली मायभू स्वतंत्र ।
कुठें शत्रु बुडले सांगा मृत्यु सागरांत ।
श्रीशिवास केल्यावांचुन भद्रिं शोभिवंत ।
उचित काय स्वर्गारोहण ? भूमिभाग्यमंदिरा ॥ २ ॥
नाथ रुधिरिं तरतां श्रमलां समरिं सुप्त झालां ।
जणूं संगरारण्यामधिं मथुन रिपुमृगाला ।
रक्तमांस सेवित हा मृगराज झोंपि गेला ।
मुखावरी घेउनि अपुल्या लाल रुधिर-अंबरा ॥ ३ ॥
लढावया भूमातेस्तव समरिं मी न आलें ।
ह्मणुन काय कोपुनि प्रियकर पहुडले भुकेले ? ।
क्षमा करा, चुकलें, बहु मत्प्राण तृषित झाले ।
पुण्यपक त्वत्प्रेमाचे पिण्या प्रेमनिर्झरा ॥ ४ ॥
विजयलक्ष्मि तुम्हां भुलली, रक्तजलें न्हाली ।
रिपुप्राणपुष्पीं नटली, लक्ष्मिवंत झाली ।
विजयारति घेउन स्वामी—पदांपुढें ठेली ।
मला म्हणे, "उठवा तुमच्या प्रियकरा मनोहरा" ॥ ५ ॥
सोडुनियां पाठीवरची रक्तमिश्र भाकरी ।
दोन प्रहर भरले कांता करा चला न्याहरी ।
तुम्हांवीण सेना सारी लेश अन्न ना वरी ।
उठा चला, येतिल आतां शिवप्रभू गंभिरा ॥ ६ ॥

अहो ! अजुन आहे अपुला रायबा लहान ।
देशभक्ति शिकविल त्याला तुह्मांविण कोण ? ।
लावुनियां तरवारीशीं तयाचें लगीन ।
कीर्तिसहित आलिंगा मग देवि मुक्तिसुंदरा ॥ ७ ॥

सुरेश्वरा, झालें तुज कां प्राप्त पारतंत्र्य ।
ह्मणुन नेशि स्वर्गी माझा शूरवीर कांत ? ।
परी प्रभो ! होऊं दे मग राष्ट्र हें स्वतंत्र ।
काय वदासि " आहे तेथें विपुल वीर संगरा " ॥ ८ ॥

अश्रु गाळि स्वातंत्र्याचें स्फुंदुनी निशाण ।
नभांतुनि नाथावरतीं फुलें वर्षि कोण ? ।
शोक–हर्ष यांच्या ध्वनिचें पाहुनी तुफान ।
हृदयकमल भ्रमलें, भ्यालें महामोहसागरा ॥ ९ ॥

देश–ईश–कार्या करुनी तुह्मी धन्य झाला ।
रणीं झुंज स्वातंत्र्यास्तव झुंजतां निमाला ।
सुखें प्रिया जा, जा, स्वर्गी, स्वार्थ बहु अह्माला ।
नको रडूं खड्गा, नेइन मीहिं तुला संगरा ॥ १० ॥

## २८ मोक्षपुराण अथवा सेवायोग.

### ओव्या.

( स्वस्तिवाचन. )

हृदयींच्या ज्ञाननारायणा ! । देवा माझ्या गजानना ! ।
ध्याऊन ध्यानीं तुझ्या ध्याना । धरितों करीं लेखणी ॥ १ ॥
माझे प्रतिभे शारदे ! । देवी काव्य विशारदे ! ।
चिंतून तव शुभप्रसाद पदें ! । कार्यारंभ आरंभितों ॥ २ ॥
तत्त्वार्थाची अनुभूति । तीच माझी सद्गुरुमूर्ति ।
तीच मूर्ति मला स्फूर्ति । देवा ग्रंथ वदावया ॥ ३ ॥
लोकहृदयींचा प्रेमरंग । मी मानितों पांडुरंग ।
होवो सादर तो श्रीरंग । मोक्ष–पुराण परिसावया ॥ ४ ॥

### प्रश्न.

प्रश्न करील श्रोता आतां । शंका घेइल वाचक तत्त्वता ।
" मोक्ष–पुराण कशाकारितां ? " । निर्माण झालें ? ॥ ५ ॥

### उत्तर.

मोक्ष–पुराण झाले निर्माण । मुमुक्षूच्या मोक्षाकारण ।
मुमुक्षुच्या मोक्षाहून । परमार्थ नाहीं निराळा ॥ ६ ॥
मुमुक्षु असो आत्ममोक्षाचा । मुमुक्षु असो धर्ममोक्षाचा ।
मुमुक्षु असो देशमोक्षाचा । त्यातें मोक्ष अर्पील हें ॥ ७ ॥
मुमुक्षु असो दुष्टदुर्जन । मुमुक्षु असो संत सज्जन ।
मुमुक्षु असो दुर्व्यसनी जन । त्यातें मोक्ष अर्पील हें ॥ ८ ॥

मुमुक्षु असो तो मनुष्य गण । त्यामध्यें सुजाणगण ।
त्याच गणीं मुमुक्षु आपण । आपणां मोक्ष अर्पील हें ॥ ९ ॥

**प्रश्न.**

दाखविणारे मोक्षपंथ । असतांना अनंत ग्रंथ ।
मग हें पुराण काय निमित्त । जन्मास आलें ? ॥ १० ॥

**उत्तर.**

पूर्वींच्या ग्रंथापरिस । सरळ सोपा जनास ।
मोक्षमार्ग दाखविण्यास । जन्म याचा जाहला ॥ ११ ॥
पूर्वींचे पुराणग्रंथ । पूर्वींचे योगग्रंथ ।
व्यक्तीला आत्ममुक्तिपंथ । दाखवीती फक्त तो ॥ १२ ॥
हा मोक्ष पुराण ग्रंथ आमुचा । व्यक्तीला आत्मकल्याणाचा ।
त्याचपरी लोककल्याणाचा । मार्ग मोक्षाचा दाखवील ॥ १३ ॥

**प्रश्न.**

मोक्ष म्हणजे आहे काय ? । मोक्ष म्हणजे होणें काय ? ।
मोक्ष याचा अर्थ काय ? । सांगा आम्हांप्रति ॥ १४ ॥

**उत्तर.**

मोक्ष म्हणजे मोकळे होणें, । स्वायत्त होणें, स्वतंत्र होणें. ।
स्वानंदमोहापासून सुटणें । या नांव मोक्ष ॥ १५ ॥
स्वानंदाचा स्वात्म्याला । स्वानंदास्तव व्यामोह जडला ।
घालविणें या तन्मोदमोहाला । या नांव मोक्ष ॥ १६ ॥

( अपूर्ण )

## २६ धांवरे ! धांव भगवंता ! !

( चाल:—उद्धवा शांतवन कर जा. )

कहरांत जळे भूमाता। धांवरे धांव भगवंता।
तुज वाही भारत जनता। पाव रे पाव भगवंता ॥ ध्रु०॥
परदास्य महानरकानें। डबडबलीं सारीं तीर्थें।
नरकानें या पापानें। देवांचीं सडलीं सत्त्वें।
हा देश कशाचा साचा ?। हा देश दास्यनरकाचा ॥ १ ॥
प्रमुख कोण नरकांतील ?। भयग्रस्त आमुचें शील।
आमचे वेद वेदांत। नरकांत कुजे गीतार्थ।
गायत्रि मंत्र नरकांत। शांबरी मंत्र नरकांत।
नरकांत आमचें क्षेम। नरकांत आमचें प्रेम।
शाप चाप द्विजश्रेष्ठांचा। चाप शाप राजेंद्रांचा।
दास्यांत पचूनी साचा। जाहला भाग नरकाचा।
आमचा जन्म नरकांत। आमचा मृत्यु नरकांत।
नरकांत काल पूर्वींचा। नरकांत काल आतांचा।
कालचा काल नरकाचा। आजचा दिवस नरकाचा।
नरकामधिं या सांपडलों। नरकरूप होउन गेलों।

**चाल:**—नरकानें संध्या स्नान।
नरकाचें भोजन पान।
पूजितों नरक सैतान।

नरकांत कोणि नच त्राता। मोक्षदा धांव भगवंता ॥ १ ॥

चावून प्राण धेनूंचे । मातले प्राण अधमांचे
भक्षून देह देवींचे । पोसले देह दुष्टांचे
मन धुंद होय मनुजांचें । मन गिळुन माय धेनूंचें ।
धेनुंच्या दीन करुणेंत । शत्रुचे क्रोध जळतात ।
शत्रुंचे काम चरतात । धेनुंच्या मरण कहरांत ।
धेनुंच्या रक्तपातांत । रिपुरसना बसल्या न्हात ।
रिपुतृष्णा अंचवतात । धेनुंच्या रोदनाश्रूंत ।
धेनूंच्या हंबरण्यांत । रणगीत शत्रु गातात ।
शत्रूंच्या खर नरड्यांत । चालला धेनुसंघात ।
धेनूंच्या दुःखाश्रूंनीं । त्वत्स्नान नाहिं कां झालें? ।
धेनूंच्या हंबरड्यांनीं । त्वद्ध्यान नाहिं कां झालें ? ।
धेनुंनिं तुज ओंवाळीलें । विझल्या जीवनज्योतीनें ।
इद्वान हिंदुचें गेलें । धेनुंच्या या विकलतेनें ।

**चाल:**—मग कसा तुला गोपाळा ।
कळवळा अजुन नच आला ।
वाटला मला तूं मेला ।
पाहसी अंत किति आतां । निर्दया धांव भगवंता ॥ २ ॥

→ ←

## २७ प्रीतिदेवीचा उत्सव.

( ज्याला आत्मतृप्तीचें भाग्य लाभलें असेल त्यालाच या उत्सवांत प्रवेश मिळेल आणि तोच तेथील आनंद लुटूं शकेल. )

[ फटका. ]

उत्सव आला संक्रमणाचा प्रीतिदेविच्या जत्रेचा ।
तिळगुळ घ्या, द्या अनन्यतेचा हृदयनिवेदनप्रेमाचा ।
आलिंगनकुंजांत चलाहो, चंद्र हंसे स्वच्छंदाचा ।
प्रेमखेळ तो आज खेळुं या राधाप्रिय गोविंदाचा ।
या वदनींचा त्या वदनावर उत्सव उधळूं हास्याचा ।
प्रेमखेळ तो आज खेळुं या प्रेमी ताराचंद्राचा ।
या हृदयांतुन त्या हृदयांतरिं झोकें देऊं आत्म्याला ।
आत्मांदोलन राजयोग हा कधींच ठावा प्रेमाला ।
रसिकाक्षांनो, स्वपंख पसरा होउन फुलपांखरें झुला ।
मृदु गालांनो, नवाधरांनो तुह्मी स्मितांचीं फुलें फुला ।
ललनालालन उपवनवासी प्रियकर वसंत जेवाचे ? ।
उन्मुख झाले स्मितामृताचे सुंदर पेले गालांचे ।
परिरंभणमंडपीं स्थापुनी प्रीतिदेवि ती मोदमया ।
स्वांक भद्र मग सुभद्रेस त्या प्रभुराया दे बसावया ।
तत्स्तनमंडळिं झळकत होता मदनहार तारुण्याचा ।
तदनुरुप प्रभु तिला नेसवी वसंतशालू भरजरिचा ।
'प्रेमकिरिट कां चंद्रकिरिट हा हवा देवि तुज बोल जरा ?' ।
'प्रेम-किरिट द्या, जयांत भरला भुवनभूतिचा सुखनखरा' ।
'देऊं आतां अलंकार मी देवी तुजला तो कसला ?' ।
'आत्मोर्मिचा संतत ताजा हास्य-बिजवरा द्याच मला' ।

'आत्माआरसा खुलवा देवा, त्यांत हांसवा चंद्राला' ।
'आपण हांसा मला हांसवा हास्य-बिजवरा द्याच मला' ।
'आत्माआरसा खुलवा देवा, त्यांत नाचवा प्रेमाला' ।
'प्रेम नाचवा, मोद डोलवा, हास्य-बिजवरा द्याच मला' ।
'हास्य-बिजवरा लेउन आम्ही वंदू भगवच्चरणांला' ।
'हास्यरूप घेउनियां देवा, दर्शन द्याहो सकलांला' ।
लाडकिचा हा लाड पाहुनी लाडामध्यें प्रभु आला ।
असा रम्यतर हास्यबिजवरा मग तद्भालीं भूपविला ।

× × × × ×

अहो नव्हे तो हास्यबिजवरा स्वयें विभू तो विकासला ।
मज वाटे जणुं श्रीब्रम्हाचा प्रमोदप्रत्यय प्रकाशला ।
त्या हास्यामधिं चुंबन जडलें, डूल श्रवणीं डोलविले ।
डोलविले कां? खेळविले कां? गालांवरती नाचविले? ।
अशा अरुणशा डूलांमध्यें दिसे देविमुख मनोहर ।
लाल लाल संध्येंत—उषेंतच जणूं शोभला प्रभाकर ।
सर्व चांदण्या खुडून घेतों आणि तोरड्या गुंफीतों ।
नादहीन त्या जरी, तरी मी देविचरणीं समर्पितों ।
मोहक काव्यालंकारांनीं सजली खचली नाहीं कां? ।
चंद्रकोर नथ देच देविला, प्रतिभे! घेशी कां शंका? ।
अरुणराग हा कसला फुलला, अरुण उषा कां ही हंसली? ।
नव्हे, देविनें चुंबनलाली कुंकुम रेखियलें भालीं! ।
त्या संध्येची मेंदि लाविली प्रीतिदेविच्या मृदु चरणीं ।
ज्या संध्येला स्कंधिं घेउनी भास्कर नाचे नभांगणीं ।
भास्कर भास्कर ज्याला वदती, तो देवीचा मशालजी! ।
काल सांगण्या घडी घडीचा काळ जहाला घड्याळजी ।।

## २८ प्रेम-शृंगार.

( चालः-येथेंच उभी कीं. )

भेट ये मला कडकडुन । हृदयाशिं हृदय जुळवून । सुंदरी ।
कर हर्ष-मत्त मज पूर्ण । हास्याचिं फुलें उधळून । सुंदरी ।
दे प्रेम हृदयिं ओतून । वदनांत वदन घालून । सुंदरी ।
वद विनोद-मंगल वचन । मम वक्षीं शिर ठेवून । सुंदरी ।
**चालः**—त्वत्स्पर्श, हर्ष हर्षाचा, मोद तुर्येचा। जादु मदनाचा ।
गारोडी हृदिंद्रियाचा । सुंदरी ॥१॥

—२—

ये प्रेमा मजशीं बोल । आत्म्या रे हांसुन डोल । डोल रे ।
स्वर्गींचे भोगुं विलास । ये हृदया मदंकिं बैस । बैस रे ।
परिहास करूं स्वच्छंद । ये आनंदा आनंद । मज सर्वें ।
तूं रमणी नच, हृच्छांती । विश्रान्तीं सजीव प्रीती । सुंदरी ।
**चालः**—स्वांतांत । प्रेमचंद्रांत । प्रीतिकिरणांत । प्रणयकुंजांत ।
रम, हरिणी तेथ निवांत । सुंदरी ॥२॥

—३—

मी कवी, सखे तूं कवन । भरुं प्रेम-स्तवनें भुवन । प्रेमले ।
प्रेमाचें गाऊं गान । तूं सरस्वती मी वीन । प्रेमले ।
मी सुम, तुं सुमश्री जाण । करूं प्रेमार्चन प्रेमानं । प्रेमले ।
स्मरुं, सदा प्रेम-भगवान । तूं राधास्तन, मी मदन । प्रेमले ।
**चालः**—प्रेमले । प्रभुस निर्मिलें । अर्पुं आपलें । प्रेम-मय प्रेम ।
प्रेमाचें बहु त्या प्रेम ! ! ! प्रेमले ॥३॥

—४—

मुग्धेच्या परिरंभांत । प्रीतिचा मोद भगवंत । उधळितो ।
तरुणिच्या नयन-कोनांत । हांसून जणूं श्रीकांत । लाजतो ।
बहु मधुर मौज भगवंत । तन्वीच्या सुधाधरांत । दावितो ।
रतिकांत बनुन श्रीकांत । कान्तावक्षप्रांतांत । क्रीडतो ।
**चालः**—श्रृंगार-संघ मौजेचे । हास्य लज्जेचें । प्रेम हास्याचें ।
प्रेमाचें कौतुक साचें । कामिनी ॥४॥

—५—

सौगंध-निधी सुमनांचे । कीं मरंद माधूर्याचे । तरुणि या ।
ते वसंत तारुण्याचे । कीं मृगांक लावण्याचे । तरुणि या ।
लाजरें हास्य प्रेमाचें । कीं विनोद 'गोविंदाचे'। तरुणि या ।
जणुं प्रसन्नत्व हृदयाचें । कीं चुकलें सुख ब्रह्माचें। तरुणि या ।
**चालः**—तरुणिंनीं विश्व प्रेमळ । मधुर मंगल । मृदुल मंजुल ।
सुप्रसन्न, सुनंदशील । जाहलें ॥५॥

—६—

झालेंच रम्य जग झालें । प्रेमाचे गुलाब फुलले । अंगना ।
डोलेच विश्व जन डोले । प्रीतीचें गायन बोले । अंगना ।
चांदणें सुखाचें पडलें । स्नेहाचे मृगांक हंसले । अंगना ।
बांधिले प्रेम-झोपाळे । देताती विनोद झोले । अंगना ।
भुवन हें लाडकें बनलें । तद्हृदयीं कौतुक लोळे । अंगना ।
**चालः**—कर भुवना, जयजयकार । करुनि मधुमधुर । नयनश्रृंगार ।
रमणीय रमणि-संभार । लाजले ॥६॥

—७—

रमणीमुख चंद्रावरती । मृदुगुलाबकपोल हंसती । प्रीतिनें ।
वाहिलि जणुं सुंदरतेनें । चंद्राला गुलाब सुमनें । प्रीतिनें ।
कीं मृगांक गुलाब कुसुमें । अन्योन्या चुंबिति प्रेमें । प्रीतिनें ।
रमणीमुख रचिले विधिनें । जणुं चंद्र जपाकुसुमानें । प्रीतिनें ।
**चाल**:–कविस्फूर्ति, प्रीतिची मूर्ति, फुलांची कीर्ति, शशीची कान्ति ।
रमणीच्या प्रणयप्रान्तीं । क्रीडती ॥७॥

—८—

रमणि त्या माळिणी ठरल्या । मुख–सुमें विकाया आल्या । माळिणी ।
हास्यांबू सिंचुनि वरती । नरसुमनें प्रफुल्ल करिती । माळिणी ।
आत्मार्चन करण्या प्रेमें । घ्या म्हणती कटाक्षकुसुमें । माळिणी ।
अर्पिती प्रेमवित्ताला । कर–कमलालिंगन माला । माळिणी ।
नर कपोलगुलाब घेती । त्या चुंबन-सुमनें म्हणती । माळिणी ।
ठेविले अंचळा खाले । घ्या स्नेहाचे सुमझेले । माळिणी ।
माळिणी– हृदब्जाकरितां । नर वेची स्वांता वित्ता । माळिणी ।
**चाल**:—माळिणी, सुमन चुंबनीं, प्रेम काननीं । जगाचा वाली ।
वनमाळी बनला माळी । मोहुनी ॥८॥

—९—

हे चंद्र–चांद्रिके, विभवे । सर्वदा किती हांसावें । चंद्रिके ।
सर्वदा जरी हासावें । हास्यांत परी लाजावें । चंद्रिके ।
लाजूनि नयन मोडावे । या जनीं प्रेम उधळावें । चंद्रिके ।
कधिं विरहानें स्फुंदावें । कधि अनुरागें कोपावें । चंद्रिके ।

कधिं मोद विनोद करावे । कधिं मंजुळ गायन गावें । चंद्रिके ।
भुवनाला आलिंगावें । चुंबावें, हें तुज ठावें । चंद्रिके ।
**चालः**—मग कशा न ठाव्या तुला, इतर प्रेमला । रमणिच्या लीला ।
ज्या प्रेमी बनती सकला । चंद्रिके ॥९॥

—१०—

लावण्य रमणि-मुखिं विलसे । गालांत मोद तो हासे । सुंदर ।
नयनांत प्रेम करि मौज । मौजेंत लाजते लाज । सुंदर ।
लज्जेंतुन कटाक्ष सुटले । रसिकाच्या हृदयीं शिरले । सुंदर ।
नयनांचे विनोद झाले । आत्म्यांनिं मोद उधळीले । सुंदर ।
चुंबना चुंबनालिंगी । आलिंगन क्षेमा चुंबी । सुंदर ।
संतोष तोष तो हुंगी । पीयूष पीयुषा चुंबी । सुंदर ।
**चालः**—सर्वत्र, सुरभि विलसति, चंद्र हासती । अरुण ते फुलती ।
प्रेमाची बहार मोठी । सुंदर ॥१०॥

—११—

श्रीमंत प्रेम श्रीमंत । करि जनशील शोभिवंत । प्रेम हें ।
भगवंत प्रेम भगवंत । आवडे जगा अत्यंत । प्रेम हें ।
गोविंद प्रेम गोविंद । हासवी भूहृत्कंद । प्रेम हें ।
आनंद प्रेम आनंद । आनंद सच्चिदानंद । प्रेम हें ।
**चालः**—सौंदर्य, तेंच माधुर्य, तेंच चातुर्य, तेंच हो शौर्य ।
रमणींना सदा सहाय । प्रेम हें ॥११॥

→←

## २९ ब्राह्मण.

( चालः—देशाचा पालनवाला० )

जो भजे लोक-ब्रह्माला । तो खराच ब्राह्मण ठरला ॥
जो जनहित-ब्रह्मीं रमला । तो खराच ब्राह्मण ठरला ॥ ध्रु०॥

—१—

लोकांत ब्रह्म सुविलीन । ब्रह्म नाहिं लोकावीण ।
हे ब्रह्मद ब्रह्मज्ञान । कळले ज्याला ।
तो ज्ञाता ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—२—

जो काम पुरवि संपूर्ण । जो प्रेम देइ परिपूर्ण ।
तो लोकब्रह्म भगवान । शरण्य ज्याला ।
तो नरवर ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—३—

लोकार्थ सांडि देहात्मा । लोकार्थ सोडि जीवात्मा ।
लोकार्थ त्यागि परमात्मा । अनंत विमला ।
तो यथार्थ ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—४—

लोकार्थ प्रेमसुखकंद । लोकार्थ आत्मस्वच्छंद ।
लोकार्थ सच्चिदानंद । विसरुन गेला ।
तो कृतार्थ ब्राह्माण ठरला ॥ जो भजे० ॥

—५—

जनहितार्थ करि पुरुषार्थ । जनहितार्थ करि परमार्थ ।
जनहितार्थ तो निज स्वार्थ । ज्याचा झाला ।
तो उदार ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—६—

भुवन हें जयाचें भवन । जनवृंद जयाचे स्वजन ।
जन प्रपंच–प्रपंच सुगुण । ज्यानें केला ।
तो उदात्त ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—७—

दुनयेचा पालनवाला । लोकांचा लालनवाला ।
धर्माचा धारणवाला । होउन ठेला ।
तो जनैक ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—८—

साधण्या सुष्टकल्याण । साधण्या दुष्टकल्याण ।
साधण्या राष्ट्रकल्याण । केवळ जगला ।
तो वत्सल ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—९—

तो वीर शिपाई विमला । जो राष्ट्रासाठीं लढला ।
जो लोकांसाठीं पडला । कामा आला ।
तो शिपाइ ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१०—

होऊन सूत देशार्थ । खाजवी अश्व देशार्थ ।
सारथ्य समरिं देशार्थ । करिता झाला ।
तो सारथि ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—११—

जो कारागारीं पडला । हद्दपार तैसा झाला ।
देशास्तव फांशीं चढला । प्राणा मुकला ।
तो धृतींद्र ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१२—

देशास्तव दे व्याख्यान । देशास्तव लिही लिखाण ।
देशास्तव गुंफी सुगुण । कवितामाला ।
तो कविवर ब्राह्मण ठरला ॥ तो भज० ॥

—१३—

सारांश जनहिताकरितां । जनस्वातंत्र्या कारितां ।
निष्काम कर्म आचरितां । जो जन झाला ।
तो हिंदवि ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१४—

तो असो विप्र वा क्षात्र । हो वैश्य शूद्र, अतिशूद्र ।
जो सज्ज जनांचें भद्र । साधायाला ।
तो हिंदवि ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१५—

तो असो उच्च वा नीच । तो असो सधन वा अधन ।
तो असोच नर वा नार । भू-रत सगळा ।
तो मानव ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१६—

ब्राह्मण्य नसे ज्ञातीचें । ब्राह्मण्य नसे सत्तेचें ।
ब्राह्मण्य असे सुगुणांचें । मान गुणांला ।
तो गुणगण ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१७—

ब्राह्मण्य पूर्ण निःस्वार्थी । ब्राह्मण्य पूर्ण लोकार्थी ।
ब्राह्मण्य पूर्ण पुरुषार्थी । श्रीहरि वदला ।
तो श्रीहरि ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१८—

हा ऐसा ब्राह्मण जन तो । राष्ट्रीय स्वयंसेवक तो ।
राष्ट्राचा संतत होतो । तारणवाला ।
तो तारक ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

—१९—

स्वातंत्र्य जनपदां द्यावें । मांगल्य जनां अर्पावें ।
कर्तव्यें ब्राह्मण व्हावें । विनंति सकलां ।
तो भावी ब्राह्मण ठरला ॥ जो भजे० ॥

## ३० महराष्ट्र—गीत.

( चालः—जो लोक कल्याण )

आनंद वन भूमि ! । गा वीर—वरगान ! ।
देवी ! पुन्हां छान ! पूर्वीसमान ! ॥ धृ० ॥

—१—

दुर्गेपरी रूप धर कांतिमान ! ।
चढ्ढं देच स्फुरणास अवसान पूर्ण ! ॥ आनंद० ॥

—२—

सह्याद्रिच्या शीर्षि हो गान मान ! ।
जावो दणाणून हें हिंदुस्थान ! ॥ आनंद० ॥

—३—

मर्दानि रागांत घे मर्द तान ।
वीररस सिंधूस चढुं दे तुफान ! ॥ आनंद० ॥

—४—

मर्दानि पर्दि मांड थैमान छान ! ।
होवो पराधीन हैराण रान ! ॥ आनंद० ॥

—५—

तूं गान गाण्यास सामर्थ्यवान ! ।
हे गान गाईल तुजवीण कोण ? ॥ आनंद० ॥

—६—

हें गान गाऊन पूर्वीसमान ! ।
संरक्षि सन्मान मानाभिमान ! ॥ आनंद० ॥

—७—

निर्मून जनिं वीररस पुण्यवान ! ।
घाली यशोमान जनतेस स्नान ! ॥ आनंद० ॥

—८—

गा गान हें छान ! हें सुखनिधान ! ।
दे लोकदेवीस स्वातंत्र्यदान ! ॥ आनंद० ॥

—९—

गा गान हें छान ! हें कीर्तिमान ! ।
कर राष्ट्र–लक्ष्मीस ऐश्वर्यवान ! ॥ आनंद० ॥

—१०—

कल्याण गुणधाम गाऊन गान ! ।
हे वीरधीरांब ! दे एक दान ! ॥ आनंद० ॥

—११—

दे दान तें जाण त्रैलोक्य त्राण ! ।
देवाधिदेवास जें स्वाधिष्ठान ! ॥ आनंद० ॥

—१२—

शुभ दान ! प्रिय दान ! तें तेंच दान ! ।
दे देवि ! बलदान ! दे शौर्यदान ! ॥ आनंद० ॥

—१३—

गा गान राष्ट्रास कर चिर महान ! ।
तुज रामदासाचि शिवबाचि आण ! ॥ आनंद० ॥

## ३१ भारतप्रशस्ति.

( चाल:— " पुष्पांजलि अर्पण हो माधवा० " )

भास्वर तुजसज भास्वर तूंच भारता ! ।
भास्वरता तव जगता दे प्रसन्नता !
दे प्रबोधता ! हरि अधीरता ! वितरि वीरता ! ॥ धृ० ॥

—१—

पृथ्वीचा उदकाचा सिंधु लंघुनी ! ।
तेजाचा वायुचा सिंधु पोहुनी ! ।
गगनाच्या सिंधुमधुन उडत जाउनी ! ।

प्राणाच्या सिंधूच्या पार होउनी ! ।
ज्ञानाच्या सिंधूचा अंत लावुनी ! ।
प्रेमसिंधु परमेश्वर त्यांत शोधुनी ! ।
चालः— [1]दाविलास तूं सकलां, किती दिव्यता ! ।
किती रम्यता ! किती धन्यता ! तुझी श्लाघ्यता ॥ भास्वर० ॥

—२—

मनोभुवन अहंभुवन एक करूनी ! ।
अहंभुवन बुद्धीच्या भुवनिं भरूनी ! ।
बुद्धिभुवन जीवभुवनिं सकल कोंडुनी ! ।
चपलगती जीवभुवन अचल बनवुनी ! ।
समसमान समाधान स्वात्मि स्थापुनी ! ।
स्वात्म्याप्रति सकलात्मीं पूर्ण मिळवुनी ! ।
पिंडांतुनि ब्रह्मांडीं ब्रह्म होउनि ! ।
चालः— मिळवलीस वीरवरा तूं प्रशांतता ! ।
तूं प्रमोदता ! तूं अनंतता ! तूं स्वतंत्रता ! ॥ भास्वर० ॥

—३—

विश्वांतिल परतेंनों ! धरा भारता ! ।
विश्वांतिल कामांनों ! हरा भारता ! ।
विश्वांतिल छद्मांनो ! छळा भारता ! ।
विश्वांतिल चोरांनों ! लुटा भारता ! ।

---

१ तो प्रेमसिंधु परमेश्वरा, तूं दाविलास.

विश्वांतिल असुरांनों ! कुटा भारता ।
विश्वांतिल खड्गांनों ! चिरा भारता ।
कोण वधूं जिंकीतो ? अजित भारता ।
कोण बघूं मर्दीतो ? मर्द भारता ।
**चालः**— सकलांची जिरे इथें सकल मत्तता ! ।
सकल धृष्टता ! सकल छद्मता ! सकल अधमता ! ।। भास्वर०

—४—

शत्रूंचीं मढीं इथें कितिक पाडलीं ! ।
परतेची थडगीं तीं कितिक बांधलीं ! ।
जगज्जेति परचक्रें अमित मोडिलीं ! ।
परतंत्रें कितिक वेळ इथें नाचलीं ! ।
नाचलिं परी हांसलिं जरि तरि न वांचलीं ! ।
स्वातंत्र्यें मेलेलीं तदा भासलीं ! ।
भासलिं परि नासलिं जरि तरि न भंगलीं ! ।
तळपत समशेर शूर भारतीं भली ! ।
**चालः**— भारतास या जगांत कोण तुडविता ? ।
कोण चिरडिता ? कोण रडविता ? कोण बुडविता ? ।। भास्वर

—५—

दास्याच्या अधम बुद्धि नमविल्या कुणी ! ।
दास्याच्या ऋद्धि-सिद्धि शमविल्या कुणी ! ।
दास्याच्या भीति-प्रीति भिवविल्या कुणी ! ।
दास्याच्या धर्म-नीति भंगिल्या कुणी ! ।

दास्याच्या जुलुमि स्थिती फिरविल्या कुणी ! ।
दास्याचें प्रबल दैव तुडविलें कुणी ! ।
दास्याचीं साम्राज्यें सडविलीं कुणी ! ।
दास्याचीं स्वातन्त्र्यें भरडिलीं कुणी ! ।
भारतीय देव कुशल दास्यनाशनी ! ।
**चाल**:— क्रांतिप्रद येथ सकल **सगुण** देवता ! ।
सुगुणि सुजनता ! ज्ञानि विप्रता ! मानि क्षात्रता ! ॥भास्वर०

—६—

हिंदभूमि शत्रूंचें तक्त होऊं द्या ! ।
हिंदसिंधु अभिसिंचन त्यास करूं द्या ! ।
हिंदि नभां परक्यावर छत्र धरूं द्या ! ।
अब्दागिरि त्यांवरती मेघ डोलुं द्या ! ।
निसर्गास तच्छीर्षीं फुलें उधळुं द्या ! ।
रवि शशि हे परसदनीं दीप मिरवुं द्या ! ।
काळाला चिरायुष्य त्यांस चिंतुं द्या ! ।
षंढ जनां परतेचे भाट बनूं द्या ! ।
सर्व सर्व परवश हे सर्व होउं द्या ! ।
मात्र आमुचा आम्हां कृष्ण राहुं द्या ! ।
विश्वाला त्याचें तें **ओज** दावुं द्या ! ।
**चाल**:— तो असतां निर्मुं पुन्हां बहुत भारता ! ।
बहुत भाग्यता ! बहु स्वतंत्रता ! बहु यशस्विता ! ॥भास्वर०॥

—७—

रोम, ग्रीक, म्लेंछ, हूण, शबर शक भले ! ।
बर्बर इत्यादि असुर लोभिं गुंतले ! ।
भक्षाया या देशा सर्व धांवले ! ।

परि उलटे ते भुरटे फजित जाहले ! ।
भक्ष्यानें भक्षुनियां त्यांस पचविले ! ।
संप्रति पाश्चात्य सुजन येथ पातले ! ।
पचवुं भारतां बघती युक्तिच्या बलें ! ।
हे यश परि आजवरी कुणां लाभलें ! ।
**चालः—** खातिल हे खचित मार काल उलटतां ! ।
**सद्दि संपतां** ! अधिक सतावितां ! वीर भारता! ॥भास्वर०

— ८ —

प्रेमशौर्य दाखविशी संतरक्षणीं ! ।
भक्ति शौर्य विकसावेसी धर्मतारणीं ! ।
दयाशौर्य प्रकटविशी दीनपालनीं ! ।
क्रौर्यशौर्य गाजविशी दुष्टनाशनीं ! ।
दमनशौर्य नियोजिशी कामकर्षणीं ! ।
धैर्यशौर्य हांसविसी दास्यबंधनीं ! ।
सदा भारता नाचें शौर्य तव मनीं ! ।
**चालः—** सर्व काल तुज ठायीं शौर्य सबलता ! ।
अधम दमनता ! धर्म समरता ! दीन अभयता ! ॥भास्वर०॥

— ९ —

नंदिवरी रणडमरू सांब वाजवी ! ।
गरुडावरि समरशंख विष्णु नादवी ! ।
सिंहावरि सिंहनाद शक्ति गर्जवी ! ।
मारुतिवरि रणझेंडा राम नाचवी ! ।
रण-गीता श्रीगीता गाई श्रीहरी ! ।

भारतीय देवसैन्य वीरकेसरी ! ।
गोचर वा गोचरसे शत्रु संहरी ! ।
**चाल**:—बघुनि भारता ! तव दळ ! पळे असुरता ! ।
जळे अस्मिता ! हंसे शांतता ! रमे सत्यता ! । ॥भास्वर०॥

—१०—

तूं एका उड्डाणीं सिंधु लंघिला ! ।
एकाची आचमनीं तसा प्राशिला ! ।
मंदरगिरि पृष्ठिवरी[1] जळीं तोलिला ! ।
द्रोणागिरि हस्तावरि नभीं झेलिला ! ।
गोवर्धन अंगुलिवरि सहज उचलिला ! ।
दंतावर[2] भुवनगोल सकल झुलविला ! ।
तीन पदीं[3] तो त्रिलोक पूर्ण व्यापिला ! ।
हालाहल पिउन अग्निप्रलय विझविला ! ।
**चाल**:— कवण देश मिरवि भुवनिं अशि समर्थता ! ।
अशि अपूर्वता ! भीम भीष्मता ! अशि विचित्रता ! ॥ भास्वर०

—११—

रामबाण रामपरशु[4] तुझा भारता ! ।
कृष्णचक्र इंद्रवज्र तुझें भारता ! ।
भीमाची भीमगदा तुझी भारता ! ।
भर्गधनू पार्थधनू तुझें भारता ! ।
ब्रह्म, पवन, पावकास्त्र तुझें भारता ! ।

---

१ कूर्मावतारांत. २ वराहावतारांत. ३ वामनावतारांत. ४ परशुरामाचा परशु.

खग[1], नग[2], जल[3] हरि[4], हरास्त्र[5], तुझें भारता ! ।
शस्त्रास्त्रें दिव्य भव्य तुझीं भारता ! ।
शत्रुंजय संतत तूं ह्मणुन भारता ! ।
**चालः**— शस्त्रास्त्रें विश्विं अशीं कवण निर्मिता ! ।
कवण मंत्रिता ! कवण प्रेरिता ! कवण कर्षिता ! ॥भास्वर०॥

—१२—

उदधिवरी तूं विशाल पूल बांधिले ! ।
सकलादि गगनयान गगनिं मिरविलें ! ।
पक्ष्यांसम मनुजांना नभीं उडविलें ! ।
कुरुक्षेत्रिं अर्धकोटि[6] सैन्य लढविलें ! ।
लंकेवर कपि अठरा पद्म प्रेषिले ! ।
गगनांतुनि शत्रुवरी अचल फेकिले ! ।
स्वर्गाला रथ नेले, खालिं आणिले ! ।
कौशल्य न अझुनि कुणीं असें दाविलें ! ।
**चालः**— पुनरपि मग या कालीं तशी ज्ञानता ! ।
तशी ध्यानता ! दावि भारता ! ऊठ तत्त्वता ! ॥ भास्वर० ॥

—१३—

भारतांत घनगणवत् कोण गर्जतो ! ।
भारतीय वीर सिंहसंघ होय तो ! ।
तो विक्रम, तो प्रताप, चंद्रगुप्त तो ! ।
पुष्पमित्र, यशोधर्म, श्रीअशोक तो ! ।

---

१ गरुडास्त्र. २. पर्वतास्त्र. ३ पर्जन्यास्त्र. ४ नारायणास्त्र.
५ पाशुपतास्त्र. ६ भारतीय युद्धांत बावन लक्ष सैन्य होतें.

छत्रपती, छत्रसाल, पृथ्विराज तो ! ।
सिंहसंघ अगणित हा वर्णवे न तो ! ।
तो हिंदवि कीर्तींच्या मंत्रतिं क्रीडतो ! ।
क्रीडुनियां झुंजुनियां शत्रु फाडितो ! ।
भारतास सिंहासनिं नित्य बसवितो ! ।
भारतीय विजय-ध्वज विश्विं मिरवितो ! ।
चाल:—बघुनि शौर्य हें त्याचें सकल तत्सुता ! ।
येइ साजिवता ! स्फुरे भुजलता ! त्यांचि तत्त्वता ! ॥भास्वर०॥

—१४—

अधर्मांना अधमाधम देश हा असे ! ।
कुटिलाशीं कुटिलाहुन कुटिल होतसे ! ।
दुष्ट घातक्यांचा तो घात करितसे ! ।
मस्तांच्या शिरिं लत्ता सत्त देतसे ! ।
सूडाचा सूडावरि सूड घेतसे ! ।
प्रेमळांस प्रेमळ हा प्रेम देतसे ! ।
भक्तांचा भक्त बनुन भक्ति करितसे ! ।
यद्वर्तन नित्य असें जशाशीं तसें ! ।
भारत-कुलजगदंबा कृष्ण ती असे ! ।
चाल:—त्याची ती श्रीगीता तत्त्वसंहिता ! ।
नीति-मंत्रिता ! धर्म-तंत्रिता ! मान्य भारता ! ॥भास्वर०॥

—१५—

असासि भारता ! तूं वनराज केसरी ! ।
इतर देश भासति हे जंबुकापरी ! ।
घेशि योगनिद्रा तूं जधीं स्वांतरीं ! ।
ते जंबुक शिरति तुझ्या तधीं गव्हरीं ! ।
बांधिति तुज कपटगुणीं-दास्यबंधनीं ! ।
जिंकियलें तुजसि असें कळविती जनीं ! ।
सिंहासनिं बसति तुझ्या भूप होउनी ! ।
तव वैभव भोगिति, कीं नेति पळवुनी ! ।
**चाल**ः—परि जागृत तूं होतां एक चपेटा ! ।
सहज लगवितां ! करित कटकटा ! मरती पटपटा ! ॥भास्वर०॥

—१६—

समरशूर दानशूर ज्ञानशूर तूं ! ।
दैत्यार्दन यवनार्दन म्लेंच्छार्दन तूं ! ।
शत्रुंजय मृत्युंजय मदनंजय तूं ! ।
सत्प्रियकर खलभयकर नतशुभकर तूं ! ।
जगदजिंक्य, जगदवध्य, जगदमर्त्य तूं ! ।
ऋद्धीश्वर सिद्धीश्वर बुद्धीश्वर तूं ! ।
राष्ट्रराज भुवनराज स्वर्गराज तूं ! ।
गुणसुंदर जनमंगल सुरमंदिर तूं ! ।
देवबली दैवबली स्वात्मबली तूं ! ।
**चाल**ः—तुझी भारता, प्रभुता वाल्मिकीनुता ! ।
व्यास-संस्तुता ! कृष्ण-वनिता ! राम-वंदिता ! ॥ भास्वर०॥

—→•←—

## ३२ भारताची आरती.

जय शूरा जय वीरा जय भारत राष्ट्रा ! ।
गाता तव जयगीता कविता संतुष्टा ! ॥ ध्रु० ॥

मायेच्या किल्ल्यावर हल्ला चढवीला ! ।
जगद्‌जिंक्य षड्‌रिपुंचा धुव्वा उडवीला ! ।
सदानंद चिदानंद सुखानंद सगळा ! ।
जिंकुनियां जीवार्पण—विश्वार्पण केला ॥ जय शूरा० ॥ १ ॥

अमित रणें, अमित शत्रु, अमित पारतंत्रें ! ।
अमित वेळ खंडियलीं स्वाशनिसंपातें ! !
अमित श्रमें संरक्षुनि ईश्वरिं स्वातंत्र्यें ! ।
अमित यशें भूषविली भू तूं यशवंते ! ॥ जय शूरा० ॥ २ ॥

भूतकाळ—दास्यकाळ जिंकुनियां सगळा ! ।
सांप्रत परकाळावर चढवीला हल्ला ! ।
हल्ला हा विजयश्री निश्चित परणील ! ।
भाविकाल स्वातंत्र्यें शुभें डोलवील ! ॥ जय शूरा० ॥ ३ ॥

काव्य दिव्य दीपावलि चंद्रकला धवला ।
भक्ति रुचिर नीरांजनिं ठेवुनि स्नेहाळा ! ।
वाजवून स्तवनाची घंटा मंजूळा ! ।
गोविंदाची प्रतिभा ओंवाळी तुजला ! ॥ जय शूरा० ॥ ४ ॥

## ३३ परमेश्वराजवळ काय मागावें ?

( चाल:—श्रीमंत पतीची राणी.)

हे गणनाथा गुणवंता । स्वातंत्र्य-शक्ति संभूता । पाहि माम् ॥
हे बलवंता श्रीकांता । श्रीमंत स्वयं-स्वतंत्रा । पाहि माम् ।
स्वातंत्र्यनुता अवधूता । जयदत्ता संत-वसंता । पाहि माम् ।
भो चंद्रभृता भगवंता । स्वातंत्र्य देविच्या नाथा । पाहि माम् ॥
**चाल**:—हे चंद्र सूर्य यम अरुणा । शचीच्या रमणा । विधात्या दहना ॥
तुम्हि स्वतंत्र सुरहो धांवा ।
स्वातंत्र्यदेविनों पावा ।
मम मनिंची वांछा पुरवा ।
कांचन वा कीर्ति कांता । इच्छीं न मुळीं मी स्वार्था । देव हो ॥१॥
तळमळति प्राण सुष्टांचे । ज्यासाठिं राष्ट्र-भक्तांचे । तेंचि द्या ॥
वाहती पूर रक्ताचे । ज्यासाठिं शूर वीरांचे । तेंचि द्या ।
ज्याच्यानिं सरे दुष्टांचें । स्वामित्व सज्जनांवरचें । तेंचि द्या ।
सार्थक जें नर-जन्माचें । अस्तित्व भूतमात्रांचें । तेंचि द्या ।
**चाल**:—वदवे न मला हो वाचे । जे परी नाचे । स्वांतिं सकलांचे ।
तें दैवत आनंदाचें ।
मंगलावलंबन ज्याचें ।
हो रति-स्थान पुण्याचें ।
जें दिलें शिवाजीनाथा । ब्रह्म तेंचि अर्पा आतां । देव हो ॥२॥

## ३४ वेदांताचा पराक्रम,

( चालः-कोठें काळा काळा राम रे. )

पराक्रमी वेदांत । आमुचा । पराक्रमी वेदांत ।
पराक्रमी वेदांत ॥ हो ॥ हा अनुभव धादांत ॥ध्रु०॥
शांतदांतसा बघून त्याला " दुर्बल " वदती भ्रांत । हो ।
त्या भ्रांतांना विक्रम त्याचा कळला नच निभ्रांत । हो ।
हा अनुभव० ॥ १ ॥
दिसे शांत तो असे शांत तो परि कवणाला शांत ? । हो ।
संत महंतां शांत जरी तरि असंतांस नच शांत । हो ।
हा अनुभव० ॥ २ ॥
भक्तिज्ञानसंघात तयाच्या शस्त्राचा संघात । हो ।
या संघानें सर्व जिंकिला त्यानें अरिसंघात । हो ।
हा अनुभव० ॥ ३ ॥
काम जिंकिला, क्रोध जिंकिला, जिंकियला रतिकांत । हो ।
रतिकांतांतक शिवाकांत शिव, जित केला श्रीकांत । हो ।
हा अनुभव० ॥ ४ ॥
भयमय दुर्जय तसा जिंकिला भवसंभव आक्रांत । हो ।
आक्रांत न परि कृतांत केला नितांत तो आक्रांत । हो ।
हा अनुभव० ॥ ५ ॥
मनांत ठसतां श्रीगीतेंतिल वेदाचा सिद्धांत । हो ।
शत्रुंजय तो अर्जुन बनला रणांत आमरणांत । हो ।
हा अनुभव० ॥ ६ ॥

पांडुरंग भजनांत गाइजो भक्तियुक्त वेदांत । हो ।
तोच वारकरि बने धारकरि प्रसिद्ध राष्ट्र–रणांत । हो ।
हा अनुभव० ॥ ७ ॥

भगवें निशाण होतें गुंगत शांतिभक्ति रंगांत । हो ।
भगवा झेंडा बनुन रंगलें तें मग रणरंगांत । हो ।
हा अनुभव० ॥ ८ ॥

" जय जय श्री रघुवीर " घोष हा. हा ऐकुन वेदांत । हो ।
झाला " हर हर महादेव " आणि,राणि ठरला दास्यांत । हो ।
हा अनुभव० ॥ ९ ॥

सौम्य प्रथम होती श्रुतिदेवी नानकशिखपंथांत । हो ।
तीच भयंकर बने भवानी पुढें शत्रुसत्रांत । हो ।
हा अनुभव० ॥ १० ॥

वीर्यवंत वेदांत असे हा मनोरणश्री—कांत । हो ।
मनोरणश्रीकांत न केवळ देशरणश्री—कांत । हो ।
हा अनुभव० ॥ ११ ॥

## ३५. राष्ट्रसंतप्रतिज्ञा.

( चालः—आनंद कंद ऐसा. )

आम्ही स्वराष्ट्र संत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ।
वारून पारतंत्र्य । करुं मातृभू स्वतंत्र ॥ ध्रृ० ॥
ईशापरी हमेश । बळ वेंचुं तें विशेष ।
ईशास जे न गम्य । करुं यत्न ते सुरम्य ॥
सेवूं अनंत पंथ । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ १ ॥
विघ्नांत धांवुं हंसत । वणव्यांत जाउं रमत ।
मरणांस सेवुं सतत । जननास घेउं अमित ।
सोसून सर्वस्वांत । करूं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ २ ॥
करुं हार तो जिवांचा । करुं हार तो शिवाचा ।
करुं हार तो मनांचा । करुं हार तो धनाचा ।
घालूं तिच्या गळ्यांत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ३ ॥
तिजला न सैन्यभार । तिजला न आरमार ।
तोफा किती? मुळीं न । मग कोठचें विमान ।
आम्हां न त्याची खंत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ४ ॥
विघ्नघ्न ढाल धैर्य । करवाल आत्मशौर्य ।
दिव्यास्त्र बुद्धिवीर्य । हा शस्त्रसंघ सर्व ।
देऊं तिच्या करांत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ५ ॥
घेऊन प्रेमपावा । गाऊन देश-धावा ।
शिकवून भक्ति सर्वां । साधूंच देशसेवा ।
करुं कार्य कांत कांत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ६ ॥

आराधुं राम सगुण । ध्याऊंच कंसहनन ।
धरुं रामदास चरण । जाऊं शिवास शरण ।
ऐकूं स्वमोक्ष मंत्र । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ७ ॥
वंदीस देवशाला । वेडीस पुष्पमाला ।
हालांस मानुं झोला । काळाशिं खेळुं खेळां ।
श्रमुं सर्वदा नितांत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ८ ॥
होती स्वतंत्र माता । झाली गुलाम आतां ।
गेली तदीय सत्ता । ठरली सदा अनाथा ।
हें दुःख जाळि स्वांत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ९ ॥
ती चोर स्वीय धामीं । परके तदीय स्वामी ।
परके खुशाल लाल । ती भोगि माय हाल ।
धिक् दैव ! हंत ! हंत ! । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ १० ॥
छद्मांत कीं भयांत । कलहांत कीं बलांत ।
स्वातंत्र्य जेथं मेलें । ते प्रान्त शोधुं सगळे ।
त्याला करुं जिवंत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ ११ ॥
तो दास्य–दैत्य सक्त । प्राशो स्वकंठ रक्त ।
त्याच्या भयार्थ व्यर्थ । ना सोडुं देशपंथ ।
ही वाणि सत्य सत्य । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ १२ ॥
करुं मातृभू सुकांत । करूं मातृभू सुमंत्र ।
भवितव्यता-वसंत । फुलवूं तिचा नितांत ।
विश्रांत भाग्यवंत । करुं राष्ट्रभू स्वतंत्र ॥ १३ ॥

—>०<—

## ३८ अनभिषिक्त भूपति.

भूपाळी.

अनंत तुज प्रणिपात उदारा स्वजनसुमंगल करा । दयाळा ।
स्वातंत्र्याच्या संता टिळका सुमनांजलि हा वरा ॥ १ ॥
पश्चिम दिक्सिंधूनें गिळितां स्वसाम्राज्य दिनमणी । दयाळा ।
पारतंत्र्य—तमिं राष्ट्र सांपडे स्वजन व्यसनकाननीं ॥ २ ॥
त्यास तारण्या कांहीं तारें देशभक्त चमकले । दयाळा ।
* विष्णु मंगलासम परि ते झणिं अस्तंगत जाहले ॥ ३ ॥
मांगल्याचा मार्ग शोधितां तदा लोक श्रमले । दयाळा ।
सर्वस्वातें तस्कर लुटितां स्वातंत्र्या मुकले ॥ ४ ॥
अशांत राष्ट्रियसुगुणचंद्रिका प्रकाशीत निर्मला । दयाळा ।
बुधेंद्र ! भद्रा ! टिळका ! चंद्रा ! तुझा उदय जाहला ॥ ५ ॥
तुझा उदय जाहला कशाचा भाग्योदय ठाकला । दयाळा ।
निजोन्नतीच्या स्वातंत्र्याच्या मार्गीं जन लागला ॥ ६ ॥
बोधामृत वर्षतो निरंतर तुझा किरण**केसरी** । दयाळा ।
म्हणुनिच हें मृत—राष्ट्र सुराष्ट्रियचैतन्यातें वरी ॥ ७ ॥
देशभक्तिचा सुंदर तरु तूं आर्यराष्ट्रिं लाविला । दयाळा ।
श्रीनरहरिच्या कृपें धरिल तो स्वातंत्र्याच्या फला ॥ ८ ॥
राष्ट्र—जागृती संघ—शक्तिस्तव गणाधीश प्रार्थिला । दयाळा ।
‘ स्वातंत्र्याचा देव शिवप्रभु ’ महोत्सवें नटविला ॥ ९ ॥
स्वलोकमान्या तुझे वदान्या स्मरुं किति उपकार । दयाळा ।
देशमंगलासाठिं भोगिलें त्वां कारागार ॥ १० ॥

---

* १ विष्णुशास्त्री चिपुळुणकर.

सुदीन आह्मी कृतज्ञ व्हाया वंद्य शीर्षभागिं ते । दयाळा ।
प्रेमाश्रूंची धारा धरितों ‘ अनभिषिक्त भूपते ’ ॥ ११ ॥
**चालः**—होवो जगिं तव जयजयकार ।
तसाच उत्सव प्रेमपुरःसर ।
राष्ट्रविभूते तुला दयाकर ।
करो चिरायु तो परमेश्वर ।
तुझ्या प्रयत्नें तुझ्या देखतां वसुंधरा सुंदरा । दयाळा ।
लेवो श्रीमत्स्वातंत्र्याचा भुवन–रुचिर–विजवरा ॥ १२

## ३७ मंगलमूर्ते ? मंगल दे.

( चालः—महिषासुरमथिनी श्री भगवति )

हे शुचिचरिते अनंतकीर्ते मंगलमूर्ते मंगल दे ।
जय सुरवंद्ये सुनंदकंदे मंगलमूर्ते मंगल दे ।
सकल अमंगल ध्वंसू दे । प्रसन्न मज्जन होऊं दे ।
येथें आतां पद्मज–दुहितायुत श्रीमाता नांदो दे ॥ धृ०
तुझ्या प्रसादें देशद्रोही–जन देशभक्त ते होऊं दे ।
शत्रुविनाशक सूड बुद्धि बहु आर्य जन मनीं जागो दे ।
राजकीयस्थिति राष्ट्रअहंकृति धीरवीरता वाढो दे ।
धर्म जागृती ऐक्य सांप्रती उद्यम–प्रगती होवो दे ।
**चालः**—माते देवी या स्थानीं ।
स्वातंत्र्याचालि सुख खाणीं ।
‘ स्वराज्यसविता ’ सत्वर आतां तो शुभदाता उगवो दे ॥ १

# ३८ भगवान् ! होई अवतीर्ण.

चालः—अभिमान, अभिमान वृथा मनुजाचा

भगवान् ! भगवान् होइ अवतीर्ण। श्रीमान् ! श्रीमान् होइ अवतीर्ण।
भगवान्। भगवान् , ! भुवनकल्याण, दीनजनशरण त्वत्पदीं जाण ॥ध्रु०॥

दुष्ट मातले संत गांजले। धर्मविभवही विलया गेले।
सज्जनप्राणावरी नाचले। पारतंत्र्य सैतान ॥ १ ॥

युगे युगे मी संत रक्षिन। श्रीगीतेमधिं दिधलें वचन।
दुष्ट संहरुन तें करि पूर्ण। पाव संत संतान ॥ २ ॥

करितों आम्हीं मार्ग प्रतीक्षा। ये ये ये ये ये कमलाक्षा।
नको नको बा करूं उपेक्षा। झालों हतबल जाण ॥ ३ ॥

त्रिभुवनराजा तूं असतांनां। अन्नासाठीं कुणा नरानां।
कधिं न प्रार्थुं हे दीनोद्धरणा। विठ्ठल होवो प्राण ॥ ४ ॥

हात जोडितों पदर पसरितों। तुझ्या पदीं मनसुमन अर्पितों।
जनकल्याणासाठिं मागतों। स्वातंत्र्याचें दान ॥ ५ ॥

## ३९. श्रीकृष्णजन्मोत्सव.

**साक्या.**

—१—

वैकुंठांचें श्रीमन्मंगल गोकुळिं जन्मा आलें ! ।
हृदयोहृदयीं हलूं लागले प्रेमाचे आंदोले ! ॥ १ ॥
वैकुंठींच्या सौंदर्यानें सकला दर्शन दिधलें ।
वदनोवदनीं हास्य विकसलें, देवावर उधळीलें ॥ २ ॥
वैकुंठींच्या स्वातंत्र्याचे गोकुळिं स्वागत झालें ।
नयनोनयनीं प्रेमाश्रूंचे हार गुंफिले गेलें ॥ ३ ॥
वैकुंठींच्या वीरश्रीनें व्रजांत डेरे दिधलें ।
शौर्य सतांचें समरां उठलें असद्भयें भ्यालेलें ॥ ४ ॥
वैकुंठींची करुणा वदली, आलें मी संतांनों ! ।
सद्धर्मानों ! सत्कर्मानों ! धीर धरा वत्सांनों ! ॥ ५ ॥
वैकुंठींची महन्माउली कुरवाळी सकलांला ।
तळमळत्याला, गहिंवरत्याला, दुष्टे छळिलें ज्याला ॥ ६ ॥
जयजयकारें हर्षोद्गारें स्मृतिवर्षण तधिं झालें ।
जगदीशाचें जगत्प्रेम तें जगतीं जन्मा आलें ॥ ७ ॥
वैकुंठींच्या श्रीमंतानें कुणास श्रीमान् केलें ? ।
श्रीमान् भूधर, श्रीमान् धीधर, श्रीमान् श्रीधर झाले ॥ ८ ॥
वैकुंठींचा चंद्र चिताचा येतां जग फुलवाया ।
उत्कर्षाचें अंतरअर्णव गदगदले हांसाया ॥ ९ ॥

बिंब विभूचें काळदर्पणीं तें बिंबे ज्या रंगें ।
झिंगें तत्प्रतिबिंब विश्व हें त्या दर्पाणिं त्या ढंगें ॥ १० ॥
कसें अनिर्वाच्याचें वाचन वाचेनें वाचावे ? ।
वाचनास तद्यशोवाचना कविनें तत्सम व्हावें ॥ ११ ॥
तत्सम व्हावें किंवा व्हावें कविवर वाल्मिक व्यास ।
गुंफावें मग निर्गुण हरिच्या गुणकवनास्तवनास ॥ १२ ॥
व्हावे अथवा नारद तुंबर सरस्वती रसवंत ।
गानगुणानें वर्णावा मग तो निर्गुण भगवंत ॥ १३ ॥
यशोदेस त्या नंदन झाला नंदाला आनंद ।
मला आवडे तो नंदाचा सदानंद गोविंद ॥ १४ ॥

—२—

सर्वांगांनीं सर्व दिशांनीं नमस्कार ते घाला ।
अर्पायाला शिव सकलांला सकलांचा प्रभु आला ॥ १ ॥
अन्यायाला विलया न्याया, न्यायाला रक्षाया ? ।
धर्माला ताराया आपण आले कां प्रभुराया ? ॥ २ ॥
दुष्टांना दंडाया, सुष्टां संतांना जगवाया ।
सत्याला तगवाया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ३ ॥
परसत्तेला लत्ता द्याया, स्वसत्तेस स्थापाया ।
सुसत्तेस सजवाया आपण आले कां प्रभुराया ! ॥ ४ ॥
प्रभुसेवेला महत्व याया, गुण—सेवा सुरु व्हाया ।
जनसेवा शिकवाया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ५ ॥

बुद्धियोग जगतीं वर्ताया, कर्मयोग सांगाया ।
भक्तियोग पढवाया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ६ ॥
सलोभ विक्रम अलोभ व्हाया, अयोग्य साहस जाया ।
तत्त्वांचे गुण गाया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ७ ॥
मनोरणीं सकळां लढवाया, देशरणीं भिडवाया ।
जनां मर्द बनवाया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ८ ॥
आले आपण काय कराया ? सकळां कांत कराया ? ।
सकळां शांत कराया आपण आले कां प्रभुराया ? ॥ ९ ॥
जणुं गोपींना नंदन झाला, गोपांना आनंद ।
मला आवडे तो गोपांचा सदानंद गोविंद ॥ १० ॥

—२—

कितिक पुण्य केलेंस गोकुळा, जगपरिस तूं अगळें ।
नारायण[1] सोडून सदनिं तव, प्रभु नारायण रमले ॥ १ ॥
सदैव दैवी खचित यशोदे ! जगापरिस तूं विमले ।
शेषशयन सोडून त्वदंकीं शेषशायि ते निजले ॥ २ ॥
सुधन्य यमुने ! सुपुण्य जमुने ! जय भवभंगे गंगे ।
क्षीरसमुद्रा सोडुन रंगे रंमारंग त्वत्संगें ॥ ३ ॥
सहस्रशीर्षें असती ज्याला असा शेष सोडुनियां ।
तव शीर्षीं ये प्रभु नाचाया, भाग्य तुझें कालीया ॥ ४ ॥
गोपालांनों ! गोपिजननांनों, ! पराभक्तिच्या प्रवलें ।
कुंठित आपण अकुंठिताला वैकुंठाला केलें ॥ ५ ॥

---

१ जलस्थान अर्थात् क्षीरसमुद्र.

राधेच्या गहिंवरास भुललें विभुत्वास विस्मरले ।
सदानंद हरि गोकुळिं आले, बालक झालें, रडलें ॥ ६ ॥
रडत धांवलें, सतत पावले, वेड भक्तिचें भारी ।
सजीव निर्जिव निजदासाचा कैवारी कंसारी ॥ ७ ॥
मुक्या मनाचे, भुकशा दयेचे सुकलेल्या आशेचें ।
प्राणांताचे, आकांताचे, शेवटच्या हुंदक्याचे ॥ ८ ॥
ऐकुनियां गोहंबरड्याचे करुणामय कल्लोळ ।
न याचिताची न पूजिताची धांवे श्रीगोपाळ ॥ ९ ॥
ती श्रुतिमाता, ही भूमाता चित्तहीन ह्या असतां ।
कैशी होती मग शोकार्ता ? नवल वाटतें चित्ता ॥ १० ॥
ऐकुन त्याचें चित्तहिनांचे अबोल दुःखी बोल ।
भक्तिभुकेला भुकाच धांवे भुवनाचा भूपाल ॥ ११ ॥
निर्गुण, निर्जिव, निर्मुख, तैसा निष्कामचि, निष्प्रेम ।
कोण असा हा प्रार्थी देवा ? धर्म तयाचें नाम ॥ १२ ॥
त्या धर्माचा निर्जिव निर्मित ऐकून निरर्थ धांवा ।
वैकुंठीचा दयाळु वेडा धांवे जेव्हां तेव्हां ॥ १३ ॥
वसुदेवाला नंदन झाला; चंद्राला आनंद ।
मला आवडे तो चंद्राचा सदानंद गोविंद ॥ १४ ॥

—४—

जेव्हां जेव्हां धांवुन रक्षी आर्यदेश जगदीश ।
आर्यदेश विश्वास दावी सदानंद विश्वास ॥ १ ॥
आर्यदेश हा सदासर्वदा स्वयें होय परमेश ।
आर्यदेश हा तैसा नित्यहि जगा करी परमेश ॥ २ ॥

आर्यदेश हा शिव होण्याचा विश्वाचा अभिलाष ।
आर्यदेश हा शिव झालेल्या जीवांचा जयघोष ॥ ३ ॥
आर्यदेश हा " तत्त्वमसी " चा सर्वांना संदेश ।
आर्यदेश तो " स्वयं शिवोऽहं " जीवांचा विश्वास ॥ ४ ॥
आर्यविप्रता जिवाशिवाचा अद्वैतोपन्यास ।
आर्यसाधुता जिवाशिवाच्या द्वैताचा संन्यास ॥ ५ ॥
आर्यवेद ते जिवाशिवाच्या ऐक्याचा इतिहास ।
आर्यधर्म त्या इतिहासाचा निदिध्यास अभ्यास ॥ ६ ॥
आर्यदेवगण त्या इतिहासा उपोद्घातसम झाला ।
आर्यांची संस्कृति त्याप्रती उपसंहारच लिहिला ॥ ७ ॥
आर्यांच्या ज्ञानांतुन " कोहं कोहं " विवेक उठला ।
आर्यांच्या ध्यानांतुन " सोहं सोहं " निर्णय झाला ॥ ८ ॥
या सर्वांच्या अवनाकरितां प्रभु घेई जन्मास ।
तज्जन्मोत्सव करून, करुं या धन्य जन्म जन्मांस ॥ ९ ॥
गोकुळास त्या नंदन झाला गोकुळास आनंद ।
मला आवडे तो गोकुळिचा सदानंद गोविंद ॥ १० ॥

—५—

उठा कवींनों ! निज दिव्याचा निधि उघडा काव्याचा ।
सुमंगलाचा आज सुखाचा जन्मोत्सव कृष्णाचा ॥ १ ॥
प्रतिभेचा कल्पद्रुम फुलवा, फुलवुन जगभर हलवा ।
सुकल्पनांनीं—सुभग सुमानीं—विश्वमंदिरां खुलवा ॥ २ ।
ताऱ्यांची, दीपांचि समांची सप्रभ काढा रास ।
हास्याची सरोम होउं द्या गमतीची आरास ॥ ३ ।

चमत्कृतीची, चतुराईची अभूत उल्हासाची, ।
नवलपणाची नवी होउं द्या रोशनाइ नवलाची ॥ ४ ॥
शृंगाराचा, नव रंगाचा सर्वां सजवा साज ।
सौंदर्याला आज होउं द्या सृष्टीचा अधिराज ॥ ५ ॥
अधिराजाची सौंदर्याची भू अधिराज्ञी आज ।
नव शोभेची, कवि काव्याची जिकडे तिकडे मौज ॥ ६ ॥
जगाएवढा, नभाएवढा, मनाएवढा व्हावा ? ।
विश्वंभर तो असे केवढा नसे कुणाला ठावा ॥ ७ ॥
अनंत भगवान् अनंत श्रीमान् अनंत विभु समजावा ।
त्या विभुच्या विभवा शोभावा ऐसा उत्सव व्हावा ॥ ८ ॥
पीत, शेंदरी, लाल, गुलाली, श्याम, शुभ्र, सोनेरी ।
निलांबरिंच्या शुभ्राभ्रावरि कसालि रिखिली सिनरी ॥ ९ ॥
संध्योषेचा सुंदर नखरा रंगविला तत्काळ ।
नभीं रंगला मनीं बिंबला सकाळ संध्याकाळ ॥ १० ॥
संध्योषेच्या रंगमहालीं स्वर्णमंचकीं हसत ।
लाल शालु नेसून बैसली देवी लक्ष्मी रमत ॥ ११ ॥
नभविष्णूनें हृदयीं धरिली रंगरूप ही कमला ।
संध्योषेचा रंग कशाचा ? प्रणयरंग तो फुलला ॥ १२ ॥
विष्णुलक्ष्मिचा विलास बघतो, हंसतो, रमतो रवि तो ।
निजकिरणांचा स्वर्णपिसारा दोघांवर वारी तो ॥ १३ ॥
उद्यानांच्या कांतारांच्या खऱ्या तसबिरा खचित ।
धवल विमल दिग्भागा लावा जगत् करां हें ललित ॥ १४ ॥

गहानिं मृगांचीं चित्रें फिरवा, गगनिं खगांचीं उडवा ।
जिवंत चित्रें हीं मनुजांचीं सर्व ठिकाणीं मिरवा ॥ १५ ॥
दिव्य आरसे वनशोभेचे वनराजीवर लावा ।
हास्याचे आरसे हांसवित मनुज मुखावर ठेवा ॥ १६ ॥
सरोवरांचे, हे सरितांचे, सरत्पतींचें सुचिर ।
रुचिर आरसे ठायीं ठायीं मांडा हारोहार ॥ १७ ॥
इंद्र धनुष्यांच्याच कमानी नभास भिडवुन थेट ।
नंतर करुं या दीपावलिचा नीटनेटका थाट ॥ १८ ॥
आर्यभूमिला नंदन झाला आर्यांना आनंद ।
मला आवडे तो आर्यांचा सदानंद गोविंद ॥ १९ ॥

---

अंधारानें अधिक पेटती सूर्यानें जे विझती ।
ते ताऱ्यांचे दीप पेटवुन ठेवा गगनावरतीं ॥ १ ॥
दीप कशाचे ! त्या ताऱ्यांच्या हौसेच्या मौजेच्या ।
नभांत लावा जळत्या, झुलत्या हंड्या जणुं कांचेच्या ॥ २ ॥
हंड्यांच्या झुबक्यामधिं ठेवा झुंबर हें चंद्राचें ।
हंड्या झुंबर शोभा सुंदर ! गगन दिसें गमतीचें ॥ ३ ॥
नच भडके नच विझे वायुनें ऐशा परिनें लावा ।
सूर्याचा तेजोमय भपका रात्रीं वरतीं ठेवा ॥ ४ ॥
त्या तेजाच्या कल्लोळें नच बालकृष्ण दचकावा ।
वीजेचा चमचमाट ह्मणुनी सावकाश लावावा ॥ ५ ॥

आंत विजेचे दिवे ठेविले, मेघफुगे फुगविले ।
नानारंगी अशा प्रसंगीं गगनावर सोडीले ॥ ६ ॥
झुळ झुळ झुलता मारुत पंखा लहरींच्या पंखांचा ।
झुलवुन लहरी, घालो वारा, हरिला शीलतेचा ॥ ७ ॥
हांसत हांसत वसंत येवो, हंसऱ्या हरिला हंसवो ।
विश्वरंजनाच्याच रंजना विश्व-फुलारा फुलवो ॥ ८ ॥
दीपोत्सव छे: आनंदोत्सव महोत्सवें हा केला ।
केला आहे कधींच प्रभुनें तो आम्हीं वर्णीला ॥ ९ ॥
दीपोत्सव हा प्रेमोत्सव हा प्रेमें देवा पावो ।
धर्मरक्षणीं युगायुगानीं धर्मेश्वर तो येवो ॥ १० ॥
जन्मोत्सव हा आज अजाचा, अजराचा अमराचा ।
किंवा स्वदेश स्वातंत्र्याच्या विजयाच्या समराचा ॥ ११ ॥
संतभक्तिला नंदन झाला संतांना आनंद ।
मला आवडे तो संतांचा सदानंद गोविंद ॥ १२ ॥

— ७ —

मान्य जाहली निजदासांची पुण्याई धन्याई ।
सकलां पूत कराया येई विश्वाची पुण्याई ॥ १ ॥
प्रभुशाही सुखशाही आतां उदयोन्मुख जगिं होई ।
लोकशाहिची नशीबशाही बिलकुल फुलुनी जाई ॥ २ ॥
ज्या जगताची जो प्रभु असतां सदा सर्वदा माता ।
त्या जगताचें तो प्रभु झाला तान्हें बालक आतां ॥ ३ ॥

आतां बालक झालें माता, माता झाली बाळ ।
जगत् जाहलें लालनकर्तें देव होय लडिवाळ ॥ ४ ॥
'आई ? आई ! ह्मणेल जगतां, जगताची जगदंबा ।
कौतुक केलें तूं जगताच्या अवलंबा ! आरंभा ॥ ५ ॥
मांडीवर घे आतां जगता, देवाला बाळाला ।
आलिंगन दे चुंबनास घे रमवि स्वय रमणाला ॥ ६ ॥
कडेवरी घे स्कंधावर घे हृदयाच्या लाडाला ।
हांसिव, नाचिव, खिदळिव, खेळिव जगताच्या खेळाला ॥ ७ ॥
मूर्त जगन्मंगलास मंगल करण्यास्तव पदिं न्हाणी ।
निज भक्तीला आतां भरतें हवें तेवढें आणी ॥ ८ ॥
प्रभु तो करतो संतत तुजवर प्रेम जगा ! निष्काम ।
वचपा त्याचा काढ, तयाला प्रेमार्पुन निस्सीम ॥ ९ ॥
प्रभु तो करतो गूढ गुप्तसे अनाद्यंत तव लाड ।
लाड तयाचे करुनी आतां वचपा त्याचा काढ ॥१०॥
प्रभू केवढा ! जगत् केवढें ! कसा जमावा मेळ ? ।
निस्सीमाला येते सीमा प्रेमास्तव बहु वेळ ॥११॥
बालकदेहीं कसें कोंदले ईशाचे गुणधर्म ।
नवल वाटतें हृदीं दाटतें या गूढाचें शर्म ॥१२॥
बालकदेहीं कसा कोंदला अतुल भव्य भगवान ? ।
नवल वाटतें हृदीं वाटतें गावें तद्गुणगान ॥१३॥
जगभर भरला भरून उरला अनंत तो भगवंत ।
भक्तीपायीं लहान देहीं आतां झाला सांत ॥१४॥
सांता झाला अनंत नंदन, सांतांना आनंद ।
मला आवडे तो सांतांचा सदानंद गोविंद ॥१५॥

—८—

वैकुंठीचे स्वयंप्रभ प्रभु गोकुळांत अवतरले ।
अननुभूतशा पूत प्रकाशें प्रकाशले जन सगळे ॥ १ ॥
चराचराच्या हृदीं दाटले सुखामृताचे पान्हे ।
परमात्म्याचें हृदय जाहलें नभश्याम शिशु तान्हें ॥ २ ॥
आत्म्याच्या आत्म्याला पाहुन आत्मा डोले सारा ।
नयनोनयनीं वाहु लागल्या प्रेमाश्रूंच्या धारा ॥ ३ ॥
प्रेमाश्रूंच्या धारा जणुं त्या हृदय न्हाणितिल तीर्थें ।
किशोर परमात्म्याला आत्मे न्हाणीति हृदयांत ॥ ४ ॥
परब्रह्म तें शिशू तान्हुलें पाहुनिया झालेलें ।
महदाश्चर्यें हर्षैश्वर्यें आत्मे सगळे हंसले ॥ ५ ॥
त्या हास्याला आपण म्हणुं या हृद्दीपांची कांती ।
बालरूप ब्रह्माला आत्मे औक्षण करिती स्वांति ॥ ६ ॥
प्रसन्नतेचे भाव मनोरम सर्वांच्या मुखिं झुलले ।
झुलले कसले ! कृष्णपुजेला फुलासारखे फुलले ॥ ७ ॥
भूतात्मा तो हरिमय झाला मोदुनि मोहुनि गेला ।
त्या मोहाच्या मधुचा वोळा मधुर माधवा दिधला ॥ ८ ॥
अमित जगांचीं शीर्षें हर्षें ज्याच्या पायां नमिती ।
त्या प्रभुराया आया बाया पायावर न्हाणीती ॥ ९ ॥
अगणित नव मेघांचे हंडे ज्या प्रभुच्या स्नानाला ।
न्हाउं घातले क्षुल्लक सलिलें सलील आतां त्याला ॥१०॥
जीवजगाचें अंग रक्षिण्या अंगरखा जो झाला ।
त्या प्रभुराया ममता म्हणते " अंगापोपी " घाला ॥११॥

निरंजनाच्या नयनीं अंजन, "धन्य" धन्यता बोले ।
चंद्रमुखाला तीट लाविली, संतभक्ति ती खेळे ॥१२॥
चुंबन घ्याया मृदुत्व प्याया कृष्णाचें अभिराम ।
लागे वेगें उचंबळाया अधरोअधरीं प्रेम ॥१३॥
बाल हांसलें, हास्य विखुरलें, विश्व हांसलें हर्षें ।
कंठालिंगन हृदयालिंगन पडलें स्नेहोत्कर्षे ॥१४॥
अंकीं घेतें करीं झेलितें करितें लालनलीला ।
हास्याला हंसवाया सारें कौतुक झालें गोळा ॥१५॥
कौतुक दोला घेतो झोला आनंदें निज बाळा ।
कविता देवी मंगल मंजुल गायन गातें तुजला ॥१६॥
विश्वनाथ विश्रांत जन्मला विश्वाला आनंद ।
मला आवडे तो विश्वाचा सदानंद गोविंद ॥१७॥

—९—

सुंदरता जन्मली, जाहलें सुंदर सुंदर सारें ।
चंचल मानस सुस्थिर गंभिर बनलें आत्मविचारें ॥ १ ॥
आत्म्याच्या चैतन्यीं जिरला अहंकार जीवांचा ।
खेळ थांबला क्षणैक साचा मनमोहन मायेचा ॥ २ ॥
शांतिदेविनें आकर्षीला कामाचा संचार ।
क्रोधाचा तो मोद जाहला, शमला तापविकार ॥ ३ ॥
महामत्सरी मत्सर गेला सौजन्याला शरण ।
मत्त मदानें विनयें धरिले नम्रत्वाचे चरण ॥ ४ ॥

चोऱ्या करतां करतां थकला लोभ कुकर्मी विटला ।
वैराग्याच्या पुण्यसागरीं जीव तयानें दिधला ॥ ५ ॥
कामप्रभृती निज मित्रांचा शेवट ऐकुनी रडला ।
घाबरला तो मोह विचारा प्रेमामध्यें दडला ॥ ६ ॥
दुःखाचा आनंद कराया आला हा गोविंद ।
सृष्टिदेवते उधळ त्यावरी जीवाचा स्वच्छंद ॥ ७ ॥
वृक्षलतांनों ! अनंत कुसुमें, कुसुमांनों ! मकरंद ।
मकरंदा ! सौगंध उधळ तूं सौगंधा ! आनंद ॥ ८ ॥
स्वर्देवींनों ! उधळा सुंदर कलिका मंदाराच्या ।
फुलत रहाव्या चमकत जाव्या हृदयीं स्वर्गंगेच्या ॥ ९ ॥
गोपीनों ! तुह्मि चुंबन लतिका फुलाच प्रेमामाजीं ।
माधवजीवर उधळा आजी चुंबन–सुमनें ताजीं ॥१०॥
ताऱ्यांचा गोजिरा फुलारा रम्य पिसारा हंसरा ।
पसरुन सारा नभीं नाच तूं प्रभुच्या चंद्रमयूरा ॥११॥
पंख कल्पनांचे पसरुनियां प्रतिभे मार भरारी ।
चंद्रमयूरावरी अंबरीं सत्वर भर चल स्वारी ॥१२॥
सकल जीव वदनांच्या वेणू नितांत सुस्वर कांता ।
धरुनी स्वाधरीं गा तूं सुंदरि, श्रीहरिच्या संगीता ॥१३॥
परमात्मा जन्मला जाहला आत्म्यांना आनंद ।
मला आवडे तो आत्म्याचा सदानंद गोविंद ॥१४॥

—›•‹—

## ४० जन्माची सार्थकता.

चाल—( राम स्मरावा राम खरोखर )

स्तुत्य तयांचें जनन । खरोखर स्तुत्य० ॥ धृ० ॥

स्वतंत्रता-भगवती जयानें । पूर्ण केलि वश भजुनि ।
खरोखर स्तुत्य० ॥ १ ॥

परपीडित निज भूजननीचें । जे करिती उद्धरण ।
खरोखर स्तुत्य० ॥ २ ॥

देशोन्नतिस्तव करुनि कदन जें । करिती रिपुमददमन ।
खरोखर स्तुत्य० ॥ ३ ॥

## ४१ पक्षिदूत.

चाल—( चंद्रकांत राजाची. )

एका सदनीं एक मोकळे उंच धवल सौध ।
जिथें रमे मोकळेपणाचा मोकळा प्रमोद ! ॥ १ ॥

त्या सौधाचा त्या मोदाचा परिसर श्रीमंत ।
मना मनोराज्यावर बसवी तेथील एकांत ! ॥ २ ॥

त्या सौधाच्या दाहि दिशांला प्रतिभा गगनाची ।
प्रेक्षकांस दाखवी मनोरम मौज भव्यतेची ! ॥ ३ ॥

त्या सौधावर अनंततेचा पसाराच सगळा ।
अनंत अंबर अनंत तारा अनंत ग्रहमाळा ॥ ४ ॥
अनंत छत नभिं नक्षत्राचें, चारु चमत्कार ।
परमेश्वर सोनाराला या जगत् जहागीर ॥ ५ ॥
अनंत आश्चर्याचा प्याला गांभिर्यें भरिला ।
घ्या नयनांनीं, प्या आत्म्यांनीं पार करा सगळा ! ॥ ६ ॥
त्या सौधाच्या पुढें भव्यसा आम्रवृक्ष डोले ।
डुलतां त्याचा शाखासमूह त्या सौधीं खेळे ॥ ७ ॥
त्या आम्राच्या स्कंधावरतीं विहग विहरतात ।
जणुं बापाच्या अंगावरतीं मुलें क्रीडतात ॥ ८ ॥
त्या आम्रावर डोल डोलवुन तुरे मस्तकींचे ।
फांदोफांदीं मोर नाचती आम्रमंजरीचे ॥ ९ ॥
त्या सौधावर करीं धरूनी एका मोराला ।
केविलवाणी परी देखणी उभी एक बाला ॥ १० ॥
बाला विमला विशाल भाला कोमला प्रियाला ।
सौधरूप पद्मांत शोभला ती पद्मा कमला ॥ ११ ॥
कुरवाळी निज आम्रवृक्ष तो कुरवाळी गगन ।
कुरवाळी भव्यता दिव्यता कुरवाळी पवन ॥ १२ ॥
येणारे जाणारे त्यापरि उडणारे नयन ।
कुरवाळीती आनंदाचें सदन तिचें वदन ॥ १३ ॥
मूर्तिमंत धारणाशक्ति ही कविची लडिवाळा ।
कवि हृदयांतुन धांवत आली सौध विहाराला ॥ १४ ॥

माळिण ही जणुं सौंदर्याचीं सुमें न्याहळीते ।
नयनांनीं तोडुनी मनाच्या परडिंत टाकीते ॥ १५ ॥
श्रृंगारादी नव सुरसांनीं रसाळ बनवीते ।
हांसाया बोलाया गाया त्यांना शिकवीते ॥ १६ ॥
प्रेमें भरिते प्रसाद सद्गुणी सुंदर गुंफीते ।
मधुर हार ते काव्यहार ते जनां समर्पीते ॥ १७ ॥
काव्यहार ते हांसुन बोलुन मनां रिझवितात ।
या बालेचे स्वरूप-सद्गुण तसे रमवितात ॥ १८ ॥
काव्यहार ते विनोद करुनी प्रमोद देतात ।
या बालेचे स्वरूप-सद्गुण तसे वाढतात ॥ १९ ॥
नयनसुंदरा वदनसुंदरा सुंदर देहाची ।
देशभक्त शाहीराची ही लावणि देशाची ॥ २० ॥
कपोलज्योत्स्ना ललाटज्योत्स्ना ज्योत्स्ना नयनांची ।
आननज्योत्स्ना हिंचा चमकते मराठमोळ्याचा ॥ २१ ॥
मराठ-मोळ्याचाच तनुचा घाटथाट साचा ।
मराठ-मोळ्याचाच कपाळीं तिलक कुंकुमाचा ॥ २२ ॥
हिरव्या साडीवरी शोभती रौप्यालंकार ।
हरित लतेवर जणूं बहरला धवल कुसुमभार ॥ २३ ॥
हृदयिं चंद्रहाराचा नाहीं चंद्रोदय फुलला ।
नयनिं बुद्धि सौदामिनिचा परि चमचमाट झाला ॥ २४ ॥
तनुवर नाहीं श्रीमंतीचा दिनमणि लखलखला ।
परी मुखावर सौंदर्याचा परमेश्वर रमला ॥ २५ ॥

वदन-चंद्रमा त्या बालेचा दिसे शांत शांत ।
नयन-चांदण्या परी भटकती उगाच गगनांत ॥ २६ ॥
दिव्य सौध तें तिचें राज्य तें ती त्याची राणी ।
राणी जवळी हज़र नाहिं पण दूत कसा कोणी ? ॥ २७ ॥
आला आला नील नभांतुन नील पक्षि आला ।
आम्रतरूवर बसला रमला दूत तिचा बनला ॥ २८ ॥
गुटुर्गुटुर्घू करून घुमला विनत तिला वदला ।
"आज्ञा कांहीं करा स्वामिनी दूत सज्ज ठेला" ॥ २९ ॥
पक्षि कशाचा ! काव्यकार तो दयावंत झाला ।
त्या बालेचें दुःख हराया विहग बनुन आला ॥ ३० ॥
पक्षिबोल ऐकुनी मनीषामोहर बहु फुलला ।
दुःखी आत्मा तिचा तोषला मुखावरी हंसला ॥ ३१ ॥
तिला वाटलें ईश आपुल्या दुःखें कळवळला ।
मनुजवाणिचा दयाविहंगम त्यानें पाठविला ॥ ३२ ॥
दुःखाच्या सासरहुन संता सुखमाहेराला ।
ने जो त्याला अशक्य कांहिं न दीनदयाळाला ॥ ३३ ॥
आनंदाच्या गहींवराच्या सद्गद कंठानें ।
पक्षीदूताप्रती बोलली ती उत्कंठेनें ॥ ३४ ॥
पक्षि दयाळा ! तूं झालासी जासुद जर माझा ।
तर गगनीच्या राजा माझ्या ऐक एक काजा ॥ ३५ ॥
निरोप घेउनि गगनीं उडुनी सुरु सुरु चातुरा ।
वलांडून डोंगरा पांखरा, जा मम माहेरा ॥ ३६ ॥

—२—

दुःख घेउनी सुख देती जे आह्मां अत्यंत ।
प्राण देउनी तसा आमुचा टाळिति प्राणांत ॥ १ ॥
भक्ति करा वा न करा तरि जे देव दयावंत ।
त्या आईबापाची मजला आली लई खंत ॥ २ ॥
सदानंद आह्माला द्याया ज्याला आनंद ।
आनंदें आनंदिं आमुच्या ज्याचा आनंद ॥ ३ ॥
आनंदाचे खेळे आह्मी ते जणुं झोपाळा ।
आनंदाचा खेळ चालला झुले सदा झोला ॥ ४ ॥
खेळण्यांत खिदळण्यांत सारा सारा आनंद ।
रडण्यामध्यें रुसण्यामध्यें देखिल आनंद ॥ ५ ॥
त्रिकाळ जेथें आनंदाचा मजा करी काळ ? ।
रडण्याला रुसण्याला तेथें कसा मिळे काळ ॥ ६ ॥
सकाळ संध्याकाळ जेथला हंसण्याचा काळ ।
रडण्याला रुसण्याला तेथें कसा मिळे काळ ? ॥ ७ ॥
तिथें रडावें त्या रडण्यानें, परि आनंदानें ।
तिथें रुसावें त्या रुसण्यानें, परि आनंदानें ॥ ८ ॥
आनंदाचा सुकाळ तेथें सदा सर्वकाळ ।
आनंदाचा काळ न तेथें असा न तो काळ ॥ ९ ॥
आनंदी आनंद असा तो जिथें मूर्तिमंत ।
त्या माझ्या माहेरचि मजला आली लई खंत ॥ १० ॥
डोळे ज्यांचे रक्षक माझे मजभवतीं फिरती ।
हात जयांचे पालक माझे मज प्रतिपाळीती ॥ ११ ॥

वाणी ज्यांचा आशीर्वादां देइ सर्वकाळ ।
शील जयांचें सुशील, माझें सुशील करि शील ॥ १२ ॥
ममता ज्यांची करी गुदगुल्या मन्मनास जेव्हां ।
लाड लाडका माझा हांसे लाडानें तेव्हां ॥ १३ ॥
राग जयांचा शिक्षक माझा मज शिकवी ज्ञान ।
मार जयांचा ईश्वर माझा करि मम कल्याण ॥ १४ ॥
ज्यांच्या आलिंगनें तोषतो माझा जीवात्मा ।
ज्यांच्या सुखचुंबनें भेटतो मजला परमात्मा ॥ १५ ॥
प्रवृत्ति ज्यांची सगळी साची सर्व-मंगलाची ।
लई सय झाली मज माझ्या त्या वडिल माणसांची ॥ १६ ॥
खेळाच्या गगनांतिल टोळी बंधु-पोपटांची ।
जमतीच्या तरुवरची गर्दी बहीण-मैनांची ॥ १७ ॥
नाचत हांसत मधुर बुलबुलत सदा रमायाची ।
लइ सय झाली मजला माझ्या भावंडाची ॥ १८ ॥
ज्यांचा माझा जिव्हाळ्याचा एकजीव भाव ।
अनेक देहांमध्यें वागतो जणूं एक जीव ॥ १९ ॥
रंगे अनेक चित्तिं आमुच्या एक प्रेमरंग ।
जणूं रंगला अनेक जीवीं श्रविर श्रीरंग ॥ २० ॥
ज्यांच्या माझ्या धिंगडशाची पदोपदीं मौज ।
त्या मैत्रिणिच्यासाठीं माझा झुरे जीव आज ॥ २१ ॥
शिवरायानें राज्य स्थापिलें देवाधर्माचें ।
स्थापन केलें आह्मी तैसें स्वराज्य खेळाचें ॥ २२ ॥

माझें घर तें पंढरपुर, ते खेळ विठ्ठलाचे ।
चालें कीर्तन भक्त-मुलींचे धांगडधिंग्याचें ॥ २३ ॥
खेळ खेळतां आह्मी गाड्यागाड्याभिंगोऱ्या ।
गुंगत्याच भिंगोऱ्या गमल्या पोरी फिरणाऱ्या ॥ २४ ॥
त्या भिंगोऱ्यां पोरी-संगें बनून भिंगोऱ्या ।
गरगर भिरभिर फिरूं लागल्या वस्तू त्या साऱ्या ॥ २५ ॥
खांत्र खांबुळ्या सगळ्या घरभर भरल्या आरोळ्या ।
झिम्याच्या टाळ्यांनीं झाल्या बधिर कानठाळ्या ॥ २६ ॥
फुगड्याच्या धिंगाण्याचा तो दणका अनिवार ।
फुगड्यासंगें उड्या घेउनी नाचे घरदार ॥ २७ ॥
घुनऱ्या पकऱ्याच्या घोषानें घुमे सर्व वाडा ।
घुमत्या नादामध्येंच नाचे फुगड्यांचा घोडा ॥ २८ ॥
लपंडाव तो आयामोया पाटीभर लाह्या ।
भागो भागो वाघाचा तो बच्चा सूट गया ॥ २९ ॥
आळा गोटा नीळा गोटा घ्या सागरगोटा ।
बिहिणिबाइच्या फगकाऱ्याचा टणकारा मोठा ॥ ३० ॥
कारसकाऱ्या कारे नाऱ्या खेळ असे नाना ।
पोरींच्या खेळांची मोठी परंपरा जाणा ॥ ३१ ॥
होतो क्रीडाजगदंबेचा जणुं जयजयकार ।
असा आमुच्या खेळामध्यें हास्याचा गजर ॥ ३२ ॥
मुखचंद्राच्या चंद्रज्योती मुलि नभिं उडवीती ।
हास्याच्या सौख्याचे त्यांतुनि भपकारे उठती ॥ ३३ ॥

मुखचंद्राची हास्यचंद्रिका मोदकारि भारी ।
गगनचंद्रिके परिस चंद्रिका हीच जनां प्यारी ॥ ३४ ॥
बालबालिका हिच्याचमध्यें रमती नरनारी ।
मुखचंद्राची हास्यचंद्रिका हृदय-हारि सारी ॥ ३५ ॥

हांसहांसुनी अमित हास्यनिधि आह्मी उधळीला ।
आह्मांपाशीं अथांग आत्मा हास्यसिंधु भरला ॥ ३६ ॥
हांसहांसुनी आत्म्यामधलें हांसू संपेना ।
सासरिं राहुन माहेरचि सय मुलिंची जाईना ॥ ३७ ॥

माहेरींच्या त्या हास्याची त्या धिंगाण्याची ।
मला आठवण झाली तधिंच्या तशि स्वातंत्र्याची ॥ ३८ ॥
निरोप घेउनि गगनीं उडुनी सुरु सुरु चातूरा ।
वलांडून डोंगरा पांखरा ! जा मम माहेरा ॥ ३९ ॥

—३—

लहान मी असतांची झालें मजला प्रेमाचें ।
गोरें गोजिरवाणें तान्हें बाळ बाहुलीचे ॥ १ ॥
सजीव आई मी बाळाची निर्जिव परि बाळ ।
सजीव निर्जिव यांचा मेळच जगताचा खेळ ॥ २ ॥
निर्जिव परि तें भारि चळवळें माझें लडिवाळ ।
निर्जिव तें जगताचें माझें सजीवची बाळ ॥ ३ ॥
खरोखरीचें बाळ परि तें लटूमटी रडलें ।
बालक रडलें आईचें मन मग व्याकुळ झालें ॥ ४ ॥

खऱ्या आइच्या नसेरु केव्हां कल्पनेंत आलें ।
असें दुःखं मज लट्टूमटीच्या आईला झालें ॥ ५ ॥
अश्रूवांचुन नादावांचुन बाळ रडे बाई ।
रडणें त्याचें ऐकूं माझ्या मौजेला येई ॥ ६ ॥
रडत्या त्या मीं छबूकड्याला हृदयाशीं धरिलें ।
हृदयाचा पाळणा डोलवुन असें डोलवीलें ॥ ७ ॥
लट्टूमटीचें पाणि तापवुन त्यास न्हाणियेलें ।
ह्मणून कां हो ! वांसरु माझें हंबरून उठलें ॥ ८ ॥
चिंध्याचें तें नवें अंगडें अंगीं चढवीलें ।
ह्मणून कां हो ! कोंकरुं माझें संतापुन खिजलें ॥ ९ ॥
मला हंसाया पक्षीदूता ! तुला हौस वाटे ।
" प्रेमावांचुन अश्रू नाहीं " बोल हें न खोटें ॥ १० ॥
उगा ! उगा ! तूं ! बाळपणीच्या बाळा ! स्वच्छंदा ! ।
उगा ! उगा ! बा ! लट्टूमटीच्या मम परमानंदा ! ॥ ११ ॥
ये रे ! ये रे ! वृंदावनिच्या धांवत गोवृंदा ! ।
गोड गोड तें दु दु देण्याला तान्ह्या गोविंदा ! ॥ १२ ॥
उगा ! बाळ ! हा घोंगडिवाला आला बागूल ! ।
बाळपणाच्या पलीकडे तुज पळवुन नेईल ॥ १३ ॥
बाळपणाच्या पुढील " पण " तें दिसें छान सारें ।
संसारें संतापें तुज परि बनविल म्हातारें ? ॥ १४ ॥
आयुष्याची उषा मजेची दुपार चिंतेची ।
सांज साचती देहास्ताची केवळ दुःखाची ॥ १५ ॥

तुझ्यासारखी होते तधिं मी किति होते शांत ।
ठाउक नव्हता बाळा ! असला मजला आक्रांत ॥ १६ ॥
उगें राहिना खरेखरीचें गाउनीहि गाणें ।
पदराखालीं घेउन मग मीं पाजियलें तान्हें ! ॥ १७ ॥
लटूमटीची दुग्धसुधा ती बालमुखीं पडली ।
बाळाची मग कळी उमलली हास्यपुष्प झाली ॥ १८ ॥
हास्यपुष्प तें पाहुन माझें वदन-पुष्प हंसलें ।
दोन्ही हास्यामधुनी हांसत प्रेम पुढें सरलें ॥ १९ ॥
हास्यपुष्प कां ? पुष्पहास्य तें ? प्रेम त्यांत गुप्त ।
प्रेमदेव तो प्रेमासाठीं झाला मग व्यक्त ॥ २० ॥
प्रेमसिंधु मी माता गमले पुत्र पूर्ण चंद्र ।
सिंधु उसळला चंद्र चुंबिला झाला आनंद ॥ २१ ॥
चुंबीतां मी त्या चंद्राला तो मजला चुंबी ।
आलिंगीतां मी बाळाला तें मज आलिंगी ॥ २२ ॥
शोभिवंत हें पांखरूं माझें भारी गुणवंत ।
त्याचा सद्गुण ग्रंथ लिहाया हवा एकदंत ॥ २३ ॥
शोभिवंत हा गुलाब माझा ध्या कुणि हातांत ।
कोमल गालीं गाल ठेवुनी खुलवा गालांत ॥ २४ ॥
खेळामधला तुटका मुटका लटका संसार ।
खरोखरीच्या संसाराहुन सुरम्य ठरणार ॥ २५ ॥
बाळपणींच्या संसारामधिं साठा प्रेमाचा ।
तरुणपणींच्या संसारामधिं श्रम तो क्षेमाचा ॥ २६ ॥

खेळामधल्या संसारासम केवळ सुखसार ।
शांतीसाठी संत वरीती धार्मिक संसार ॥ २७ ॥
खरी संसृति कष्टद, इष्टद तिचा खेळ गमतो ।
अस्सल खेदद नक्कल मोदद हा निर्णय दिसतो ॥ २८ ॥
क्षणोक्षणीं जन संसाराची बाळगी न पर्वा ।
नाटक त्याचें बघण्याचा परि सदानंद सर्वा ॥ २९ ॥
मनोवृत्ति त्या जिवा वाटती गुप्त द्वीप आग ।
काव्य तयांचें प्रसन्नतेची झोकदार बाग ॥ ३० ॥
खरोखरीचा प्रपंच मनुजां दुःखानें रडवी ।
काव्य तयाचें रडवी परि तें आनंदें रडवी ॥ ३१ ॥
खरोखरीचा प्रपंच समजा मधुरभास मदिरा ।
कविता त्याची सुधा सुंदरा अनंतरा मधुरा ॥ ३२ ॥
बाळपणींच्या खेळामधल्या स्मरून संसारा ।
त्या काव्यास्तव जीव घाबरा होउन पी वारा ॥ ३३ ॥
निरोप घेउनि गगनीं उडुनी सुरु सुरु चातूरा ।
वलांडून डोंगरा पांखरा, जा, मम माहेरा ॥ ६४ ॥

—४—

मजला झाला मुलगा त्यापरि त्याच मुहुर्ताला ।
रंगुभटाच्या मुलीस मुलगा झाला गंगूला ॥ १ ॥
बाळ मुलांचे आले भिक्षुक शांतीपाठाला ।
काय कमी मग लट्टूमटीच्या साखरपेढ्याला ॥ २ ॥

मुळें जन्मलीं उपवर झालीं त्वरीत लग्नाला ।
जन्मोत्सवमंडपींच त्यांचा लग्नोत्सव ठरला ॥ ३ ॥
चाले मुलिंच्या इच्छामात्रें खेळाची सृष्टि ।
इच्छामात्रें लटूमटीच्या खऱ्या होति गोष्टी ॥ ४ ॥
लटूमटीचा महामंत्र तो चित्तीं चिंतीतां ।
नसत्या वस्तू असत्या होउनि सरे सर्व चिंता ॥ ५ ॥
नसतें प्रेमही असतें झालें नवरानवरीचें ।
टिपणांवाचुन सहज टिपण तें बसलें दोघांचें ॥ ६ ॥
तीन सहाचें लग्न जाहलें छत्तिस गुण जुळले ।
या लग्नाला त्या लग्नाचे तेची गुण आले ॥ ७ ॥
लक्कड गण तो असे वराचा खापर गण वधुचा ।
वधु मातीच्या गोत्राची, वर तरुच्या गोत्राचा ॥ ८ ॥
जरी आमुची-वरमाईंची लग्नें नच झालीं ।
तरी आमुच्या मुलामुलींचीं लग्नें तीं ठरलीं ॥ ९ ॥
लग्नें ठरलीं अक्षत गेली विघ्ननाशनाला ।
विघ्ननाशना, लड्डुभंजना ! या हो ! लग्नाला ॥ १० ॥
लग्नें ठरलीं अक्षत गेली ग्रहांस देवांस ।
लग्नामध्यें देवप्रतिष्ठा, या हो ! लग्नास ॥ ११ ॥
रुसण्याफुगण्या वांचुन नाहीं लग्नाला शोभा ।
ह्मणून सादर व्हा करवलिंनों ! अशा समारंभा ॥ १२ ॥
आमंत्रण या शुभ लग्नाचें सतत आपणाला ।
भोजनगाजी याजी आजी भटजि भोजनाला ॥ १३ ॥
भिंगाचें बाशिंग बांधुनी रम्य कपाळाला ।
नवरदेव लग्नास निघाला उतावळा झाला ॥ १४ ॥

खेळामधला हत्ती सजला त्यावर अंबारी ।
अंबारींतुन स्वारि चालली परणाया नवरी ॥ १५ ॥
आंब्याच्या कोंवळ्या डाहळ्या छत्रचामरें तीं ।
मंगलकारक वैभवदायक वरावरी ढळिती ॥ १६ ॥
वरामागुनी मिरवे पोरी-नारींचा थाट ।
अपूर्व सुस्वर शुभ-वाद्यांचा पुढें कलकलाट ॥ १७ ॥
तू तू तू तू करुनि तुताऱ्या मुलें नादवीती ।
भोंआ भोंआ सूर काढुनी सूर गुंगवीती ॥ १८ ॥
मुखध्वनीचें शिंग गर्जलें धू धू धू ऐसें ।
कड कड कड कड वाजुं लागले पोटांचे तासे ॥ १९ ॥
झणाणले मग सुघोष झण् झण् झांजा टाळ्यांचे ।
थै थै थै थै नाचुं लागले घोडे काठ्यांचे ॥ २० ॥
कांहिं मुलें जाहलीं आमुचें सैन्य मराठ्यांचें ।
उडवुं लागलीं लटूमटीचे बार बंदुकांचे ॥ २१ ॥
चतुर्भुज चतुष्पाद चतुर्लोचन तें होण्याला ।
वाजत गाजत मिरवत नवरा नवरिकडे आला ॥ २२ ॥
नवरा इकडुन नवरी तिकडुन मंडपांत जुळली ।
धरिला अंतरपाट शांतता नितांतशी झाली ॥ २३ ॥
वाजंत्री असलेलीं पोरें भिक्षुक तीं बनलीं ।
मंगलाष्टकें ह्मणूं लागलीं उंच सुरीं सगळीं ॥ २४ ॥
हत्तीचें सिंहाचें तैसें गरुड वानराचें ।
अश्वाचें डुकराचें सुंदर चित्र तुंड ज्यांचें ॥ २५ ॥
तीन चार तशि पांच सहा तीं असति शिरें ज्याला ।
सकल देवहो ! या लग्नाचें सावधान बोला ॥ २६ ॥

काळ्या गोऱ्या निळ्या तांबड्या पिवळ्या देहाचे ।
चार दहा बारा त्यापरि ते अठरा हातांचे ॥ २७ ॥
अनेक लोचन अनेक शुभकर असतिं पदें ज्याला ।
सकल देव हो ! या लग्नाचें सावधान बोला ॥ २८ ॥

(अपूर्ण ... ४७८३

## ४२ जपान स्तवन.

( चाल—चलारे गणराया वंदा )

प्रणती तव चरणा । जपाना ।
स्वातंत्र्याच्या सूर्या करिशी आम्हावर करुणा । जपाना ॥ १ ॥
पसरुनि जय किरणा । जपाना ।
अज्ञानाची निद्रा अमुची हरिली सुखसदना । जपाना ॥ २ ॥
उदयें तव तपना । जपाना ।
निजोन्नत्तीचा मार्ग दिसाया लागे आशियांना । जपाना ॥ ३ ॥
पुढती करि गमना । जपाना ।
परवशतेचा तम साराया प्राचीच्या रमणा । जपाना ॥ ४ ॥
शौर्योष्णें तुझिया । जपाना ।
स्वातंत्र्यांकुर फुटले अमुच्या आशा-वल्लींना । जपाना ॥ ५ ॥
तेवीं ह्या तरुणा । जपाना ।
तव दर्शन तें घडतां चढलें स्फुरण श्रीमाना । जपाना ॥ ६ ॥
पाहुनि तव वदना । जपाना ।
द्वैत हिमानें, पळ काढियला येथुनि बलवाना । जपाना ॥ ७ ॥
जन खग गण सुगुणा । जपाना ।
स्वातंत्र्यश्री तव बघतां करि स्तवनान्वित गाना । जपाना ॥ ८ ॥

पाहि तवागमना । जपाना ।
भरतभूमिही घेउनि आरती ऐक्याची सुजना । जपाना ॥ ९ ॥
आह्मां सकलांना । जपाना ।
नाथा आतां तारक तूंची स्वतंत्र भगवाना । जपाना ॥ १०॥

## ४३ वाहवा ! साधुवृत्ती ! !

( **चाल**—वाहवा ! चटक चांदणी )

वाहवा ! साधुवृत्ति ती तुह्मां लाधली सुंदर आपोआप ।
देशावरचा हक्क उडाला सरला सारा व्याप ॥ धृ० ॥
पैका नेला सर्व परानें सरला सारा ताप ।
कोणि लुटीना चोर कुटीना नहीं किसीका धाक ॥ १ ॥
कटिं लंगोटा घ्या करिं चिमटा लावा अंगा राख ।
व्हा गोसावी घेउन झोळी बोला " सैत्ताराम " ॥ २ ॥
संसाराची पीडा गेली हवा कशाला त्रास ।
गृहधनदारा या लोकांना सोडा सारा व्याप ॥ ३ ॥
करा धरणिची सुंदर शय्या गगन पांघरा छान ।
थंडी वारा सोसा सारा मिळेल मुक्ति-धाम ॥ ४ ॥
शक्ती नाहीं अंगीं तुमच्या झालें नामी खास ।
पोटासाठीं शठांसि दंडुनि कोणिं करावें पाप ॥ ५ ॥
लोकांना तो स्वदेश सारा लुटुनि करुं द्या साफ ।
साधुपणा भंगेल, तयावरि करूं नका संताप ॥ ६ ॥

## ४४ स्वातंत्र्यलक्ष्मीस उद्देशून.

( चाल—अरसिक किति हा शेला )

स्वातंत्र्यलक्ष्मी यावें । निज संतानें ते शांत करावे ॥ धृ० ॥

दीनास स्वातंत्र्य द्यावें । मग निज नाथाशीं स्वस्थ रमावें ॥
हे बघ बालक चिमणे । बाहति तुजला या चुंबावें ॥
तरुणास हृदयीं धरावें । मृदु लल्नांचे अश्रु पुसावें ॥
श्रीभूदेवीस भावें । स्वातंत्र्याचें सौभाग्य द्यावें ॥
तुझिया दर्शन लोभें । पक्ष्यांनींही किति नाचावें ॥
मन्मन वेडे ग सरले । गिरिकंदरिं तुज शोधित धांवें ॥
धीर न प्राणा धरवे । परतेचे क्लेश किति सोसावे ॥
दे भेट भुवन विसावें । तळमळतो हा आत्मा पावे ॥
स्वांतर त्वन्मय बनलें । हृदय विदारुनि जननि बघावें ॥

## ४५ देवा ! तारि हिंदुस्थान.

( चाल—म्हातारा इतुका न )

पसरी कृपा-वितान । देवा तारी हिंदुस्थान ।
करुणा इतकी मान । देवा तारी हिंदुस्थान ॥ धृ० ॥
हृदयांतुन काढून आमुचे प्रियकर पंचप्राण ।
ह्या प्राणांचा प्राण घालुनी कर त्याला सप्राण । देवा ॥१॥
जीव आमुचे देशपदावर आह्मी केले दान ।
ह्या जीवांचा जीव देउनी दे ह्याला जिवदान । देवा ॥२॥

खुडून तोडुन आत्म्यामधलें सबल आमुचें ज्ञान ।
त्यानें ईशा कर मद्देशा ज्ञानवान बलवान । देवा ॥३॥
पारतंत्र्य सैतान ह्यामध्यें होवो तो अवदान ।
हृदयानल धगधगो आमुचा प्रलयानलासमान । देवा ॥४॥
अस्थि आमुच्या कापुनि करवुनि खरतर वज्र कृपाण ।
कृपाणघातें अधर्म छेदुनि साधी धर्मत्राण । देवा ॥५॥
सांगशील तूं स्वयें तरि करूं आह्मी कंठस्नान ।
ह्या स्नानानें स्वतंत्रतेला घालूं रुधिर स्नान । देवा ॥६॥
देह सोलुनि चर्मांबर हें देतों श्री भगवान ।
बनवी त्याचें मिरवी त्याचें समरीं समर निशाण । देवा ॥७॥
नेत्र आमुचे त्यापरि काढुन घेवो हिंदुस्थान ।
त्या नेत्रांनीं त्यास दिसावें चिरकालिक कल्याण । देवा ॥८॥
हंबरडा हंबरें आमुचा अनंत वेदनीं जाण ।
अनंत-नमना ! अनंत-श्रवणा ! दे इकडे अवधान । देवा ॥९॥
हृदय आमुचें रडे खरोखर मिथ्या नच हें मान ।
हे विश्वस्था ! भो हृदयस्था ! तव चरणाची आण । देवा ॥१०
मनीं आमुच्या सदा रमावें भूमातेचें ध्यान ।
गोविंदाच्या हृदयिं रडावें हेंच निरंतर गान । देवा ॥११

## ४६ डोळे उघडाना !

( चाल—माया जळली कां )

स्वस्थ बैसला ना ? सारी काळजि सरलीना ? ।
देशामध्यें कहर मातला खुशाल बघतांना ? ॥ धृ० ॥
धर्म भ्रष्टला ना ? तुमचा लोक बाटला ना ? ।
आईसारख्या गाई तुमच्या कसाब चिरिती ना ? ॥ १ ॥
धंदा बसला ना ? तुमचा पैका लुटला ना ? ।
सारा भारतीं गरीब कुणबी ठार बुडाला ना ? ॥ २ ॥
गुलाम झालां ना ? आपण हमाल बनलां ना ? ।
परवशतेचा खोडा पायीं पक्का जडला ना ? ॥ ३ ॥
शेती बसली ना ? हातीं झोळी पडली ना ? ।
अन्नावांचुनि मरण्याची ती पाळी आली ना ? ॥ ४ ॥
शक्ती नाहीं ना ? तुह्मां मानहि नाहीं ना ? ।
परक्यांच्या बुळग्यांनीं ? लाथा खुशाल खातां ना ; ॥ ५ ॥
हाशा पिकला ना ? तुमचा फज्जा झाला ना ? ।
घरांत अजुनी कज्जा करितां कज्जा नाहीं ना ? ॥ ६ ॥
झापा सोडाना ? जनहो ! डोळे उघडाना ! ।
वेळ अजुनि तो आहे झडकरि वैभव मिळवाना ! ॥ ७ ॥

## ४७ मुरली.

( चाल — तस्कर-हातीं )

अधरिं धर मुरली । मुरली धर गोविंदा । सेवुं दे तव गानानंदा ।
अधरिं धर मुरली । मुरली भगवंता । गाई स्नेहाऱ्या संगीता ॥धृ०॥

नादवी ताना । ताना श्रीरंगा । गुंगवी मंजु मनोरंगा ।
अरे दे हृदय । हृदय विकल-हृदया । अखिल हृदयांच्या हृदया ।
विकल बहु झाली । झाली प्रीतिविना। मदिय करुणा, करुणारमणा ।
फोडिले कोणी । कोणी हंबरडे । प्रीतिचा तान्हा विरह रडे ।
त्यजुनि या बाळा । बाळा मोहवनीं । कुठें हो जाय प्रीति-जननी ।
त्रासली माझी । माझि मनोगंगा । कामनांचा नाचुन पिंगा ।
खेळतां घाली । घालि कर्मफेऱ्या । वृत्तिच्या भ्रममय भिंगोऱ्या ।
प्रभो ! तुज कळतें । कळतें कळवळणें । दीनहृदयाचें गहिंवरणें ।
प्रभो ! तुज कळतें । कळतें पूर्णपणें । जीवविहगाचें चिवचिवणें ।
प्रभो ! तुज कळतें । कळतें निशब्द । स्फुंदणें श्रद्धेचें मुग्ध ।
प्रभो ! तुज कळतें । कळतें नत-दैन्य । करुण हृदयाचें कारुण्य ।
प्रेम सुख स्मरण । स्मरण खंत करिते । जाणणें माझें तळमळतें ।
हृदिं कसें होतें । होतें मज नुमजें । वत्सला तुज सर्व समजे ।
हंबरे कोण ? । कोण हृदयिं माझ्या । अधरिं धर मुरलि महाराजा ।

× × × ×

प्रीतिची भिक्षा । भिक्षा मागाया । हिंडलों जगांजवळ वायां ।
मला जग कळलें । कळलें तें स्वार्थी । भिकारी मजसम प्रेमार्थी ।

म्हणुन तुज शरण । शरण मायबापा । विश्व-प्रियकरा प्रेमरूपा ।
कंठिं धरिलें तूं । तूं अपरंपार । नतांच्या दुःखाचे हार ।
शिरीं वरिलें तूं । तूं अघटित विकट । जगाच्या पापांचे किरिट ।
असा तूं सदय । सदया मज तार । भडकला मन्मानस कहर ।
तुजविणें कवण । कवण मला आतां । अनंता प्रसन्नता देता

× × × ×

गान गाण्याचें । गाण्याचें स्थान । मन्मनःश्रीचें कुंजवन ।
सदिच्छा-वेली । वेलि हंसत सुटल्या । गुदगुल्या त्यास जणुं झाल्या ।
वेलिवर शोभा । शोभा उपरतिच्या । शोभल्या विरक्तिराजीच्या ।
राजिच्या स्कंधीं । स्कंधि भक्तीच्या । कळ्या उमलल्या भावनांच्या ।
कळ्यांतुन फुलल्या । फुलल्या प्रीतीच्या । हांसऱ्या लक्ष्मिवसंताच्या ।
लक्ष्मिकर-कमलीं । कमलिं लालसांचा । भ्रमे गुंजारव भृंगांचा ।
लक्ष्मिच्या पुढतीं । पुढति वासनांचा । नाचतो नाच मयूरांचा ।
लक्ष्मिला प्रार्थी । प्रार्थी करुणेचा । प्रेमभर कोकिळ-गानाचा ।
लक्ष्मिवर छत्र । छत्र चंद्रिकेचें । धराया तारा-मोत्यांचें ।
चंद्र ये उदया । उदया पुण्याचा । हिमालय हांसे हास्याचा ।
धबधबा पडतो । पडतो मौजेचा । नभांतुन जणुं नभगंगेचा ।
धबधबा चंद्र । चंद्रकांति फेन । तारका-तुषार श्रीमान ।
चमकते रजनी । रजनि भालचंद्रा । सुंदरा लोभवि चंद्रेंद्रा ।
वनावर वाहे । वाहे धवलांगा । मनोरम ज्योत्स्नेची गंगा ।
वनांतुन धांवे । धांवे भवभंगा । ज्ञानकालिंदी जगदंबा ।
क्रोध फूत्कार । फुत्कारुन थकला । काम कालिया क्लांत झाला ।
कामना गोपी । गोपि सकल जमल्या । वृत्तिचा गोफ विणुन दमल्या।

प्रभूशीं गोपी । गोपीगण हंसला । प्रभू त्या हंसण्याला भुलला ।
प्रभुवर गोपी । गोपीगण रुसला । प्रभू त्या रुसण्याला भुलला ।
प्रभूस्तव गोपी । गोपीगण रडला । प्रभू त्या रडण्याला भुलला ।

× × × ×

लाजवित चंद्र । चंद्र लोचनांचे । हांसवित गुलाब गालांचे ।
नाचवित स्मरण । स्मरण चुंबनांचें । खेळवित कटाक्ष मदनाचे ।
पातळी माझी । माझी उत्कंठा । तुझी चंद्रावळ वैकुंठा ।

× × × ×

दुजी ही कवण । कवण श्री आली । वनश्री यत्श्रीनें खुळली ।
प्रभा गमली ही । ही सुंदर साची ! सकल सुंदरिच्या हास्याची ।
महन्मधुरा ही । ही लीला त्यांची । सकल ललनांच्या नयनांची ।
नादविलि कविनें । कविनें ही जाणा । रमणिंच्या शद्बांची वीणा ।
कसा शोभे हा । हा यद्धास्याचा । आरसेमहाल मदनाचा ।
कसा शोभे हा । हा सौंदर्याचा । महोत्सव यत्तारुणाचा ।
हिच्या तनुच्या या । या कुंजावरतीं । सुखालिंगन वेली झुलती ।
वेलिवर गाल । गाल हिचे हंसरे । बहरले गुलाब प्रेमभरें ।
प्रेमरस प्याया । प्याया गालांचे । भृंग उडतात चुंबनांचे ।
हिचे हे गाल । गाल हांसतात । फुलें काव्यांचीं फुलतात ।
निरर्गल हास्य । हास्य हिचें उठलें । जगाच्या गालावर नटलें ।
हिच्या हास्याचें । हसूं तदा झालें । जगत् यद्धास्याला हंसलें ।
कारिति यन्नयन । नयन प्रेमचाळे । अनिर्वचनीय मौज उधळे ।
हिचे हे नयन । नयन नटत फिरती । जगाच्या नयना गुंगविती ।
जगाचे नयन । नयन उडत येती । हिच्या नजर वरती झुलती ।

जगाचे नयन । नयन हेच दीप । केलि दीपांचा महिराप ।
तींत यन्मूर्ति । मूर्ती भूषविली । आरती कीर्तिची केली ।
हरीचा अधर । अधर मधुर मेवा । हिनें नैवेद्याला द्यावा ।
हिला कविराया । राया ! दिलप्यार । अर्पि तव कवितांचे हार ।
हिला तूं रसिका । रसिका शृंगार । चढव चल काव्यालंकार ।
हिची करितील । करितिल मग अर्चा । पंडितांच्या चर्चा ।
हिची ही मूर्त । मूर्त किती कांत । असे कां ? असाच श्रीकांत ।
हिचें हें ध्यान । ध्यान कसें शांत । दिसे कां ? असाच भगवंत ।
देई यद्धास्य । हास्य सदानंद । हंसे कां ? असाच गोविंद ।
हिनें हें सकल । सकल सरल विमल । चोरिलें सकला ! तव सकल ।
भक्त हृच्चोरा । चोरा ! निःशेष । हिनें हरिला त्वत्संतोष ।
चोरिलें खचित । खचित हिनें तूतें । त्वदंतर केलें स्वांतर तें ।
अशी ही कवण ? । कवण सबल बाला । जिंकिलें तुला आजिंक्याला ।
सकलात्मन् देवा ! । देवा वनमाले ! । हिला तूं कसें न ओळखिलें ।
अरे ही राधा । राधा गोविंदा ! । तुझी राधा ती मच्छ्रद्धा ।

× × × ×

वदत तुज शांति । शांति दया धेनू । नांदवी नाद नटी वेणू ।
नादल्या तारा । तारा भृंगाच्या । गुंगल्या उडल्या वीणेच्या ।
नादल्या वीणा । वीणा मंजुरवा । छेड तव पावा गंधर्वा ।

× × × ×

घेउनी झोके । झोके पवनांत । वनश्री खेळे गगनांत ।
पर्णपंखांनीं । पंखांनीं उडते । जणूं हीं स्वर्गाला भिडते ।
स्वर्गिचे तारे । तारे नभिं खुडिते । तयांचे अलंकार लेते ।

वनश्री साजे। साजे ताऱ्यांत। नव्हे ताऱ्यांच्या तोऱ्यांत।
चंद्रिका चंद्र। चंद्र खिदळतात। भव्य गगनाच्या वाड्यांत।
गगनिं या हलती। हलती हौसेचे। मेघ झोपाळे सोन्याचे।
चंद्र त्यावर तो। तो बसतो हंसतो। वायु त्याला झोके देतो।
नव्हे हा चंद्र। चंद्ररूप विमलें। मला सुख देवाचें गमलें।
चंद्र-मुख खालीं। खालीं वाकवुन। हंसे प्रभु जगास पाहुन।
थांब चांदोबा। चांदोबा बाप्पा। हरीचा घेउन जा पापा।
थांब चांदोबा। चांदोबा देवा !। हरीचा ऐकुन जा पावा।
असें कां ? स्वर्गी। स्वर्गी स्वर्गराज। हरीच्या प्रेमाची मौज।
धन्य हा सुषमा। सुषमा अभिरामा। अनुपमा ही जनमनोरमा।
सुंदरी सृष्टि। सृष्टि नटे रुचिरा। सुंदरा ! तूं नट बन्सिधरा।

× × × ×

किरिट निज शीर्षी। शीर्षी चढवीव। तुझी मग मुरली वाजीव।
कुंडल श्रवणीं। श्रवणीं डोलीव। तुझी मग मुरली वाजीव।
स्मिताला वदनीं। वदनीं राजीव। तुझी मग मुरली वाजीव।
प्रीतिला नयनीं। नयनीं साजीव। तुझी मग मुरली वाजीव।
हृदयिं वनमाला। माळा शोभीव। तुझी मग मुरली वाजीव।
राधिका जवळी। जवळी लाजीव। तुझी मग मुरली वाजीव।
रम्य तूं देवा। देवा तव पावा। रम्य कुंजांतिल देखावा।
दर्शनास्तव हें। हें भगवच्चित्र। चितारा चित्त चवकटींत।
चित्तगत विभु तो। तो तन्मयतेनें। स्तवूं या सोहं-स्तोत्रानें।
होउं या कृष्ण। कृष्णरूपिं रमत। गाउं या अहंब्रह्मगीत।

× × × ×

रुचे मज देवा ! । देवा ! प्रेमपर । तुझा आनंद निर्विकार ।
रुचे मज देवा ! । देवा ! क्लेशहर । तुझें सौंदर्य निराकार ।
रुचे मज देवा ! । देवा ! शांतकर । तुझें गांभीर्य निर्विचार ।
रुचे मज देवा ! । देवा ! हृन्मधुर । तुझें दिव्यत्व ओज रुचिर ।
रुचे मज देवा ! । देवा तूं सगळा । तुझा इतिहास मला कळला ।
झेलितां नयनीं । नयनीं त्वध्यान । होइ निर्भान मनोभान ।
झेलितां भालीं । भालीं त्वच्चरण । भावना येती गहिंवरुन ।
झेलितां वदनीं । वदनीं त्वत्स्तवन । विकारां मिळे समाधान ।
झेलितां श्रवणीं । श्रवणीं त्वद्गान । वासनांचें लागे ध्यान ।
झेलितां हृदयीं । हृदयीं त्वत्प्रेम । कामना होती निष्काम ।
सहज साधे तो । तो प्राणायाम । शांत होतो आत्माराम ।
जल्पना मिटुनी । मिटुनी मायेची । कल्पना कळे समाधीची ।
गळूनी जाई । जाइ अहंभाव । जीव तो होइ देवदेव ।

× × × ×

देवदेवा ! मी । मी देउळ तुमचें । बांधिलें करुणा-काव्याचें ।
त्यावरी चित्रें । चित्रें दुःखाचीं । कोरिलीं रडल्या हृदयाचीं ।
त्यामध्यें विरह । विरह बुदबुदांचें । लाविलें झुंबर अश्रूंचें ।
बांधिलें मग हे । हे मुखमखराचे । आरसे आत्मपुण्यतेचे ।
नादती घंटा । घंटा नादाच्या । तूझ्या भजनाच्या छंदाच्या ।
चढविला कळस । कळस सुवर्णाचा । अलौकिक विषय-विरागाचा ।
पाहिजे आतां । आतां ध्वज साचा । उभारा भक्तीभावाचा ।
वदनिं फूत्कार । फूत्कारित सतत । कामना-फणा डोलवीत ।

देवळा आंत । आंत हृदय राजा । खेळतो मनोनाग माझा ।
धरुनि सद्रूप । रूप देवराज । आज या नागसनिं राज ।
वाजवित मुरली । मुरली मौजेंत । बस मग नागप्रभावळिंत ।
नाहिंतर गात । गात हृषीकेशी । नाच या नागाच्या शीर्षी ।
नृत्य-गीतानें । गीतानें थकवा । तुला येइल देवा ! तेव्हां ।
शेषमंचाकिं या । या केवळ होई । योगानिद्रेंत शेषशाई ।

× × × ×

येउद्यां स्वारी । स्वारी प्रभु ! तुमची । सिद्धता झालि स्वागताची ।
गुंफिला मधुर । मधुर मजेदार । प्राणवल्लभा ! प्राणहार ।
गुंफिला शीर्ष । शीर्ष-शोभनाचा । तुरा जीवीत-मौक्तिकांचा ।
गुंफिला किरिट । किरिट तसा साचा । मदीयायुष्य-पिसाऱ्याचा ।
तुझ्यावर करण्या । करण्याला वृष्टी । फुलविली अभिनंदनसृष्टि ।
कार्यशुभ केलें । केलें कवितेनें । लाडक्या मम काव्यश्रीनें ।
सिंचिलें शुद्ध । शुद्ध नवरसांचे । सडे मोदद प्रसादाचे ।
घेउनी प्रणय । प्रणय-रंगशाली । रंगवल्या सुरंगवल्ली ।
कमानी रचिल्या । रचिल्या सूक्तांच्या । पूतपुण्याहवाचनाच्या ।
लाविल्या कदली । कदलिस नच तोटा । कवीचा कल्पतिबाग मोठा ।
सज्ज हा केला । केला प्रभुराया मनोरथ-रथ तुज मिरवाया ।
अनाहत नाद । नाद हाँच तूर्यें । नादतिल संतत माधुर्यें ।
नाचतिल छंदें । छंदें तुझ्यापुढें । माझिया दैवाचे घोडे ।
उताविळ इच्छा । इच्छा मम भारी । उभ्या औक्षणां नेत्रद्वारीं ।

उताविळ दृष्टि । दृष्टी मम फार । उभ्या दर्शना हरोहार ।
स्तुतीनों ! या ग । या ग कां ग उशिर । करा प्रभुचा जयजयकार ।
शारदा माझी । माझी तर सुगुण । गातसे कधिंपासुन गान ।
उठा ! व्हा सिद्ध । सिद्ध नमस्कार । द्यावया प्रभुला सत्कार ।
विचारीं गर्क । गर्क किती तर्क । कराया हरिला मधुपर्क ।
सलामी द्याया । द्याया तुज भूपा । आमुच्याजवळ नाहीं तोफा ।
झडाया मुजरे । मुजऱ्यांची फैर । आमुच्या जवळ न दळभार ।
प्रभू रे आह्मीं । आह्मी परतंत्र । कशाचें नाहिं स्वातंत्र्य ।
शक्य ती केली । केलि रोशनाई । देवराया ! लवकर येई ।
शक्य ती केली । केलि आरास । ग्रहण या करी स्वागतास ।
लागली आस । आस तुझी भारी । पाहिजे प्यास तुझी प्यारी ।
पसरिलें भाल । भाल विभो ! तुझिया । विश्वमूर्तीला वंदाया ।
पसरिले बाहू । बाहु विभो ! तुझिया । विश्वहृदयाला कवळाया ।
पसरिले नेत्र । नेत्र विभो ! तुझिया विश्वरूपाशीं क्रीडाया ।
पसरिले कर्ण । कर्ण विभो ! तुझिया । विश्वनादांत रंजवाया ।
पसरिला देह । देह विभो ! तुझिया । विश्वदेहास पांघराया ।
पसरिलें हृदय । हृदय विभो ! तुझिया । विश्वमोदाला झेलाया ।
असे हा प्राण । प्राण चरणशरण । विश्वतारणा ! तार तूर्ण ।
भाकि हा जीव । जीव तुझी कींव । विश्वपालना ! पाव पाव ।
करी हा आत्मा । आत्मा तव धांवा । विश्वलालना ! अंकिं घ्यावा ।
रडे हें मूल । मूल धाइ धाई । विश्वमाउली ! कडे घेई ।

हंबरे वत्स । वत्स तुझा तान्हा । विश्व-धेनुके ! सोड पान्हा ।
जाळि भवताप । ताप पिळा तव या । विश्व-पक्षिणी ! करी छाया ।
सुखासुख यांच्या । यांच्या कुंजांत । देहमिष बागबगीच्यांत ।
मुळीं हा नसतां । नसतां सुमवृक्ष । जीवरूपें मग प्रत्यक्ष ।
कसा देवा ! मी । देवा ! मी ! फुललों ?। विकसित कशांतून झालों?।
ज्ञाननिधिंतुन त्या। त्या उमलत आलों ?। कीं कुसुम प्रीतीचें बनलों? ।
कालगतिंतुन वा । वा बहरत गेलों ? । कीं प्रगट प्राणांतुन झालों ? ।
चंद्रवत् तिमिरीं। तिमिरिं काय खुललों?। कीं नभीं भास्करसा फुललों?।
महेश्वर नामें । नामें तरु एक । वदति आहे या हृदयांत ।
त्याच तरुवर मी । मी संभवलों कां ? । जीवरूपानें फुललों कां ? ।
जीवरूपानें । रूपानें फुलत । फुलत आलों कां मनुजांत ? ।
फुलें मम फूल । फूल स्वयंचारें ? । विकारें ? किंवा सुविचारें ? ।
फुलें मम फूल । फूल स्वच्छंदें ? । कीं स्वयंछंदा ! त्वच्छंदें ? ।
फुलें मम फूल । फूल निजानंदें ? । कीं सदानंदा ! त्वन्नंदें ? ।
काळ्या त्या याच्या । याच्या ज्ञानाच्या । पाकळ्या जणुं विज्ञानाच्या ।
संपलें फुलणें ? । फुलण तें याचें । कीं अजुन असें फुलायाचें ? ।
किती हें फूल । फूल फुलायाचें ? । चंद्र कीं सूर्य व्हावयाचें ? ।
किती हें फूल ? । फूल फुलायाचें ? । गगन कीं भुवन व्हावयाचें ? ।
किती हें फूल ? । फल फुलायाचें ? । प्राण कीं ज्ञान व्हावयाचें ? ।
किती हें फूल ?। फूल फुलायाचें ?। प्रेम कीं ब्रह्म व्हावयाचें ? ।
मोगरा मम हा । हा फुलवुन सारा । सजविशी कवणाचा तोरा ? ।
मोगरा मम हा । हा आणुन बहरा । गुंफिसी श्रीस काय गजरा ? ।

मोगऱ्याचा हा । हा झेलुन झला । मांडिली काय पुष्प-लीला ? ।
कळेना कां तूं । तूं मज फुलवीतो ? । कां विविध रूपें नटवीतो ? ।
कळेना कांहीं । कांहीं मज तत्र ही । ईश्वरी जादुगिरी पाही ।
तुझी हा जादु । जादु सहज होतो । शीण पण मला बहू येतो ।
बहू शिणलों मी । मी फुलतां फुलतां । जन्मि या जीवा रक्षीतां ।
बहू श्रमलों मी । मी श्रीला भजतां । भुकेचें पूजन तें करितां ।
बहू दमलों मी । मी स्त्रीला स्मरतां । सुखाच्या मागुनी पळतां ।
शांतता व्हावी । व्हावी भगवंता ! । तुझ्यासम केवळ या श्रांता ।
शांतिचा शोध । शोध करित करित । हिंडलों साऱ्या हृदयांत ।
वाटला मजला । मजला जणुं समजा । सूक्ष्मतर विचार तो माझा ।
तोच दरवाजा । दरवाजा साचा । लोकहृदयांच्या वाड्याचा ।
त्यांतुनी आंत । आंतमधें गेलों । शांतिचा शोध करित फिरलों ।
शोधल्या खोल्या । खोल्या शांतीच्या । सर्व माझ्या विश्रांतीच्या ।
कशाची शांति ? । शांती विश्रांति । शांततेची केवळ भ्रांति !
कशाची शांति । शांतेच्या स्वांतीं । नाचती संतत संक्रांती ।
कशाची शांति । शांतेच्या पोटीं । जन्मल्या तृष्णा शतकोटी ।
सिंधु स्मरणाचा । स्मरणाचा मोठा । अमित ह्या तृष्णांच्या लाटा ।
जगामधिं वस्तु । वस्तु असति जितक्या । जिवाच्या तृष्णा त्या तितुक्या ।
जन्मल्या तृष्णा । तृष्णा ह्या कैशा । यदुत्तर कथिल मम निराशा ! ।
जन्मल्या तृष्णा । तृष्णा केव्हां ह्या । प्रश्न हा सोडवील माया ! ।
जन्मल्या तृष्णा । तृष्णा ह्या काय ! । नव्हे, जन्मली हाय ! हाय ! ।
जन्मल्या तृष्णा । तृष्णा कां खास ! । नव्हे, जन्मला स्वयं त्रास ! ।

पावल्या तृष्णा । तृष्णा कां जनन ! । नव्हे, जंन्मलें जन्ममरण ! ।
खरोखर ! तृष्णा । तृष्णा ह्या नसती । भासती भूतांच्या मूर्ती ! ।
लोक-हृदयाचा । हृदयाचा वाडा । ह्याच भूतांचा आखाडा ! ।
दडति भूतें हीं । हीं अंधारांत । मनाच्या खोल तळघरांत ! ।
जगांतिल वस्तु । वस्तू लोभानें । बळें भक्षील्या जीवानें ! ।
ह्मणुन वस्तु त्या । त्या भूतें बनल्या । जिवांच्या बोकांडीं बसल्या ।
भूतगण घुमतो । घुमतो जीवांत । अकस्मात् येतो अंगांत ! ।
भूतगण नाचे । नाचे प्रमदांत । क्रोध-दिवट्यांच्या ज्वालांत ! ।
भूतगण बहु हा । हा दंडम द्वाड । लोभमुख प्रचंड खादाड ।
धांवतो खाया । खाया भूगोल । अहंकाराचा वेताळ ।
पाहतो ध्याया । ध्याया सोत्कंठ । जगाच्या नरडीचा घोट ।
जादु भूतांनीं । भूतांनीं केला । जीव सारा वेडा झाला ।
भूतबाधा ही । ही जडली फार । लोक करिती वेडेचार ।
लक्ष्मिला दासी । दासी करुं सजती । विष्णु आपण होऊं बघती ।
युवतिंना गोपी । गोपीसम गणितीं । कृष्ण आपण होऊं बघती ।
कीर्तिचा स्वर्ग । स्वर्ग घेउं झटती । इंद्र आपण होऊं बघती ।
तृप्तिची गंगा । गंगा धरुं वदती । शंभु आपण होऊं बघती ।
अरे वेड्यांनों ! । वेड्यांनों थांबा । भ्रष्टवूं नका नीति-अंबा ।
दशेंद्रिय-गण तो । तो दशमुख तुमचा ।छळ करी दया-जानकीचा ।
नका रे चिरडूं । चिरडूं धर्माचा । लोककालक्रम प्रेमाचा ।
नका रे दवडूं । दवडूं हृदयींचा । पुण्य परमेश संयमाचा ।
पुरें गायन हें । हें आकांताचें । भवाच्या जाचाकाचाचें ।

पुरें गायन हें । हें संसाराचें । सुखाच्या भासाचें साचें ।
पुरें गायन हें । हें यां तृष्णांचें । नव्हे, तृष्णांच्या शौर्याचें ! ।
गुंफिला कुणि हा । हा या तृष्णांचा । हार विंचांच्या दंशांचा ! ।
ठरविला कुणि हा । हा हृत्सोल्याचा । हार अग्नीच्या चटक्यांचा ! ।
अर्पिला कुणि हा । हा जीवा साचा । हार मरणाच्या धसक्याचा ! ।
कशाचि शांति ! । शांतेची भ्रांती । जगामधिं नाहीं विश्रांति ! ।
विकल करि मजला । मजला सुंदरता । पाहि माम् आतां भगवंता ! ।
विकल करि मजला । मजला मम ममता । त्राहि माम् देवा श्रीकांता ! ।
जाळ मदनाचा । मदनाचा कंद । प्रपन्नम् प्रसीद गोविंद ! ।
धुंडिले सकल । सकल छंदफंद । नाढळे कोठें स्वानंद ! ।
धुंडिले सकल । सकल वेदमंत्र । नाढळे कोठें स्वातंत्र्य ! ।
कुणी तरी दावा । दावा मज आतां । कुठें हारवली मम समता ! ।
सारुनी दूर । दूर अंतराला । भेटवा मज निरंतराला ! ।
धांवगे धांव । धांव आत्म कांते । पाव गे पात्र मला शांते ! ।
अरे आनंदा । आनंदा थांब । पळुं नको असा लांब लांब ! ।
मज-मधीं येशीं । येशिं सौख्य देशीं । जिवाला मधुर मधुर करिशीं ! ।
जिवावर झुलशीं । झुलशीं तोंच उडशीं । उडवुनी नेशि मन्मनाशीं ! ।
उडे मन माझें । माझें तव संगें । जीव हा झुरे तुझ्या रंगे ! ।
सख्या आनंदा । आनंदा पावें । तुझें सायुज्य मला द्यावें ! ।
सख्या आनंदा ! । आनंदा साच । प्रिय मन्मुरलीधर तूंच ! ।
मोदमय मधुरा ! । मधुरा मुरलिधरा । सुस्वरा मुरली अधरीं धरा ! ।
घेउनी मुरली । मुरली प्रतिभेची । नादमय मझ्या कवितेची ! ।

उर्मी त्वन्मूर्त । मूर्त मन्मनांत । सच्चिद्रानंदमया शांत ! ।
करो ती गान । गानप्रारंभा । भक्तजन-प्रेमपरा अंबा ! ।
लेकरें जींव । जीव तिचीं अमित । स्फुंदतीं देह पाळण्यांत ।
जगज्जननी ही । ही सुखवो त्यांतें । गाउनी अंगाई गीतें ।
प्रभू हा गातो । गातो दिलरंगीं । गुंगवी भृंगा सारंगीं ।
प्रभू हा घेतो । घेतो निजपावा । पारव्या मृदंग घुमवावा ।
मोर समछंदें । छंदें नाचावा । गायनीं भुजंग डोलावा ।
हरीचें गान । गान ऐक हरणें । पुरे, पक्षांनो किलबिलणें ।
जीवगण जमला । जमला गानाला । महोत्सव थाटाचा बनला ।
खुलवितां ध्यान । ध्यान माधवानें । फुलविलें रान वसंतानें ।
गुंफिलें कुंज । कुंज वल्लरींनीं । घातले मंडप वृक्षांनीं ।
हलविले पंखे । पंखे वायूंनीं । उधळिले सुगंध सुमनांनीं ।
उल्हसित ऐशा । ऐशा या काली । दिवाळी ताऱ्यांनीं केली ।
दिवाळीमध्यें । मध्यें आनंद । चंद्रज्योती उडवी चंद्र ।
चंद्रिकेमध्यें । मध्यें गोविंद । गान गातसे प्रेमधुंद ।
प्रभो ! तव मुरली । मुरली सरस्वती । सरस्वति गावो सुस्वर ती ।
रमणि ती आह्मां । आह्मां मोहुनी । रंजवू रंमवू गाऊनी ।

## ४८ सुंदर मी होणार ! ! *

( चाल:—कोठें काळा काळा राम. )

सुंदर मी होणार । आतां सुंदर मी होणार ।
सुंदर मी होणार । हो । मरणानें जगणार ॥ आतां ॥ धृ० ॥
वर्षत्रय मम देह मरतसे, तो आतां मरणार । हो ।
वर्षत्रय मम प्राण जातसे तो आतां जाणार । हो । सुंदर ॥ १ ॥
प्राशुनी माझ्या रुधिरा हंसतो,तो व्याधी रडणार । हो ।
व्याधिक्लेशें रडतो तो मम, जीवात्मा हंसणार । हो । सुंदर ॥२॥
हृद्रोगाच्या ज्वाला विझुनी सुख माझें निवणार । हो ।
माझा मृत्यू माझा सारा अश्रुपूर गिळणार । हो । सुंदर ॥ ३॥
कटंक पंजर-तनु पांडेचा, पिचूनियां फुटणार । हो ।
बंदिवान मम आत्मा चातक सुखैनेव सुटणार । हो । सुंदर ॥४॥
जुनीं इंद्रियें जुना पिसारा, सर्व सर्व झडणार । हो ।
नव्या तनूचे नव्या शक्तिचे, पंख मला फुटणार । हो । सुंदर ॥५॥
त्या पंखांनीं कर्तृत्वाच्या व्योमीं मी घुसणार । हो ।
देशहिताच्या पवनसागरीं, पोहाया सजणार । हो । सुंदर ॥६॥
प्रतिभा प्रसन्न तव बुद्धीची, चंचु मला येणार । हो ।
चंचुरूप मुरलीनें प्रभुचें, काव्य गान गाणार । हो । सुंदर ॥७॥
मम हृदयांतरीं ज्ञानफुलांचा फुलबागिचा फुलणार । हो ।
फुलांत झुलुनी आत्मदेव मम, नवानंद लुटणार । हो । सुंदर ॥८॥
नवें ओज मज नवें तेज मज, सर्व नवें मिळणार । हो ।
जीर्ण जुन्यास्तव कोण अवास्तव, सुज्ञ झुरत बसणार। हो। सुंदर ।

---

* मृत्यूपूर्वी पंधरा दिवस केलेली कविता.

गहनो-गहनीं भुवनो-भुवनीं, शोधित मी फिरणार । हो ।
भूमातेला हुडकुन काढुन तद्दर्शन घेणार । हो । सुंदर ॥१०॥
माझि भरारी विमान उडते, भरकन् तिज देणार । हो ।
परवशतेचें जाल तोडुनी, उडवुनि तिज नेणार । हो । सुंदर ॥११॥
उडत उडत मग रडत रडत मग, प्रभुपाशीं जाणार । हो ।
'स्वतंत्र तिजला करा' म्हणूनी तच्चरणीं पडणार । हो । सुंदर ॥१२॥
व्यंग देह हा यानें कामुक, काम कसें पुरणार । हो ।
पुरलें नच तें पुढतीं पुरवुन आणणार शतवार । हो । सुंदर ॥१३॥
या जन्मीं नच मोद लाभला खेद मात्र अनिवार । हो ।
प्रीति अतृप्ता तृप्ति अशांता जन्म मला देणार । हो । सुंदर ॥१४॥
मृत्यू म्हणजे वसंत माझा, मजवरतीं खुलणार । हो ।
सौंदर्याचा ब्रह्मा तो मज, सौंदर्यें घडणार । हो । सुंदर ॥१५॥
तळमळ हरुनी कळकळ देई, मृत्यु असा दातार । हो ।
कळकळ भक्षुनि जळफळ वितरी, रोग असा अनुदार । हो । सुंदर ॥१६॥
प्रेम हांसतें हास्य नाचतें, मृत्यूचा परिवार । हो ।
शोक क्रंदतें, भय स्फुंदतें, रोगाचा दरबार । हो । सुंदर ॥१७॥
जगण्याच्या नव अवताराचा, मरणें हा व्यवहार । हो ।
जगतें जगणें प्रभुप्रमाणें, मरणें क्षण जगणार । हो । सुंदर ॥१८॥
मरणाविरहित जगणें मिळवूं, असा करूं निर्धार । हो ।
शाश्वत जगण्यामधें कोठचा, दुःखाचा संचार । हो । सुंदर ॥१९॥
आनंदी-आनंद जहला, तनुक्रांति होणार । हो ।
मरणाचा परमेश्वर मजवर, करुणाघन वळणार । हो । सुंदर ॥२०॥
आनंदी-आनंद जाहला, मरतां मी हंसणार । हो ।
हांसत मरणें गोविंदाचा, प्रेमपंथ ठरणार । हो । सुंदर ॥२१॥

—→ ० ←—

## ४९ गोविंदाचें करुणागान. *

**धांवा**

( **चाल**—देवा धांव रे लौकरी संकट पडलें भारी )

देवा ! दावी रे निजचरण । मंगल शोभन सगुण ।
त्यातें मनःसंयमीं स्थापून । ध्यानानें पूजीन ॥ ध्रु० ॥
देवा ! दावीरे निजचरण । करीन त्यांचें भजन ।
त्यांना जाऊनी मग शरण । घालिन लोटांगण । देवा॥ १ ॥
देवा ! दावीरे निजचरण । घेईन तद्दर्शन ।
मस्तक श्रीफल त्या वाहून । वाहिन अंतःकरण । देवा॥ २ ॥
देवा दावीरे निजचरण । मज कर पुण्यवान ।
ज्याला ध्याऊनी तपोधन । झाले धन्यमान । देवा॥ ३ ॥
करितां पुण्याचें अर्जन । तुझें चरण-दर्शन ।
वाटे भक्तांना भक्तीचें । पुण्याहवाचन । देवा॥ ४ ॥
होते माधवा ! तव चरण । श्रेयां श्रेयस्कर ।
करितें त्याचपरी पदोपदीं । प्रेयाला प्रियतर । देवा॥ ५ ॥
झाले माधवा ! तव चरण । जननयनाचे रमण ।
त्यांचें माहात्म ऐकून । रंजे मनिं रंजन । देवा॥ ६ ॥
देवा माधवा ! तव चरण । ते न चालिचे चरण ।
केवळ पूजेचे ते चरण । वंदनीय ते चरण । देवा॥ ७ ॥
देवा माधवा ! तव चरण । जीवांचे ते चरण ।
जीव-चरणाला चिंतून । कळतो नारायण । देवा॥ ८ ॥
देवा माधवा ! तव वदन । साऱ्यांचें तें वदन ।

* निधनापूर्वीं दोन दिवस रचलेली.

सान्या वदनांला मनिं स्मरुन । दिसतो श्री भगवान् । देवा०॥९॥
सान्या जीवांच्या वदनांनीं । हांसे मनमोहन ।
सान्या विश्वाच्या अधरांनीं । हरि करी मुरलीगान ।देवा०॥१०॥
सान्या चराचराच्या नयनांनीं । पाही यदुनंदन ।
आम्हां सान्यांच्या हृदयांनीं । रमे भक्तरंजन । देवा०॥११॥
सान्या जीवांतील श्रीकृष्ण । ज्ञान-चक्षुंनीं दिसतो ! ।
सान्या आत्म्यांतील गोविंद । तन्मयतेनें दिसतो । देवा०॥१२॥
सान्या हृदयांतील गोविंद । तोचि प्रेमानंद ।
देवा गोविंदा ! आनंदा ! । ये धांवत स्वच्छंदा । देवा०॥१३॥
आहे भक्तीचा तव धंदा । न करीं तो रे मंदा ।
देउनि भक्ती या गोविंदा । कर त्या भक्ती-धंदा । देवा०॥१४॥
प्रेमें सेवाया मत्प्रेम । यावें मेघश्याम ।
माझ्या आत्म्याच्या मंदीरीं । येऊं दे तव स्वारी । देवा०॥१५॥
माझ्या हृदयींचा सन्मान । देतों सिंहासन ।
त्यावर मंडित हो सुंदर । हसवित वदनेंदिर । देवा०॥१६॥
माझ्या भक्तीची कालिंदी । स्नान तुला घालील ।
माझ्या स्तवनाची फुलबाग । पुष्पें तुज वाहील । देवा०॥१७॥
माझ्या काव्याची स्वरवल्ली । माला तुज अर्पील ।
माझ्या प्रीतीची रक्तीमा । कुंकुमास रेखील । देवा०॥१८॥
माझ्या जीवाची सार सुधा । नैवेद्या दावील ।
माझ्या स्वराची सरस्वती । सुरस गान छेडील । देवा०॥१९॥
माझ्या प्रतिभेचि विभा प्रभा । आरति ओवाळील ।
माझ्या ज्ञानाची सुमंत्रता । मंत्रपुष्प गाईल । देवा०॥२०॥

वाजवुन टाळ ते टाळ्यांचें । वीणे उत्कंठेचे ।
घुमविन मृदंग मग हर्षाचे । करीन कीर्तन तुमचें । देवा०॥२१॥
देवा ! नमनें तुज हातांचीं । भालांचीं शीर्षांचीं ।
देवा ! नमनें तुज साष्टांगें । नम्रांगें लोटांगें । देवा०॥२२॥
देवा ! नमनें तुज सर्वांगें । अनंगशा आत्मांगें ।
देवा ! नमनें तुज शब्दांची । अर्था—भावार्थांचीं । देवा०॥२३॥
देवा ! नमनें तुज नाचून । गरगरां फीरून ।
देवा ! नमनें तुज सहस्रदां । सहस्रदां सर्वदा । देवा०॥४॥*

—>०<—

## ५० नमस्कार.

**चालः**—( रोडगा वाहिन तुला । भवानि आई० )

नमस्कार हा तुला । मोरया । नमस्कार हा तुला ॥ धृ०॥
सुरम्य उत्सव वाहुनि तव हा । प्रमोद झाला मना । मोरया० ॥१॥
दर्शन प्रेमें तुझें घेतलें । पुण्य लाधलें मला । मोरया० ॥२॥
अल्प स्वल्प तव सेवा घडली । प्रसाद द्यावा मला । मोरया० ॥३॥
वंदुनि तव पद येतों आतां । आज्ञा द्यावी मला । मोरया० ॥४॥

—>०<—

* निधनदिनीं दुरुस्त केलेली जोड.

## गोविंद कवीची अगदीं पहिली उपलब्ध असलेली लावणी

( वय सुमारें १८ वर्षें )

हौशिनें करा मसि गेंद गेंद । घडवा हो बाजुबंद ॥ धृ० ॥
बाजुबंद पायांत साखळ्या । मूद राखडी नथ पाटल्या ।
ठुशी सरी आणीक मूगड्या । बिल्लोरि भरा मसि छंद छंद ।
घडवा हो बाजुबंद ॥ १ ॥
हातिं बाजुबंद, गोठ पाटल्या । दाही बोटीं मुद्या दाटल्या ।
बिलवरी भरा मसि छंद छंद । घडवा हो बाजुबंद ॥ २ ॥
पाईं साखळ्या आणि तोरड्या । पायिं बोटिं मासुळ्या मूरड्या ।
हौशिनें करा मसि छंद छंद । घडवाहो बाजुबंद ॥ ३ ॥

## हरवलेलीं पद्यें
## मराठ्यांच्या पराक्रमाचा फटका.

१ ज्यांहीं रणीं रडविलें देशरत्नहररिपू ठका ।
ऐका त्या बलवंत मराठ्या शूर गड्यांचा तुह्मि फटका ॥

× × × ×

२ शिवाजी व दादोजी कोंडदेव यांचा संवाद ( पुण्यास कोणत्या तरी मेळ्यांत ह्मटला गेला आहे. )

× × × ×

३ मावळे वीरांनों ! ऐका भय टाका ।
शिवसाह्यास्तव रणिं ठाका ।
जमवा सारा वीर मराठा ।

× × × ×

## भूपाळी.

४ हे भूमाते ? आम्हि गाऊं तुजला भूपाळी

× × × ×

५ गेला गेला धर्म वांया ।

नीतिचाही खचला पाया

× × × ×

६ हिंदुस्थाना रे स्थाना । जग हंसे तुझ्या अज्ञाना ॥

× × × ×

कै सौ. येसूवहिनी सावरकरादि भागिनींसाठीं करून दिलेलें पद्य.

चालः—( प्रभोविभो )

संकटिं सदा रक्षि कांत मम देवा ॥

हृदयाचा प्रेमविसावा ॥ ध्रु० ॥

---

**विनंति**—ज्यांच्याजवळ हरवलेल्या पद्यांपैकीं पदें असतील त्यांनीं तीं प्रकाशाकाकडे कृपा करून पाठवून द्यावींत.

# गोविंद काव्य प्रशस्ति.

# अभिप्राय.

**श्री. लक्ष्मणशास्त्री लेले**:–(प्रोफेसर सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें.)

नासिक येथील आधुनिक दिवंगत शाहीर रा. गोविंद त्र्यंबक दरेकर यांची कविता पुस्तक–रूपानें नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या पुस्तकाला वैद्यभूषण वामनशास्त्री दातार यांनीं कवीचें चरित्र जोडलें आहे. तें मनोरंजक आणि उद्‌बोधक आहे. त्यांत कवीच्या इतिवृत्ताची करुण कथा असून त्याच्या काव्यशक्तीचा उदय, विकास व उत्कर्ष यांचाही इतिहास आहे. कवीचें चरित्र कवीच्या उदार व उदात्त मनोवृत्ति प्रकट करीत आहे. परिस्थिति कवि निर्माण करिते असें कोणी विद्वान् म्हणतात. याचें कवि दरेकर हें उत्कृष्ट निदर्शन होत. रा. दरेकर शाहीर या नात्यानें विश्रुत आहेत. शाहीर या पदवीला साजेल असेंच त्यांचें काव्य आहे. देशभक्ति व स्वातंत्र्य यांच्या उत्कट भावनांनीं त्यांच्या शाहिरी कृतीला तेज चढलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं कविता आम्हीं वाचल्या त्यांत मुरली, पुरुष कोण, राष्ट्रसंत प्रतिज्ञा, शेतकऱ्यांची दुःखाची काहाणी, शिवाजी व पक्षिदूत हीं काव्यें आम्हांस विशेष आवडलीं एकंदरींत गोविंद कवीची कृति कौतुकास्पद आहे. दिवंगत प्रिय मित्राची वाङ्मय कृति मुद्रित करून त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचा स्तुत्य प्रयत्न वैद्यभूषण दातार प्रभृति सद्‌गृहस्थांनीं केला याबद्दल त्यांचेंही अभिनंदन करणें योग्य आहे.

× × × ×

**श्री. न. चिं. केतकर,** बी ए. एलएल बी. सहसंपादक केसरी: —

स्वातंत्र्यशाहीर ' गोविंद कवीच्या जिवंत व स्फूर्तिमय काव्यांनीं एकेकाळीं महाराष्ट्रांत स्वातंत्र्यवाद घुमविला. ब्रिटिश सरकारच्या वक्र दृष्टीनें तीं बहुतेक कवनें जप्त झालीं. त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा काळ केव्हां येईल तो येवो पण गोविंद कवींचें अवशिष्ट काव्यहि स्वातंत्र्याच्या उत्कट तळमळीनें व वीरश्रीनें भरलेलें आहे. आणि तें समग्र, सचित्र व सच्चारित्र असें प्रसिद्ध होत आहे. प्रत्येक महाराष्ट्रीय तरुणानें तें अभ्यासावें व त्याचा प्रसार करावा हें काव्य राष्ट्रसंतांना ' पराक्रमी वेदांत ' शिकवील व ' लोकहृदयांतरीं नाचवील. म्हणून गोविंद कवींच्या कवितेचा प्रसार करणें हें उत्कृष्ट वाङ्मय-प्रसाराचें तर काम आहेच पण परिणामकारी राष्ट्रकार्यहि आहे. चरित्र या दृष्टीनें गोविंद कवीचें या पुस्तकांत दिलेलें चरित्रहि त्यांच्या काव्याप्रमाणेंच उद्बोधक आहे.

---

## श्रद्धानंद ता० १ मार्च सन १९३०

आक्सफर्ड, केंब्रीज इत्यादि विश्वविद्यालयांतील हिंदी तरुण आणि अभिनव भारत संस्थेच्या पारीस वगैरे ठिकाणच्या शाखांतूनहि " स्वातंत्र्य कवि " किंवा सावरकर सुचवीत त्या पदवीप्रमाणें " स्वातंत्र्य काव्य कोकील " अशा अभिधेनें नें हिंदी विद्वान मंडळ त्या स्वातंत्र्य कवि वीरांच्या छावणींत गोविंदास गौरवीत असे. सावरकरांनीं नाशिकला पत्र पाठवून गोविंद कवीस ती " स्वातंत्र्य कवी ' ही पदवी जी प्रथम अर्पिली, ती त्या युरोपांतील भारतीय मंडळाच्याच वतीनें आणि अनुरोधानें होय

अशाप्रकारें गोविंद हे स्वातंत्र्य कवि झाले. हा पंगु कवी महाराष्ट्रीय कीर्तीचाच नव्हे तर कांहीं अंशीं भारतीय कीर्तीचा गिरीहि लंघून गेला. सन १९१० चे संधीस त्यानें त्याच्या तेजस्वी स्वातंत्र्य रणगीतानें पटकाविलेलें हें स्थान त्याच्या उत्तरार्धांतील " मुरली " सारख्या तात्विक तरीहि प्रेमळ गंभीर असूनहीं अत्यंत सुरस अशा गीतांनें आणि गतीनें आमरण अढळ ठेविलें. आणि त्या स्वातंत्र्य कवीच्या शाब्दिक रणगीतांस सार्थ कृतार्थ करणाऱ्या त्या अनेक स्वातंत्र्य वीरांच्या रणपराक्रमाची दैदिप्यमान प्रभावळ जोंवर त्या स्थानीं अशीच प्रकाशत राहील तोंवर तें स्थानहि तसेंच प्रकाशत रहाणार आहे.

—→०←—

केसरी ता. ४ मार्च १९३०.

# गोविंद-काव्याचा-अल्प परिचय.

## ( ले. डॉ० विष्णु महादेव भट येवलें. )

" गोविंद " कवीसंबंधाने थोडीशी माहिती गल्या केसरींत दिली होती, पण " कस्तूरीचा परिमळ कळवाया शपथ वाहणें नलगे " ह्या उक्तीप्रमाणें गोविंद कवीच्या अवशिष्ट काव्यावरूनच त्यांच्या अदृष्ट काव्याबद्दलची वाचकांस सहज कल्पना येईल. उदाहरणार्थः—

( चाल—आनंद कंद ऐसा )

आह्मी स्वराष्ट्रसंत । करूं मातृभू स्वतंत्र
वारून पारतंत्र्य । करूं राष्ट्रभू स्वतंत्र ॥
बंदीस देवशाला । बेडीस पुष्पमाला
हालांस मानुं झोला । काळाशीं खेळुं खेळा ॥
श्रमुं सर्वदा नितांत । करूं राष्ट्रभू स्वतंत्र

गोविंदाच्या राष्ट्रसंतप्रतिज्ञेंतलें हें एक कडवें आहे ह्यांत अलंकारशास्त्रदृष्ट्या " अपन्हुति " अलंकार तर आहेच, पण माझें मतें एतदर्थक जी एक इंग्रजी कविता " Stone-walls do not a prision make, nor iron-bars a cage " आमच्या सुशिक्षितांच्या जिभेवर नाचत असते तीपेक्षांहि गोविंदोक्ति कितीतरी पटीनें सरस आहे

लोकमान्य टिळकांवरील गोविंदाची भूपाळी हें तर सर्वोत्कृष्ट काव्य आहे आणि पुष्कळ राष्ट्रीय शाळांतून तें शिकविलें जात आहे, राष्ट्रीय शाळांतूनच काय पण प्रत्येक कवीनें व राष्ट्रीय वृत्तीच्या माणसानें तें मुखोद्गत करण्यासारखी नितांत सुंदरता त्यांत आहे. उदाहरणार्थ त्यांतलि २-३ कडवींच देतों:—

( चाल—भूपाळी. )

देशभक्तिचें कल्पद्रुमवन विस्तारी केसरी । जनहृदीं । विस्तारी केसरी ॥
आशा वाटे खुलेल फुलेल वसंत तो लौकरी ।
विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते । टिळक ही । देशभक्ति खेळते ॥
बंधुप्रीति गीतें गाते समता ती डोलते ।
तव अनुशासन जनसंजीवन, सिंहासन तुज नसे । फक्त तें । सिंहासन तुज नसे ॥
सार्वभौम भूपाळ परी तूं जनादराचा असे ।
मुक्या मनानें किति उधळावें शद्बांचे बुडबुडे । तुझ्यावर शद्बांचे बुडबुडे ॥
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ।

ह्या एकंदर काव्यांत शुद्ध अपन्हुति, अनन्वय, परिकर, सार इत्यादि अलंकारांची लकेर आपणास ठिकठिकाणीं आढळते. " श्रीकृष्णजन्मोत्सवाच्या " कवितेंत आर्यभूचें भाग्य वर्णन करतांना गोविंद कवि ह्मणतो:—

( वृत्त–साकी )

आर्य विप्रता जिवाशिवाचा अद्वैतोपन्यास ।
आर्य साधुता जिवाशिवाच्या द्वैताचा संन्यास ॥
आर्य वेद ते जिवाशिवाच्या ऐक्याचा इतिहास ।
आर्य धर्म त्या इतिहासाचा निदिध्यास, अभ्यास ॥
आर्य देवगण त्या इतिहासा उपोद्घातसम झाला ।
आर्यांची संस्कृति त्याप्रति उपसंहारचि ठरला ॥

" व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं " ह्या वचनाप्रमाणें आर्यधर्म व आर्यसंस्कृतीपलीकडे इतिहासाला त्याच्या कितीहि पुनरावृत्ति झाल्या तरी, जाणें शक्य नाहीं मनुष्यस्वभावाची, उन्नतीची, ज्ञानाची ती संस्कृति ही सीमा आहे असें अनेकपौर्वात्य व पाश्चिमात्य विद्वानांप्रमाणें गोविंद कवि यांत स्वाभिमानानें ठांसून सांगत आहे.

त्याचप्रमाणें त्याच साक्यांतले निवडक वेचें देतों:—

प्रभु केवढा जगत् केवढें, कसा जमावा मेळ ? ।
निस्सीमाला सीमा येते प्रेमास्तव बहु वेळ ॥
बालक-देहीं कसे कोंदले ईशाचे गुणधर्म ।
नवल वाटतें हृदिं दाटतें या गूढाचें शर्म ॥
अमित जनांचीं शीर्षें हर्षें ज्याच्या पायां नमिती ।
त्या प्रभुराया आयाबाया पायांवर न्हाणिती ॥
अगणित नव मेघांचे हंडे ज्या प्रभुच्या स्नानाला ।
न्हाऊं घातलें क्षुल्लक सलिलें सलील आतां त्याला ॥
जीवजगाचें अंग रक्षण्या अंगरखा जो झाला ।
त्या प्रभुराया ममता ह्मणते ' अंगा पोपी घाला ' ॥
निरंजनाच्या नयनीं अंजन, धन्य धन्यता बोले ।
चंद्रमुखाला तीट लाविली संतभक्ति ती खेळे ॥

गोविंदाच्या राष्ट्रसंतप्रतिज्ञेंतलें हें एक कडवें आहे ह्यांत अलंकारशास्त्रदृष्ट्या " अपन्हुति " अलंकार तर आहेच, पण माझें मतें एतदर्थक जी एक इंग्रजी कविता " Stone-walls do not a prision make, nor iron-bars a cage " आमच्या सुशिक्षितांच्या जिभेवर नाचत असते तीपेक्षांहि गोविंदोक्ति कितीतरी पटीनें सरस आहे

लोकमान्य टिळकांवरील गोविंदाची भूपाळी हें तर सर्वोत्कृष्ट काव्य आहे आणि पुष्कळ राष्ट्रीय शाळांतून तें शिकविलें जात आहे, राष्ट्रीय शाळांतूनच काय पण प्रत्येक कवीनें व राष्ट्रीय वृत्तीच्या माणसानें तें मुखोद्गत करण्यासारखी नितांत सुंदरता त्यांत आहे. उदाहरणार्थ त्यांतील २-३ कडवींच देतों:—

( चाल—भूपाळी. )

देशभक्तिचें कल्पद्रुमवन विस्तारी केसरी । जनहृदीं । विस्तारी केसरी ॥
आशा वाटे खुलेल फुलेल वसंत तो लौकरी ।
विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते । टिळक ही । देशभक्ति खेळते ॥
बंधुप्रीति गीतें गाते समता ती डोलते ।
तव अनुशासन जनसंजीवन, सिंहासन तुज नसे । फक्त तें । सिंहासन तुज नसे ॥
सार्वभौम भूपाळ परी तूं जनादराचा असे ।
मुक्या मनानें किति उधळावें शब्दांचे बुडबुडे । तुझ्यावर शब्दांचे बुडबुडे ॥
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ।

ह्या एकंदर काव्यांत शुद्ध अपन्हुति, अनन्वय, परिकर, सार इत्यादि अलंकारांची लेकर आपणास ठिकठिकाणीं आढळते. " श्रीकृष्णजन्मोत्सवाच्या " कवितेंत आर्यभूचें भाग्य वर्णन करतांना गोविंद कवि ह्मणतो:—

( वृत्त–साकी )

आर्य विप्रता जिवाशिवाचा अद्वैतोपन्यास ।
आर्य साधुता जिवाशिवाच्या द्वैताचा संन्यास ॥
आर्य वेद ते जिवाशिवाच्या ऐक्याचा इतिहास ।
आर्य धर्म त्या इतिहासाचा निदिध्यास, अभ्यास ॥
आर्य देवगण त्या इतिहासा उपोद्घातसम झाला ।
आर्यांची संस्कृति त्याप्रति उपसंहारचि ठरला ॥

" व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं " ह्या वचनाप्रमाणें आर्यधर्म व आर्यसंस्कृतीपलीकडे इतिहासाला त्याच्या कितीहि पुनरावृत्ति झाल्या तरी, जाणें शक्य नाहीं मनुष्यस्वभावाची, उन्नतीची, ज्ञानाची ती संस्कृति ही सीमा आहे असें अनेकपौर्वात्य व पाश्चिमात्य विद्वानांप्रमाणें गोविंद कवि यांत स्वाभिमानानें ठांसून सांगत आहे.

त्याचप्रमाणें त्याच साक्यांतले निवडक वेचे देतों:—

प्रभु केवढा जगत् केवढें, कसा जमावा मेळ ? ।
निस्सीमाला सीमा येते प्रेमास्तव बहु वेळ ॥
बालक-देहीं कसे कोंदले ईशाचे गुणधर्म ।
नवल वाटतें हृदिं दाटतें या गूढाचें शर्म ॥
अमित जनांचीं शीर्षें हर्षें ज्याच्या पायां नमिती ।
त्या प्रभुराया आयाबाया पायांवर न्हाणिती ॥
अगणित नव मेघांचे हंडे ज्या प्रभुच्या स्नानाला ।
न्हाऊं घातलें क्षुल्लक सलिलें सलील आतां त्याला ॥
जीवजगाचें अंग रक्षण्या अंगरखा जो झाला ।
त्या प्रभुराया ममता ह्मणते ' अंगा पोपी घाला ' ॥
निरंजनाच्या नयनीं अंजन, धन्य धन्यता बोले ।
चंद्रमुखाला तीट लाविली संतभक्ति ती खेळे ॥

वृत्त्यनुप्रास, निदर्शनादि अलंकारांना यांत ठाव मिळाला आहे. विषमालंकाराचें एक उत्कृष्ट उदाहरण त्याच काव्यांत पहा:--

अंधारानें अधिक पेटती, सूर्यानें जे विझती।
ते ताऱ्यांचे दीप पेटवुनि ठेवा गगनावरती ॥

इतके उतारे वाचकांना 'गोविंदाच्या' काव्यमाधुरीची चटक लावण्यास पुरे झाले. ह्यापेक्षां अधिक जागा अडविणें येथें इष्ट नाहीं. गोविंदकवींच्या काव्यामोदाचा ज्यांना स्वाद घ्यावयाचा असेल त्यांनीं त्या काव्यपुष्पांचा गुच्छच जवळ ठेवला पाहिजे. थोड्याच दिवसांत हा पुष्पांचा झेला नाशकास कोणत्या बगीच्यांत मिळेल हें जाहीर होईलच. तो घेऊन या फाल्गुन व॥ १ येणारी गोविंदाची पुण्यतिथि कवींनीं व काव्यलोलुप रसिकांनीं आणि राष्ट्रभक्तांनीं यथोचित साजरी करावी, आणि ह्या स्वातंत्र्यशाहीराचें वाङ्मय-तर्पण करावें एवढीच सहृदय महाराष्ट्रीयांना माझी प्रार्थना आहे.

महाराष्ट्र ता. १३ मार्च सन १९३०.

# स्वातंत्र्यकवि गोविंद

## ( ले. विश्वनाथ विनायक केळकर )

ज्या वेळच्या काळोखांत हिंदुस्थानांतील मोठ्या पुढाऱ्यांना चांचपडून देखील स्वतंत्रतेचा माग लागत नव्हता, त्याकाळीं गोविंद कवींच्या दिव्य दृष्टीनें स्वातंत्र्याच्या दिव्य ध्येयाचें सुसंस्पष्ट आकलन केलें. त्यांनीं स्वातंत्र्याला पाळणा करून दिला; स्वतंत्रतादेवीची भूपाळी गायिली; आणि आपल्या ओजस्वी गीतांतून स्वातंत्र्याच्या प्रखर तत्त्वांचें उद्घाटन केलें. गोविंदाचें अनन्यत्व

त्यांच्या "स्वातंत्र्यकवि"त्वांत आहे. ... ... ... ... ... ज्या पुरुषांची स्मृति महाराष्ट्रानें अभिमानानें आणि आदरानें आपल्या हृदयसंपुटांत सदैव आस्थापूर्वक बाळगून ठेविली पाहिजे, त्या पुरुषांत **गोविंद** कवींची प्रामुख्यानें गणना होते. राष्ट्राच्या इतिहासांत स्वातंत्र्यकवीचें स्थान स्वातंत्र्यवीराच्या बरोबरीनें असतें. कोणत्याही राष्ट्रांत स्वातंत्र्य कवि किति दुर्मिळ असतात, हें पाहिलें ह्मणजे ही गोष्ट मनाला पटते. ३०-३५ वर्षांपूर्वीपर्यंत हिंदुस्थानातल्या कवींच्या काव्याला राष्ट्रीय विचारांचा वास क्वचित्च लागत असे, विख्यात स्वातंत्र्यभक्त तात्याराव सावरकर आणि गोविंद ह्यांच्या रोमहर्षण, हृदयें थरारून सोडणाऱ्या कविता बाहेर पडूं लागल्यावर अलीकडे देशविषयक, राष्ट्रीय विचाराच्या कविता बऱ्याच होऊं लागल्या आहेत. पण गोविंदांवाचून इतर कोणालाही ' स्वातंत्र्यशाहीर ही पदवी लावली जात नाहीं आणि अन्वर्थकतेनें लावतां येतही नाहीं. गोविंद कवि स्वातंत्र्यसूक्तांचा प्रणेता आहे. त्याच्या कवितेंतून स्वातंत्र्याचें जाज्वल्य तत्वज्ञान भरलें आहे. ... ... ... ...गोविंद कवि हे शब्दांचे जादूगार आहेत. त्यांच्या शद्बांची निवड आणि ठेवणच अशी असते कीं, त्यांच्या श्रवणानेंच श्रोत्यांवर अर्धा अधिक परिणाम होतो ! मनाजोगता शद्ब मिळाला नाहीं म्हणून त्यांच्या कवितेचा चरण चार चार दिवस अडून बसे ! ही शब्दांची जादुगिरी कोणत्याही प्रसंगाचें चित्र डोळ्यापुढें उभें करण्याची कुशलता, कल्पनांची भव्यता, बिचारांची उदात्तता आणि तत्वग्राही विवेचन ह्यांनीं त्यांच्या कवि तेला विशिष्ठत्व आलेलें आहे गोविंदाची "मुरली" वाचली ह्मणजे त्यांच्या कल्पनांच्या विलासांनीं मन थक्क होतें ! गोविंदांच्या "मरणाच्या प्रार्थने" हून अधिक उदात्त मरणाच्या प्रार्थना कोणत्याही भाषेंत क्वचितच वाचावयाला मिळतील.

वैनतेय सांवतवाडी ता. १५ एप्रिल सन १९३०

# गोविंदाची कविता

( ले.-आदर्श. )

गारगोटीच्या अंतरंगांत वास करणाऱ्या अग्नीप्रमाणें, जीर्ण पोथींत असलेल्या सुंदर काव्याप्रमाणें, भग्न मंदिरांत जागृत दैवताप्रमाणें गोविंदांच्या पराधीन देहांत स्वातंत्र्योत्सुक मन नांदत होतें. ... ... ... समुद्राच्या पाण्यांत मीठ असतें; पण मिठागरांत पाणी सांठवून त्याला उन्हाची आंच लागली ह्मणजेच मीठ पडतें. कवित्वशक्तीचा गुण असाच आहे. अशिक्षित, सुशिक्षित, व सुसंस्कृत अशा प्रकारचे बदल गोविंदांच्या मित्रमंडळांत क्रमाक्रमानें झाले व त्याप्रमाणें त्यांच्या काव्यरचनेचें वळणही बदललें......... शिवजयंती, असो वा कृष्णजयंती असो, टिळकांच्या वाढदिवसानिमित्त कवितेची रचना होवो, वा त्यांच्या मृत्यूनंतर दहाव्या दिवशीं शोकग्रस्त अंतःकरणांतून तिचा उगम होवो, ज्याची प्रार्थना करावयाची तो देव गणपति असो वा प्रभु रामराय असो, गोविंदांची स्वातंत्र्यलालसा त्यांत प्रगट व्हायची हें ठरलेलेंच आहे. इतर लोकांच्या मनीं असतें तें स्वप्नीं दिसतें; पण प्रतिभावंतांच्या मनीं असतें तें कवनीं प्रगट होतें. ... ... ... बटन दाबलें कीं, विजेचा प्रवाह सुरू होऊन विजेचे दिवे जसे लागतात, त्याप्रमाणें गोविंदांची राष्ट्रप्रेमानें रसरसलेली कविता वाचतांना अंगांत चैतन्य उत्पन्न होतें. ... ... ... ... कावळीं कुत्रींदेखील जगतात. नुसतें जगणें हें मनुष्याचें ध्येयच नव्हे. आपल्या राष्ट्रासाठीं अथवा समाजासाठीं कांहींतरी करीत जगणें व तें करीत असतांना मृत्यु आला तरी त्याला आनंदानें कवटाळणें यांतच मनुष्याचा मोठेपणा आहे. ही उज्वल शिकवण गोविंदांची कविता देत आहे.

वर्ष २४ एप्रील १९३० अंक १०

# आनंद

स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांचें नांव विश्रुत आहे. त्यांची कवनें ओजस्वी, राष्ट्रीय भावनांनीं रसरसलेलीं आणि चैतन्ययुक्त असतात. आणि देशाभिमानाची स्फूर्ति देण्याचें सामर्थ्य त्यांच्या कवनांत आहे.

ज्ञानप्रकाश १९३०.

# कवि गोविंद यांची कविता.

कवि गोविंद यांच्या काव्याबद्दल लिहावें तितकें थोडेंच आहे. जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें. मात्रा, गण, यमक, वृत्त वगैरे गोष्टी ठाकठीक नसूनही ही कविता सुंदरच वाटते. गोविंद कवींची ही कविता कांहीं ठिकाणीं काळ्या कपारींना फोडून गिरिंतरांतून निघालेल्या स्वातंत्र्य निर्झराप्रमाणें खळखळणारी व प्रसन्न अशी वाटली तर तीच कांहीं ठिकाणीं वृत्ति तुफान झाल्यामुळें बेभान भासणाऱ्या सागराप्रमाणें उसळणारी व उग्र अशी वाटते. ती कांहीं ठिकाणीं पित्याशीं लडिवाळपणानें हट्ट घेणाऱ्या बालिकेप्रमाणें अल्लड वाटली तर कांहीं ठिकाणीं प्रेमानें धुंद झालेल्या तरुणीप्रमाणें मस्त अशी वाटते. गोविंदाच्या "मुरली" सारख्या कवितेंत प्रवेश केल्याबरोबर वाचकांना एखाद्या सुंदर बनामध्यें प्रवेश केल्यासारखें होऊन आपण वृक्षलतांचें वैभव पहात आहों कीं सुमनांचा सौंदर्यास्वाद घेत आहों, आपण विरहकूजन ऐकत आहों कीं स्थिर जलाशयावरच्या प्रतिबिंबित झालेल्या छटा पहात आहों असा

भास होईल. त्यांची सरस्वतीची भूपाळी वाचीत असतां वाचकांस त्यांचे नवीनव व अत्यंत अनपेक्षित असे चपल कल्पनाविहार पाहून आपण एकादें विविधरंगी तारगोळ उडविणारें दारूकाम तर पाहत नाहींना असें वाटेल. त्यांची कोणत्याही विषयावरची कविता वाचली तरी त्यांत भोंवतालची विषम परिस्थिति पाहून वाटणारी तळमळ उत्कटपणानें व्यक्त होते. ही कविता वाचून सर्व काव्यभर ऐकूं येणारा या कविसिंहाचा स्वातंत्र्य हुंकार तर वाचक केव्हांच विसरूं शकणार नाहींत पारतंत्र्य ह्मणजे नरक व स्वातंत्र्य ह्मणजे स्वर्ग हा मोक्षमंत्र घुमविणारी ही ओजस्वी कविता प्रसिद्ध करुन गोविंदकाव्यप्रकाशन मंडळानें महाराष्ट्रास ऋणी करून ठेविलें आहे.

—>०<—

केसरी ता. २१ जून सन १९३०.

## स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद

देशसेवेसाठीं आपल्या प्रतिभेचा विनियोग करणाऱ्या राष्ट्रीय कवींच्या मालिकेंत कवि गोविंदाचें स्थान उच्च आहे. त्यांचीं कवनें लोकांच्या जिभेवर शक्य तोंवर जशीं नाचत राहिलीं तशींच तीं सरकारच्या डोळ्यांत सलूं लागलीं. यावरूनच त्यांची प्रखरता समजून येणारी आहे. गोविंद कवीच्या जप्त झालेल्या कविता वगळून सुमारें पन्नास कविता या पुस्तकांत संग्रहीत केल्या आहेत. त्यांच्या योग्यतेसंबंधाचें विवेचन "केसरी"त मागें येऊन गेलेंच आहे. तथापि गोविंद कवीचें एक वैशिष्ट्य वाचकवर्गाचे-किंबहुना कविमंडळाचे-नजरेस आणून देणें अगत्याचें

आहे. आणि तें ह्मणजे सदा व सर्वत्र जळत असलेली त्यांची राष्ट्रीयदृष्टि. त्यानेंही " मुरलीवर " काव्य रचलें, " वसंत गेल्या " बद्दल विलाप केला, आणि " सुंदर कविते " चें स्वरूपवर्णन केलें परंतु ह्या सर्व विषयांना त्यानें राष्ट्रप्रेमाचेंच वाहन केलें आणि वाचकांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्यलालसा उत्पन्न करण्याचें ध्येय आपल्यापुढें अचल ठेवलें. तानाजीच्या पत्नीचा विलाप तर हृदय पिळवटून टाकणारा आहे! " भारतप्रशस्ति " हें दीर्घकाव्य या अल्पशिक्षित कवीच्या भाषाप्रभुत्वाचें उत्तम स्मारक आहे. तसेंच " प्रीतिदेवीचा उत्सव " " श्रीकृष्णजन्मोत्सव " " प्रेमशृंगार " इत्यादि कवितांतलि अलंकारप्राचुर्य व कल्पनासौंदर्य रसिकांना मोहनी घालणारें आहे. परंतु गोविंदाची कविता मुख्यत्वेंकरून " हस्तीं भयकर करवाल " धारण करणारी अशीच आहे. " देशास्तव गुंफी सुगुण कवितामाला। तो कविवर ब्राह्मण ठरला।" हें कवीनें केलेलें वर्णन त्याला स्वतःलाच लागू पडणार आहे. आरंभीं कवीचें चरित्र दिलें आहे. शरीरानें पंगु, बुद्धीवर शिक्षणाचें संस्कार अत्यल्प व सरकारचा ससेमिरा मागें लागलेला, अशा प्रतिकूल परिस्थितींत, खडकांतून पाझर वहावेत त्याप्रमाणें, ही पावन काव्यगंगा स्रवत आहे, हें पाहून कोणाला आश्चर्य आणि आदर वाटणार नाहीं? महाराष्ट्र वाङ्मयाचा कमनीय अलंकार आणि स्वातंत्र्य-वृत्तीचें उज्वल वाहन या दृष्टींनीं हें पुस्तक वाचनीय आहे.

मनोरंजन जून १९३०.

# स्वातंत्र्य शाहीर कवि गोविंद यांची कविता.

( ले. श्री. प्रो. रा. वि. ओतूरकर, एम्. ए )

कवि गोविंद यांच्या राजकीय व सामाजिक मतांचें वर्णन झालें. परंतु यावर कित्येकांचें मत असें आहे कीं काव्यांत व्यक्त केलेले विचार उच्च असले तरी तेवढ्यानें ते मांडणारा मनुष्य उत्तम कवींच्या पंक्तींत बसण्याला लायक होतोच असें नाहीं तो थोर ग्रंथकार किंवा लेखक असेल परंतु त्याला कवि ही संज्ञा देतां येणार नाहीं. काव्याचे जे निरनिराळे प्रकार आहेत त्यांत बोध काव्य हें वरच्या दर्जाचें मानलें जात नाहीं, कारण तें तयार होण्याला स्फूर्तिपेक्षां पद्य रचनाशक्तीचीच अधिक मदत होते. ध्यानविषयांत रंगून जाणारा मनुष्य हा दुसऱ्यास उपदेश करण्याची पर्वा करीत नाहीं त्याविषयांत त्याचें चित्त तल्लीन झाल्यावर त्याच्या तोंडून तद्वर्णनपर शब्द सहज बाहेर पडतात. भावनेच्या उद्रेकानें निर्माण झालेलें काव्य हें अशा प्रकारचें असतें व त्यांत बोध करण्याची बुद्धि फारशी नसते उत्तम काव्याची ही कसोटी मान्य केली तरी सुद्धां 'कवि गोविंद' हे त्या कसोटीस उतरतील याची आम्हास खात्री वाटते. त्यांचीं काव्यें वाचणारास ते आपल्या चिंतित विषयांत रंगून गेले आहेत कीं नाहीं याची यत्किंचित्‌ही शंका उरत नाहीं मात्र कित्येक अलीकडील कवींचा चिंतनाचा विषय बागेंतील फूल, घरांतील मूल आकाशांतील चंद्र, आवडीची चंद्रानना, इत्यादि प्रकारचा असतो तसा गोविंद कवींचा विषय नव्हता आवडीचा विषय जितका साधा तितकें त्याचें वर्णनही सामान्य आल्हाद देण्यापलीकडे अधिक कांहीं करूं शकणार नाहीं. परंतु तोच आवडीचा विषय उच्च दर्जाचा

असेल तर त्याच्या वर्णनानें नुसता आल्हादच नव्हे तर बोधही होईल किंबहुना एखाद्या विषयासंबंधीं अन्तःकरण कळवळून भावना पूर्ण उद्गार बाहेर निघाले तर त्यांतून बोध उत्पन्न होतो; एवढ्यावरूनच तें काव्य दुय्यम दर्जाचें कसें मानतां येईल ? बोध करण्याच्या उद्देशानें कृत्रिम रीतीनें काव्य रचलें गेलें कीं भावनापूर्ण स्थितींत चिंत्यविषय वर्णिला जात असतां त्यांतून बोध प्रकट झाला हें मुख्यतः पाहिलें पाहिजे पहिल्या काव्यास दुय्यम दर्जाचें म्हणतां येईल. परंतु दुसऱ्या वर्गांतील काव्यावर तसाच शेरा मारणें हें न्यायाचें होणार नाहीं. कवि गोविंद वाटेल त्या सांगितलेल्या विषयावर ' ट 'ला ' ट ' व ' प 'ला ' प ' रचून कविता करून देणारे भाडोत्री कवि नव्हते. जेव्हां सुचत नसेल किंवा स्फुरत नसेल तेव्हां हट्टानें ते कधीं काव्य करीत नसत. तेव्हां गोविंद कवींच्या काव्यांत बोध आहे येवढ्यावरूनच त्यांच्या काव्यावर दुय्यमपणाचा शिक्का ठोकणारे गृहस्थ परंपरागत काव्य लक्षणेच्या छापेंतून सुटले नाहींत असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

कवि गोविंद हे उत्तम कवि होते इतकेच नव्हे तर उत्तम कवि भविष्यवाणी बोलतात त्याप्रमाणें कवि गोविंदांनीं भविष्यकाळांत घडणाऱ्या गोष्टींचें वर्णन केलेलें आहे......................एकंदरींत कवि गोविंद यांचें काव्य प्रासादिक तालबद्ध, उच्च भावनापूर्ण आहे त्यांत शृंगाराला फारसा थार नाहीं. प्रेमाच्या पाचकळ पणास वाव नाहीं. एकच एक देशाभिमानाची भावना शेवटपर्यंत त्यांच्या काव्यांतून प्रतीत होते, म्हणून त्यांचें काव्य विद्यार्थ्यांनीं पाठकरण्या जोगें, घरोघर स्त्रियांनीं गाण्या जोगें व रसिकांनीं आपल्या कुटुंबाच्या हातांत निर्धास्तपणें देण्याजोगें आहे. त्यांच्या सरकार जमा कविता तर याहूनही तेजस्वी असल्या पाहिजेत. व त्या तशाच पडून राहणें हें वाङ्मयाचें मोठेंच

नुकसान आहे; तेव्हां गोविंद कवीच्या काव्याचें परीक्षण करीत असतांना हा ' स्वातंत्र्याचा अमोल ठेवा परत मिळविण्याविषयीं आमच्या कायदेकौन्सिलांतील प्रतिनिधींस विनंति करणें हें आमचें कर्तव्य. होय कारण त्या काव्याच्या अभावीं कवि गोविंद यांची खरी योग्यता ठरविणें अन्यायाचें होईल.

---

लोकशिक्षण २–१९३०.

## स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांची कविता

.........कविपूर्वपरंपरा नाहीं, शिक्षण नाहीं अंगकाठी धड नाहीं इतकें असूनहि त्यांच्या काव्यांत संस्कृत भाषेची ओळख व अनेक ग्रंथांचें वाचन स्पष्टपणें दिसून येतें ही गोष्ट कौतुकास्पद होय. त्यांच्या कवितेचा उगम नदीच्या मुळाप्रमाणेंच न पाहण्याजोगा आहे. कारण पहिली स्फूर्ति ही तमाशेवाल्या लोकांच्या संगतींत व पहिलें लेखन म्हणजे लावणी असा त्यांचा इतिहास आहे. ............पूर्वीचा काळ आतां राहिला नसल्यामुळें एके वेळीं आक्षिप्त ठरलेलीं त्यांची कवनेंहि यांतच समाविष्ट करतां आलीं असतीं तर बरें होतें. असो. .........देशाभिमान हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे. ' देश हाच त्यांचा देव आहे, देशसेवा हाच त्यांचा धर्म आहे. ' असें असल्यामुळें देशाची पूर्वकालीन उज्ज्वल स्थिति व सद्यःकालीन अवनत स्थिति हेच सारे त्यांच्या काव्याचे विषय होतात...... ...त्यांच्या ' श्रीकृष्णजन्मोत्सव ' व मुरली ' या दोनहि कविता ईशभक्तिपर असून देखील देशप्रीतीनें थबथबलेल्या आहेत. साऱ्या काव्यांत ' मुरली ' इतकें मधुर व रसपरीवाही प्रकरण दुसरें कोणतेंहि नाहीं, असें म्हटल्यास हरकत नाहीं कल्पनांचें सौंदर्यहि भरपूर आहे कदाचित् याचे तोडीस यापेक्षां लहान पण अधिक करुणरसपूर्ण अशी त्यांच्या मृत्यूचे आधींची ' सुंदर मी होणार ' ही कविताच येऊं शकेल.........त्यांच्या लेखनपद्धतीचा मुख्य गुण माधुर्य हा आहे. हें माधुर्य अनेक ठिकाणीं

अनुप्रासांनीं आलें आहे. पुष्कळ ठिकाणीं या अनुप्रासांचा अतिरेक झाला आहे हेंही येथें नमूद करणें जरूर आहे. त्यामुळें कित्येक स्थळीं अर्थशून्य किंवा पुनरुक्त असे शब्द आले आहेत. या बाबतींत गोविंद कवि हे गडकऱ्यांसहि हार जाणार नाहींत असें वाटतें.........काव्याचा आत्मा जो रस तो त्यांच्या काव्यांत परिपूर्ण आहे. त्यांच्या लेखनांत सर्वत्र आवेश भरलेला आहे. अंतःकरणाची तळमळ सर्वत्र स्पष्ट होत आहे. त्यामुळें कलाविकासाच्या दृष्टीनें असणारा थोडाफार कमीपणा त्यांत बराचसा झांकला जातो. काव्य हें आत्म्याचें प्रतिबिंब असेल तर गोविंदांच्या थोर मनाचें प्रतिबिंब त्यांत पूर्णपणें पडलें आहे.

—›•‹—

ब्राह्मण आषाढ शके १८५२.

## स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद.

स्वातंत्र्याची ललकारी स्वैरपणें मारणारा व महाराष्ट्रीयांच्या राजकीय भावनांचें स्फूर्तिकारक चित्र रेखाटणारा आणि तत्कालिन तरूणपिढींत उत्कट राष्ट्रीय भावनेचें बीजारोपण करणारा आद्य कवि या नात्यानें गोविंद कवीचें काव्य व नांव मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत दीर्घकाल राहील यांत शंका नाहीं त्यांचें काव्य ओजस्वी, तेजस्वी, सहज सुंदर आणि प्रासादिक आहे.

—›•‹—

फर्ग्युसन कॉलेज त्रैमासिक पु. २२ अंक १ जुलै १९३०

## कवि गोविंद यांची कविता.

... ... ... गोविंद कवि जातीनें मराठे. त्यांची परिस्थिति अगदींच गरिबीची व त्यामुळें त्यांना उच्च शिक्षणाचा संस्कार मुळींच झाला नव्हता. तथापि या शतकाच्या सुरवातीस स्वदेशभक्तीची जी लाट महाराष्ट्रांत उसळली व जिचें नासिक हें कांहीं काळपर्यंत केंद्रस्थान झालें त्या लाटेंत हे कवि

सांपडले. प्रसिद्ध सावरकरबंधूंचा व यांचा निकट परिचय होता, लो. टिळक हे त्यांचे राजकीय गुरू होते व त्यांचे कांहीं काव्य सरकारजमा झालें आहे, यावरून त्यांच्या काव्याची दिशा लक्षांत येणार आहे.........स्वदेशप्रीति किंवा स्वातंत्र्यप्रेम हाच त्यांच्या कवितेचा निरनिराळया रूपानें विषय आहे. महाराष्ट्र व मराठ्यांचा इतिहास यांचा त्यांना अभिमान आहे. त्यांच्या सर्व कवितांचे सार " हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य तें " या कवितेंत आहे. स्वतःमराठे असून जातिमत्सराचा गंध सुद्धां त्यांच्या कवितेंत नाहीं, किंवा ब्राह्मणब्राह्मणेतर हा भेद त्यांनी केला नाहीं.

---

सर परशरामभाऊ कॉलेज

## स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांची कविता

......शरीरानें पंगु पण मनानें आकाशालाही गवसणी घालूं पाहाणाऱ्या असामान्य मनुष्याच्या दैवी प्रतिभेंतून या कवितांचा जन्म झाला आहे. तेव्हां त्याचा पराक्रम किती मोठा असेल हे काय सांगायला हवे ? पराक्रमी सेनापती ज्याप्रमाणें शत्रुसैन्याच्या कोणत्याही बाजूवर-मग तें घोडदळ असो पायदळ असो वा प्रचंड गजश्रेणी असो, चाल करून जाण्याला भीत नाहीं; त्याप्रमाणें गोविंद कवींची प्रतिमा कसल्याही अभिरुचीचा व कोणत्याही दर्जाचा वाचक असो, त्याला वश केल्याशिवाय मागें फिरत नाहीं. वाचकाच्या प्रकृतीप्रमाणें ती निरनिराळीं रूपें धारण करील, निरनिराळ्या भाषेंत बोलूं लागेल व मारा करण्याचीं साधनेंही बदलील पण तिचें साध्य सदा एकच राहणार........स्त्रीजनांच्या कोमल हृदयांत देशभक्तीसारख्या भावना प्रज्वलित करावयाच्या असल्यास त्यांच्या नित्यपरिचयांतल्या प्रसंगांशींच त्या निगडित केल्या पाहिजेत. ' श्रीजिजाबाईचा पाळणा ' या दृष्टीनें फार अप्रतिम

आहे ..........उपास्यदेवता ज्याप्रमाणें भक्ताच्या आवडीसारखें रूप धारण करते व त्यामुळें अनेक रूपांनीं तिला नटावें लागतें तसेंच गोविंदकवींच्या कवितेबद्दलही आपणांला म्हणतां येईल.........गोविंदकवींच्या कवितेचें वैशिष्ट्य त्यांच्या ओजस्वी व अस्खलित वाणींत आहे. उताराकडे जाणारा प्रचंड प्रवाह ज्याप्रमाणें सारखा धावत असतो, मध्यें थांबत नाहीं, रमत नाहीं, किंवा गमत नाहीं त्याप्रमाणें गोविंदकवींच्या भाषेचें आहे. तिचा वेग सारखा वाढतच असतो.........दुसरा विशेष गुण म्हणजे नादमाधुर्य हा होय. नादमाधुर्य हा **स्वतंत्रपणें** मोठा काव्यगुण आहे आशांतला भाग नाहीं. थोड्याशा परिश्रमानें ही शब्दांची कसरत एखादा साधा कवीसुद्धां करूं शकतो. पण अर्थाला यत्किंचितही गौणत्व न आणतां, एवढेंच नव्हे तर त्याची शोभा वाढेल अशा रीतीनें या शब्दालंकाराचा उपयोग करणें हें एखाद्यालाच साधतें. वीररस, शृंगाररस व शांतरस या तिन्हींचेंही पोषण उचित अनुप्रासानें कसें करतां येतें हें गोविंदकवीपासून शिकण्यासारखें आहे..........कवि जर कल्पनेनें दरिद्री असला तर त्याला रसिकांच्या बाजारांत कोणीही विचारणार नाहीं. खरा रसिक त्याच्या नुसत्या गोडगुळचट भाषेला कधींही भुलणारा नाहीं. या दृष्टीनें पाहिलें तर गोविंदकवि फार श्रीमंत होते असें आम्हांला वाटतें. ( लौकिक दृष्टीनें त्यांच्या घरीं शेवटपर्यंत अठराविश्वें दारिद्य होतें !) त्यांची कोणतीही कविता काढली तरी तिच्यांतील विषयाची मांडणी नवीन व कल्पनाही नवीन आढळून येतील.... ........‘ मुरली ’ ही कविता म्हणजे सुंदर कल्पनांची लांबचलांब मालिकाच होय. या कवितेंत गोविंद कवींचे सर्व गुण उत्कर्ष पावले आहेत. नादमाधुरी तर विशेषच आहे..........गोविंदकवि हे नुसते कवि नसून त्यांच्या काव्यानंदाची उत्क्रांति आत्मानंदांत झाली आहे, हें विशेष आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम एकनाथ या संत कवींचीं मध्यें त्रुटित झालेली परंपरा गोविंदकवींनीं पुन्हां सुरू केली आहे, असें निर्भयपणें म्हणतां येईल, इतकी आत्मज्ञानाविषयींची तळमळ

त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं दिसून येते 'सुंदर मी होणार' या कवितेंत तर तळमळीचें पर्यवसान दृढविश्वसांत झालें आहे. व आनंदीआनंद जाहला, तनुकांति होणार ॥ हो ॥ मरणाचा परमेश्वर मजवर, करुणाघन वळणार ॥ हो ॥ सुंदर मी होणार ॥

## मुरली वाचून सुचलेले विचार.

वाचुनी मुरली । मुरली गोविंदा । विसरलों मी सारा धंदा ।
वाचुनी मुरली । मुरली कविराया । वाटलें उदास जीवा या ।
जीव हा दीन । दिसे दैन्यवाणा । तोषवी तुझी काव्यवीणा ।
छेडिल्या तारा । तारा दातारा । शब्दसृष्टीच्या माहेरा ।
काव्य कोकिला । स्तविसी घननीळा । तुजवरी देव तुष्ट झाला ।
म्हणुनी धी दिधली । ही तुजला असली । सरस्वति जिव्हाग्रीं बसली ।
वाटतें मजला । ती वदते बोल । डोलतो सारा भूगोल ।
वाटते मजला । तुजला देवानें । धाडिलें येथे प्रेमानें ।
वाटतें मजला । तुझें काव्यकिरण । सुचवितें रविचें आगमन ।
आगमन होई । होई शुभकालीं । स्वागताची घाई झाली ।
स्तवूं कविराया । कविवर गोविंदा । सेवूं या तद्गानानंदा ।

आश्विन शु॥ ७ शके १८४५ } **आर. पी. चिंचगांवकर.** कविराय-मंडळ, सोलापूर.

# कै० गोविंद कवीस—

( चाल—पांखरा ! येशिल कां परतून ? )

गोविंदा ! मधु मुरली नादें निखिल राष्ट्र भारून राजसा !
जासी कां परतून ? ।
अभिनव भारति लहरि उसळति सुततेज उफळून राजसा !
जासी कां लोपून ? ।
स्वातंत्र्याची पहाट होतां अरुण तूंच विलसून राजसा !
जासि कुठें लोपून ? ।
एकाएकीं श्री अरुणा ! तूं हाय ! जासि वितळून ! राजसा ।
जासि कसा लोपून ? ।
काळ लोटतां भाग्य वाढतां ध्येयातें गाठून राजसा !
जासी सूर्य बनून ! ।
स्वातंत्र्याच्या अनंत गगनीं राही तूं विलसून राजसा !
ध्रुवतारा होऊन ! ।
त्वदीय तेज स्फूर्ति भारता राष्ट्रवृत्ति हलवून राजसा !
येऊं दे उसळून ! ।
फुलपांखरा । पंगु कोष हा सत्वर कीं सोडून राजसा !
जासी व्योमिं उडून [ ।
सीमेचीही सीमा सरली ! विहर मुदें नाचून राजसा !
विरम सुखें डोलून ।
डोलडोलुनी रंगरंगुनी जाउनिया गुंगून राजसा !
गा ईशा अळवून ! ।
श्री परमेश्वर प्रसन्न होइल सकल काम पुरवून राजसा !
तव गानें तोषून ! ।

वनवसंत—नासिक.

# स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांस

( वृत्त—शार्दूल विक्रीडित )

प्रारंभीं प्रणती अगा ! बुधवरा ! त्वत्पादपद्मांप्रती ।
तूझ्या सद्गुणगौरवीं अगतिका आहे मदीया मती ।
लोकीं दुम्‌दुमतो अहर्निश तुझा स्वातंत्र्यगीतस्वर ।
गोविंदा ! कविराजराजिमधला तूं श्रेष्ठ राजेश्वर ॥ १ ॥
हिंदू राजवटींतुनी दिनमणी अस्तास गेल्यावरी ।
तेजस्वी कवितारकांहिं अवघी संव्यापिली शर्वरी ।
तेथें शाहिर-हीरका ! चमकसी शुक्राचिया सानिभ ।
वाग्देवी-कवि-मौक्तिकावलिमध्यें तूं शोभसी कौस्तुभ ॥ २ ॥
पाश्चात्यांसम गाइ प्रेमकवनें कोणी स्वसारस्वतीं ।
तत्त्वोद्‌बोधिक वा निगूढ कविता कोणी रची संप्रती ।
गीतांनीं तुटक्याहि राष्ट्रिय कवी होई कुणी जाहिर ।
स्वातंत्र्योन्मुख तूंच भाससी महाराष्ट्रा खरा शाहिर ॥ ३ ॥
शौर्योत्पादिनि, देशभक्तिजननी, दौर्बल्य संहारिणी ।
गंगौघापरि दिव्य सोज्वल गिरा वाहे सुकाव्यांतुनी ।
तत्वांचे सुविशाल पादप तटीं वा कल्पनावल्लरी ।
ठायीं ठायिं फुलोनियां खगतती गताति त्यांचेवरी ॥ ४ ॥
त्वद्वाणी परदास्यदग्धहृदया स्वातंत्र्य संजीवनी ।
कारागारनिबद्ध शूर पुरुषा चैतन्यसंचारिणी ।
दु:खांनीं सतत प्रपीडित जना उत्साहसंभाविनी ।
देशोद्धारक धीरवीर तरुणा सामर्थ्यसंवर्धिनी ॥ ५ ॥
प्रात:कालिंच अर्चिती जन तुझ्या 'भूपाळिनें' शारदा ।
प्रेमें-काव्य-'वसंत' गाति, पठती जन्मोत्सवाच्या पदा ।

स्वध्येयाचरणा कुणीं झटतसे त्या ' राष्ट्रसंतापरी ।
मृत्यूतेंहि कुणीं ' प्रताप मुखिंची अभ्यर्थना ' या करी ॥ ६ ॥
गेहोंगेहिं जिजा शिवास अपुल्या ' अंगाइतें ' जोजवी ।
आर्यांच्या हृदयीं मनोज्ञ ' मुरली ' गोविंदही वाजवी ।
काव्यालंकृति ' प्रीतिचा विजवरा ' रामामुखीं हांसवी ।
विश्वा ' भारत भूप्रशस्ति ' जनता गावोनिया लाजवी ॥ ७ ॥
गोविंदा असता जरी उपजला दैवें स्वराज्यामधें ।
गाता बालकवृंद ' राजकविचीं ' ही राष्ट्रगीतें मुदें ।
संग्रामीं वदती मुखें कुणि युवा शत्रूप्रती कापितां ।
आनंदें स्मरुनी मनांत कुणि वा स्वप्राणही सोडितां ॥ ८ ॥
स्वातंत्र्यध्वज यद्यपी विधिबलें हो छिन्नविछिन्न हा ।
किंवा तत्पट जीर्ण दीर्ण शतधा झाला प्रवातें मही ।
ना पर्वा, असतील ठाऊक जरी गोविंद गीतें मना ।
श्वासोच्छ्वास असेल, देइल तरी धन्वंतरी जीवना ॥ ९ ॥
नांदे त्वद्वचनांत वीरहृदिंची तेजोमयी शूरता ।
दाटे पूततमा अकाम भगवद्भक्तींतली शुद्धता ।
खेळे स्वैर विलोल दिव्य प्रतिभा-बाला मुदा लीलया ।
हांसे कल्पकताऽप्सरा गगनिंची काव्यांत बा! तूझिया ॥१०॥
देशोद्धारक भावनांहि कविता संव्यापिलेली असे ।
स्वर्भूसंगम होउनी मधुरसीं संमोहिलेली दिसे ।
शब्दालंकृतिरूपकांहिं खचिता रम्यांगना कां गणूं ? ।
वाटे त्वत्कविता सुरेंद्रवनिचो वासंतिकश्री जणूं ॥११॥

रामाच्या मृदु कुंतलांतिल गुलाबाहूनि जी कोमला ।
कोठें खड्गलतेपरी तळपते तेजाळ ते चंचला ।
बालेच्या पदिंच्या सुनूपुरझणत्कारा कुठें तो करी ।
गंभीरांबुधिगर्जनोपमरवें कोठें दिगंता भरी ॥ १२ ॥
कालाबाधित जीं उदात्त कवनीं सत्यें तुवां गोविलीं ।
यावश्चंद्रदिवाकरौ अमरता केव्हांच तीं पावलीं ।
कित्येकां रुचलीं मुळीं न तरी ना तद्दोष किंचित् तुला ।
तत्त्वें सत्य सदा, परंतु जगतीं देशस्थिती चंचला ॥ १३ ॥
पंगुत्वें असमर्थ यत्न करण्या बा ! मातृभूमोचनीं ।
होता, यास्तव तूं नितांत झुरला चित्तांत रात्रंदिनीं ।
जन्मा येउनियां पुन्हां प्रियजनामाजीं तुझ्या सत्वरीं ।
वेगें कायिकवाचिकामितबलें या भारता उद्धरीं ॥ १४ ॥
जिव्हाग्रीं शिशुच्या तुझी कविवरा ! स्वातंत्र्यगीता वसो ! ।
वक्त्यांच्या वदनीं सदोदित तुझीं स्वातंत्र्यसूक्तें वसो ! ।
आर्यांच्या अवघ्या हताश हृदयीं त्वद्बोध वाणी ठसो ! ।
त्वद्ध्येया झणिं, साधण्यासि जनता चैतन्यशीला असो ! ॥ १५ ॥

**धों. त्र्यं. कोचरगांवकर**

बी. ए., वकील–नासिक ता. ७-३-१९२८.

—›◦‹—

लोकशिक्षण २–१९३०.

## स्वातंत्र्यशाहीर ‘ गोविंद ’ यांच्या स्मृतीस

चंडोला नव शक्ति तूं स्फुरविली स्वातंत्र्यतेजासवें ।
स्वत्वाची हृद्यास तूं पेटविली जाणीव लोकीं जवें ॥
विद्या तेथ नको नको सुखमयी लोकांतली थोरवी ।
येतां स्फूर्ति उचंबळोनि हृदयीं शक्तीहि येते नवी ॥
कोणी का तुजला अशिक्षित गणी विद्येविना संप्रति ।
विद्यावंत न ते सुखांत जगतीं दास्यामधें लोळती ॥
झाले पाय लुले करांत न परी शक्ती मुळीं राहिली ।
जीवाची तव शक्ति एकवटुनी वाचेंत संस्थापिली ॥
जे जे बोल तुझ्या मुखांत स्फुरले ते दिव्यता पावले ।
स्फूर्तीचा सुखसोहळा पुरविला त्यांतें न कांहीं तुले ॥
दुर्दैवें परदास्यदूषित अम्हां नये त्यांची कल्पना ।
दिव्यत्वांतुनि दावि सोज्वल तुझें सौंदर्य या लोचनां ॥
आशीर्वाद तुझाच येउनि फळा तीं बंधनें तोडुन ।
सौंदर्यें विलसो नवोदित तुझें तें रूप रात्रंदिन ॥

—अविनाशचंद्र.

REFBK 0004493

REFBK-0004493